श्रीरामायण महाकाव्य,

वनविहार.

साधुदास.

दक्षिणाप्राइझ कमेटीनें बक्षिस दिलेलें.

श्रीराम समर्थ.

दत्तात्रेय रामचंद्र गदगकर उर्फ
गोपाळ गोविंद मुजुमदार उर्फ
साधुदासकविविरचित

श्रीरामायण महाकाव्यांतर्गत

वनविहार

अर्थनिर्णायक भरपूर टीपांसह.

पुणें येथें " **आर्यभूषण** " छापखान्यांत **नटेश अप्पाजी द्रविड** यांनीं छापिलें

व

सांगली येथें **गोपाळ गोविंद मुजुमदार** यांनीं प्रसिद्ध केलें.

सन १९१४ इसवी.

कि. रु. १

कवीचे प्रास्ताविक चार शब्द.

चार वर्षांपूर्वीं रघुवंश वाचीत असतां आपणही मराठींत तसलें एखादें महाकाव्य करावें असें मनांत येऊन मी त्या उद्योगास लागलों. पण हिमालय पर्वतावर चालणाऱ्या मुंगीच्या मनांत हिमालयासारखा पर्वत निर्माण करण्याचा विचार येणें व माझ्या मनांत रघुवंशासारखें महाकाव्य करण्याचा विचार येणें या दोन्ही गोष्टी जवळजवळ सारख्याच होत असें हळूंहळूं माझ्या अनुभवास येऊं लागलें. शेवटीं एकदांचें दीड वर्षानें काव्य पुरें झालें. नंतर मी तें महाराष्ट्रांतील कांहीं विद्वान् व रसिक मंडळीकडे पाठवून त्यांच्या सूचना मागविल्या. त्या सूचना येण्यास वर्ष दीडवर्ष लागलें. पुढें त्या बहुमोल सूचना आल्यावर त्यांबरहुकूम काव्यांत दुरुस्त्या करून मी आज तें वाचकवर्गापुढें ठेवीत आहें.

रामप्रभूंच्या लीला विषयाकरितां मिळाल्या, महाकवि वाल्मीकींनीं कथासूत्राचा पुरवठा केला, माघ—कालिदास—ज्ञानेश्वरादिकांनीं कल्पना दिल्या, मोठमोठ्या विद्वानांनीं शुद्धीचे संस्कार केले, आणि आर्यभूषण छापखान्याच्या मालकांनीं बाह्यांग नटविलें. या सर्वांचा मी कमी अधिक प्रमाणानें ऋणी आहें, पण इतक्यांतून एकानेंही मला जातिवंत महाकवीची प्रतिभा न दिल्यामुळें या बाबतींत मात्र मी कोणाचाही ऋणी नाहीं ! या मोठ्या व्यंगामुळें वाचकवृंद या काव्याच्या वाचनांत ‘ वनविहारा ’ च सुख अनुभवितील कीं वनवासाचे कष्टच भोगतील याची कांहीं कल्पना होत नाहीं ! पण अज्ञ बालकानें महाराष्ट्रभाषाजननीची मनःपूर्वक केलेली सेवा म्हणून या माझ्या कृतीला तिचे जाणते पुत्र गोड करून घेतील अशी मला पूर्ण आशा आहे.

सांगली,
ता. १६।८।१४ इ.

आपला नम्र,
साधुदास.

अनुक्रमणिका.

श्रीरामायण महाकाव्य.

वनविहार.

सर्ग १ ला.

सद्रूपसारा! अघ-सार-पावका! चिद्बोधमेघा! खल-मेघ-मारुता! ॥
आनंदकंदा! कलि-कंद-कंदना! श्रीरामचंद्रा तुजला नमूं अतां ॥ १ ॥

काव्यारंभ करण्याच्या कवींच्या तीन पद्धति आहेत. आशीर्वाद, प्रिय देवतेला नमस्कार व वस्तुनिर्देश. यांपैकीं दुसऱ्या पद्धतीनें या काव्यास प्रारंभ झाला आहे.

सत् म्ह० शाश्वत आहे रूप ज्याचें तो सद्रूप. सद्रूप असा जो सार (सारभूत वस्तु) तो **सद्रूपसार**, निर्गुण परमात्मा असा अर्थ. **अघसारपावका**; अघ म्ह० संकटें त्यांचें सार म्ह० जीवन त्याचा पावक म्ह० अग्नि, विघ्नहर्त्या असा अर्थ. स्वतः सार असून दुसऱ्या साराचा नाश करितो असा विरोध. **चिद्बोधमेघा**; चित् म्ह० ज्ञान त्याचा बोध (शिक्षण), त्याच्या मेघा, ज्ञानवृष्टि करणाऱ्या, असा अर्थ. **खलमेघमारुता**; खल म्ह० दुर्जन हेच मेघ, त्यांच्या मारुता–दुर्जनांचा नाश करणाऱ्या वायो, असा अर्थ. स्वतः मेघ असून दुसऱ्या मेघांचा नाश करणारा असा विरोध. **आनंदकंदा**; आनंदाच्या मूळबीजा. **कलिकंदकंदना**; कलीचा कंद (गड्डा) त्याच्या कंदना, कलीला समूळ नाहींसा करणाऱ्या. स्वतः कंद असून दुसरा कंद उपडून काढणारा असा विरोध. अशा श्रीरामचंद्रा, तुला (मी) आतां नमस्कार करितों. या श्लोकाच्या एका पादांत सत्, दुसऱ्यांत चित्, तिसऱ्यांत आनंद व चवथ्यांत श्री असे मंगलसूचक शब्द आले आहेत, त्यांवरून रामाचें सच्चिदानंदस्वरूप दर्शविलें आहे. विशेषणांतल्या विरोधांनीं विरोधाभास अलंकार व रामावरच्या रूपकांनीं रूपकालंकार झाला आहे. या सर्गांत सर्वत्र **इंद्रवंशा** वृत्त आहे.

हेंच नमन रामास पोंचविण्यास आलेले पौरजन आपल्या मुखांनीं रामास करीत आहेत असें समजावें. पौरपक्षीं अर्थ. **सद्रूपसारा**; चांगलें आहे रूपसर्वस्व ज्याचें अशा. **अघसारपावका**; पापजलाला आटविणाऱ्या अग्ने! (यावरून रामाच्या यौवराज्यांत पाप होत नसे असा पौरांचा आशय). **चिद्बोधमेघा**; आत्मज्ञानाचा वर्षाव करणाऱ्या मेघा. (यावरून रामाच्या यौवराज्यांत आत्मज्ञानाकडे विशेष लक्ष्य दिलें जात होतें

असा आशय). **खलमेघमारुता**; दुर्जनरूपी मेघांचा नाश करणाऱ्या वायो ! (खलांत दुष्ट शत्रूंचाही अंतर्भाव होतो, यावरून रामराज्यांत सेनेची तयारी जय्यत असे असें सुचविलें). **आनंदकंदा** या पदावरून रामाचें यौवराज्य आनंददायक होतें असा अभिप्राय. **कलिकंदकंदना**; कलहाचें बीज नष्ट करणाऱ्या. (यावरून रामराज्यांत तंटे व गुन्हे होत नसत असा आशय) अशा श्रीरामा ! तुला (आम्ही) आतां नमस्कार करितों.

ऐशापरी, जो विपिनास चालला त्या राघवाच्या चरणद्वयाप्रति ॥
साकेत–पौरीं बहुवार अर्पिल्या दुःख–प्रकर्षें निबिडा नमस्कृती ॥ २ ॥

साकेतपौरीं; साकेत म्ह० अयोध्या तेथल्या पौरांनीं. **दुःखप्रकर्षें निबिडा**; दुःखाचा अतिरेक झाल्यामुळें घट्ट अशा (नमस्कृति). त्यांचीं अंतःकरणें दुःखानें अगदीं करपून गेल्यामुळें त्यांनीं रामाचे पाय अगदीं घट्ट धरले. अंतःकरणाला ज्या मानानें पीळ पडतो त्या मानानें भक्तीकडे प्रवृत्ति होते असा भाव.

बाष्पाऽर्द्र–नेत्रें न शिरेंचि केवलें त्यांचीं तदा तीं लवलीं महीतलीं ॥
शोकें तदीयें परि सर्व इंद्रियें तैशींच चित्तें करपूनि लोळलीं ॥ ३ ॥

बाष्पार्द्रनेत्रें; बाष्प म्ह० अश्रु त्यांनीं आर्द्र म्ह० ओले आहेत डोळे ज्यांचे अशीं (शिरें). **शोकें......लोळलीं**; त्यांचीं मस्तकेंच तेवढीं वांकलीं असें नाहीं तर बाकीचीं इंद्रियें आणि मनेंही दुःखानें करपून जाऊन पृथ्वीवर लोळूं लागलीं.

त्यां सिंचिता स्नेह–कटाक्ष–जीवनें आरामलाभार्थ निजांघ्रि–संश्रितां ॥
श्रीराम तेव्हां क्षणमात्र शोभला आनील मेघापरि वर्षणोद्यता ॥ ४ ॥

सिंचिता; सिंचन करणारा (श्रीराम). **स्नेहकटाक्षजीवनें**; प्रेमपूर्ण कटाक्षरूपी पाण्यानें. (सं० जीवय् ह्म० जगविणें–पासून, जीवन ह्म० जगविणारें अर्थात् पाणी). **आराम ... ... संश्रितां**; सुख मिळावें या हेतूनें आपल्या पायांवर पडलेल्या (अशा त्यांना). **वर्षणोद्यता**; वृष्टि करण्यास सज्ज झालेल्या (मेघाप्रमाणें शोभला).उपमालंकार.

जे भूतळीं लोळण घेत राहिले आधार झाला सगळ्या जनां तयां ॥
हस्त प्रभूचा, धरणींत पेरिल्यां बीजां रवीचा करसा उठावया ॥ ५ ॥

धरणींत......उठावया; पृथ्वींत पेरलेल्या बीजांना सूर्यकिरण ज्याप्रमाणें फुटून वर येण्याला आधार होतो (त्याप्रमाणें भूमीवर लोळणाऱ्या त्या पौरांना रामाचा हात उठण्यास आधार झाला; रामानें हात देऊन त्यांना उठविलें असा अर्थ). उपमालंकार.

पौरीं पुर–द्वार–पथांत वेष्टिला तो आसमंतीं धृततापसाकृति ॥
तेव्हां स्वतेजोतिशयें विराजला नक्षत्रपुंजांत जसा निशापति ॥ ६ ॥

पुरद्वारपथांत; नगराच्या वेशीच्या मार्गांत. **धृततापसाकृति**; धारण केला आहे तपस्विवेष ज्यानें तो (राम). उपमालंकार.

राज्याभिषेकास्तव देशिदेशिचे सामंत साकेतपुरीस पातले ॥
ते तेधवां काननसंश्रयोन्मुखा रामासवें होउनि खिन्न चालले ॥ ७ ॥

सामंत; मांडलिक राजे. **काननसंश्रयोन्मुखा**; वनांत जाण्यास निघालेल्या.

हस्तांत कोदंड, पदांत पादुका, स्कंधासि तूणीर, शिरीं जटावली, ॥
कासेस वल्कांबर, मूर्ति राघवी ऐशापरी ती विपिनास चालली ॥ ८ ।

वल्कांबर; वल्क म्ह० झाडांची साल, तिचीं वस्त्रें म्ह० वल्कलें. स्वभावोक्ति अलंकार.

जो शैशवापासुनि रामसेवनीं मानूनियां जन्म कृतार्थ राहिला ॥
रामापरी घेउनि वेष साधु तो सौमित्रिही मागुनि मंद चालला ॥ ९ ॥
सीता अलंकार न एकही जिच्या अंगीं तरी रूप-विकास-शोभिनी ॥
त्यामागुनी लज्जित मंदशा पदें चाले पतीचा वनमार्ग लक्षुनी ॥ १० ॥

रूपविकासशोभिनी; स्वाभाविक सौंदर्याच्या विकासानें शोभणारी.

अभ्यंतरीं क्षुब्धहि शांत दर्शनीं, प्रक्षुब्ध बाहेरुनि तेंवि अंतरीं, ॥
ऐशापरी भिन्न विकार भाविती ते बंधु दोघे क्षितिसागरांपरी ॥ ११ ॥

अभ्यंतरीं; हृदयांत. **भाविती**; अनुभविते झाले. (भू असणें प्रयो० भावय् म्ह० अस्तित्वांत आणणें, अनुभविणें). हृदयांतून क्षुब्ध झालेला पण दिसायला शांत असा (राम), आणि अंतःकरणांतही क्षुब्ध व बाहेरूनही क्षुब्ध असा (लक्ष्मण), पृथ्वी आणि समुद्रांप्रमाणें वेगवेगळे विकार अनुभविते झाले. पृथ्वीच्या पोटांत नाना प्रकारची खळबळ सुरू असते, पण दिसायला ती अगदीं शांत असते; तिच्याप्रमाणें रामांनीं आपलें दुःख गिळून टाकून वृत्ति अगदीं शांत ठेविली होती. पण समुद्राच्या पोटांत वडवाग्नि पेटलेला असतो व बाहेरूनही त्याच्यावर तुफानें वगैरे होत असतात; तशी लक्ष्मणाची स्थिति होती. त्याला आपल्या मनांतील खळबळ झांकतां आली नाहीं. उपमालंकार.

श्रीराम-सौमित्रि-धरात्मजामिषें वाटे निघालें जणुं पट्टणांतुनी ॥
धर्माऽर्थ-मुक्ति-त्रय एकदांच तें साकेतवासास विरक्त होउनी ॥ १२ ॥

एकदांच; एकदम. **श्रीराम.....होउनी**; रामाच्या मिषानें धर्म, लक्ष्मणाच्या मिषानें अर्थ व सीतेच्या मिषानें मुक्ति हीं जणूं काय अयोध्येंत राहण्यास कंटाळून एकदम बाहेर पडलीं. रूपकाश्रित उत्प्रेक्षा.

जे पोंचवाया जन त्यांस पातले वेशींतुनी दुर्लभ मार्ग काढुनी ॥
त्यां जाववेना परतोनि मागुती येती पुढें सर्व अपाप चालुनी ॥ १३ ॥

दुर्लभ; (गर्दीमुळें) मिळण्यास कठिण. **अपाप**; आपोआप.

शय्येवरी टाकुनि रुग्ण बालका माता कुणी त्या जनतेंत पातली ॥
तैसीच चाले पुढती, मनें तिच्या मागें जरी संतत धांव घेतली ॥ १४ ॥

रुग्ण; आजारी. **जनता**; लोकसमूह. **तैसीच......घेतली**; तिचें मन जरी एक-सारखी मागें धांव घेत होतें तरी ती पुढें पुढेंच चालली होती.

श्वश्रूगृहातें स्वसुतेस धाडुनी रामा दुजी सत्वर तेथ धांवली ॥
कन्यावियोगोद्भव दुःख ती नवें सीतावियोगीं विसरोनि राहिली ॥१५॥

श्वश्रूगृहातें; सासूच्या घराला. **कन्यावियोगोद्भव ...... राहिली**; आपल्या मुलीच्या वियोगाचें जें दुःख तिला नुकतेंच झालें होतें तें ती, सीतेच्या होणाऱ्या वियोगांत पार विसरून गेली.

कोणी वधू स्नानविधी त्यजूनियां आर्द्रांबरा येत तशीच संभ्रमें ॥
द्वारांत होतां मग सावधान ती तेथेंचि कर्तव्यविमोहिता भ्रमे ॥ १६ ॥

आर्द्रांबरा; ओलें आहे वस्त्र जिचें अशी. **संभ्रमें**; गडबडीनें, धांदलीनें. एक स्त्री स्नान करीत असतां राम निघाल्याची बातमी तिला कळली, त्याबरोबर ती गडबडीनें स्नान टाकून तशीच ओलेत्यानें निघाली; पण दारांत तिला आपण ओलेत्यानें निघालों आहोंत याची आठवण झाली, तेव्हां ती काय करावें अशा बुचकळ्यांत पडली. तसेंच जावें तर लोकलज्जेची भीति, कोरडें वस्त्र नेसून जावें तर उशीर होऊन राम पुढें जातील, अशा पेंचांत सांपडून ती दारांतच घुटमळत राहिली.

नारी दुजी दुर्वह-गर्भ-पीडिता देखावया राम अधीर लोचनें ॥
धांवे, पुढें चालतसे, जडें पदें कंठीं पथा, होय उभी, निघे मनें ॥ १७ ॥

दुर्वहगर्भपीडिता; वाहण्यास कठिण झालेला असा गर्भ धारण करणारी, अवघड-लेली. **धांवे......मनें**; प्रथम ती धांवूं लागली, तें निभेना तेव्हां मग चालूं लागली, तें निभेना–पाय भरून आले–तेव्हां जड पावलांनीं कशी तरी निघाली, तेंही निभेना तेव्हां उभी राहिली; परंतु शेवटीं इतर लोक व राम पुढें निघाले हें पाहून ती त्यांच्याबरोबर मनानेंच निघाली, असा भाव.

आहार द्यायास्तव पिंजऱ्यांतल्या कीरास रंभाफल एक सोललें ॥
एका वधूनें सदनीं, करांत तें येतां पुरींतून तसेंच राहिलें ॥ १८ ॥

कीरास; पोपटाला. **रंभाफल**, केळें.

सस्नेह माता, सकुतूहला सुता, मातामही विस्मित, विक्लवा वधू ॥
सोडूनियां स्वव्यवसाय पातल्या देखावया तो गुण-कौमुदी-विधु ॥ १९ ॥

सस्नेह; वात्सल्ययुक्त. **सकुतूहला**; कौतुकयुक्त. **विक्लवा**; भीतियुक्त. **गुण-कौमुदीविधु**; गुणरूपी चांदण्यानें प्रकाशणारा चंद्र (राम).

त्या वेळीं ज्यांना मुलें होतीं अशा स्त्रिया, अर्थात् प्रौढ स्त्रिया रामाविषयीं वात्सल्य धरून आल्या. मुली अज्ञान असल्यामुळें त्या नुसती मौज पाहण्याकरितां आल्या. मातामही ह्म० वृद्ध स्त्रिया, (आपल्या आठवणींत राजघराण्यांत न झालेली गोष्ट कशी झाली) असें आश्चर्य करीत आल्या, व वधू ह्म० तरुणी रामाबरोबर आपले पति वनास जातील हें भय मानून आल्या असा भाव. परिकरालंकार.

खाद्यार्थ मातेजवळीं धरूनियां जो आग्रहातें चिरकाल बैसला ॥
तो कामना-पूरण-संधि सोडुनी अज्ञानही बाल तसाच पातला ॥ २० ॥

कामनापूरणसंधि; आपला इच्छित पदार्थ खाण्यास मिळण्याची संधि.

जो अंध पंगु व्यथितांग वार्धकें चालावयातें असमर्थ जाहला ॥
ऐसाहि यष्टीवर भार टाकुनी त्या पौरलोकांतुनि वृद्ध चालला ॥ २१ ॥

भार टाकुनी, देहाचें वजन टाकून, (पक्षीं) हवाला टाकून.

कर्मी कुणी आन्हिक कर्म टाकुनी रामा पहायास्तव तेथ धांवला ॥
एकांतलब्धाधरपान सोडुनी कामी युवा एक सखेद पातला ॥ २२ ॥

कर्मी; कर्मनिष्ठ ब्राह्मण. **एकांत ... ... पातला**; एका कामी तरुणाला एकांतांत प्रियेच्या अधरपानाची संधि सांपडली होती, ती दवडून तो निघाला. पण जातांना ती संधि गेल्याबद्दल त्याला खेद होत होता.

वाणिज्यकर्मैं त्यजुनी वणिग्जन सामान्य लोकांसह धांवती स्वयें ॥
त्या संभ्रमीं सर्व पुरीं अनर्गलें राहून गेलीं सधनें तदालयें ॥ २३ ॥

वाणिज्यकर्मैं; व्यापारासंबंधीं कामें. **वणिग्जन**; व्यापारी. **अनर्गलें**; ज्यांना अर्गला नाहींत अशीं, उघडीं.

विख्यात वक्ते, भट धीर, सन्मुनी, मंत्री महापंडित राजकारणी ॥
सारेहि एकत्र मिळूनि तेधवां उद्युक्त झाले जनतानुधावनीं ॥ २४ ॥

भट; योद्धे. **सन्मुनी**; मोठे ऋषि. **जनतानुधावनीं**; लोकांमागून धांवण्यांत.

ते भिन्नवर्णाकृति पौर तेथले भिन्नेप्सिताचारविचारही जरी ॥
रामानुरागें परिबद्ध होउनी आले तयामागुनि काननोदरीं ॥ २५ ॥

भिन्नवर्णाकृति; भिन्न आहेत जाति व वेष ज्यांचे असे. **भिन्नेप्सिताचार-विचार**; भिन्न आहेत इच्छित हेतु, आचार व विचार ज्यांचे असे.

जैशा दशा चारहि जीवजीवितीं सामावती, चार युगांत जीवितें, ॥
चारी युगें वा प्रलयीं, मिळे तया संघीं तदा वर्ण-चतुष्क तेंवि तें ॥२६॥

जीवजीवितीं; जीवाच्या आयुष्यांत. **सामावती**; मावतात, असतात. **वर्ण-चतुष्क**; चार वर्ण (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र). ज्याप्रमाणें प्रत्येक प्राण्याच्या

आयुष्यांत बाल्य, कौमार, यौवन व जरा अशा चार दशा असतात, ज्याप्रमाणें प्रत्येक युगांत अंडज, जारज, स्वेदज व उद्भिज्ज असे चार प्रकारचे प्राणी असतात, ज्याप्रमाणें प्रत्येक प्रलयांत कृत, त्रेत, द्वापर व कलि अशीं चार युगें असतात, त्याप्रमाणें त्या लोकसमुदायांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चारी वर्ण होते. एकावलीमिश्र मालोपमा अलंकार.

सारी पुरी किंबहुना तयांसवें आली, मुमूर्षु क्षितिपाल जाहला ॥
तो एक, भार्याद्वय, राजसद्गुरू, हा शेष तेव्हां नगरांत राहिला ॥ २७ ॥

मुमूर्षु; मरायास टेंकलेला. **भार्याद्वय**; दोन बायका (कौसल्या व सुमित्रा). **राजसद्गुरु**; राजगुरु वसिष्ठ ऋषि.

ते सर्व दुःखाकुल पौर चालतां त्यांमागुनी केकयराजकन्यका ॥
चोरून मंदस्मितयुक्त चालली पाहून लोकार्ति करीत कौतुका ॥ २८ ॥

केकयराजकन्यका; केकयराजाची कन्या, कैकेयी. **लोकार्ति**; लोकांचें दुःख.

तीच्या मनोरूप नगांत जन्मुनी जी रामसिंधूंत समूळ लोपली ॥
बाष्पापगा संतत-वाहिनी अशी ती पौरनेत्रांतुनि दृश्य जाहली ॥ २९ ॥

बाष्पापगा; अश्रूंची नदी. **संततवाहिनी**; अखंडित वाहणारी.

त्या कैकेयीच्या हृदयरूपी पर्वतांत जी उगम पावली व लोकांचे नेत्र या पात्रांतून जी व्यक्त झाली अशी अश्रूंची नदी त्या ठिकाणीं अखंड वाहून रामरूपी समुद्रांत गडप झाली. सर्वांच्या मागें सर्व दुःखाचें कारण अशी कैकेयी होती, तिच्यापुढें लोकसमूह रडत चालला होता, व त्यांच्यापुढें सर्व दुःख गिळून राम चालले होते असा भाव. रूपकालंकार.

ती धन्यता मानुनि अश्रुदर्शनीं त्यांच्या निघाली अतिहर्षितें मनें ॥
दुष्टांस नोहे सुख आपुल्या सुखें होतें परी तें परदुःखदर्शनें ॥ ३० ॥

दुष्टांस.....दर्शनें; दुष्टांचें सुख स्वतःच्या सुखांत असत नाहीं, तर दुसऱ्यांच्या दुःखांत असतें. अर्थांतरन्यास.

त्यां थांबवोनी मग दुःखभाजनां मार्गीं स्वपौरां प्रभु गद्गद स्वरें ॥
जोडूनि हस्तां वदता वचें अशीं झाला निज-स्नेह-सुधा-मनोहरें ॥ ३१ ॥

दुःखभाजनां; दुःखास पात्र झालेल्या (स्वपौरां). **गद्गदस्वरें**; अडखळणाऱ्या स्वरानें. **निज०......मनोहरें**; आपल्या वात्सल्यरूपी अमृतानें मोहक अशीं (वचें).

हे मित्रहो ! शोक किमर्थ एवढा कां दुःख वाटे मम दुर्गसेवनीं ॥
प्रारब्ध भोगाविण काय सोडितें चित्तीं पहा आपण हें विचारुनी ॥३२॥

दुर्गसेवनीं; वनवासास जाण्यांत. **विचारुनी**; विचार करून.

भग्नप्रतिज्ञा जनकास रौरवीं टाकूनि, मी राज्यपदास भोगितां ॥
तुम्हां बुधां तें अतिनिंद्य वाटतें, होती न तातांस सुतोपयोगिता ॥ ३३ ॥

भग्नप्रतिज्ञा; ज्याची प्रतिज्ञा मोडली आहे अशा. **होती......सुतोपयोगिता**; बाबांना मुलांचा उपयोग झाला नसता.

जावोत सारीं मम राज्यवैभवें, साम्राज्य माझें तुमच्या मनांवरी ॥
जों चालतें तोंवरि चक्रवर्तिता माझी न नाशे फिरतां वनोदरीं ॥ ३४ ॥

चक्रवर्तिता; सार्वभौमपणा. **नाशे**; नाश पावेल.

भेदा न रामाभरतांत वागवा, एकासु दोघे, तनु मात्र वेगळी ॥
तो जोंवरी राज्य करील पत्तनीं माझी स्मृती ताप न दे तुम्हांमुळीं ॥३५॥

भेदा......वेगळी; माझ्यांत व भरतांत भेद बाळगूं नका, आमचे दोघांचे प्राण एकच आहेत, देह तेवढे वेगळे आहेत.

अज्ञान तो बाल अजूनि धाकुटा नाहीं तयातें नृपनीति ठाउकी ॥
प्रेमें तया सर्वहि वागवा तुम्ही, राजासि राजत्व मिळे प्रजामुखीं ॥३६॥

राजासि......प्रजामुखीं; राजाला नुसत्या अधिकारानें राजत्व येत नाहीं तर तें प्रजांच्या मुखानें येतें. अर्थांतरन्यास.

मी यौवराज्यीं असतां प्रमाद जे केले मदानें असती सहस्रशा ॥
ते साहुनी घ्या ह्मणुनी क्षमार्णवां यांचा कराया नलगे भवादृशां ॥३७॥

क्षमार्णवां भवादृशां; क्षमेचे समुद्र अशा तुम्हांसारख्यांना.

आतां असो लोभ असाचि सर्वदा ही भेटही शेवटचीच भासते ॥
कालोदरीं दर्शनयोग येथुनी येईल केव्हां पुढतीं कळे न तें ॥ ३८ ॥
झाले कृती तात निजोक्तिपालनें, मी जाहलों तात-निदेश-पालनें ॥
भूपाल आतां भरतास मानुनी तुह्मींहि कर्तव्य असेंच पाळणें ॥ ३९ ॥

बाबांचे (दशरथाचे) शब्द खरे झाले म्हणून ते धन्य झाले, मी त्यांची आज्ञा पाळल्यामुळें धन्य झालों, (आतां) तुह्मीही भरताला राजा मानून आपलें कर्तव्य पाळा.

लागा सुखानें नगरा चलावया, वागा स्वधर्मावरि दृष्टि ठेवुनी ॥
जें प्रेम माझ्यावरि दाविलें, स्मृती राहे तयाची चिरकाल मन्मनीं ॥४०॥
बोलूनियां वत्सल शब्द राम हे पौरांस एक क्षण जों विरामला ॥
सर्वत्र तों गद्गद-रोदन-च्छलें तद्भाषणाचा प्रतिनाद जाहला ॥ ४१ ॥

गद्गदरोदनच्छलें; ओक्साबोक्शीं रडण्याच्या मिषानें. **सर्वत्र ...... जाहला**; सर्व लोकसमूहांतून रडण्याच्या रूपानें त्याच्या भाषणाचा प्रतिध्वनि उठला. उत्प्रेक्षा.

भिन्नांतरंगां मनुजास तेधवां लाधे अवस्था सकलांस सारखी ॥
गंगांबु, मेघांबु, सुधा, सुराहि वा क्षारत्व पावे सम सागरोदकीं ॥ ४२ ॥

भिन्नांतरंगां; भिन्न मनांच्या. **गंगांबु......सागरोदकीं**; गंगेचें पाणी, मेघांचें पाणी, अमृत अथवा मद्य, समुद्रांत पडल्यावर सारखींच खारट होतात. दृष्टांत.

ते लोळुनी रामपदीं पुनःपुन्हा दुःखें निघाले परतूनि पत्तना ॥
रामास सोडून पुरीस चालतां झाल्या तयांतें अनिवार यातना ॥ ४३ ॥
श्रीराघवी मूर्ति नितांतसुंदरा ते चालतांना मुरडोनि पाहती ॥
त्यां हस्तसंकेत करूनि जावया तेव्हां गृहांतें सुचवी महामति ॥ ४४ ॥

हस्तसंकेत करूनि; हातानें खुणावून. **महामति**; थोरबुद्धीचा (राम).

पाळावया रामनिदेश सर्वथा, न स्वप्रवृत्तीवरि लोभ ठेवुनी ॥
तो पौरसंमर्द समस्त तेधवां गेला पुरीतें शतभिन्न होउनी ॥ ४५ ॥

प्रवृत्ति; व्यवसाय. **पाळावया......होउनी**; निवळ रामाची आज्ञा पाळावी म्हणूनच,–आपल्या नित्य व्यवसायांच्या लोभानें नव्हे,–ते लोक शंभर वेगळ्या टोळ्यांनीं नगरास परत गेले.

सामंतही सर्व वनप्रवासिया रामास गेले सविषाद सोडुनी ॥
अस्तास जाया सजल्या विधु स्वयें जाती ग्रह म्लान पुढें न मागुनी ॥४६॥

सविषाद; खेदपूर्वक. **अस्तास......मागुनी**; चंद्र अस्तास निघाला म्हणजे इतर म्लान झालेले ग्रह (त्याचें दुःख न पाहावें म्हणून) त्याच्या आधीं आपण मावळतात, मागाहून मावळत नाहींत. दृष्टांत अलंकार.

संसारबंधां सकलां त्यजूनियां एकांतवासा निघतो जसा मुनि ॥
श्रीरामही राजपदास सोडुनी तैसा निघाला वनमार्ग लक्षुनी ॥ ४७ ॥

संसारबंधां; संसाराचे पाश. उपमा.

तातोक्तिला सार्थ जगीं करावया, भक्तांस पायांजवळीं धरावया ॥
लोकां स्वचारित्र्यविलास दाउनी नीतिध्वजा उज्वल उंचवावया ॥ ४८ ॥
दुष्टां, अभक्तां, कुटिलां वधावया, ब्रह्मांड सारें स्वयशें भरावया ॥
मूढां भवाब्धींतुनि उद्धरावया, रामाभिधागौरव वाढवावया ॥ ४९ ॥
युद्धीं जयश्रीनवरी वरावया, भूभार जो फार तया हरावया ॥
सोडूनियां राज्य वनास चालला तो लोककल्याण विभू करावया ॥५०॥

तातोक्तिला......करावया; बापाचे शब्द जगांत खरे करून दाखविण्याकरितां. **स्वचारित्र्यविलास**; आपल्या चरित्राची लीला. **रामाभिधागौरव**; रामनामाचें माहात्म्य. **विभू**; प्रभू.

तो पाहुणा राजस पक्षिमंडळीं सत्कारिला मंजुल केलि-गायनीं, ॥
छायाद्रुमीं तोषविला निजाश्रयीं, वल्लीकुलें पुष्पमयीं उपायनीं ॥ ५१ ॥

राजस पाहुणा; राजवंशी पाहुणा. **छायाद्रुमीं**; दाट सांवलीच्या वृक्षांनीं. **उपायनीं**; नजराण्यांनीं.

झालीं प्रसन्नें सगळीं दिशामुखें, वारेहि सौगंध्यपरीत वाहती ।
त्या आत्मकार्यार्थ वनागता बुधा व्योमीं विमानांतुनि देव पाहती ॥ ५२ ॥

सौगंध्यपरीत; सुगंधयुक्त. **आत्मकार्यार्थ वनागता**; आपल्या कामाकरितां, (आपणांस रावणाच्या बंदिवासांतून सोडविण्याकरितां) वनांत आलेल्या (बुधा).

त्याच्या पथीं पादतलां न भेदिते चिन्हांकितां कंटक जाहले मुळीं ॥
ते सर्व होते वनवाहि–मारुतें पूर्वींच नेले हरुनी दुजा स्थळीं ॥ ५३ ॥

चिन्हांकितां; रेखा, ध्वज, वज्र व छत्र या चिन्हांनीं युक्त अशा (पादतलां). **वनवाहि–मारुतें**; वनांत वाहणाऱ्या वायूनें.

व्हावें स्ववंशोज्वल--भूप--भूषणा पुष्पोपमा सौख्य वनांत चालतां ॥
ऐसा मनीं आणुनि हेतु काननीं मंदातपें होय रवि प्रकाशता ॥ ५४ ॥

स्ववंशोज्वल–भूप–भूषणा; आपल्या वंशांतील तेजस्वी राजरत्नाला (रामाला). **पुष्पोपमा**; फुलाप्रमाणें सुकुमार अशा. **मंदातपें ... ... प्रकाशता**; सूर्य मंद ऊन पाडूं लागला.

रामासवें जी धरि वर्णबंधुता सूर्यीं न विश्वासुनि ती घनावली ॥
झांकावया त्या निज बांधवा स्वयें झाली कृतार्था पसरोनि सांवली॥ ५५॥

वर्णबंधुता; सजातीयत्व, (पक्षीं) समान रंग असणें. राम सूर्याचा वंशज असल्यामुळें सूर्याला त्याची काळजी होती, म्हणून तो मंद ऊन पाडूं लागला. पण मेघांना त्याचा विश्वास वाटेना. तेही रामाचे वर्णबंधु होते. तेव्हां त्यांनीं सूर्याच्या उन्हापासून रामाचें रक्षण करावें म्हणून सूर्याच्या आड आपले देह आणून रामावर सांवली पाडली असा आशय.

जो पाहुणा आत्मगृहासि पातला त्याचा तनूदाह घडे घनांमुळें ॥
ऐसें मनीं आणुनि वृक्ष त्यावरी शीतातपत्रें स्वयमेव जाहले ॥ ५६ ॥

शीतातपत्रें; थंड अशीं छत्रें. (आतपात् त्रायते, उन्हापासून राखतें तें आतपत्र, छत्री). मेघांनीं रामावर सांवलीची तजवीज केली, पण त्यांचा विश्वास वृक्षांस लागेना. वृक्षांचा राम पाहुणा होता. त्यांनीं विचार केला कीं, हे मेघ रामाला उकाडा करितील म्हणून ते वृक्ष स्वतःच त्याच्या शरीरावर थंडगार अशीं छत्रें झाले, असा भाव.

जो देवकार्यार्थ महावनोदरीं संचार झाला करिता जगद्गुरू ॥
आहारदानार्थ तया स्थलीं स्थलीं कालीं अकालीं फलती वनीं तरू ॥५७॥

आहारदानार्थ; खावयास देण्याकरितां. **फलती**; फळें देते झाले.

त्या काननीं हिंस्रमृगोपपूरितीं पावे न भीति क्षणमात्र जानकी ॥
तीतें भवघ्न प्रभुचेंच लाधलें होतें भयध्वंसक संनिधान कीं ॥ ५८ ॥

हिंस्रमृगोपपूरितीं; हिंस्र पशूंनीं भरलेल्या अशा (काननीं). **तीतें......कीं**; कारण तिला संसाराचा नाश करणाऱ्या भयहारक रामाचा समागम लाभला होता. जो भवभीति नाहींशी करितो तो वनपशूंची भीति सहज नाहींशी करील, असा भाव. काव्य लिंग अलंकार.

जी कोमला श्रांत पथांत होउनी राहे उभी म्लानमुखें पदीं पदीं ॥
तीतें दृढालिंगन राम देउनी पाजी स्वनेत्रेंदु-विलोक-कौमुदी ॥ ५९ ॥

पाजी......कौमुदी; आपल्या नेत्ररूपी चंद्राचे कटाक्ष हीच चंद्रिका तिला पाजता झाला, तिच्याकडे प्रेमानें पाहता झाला, असा भाव.

प्राणेश्वराच्या कर-लालनें अशा उल्हासली फारचि गौररोचना ॥
वर्षानिलानें कवटाळिलें जिला जाई करी ती बहुगंध-मोचना ॥ ६० ॥

गौररोचना; गौर (गोरी) आहे कांति जिची अशी (सीता). **वर्षानिलानें......मोचना** वर्षाऋतूंतल्या वायूचा स्पर्श झाल्यानें जाईची वेल अधिकच गंध टाकूं लागते. दृष्टांत.

झाला तिच्याही मृदु-पाणि-संगमें सारा प्रभूचा श्रम नष्ट तेधवां ॥
दोघांस अन्योन्य-तनू-समागमें उत्साह मार्गक्रमणासि ये नवा ॥ ६१ ॥

अन्योन्यतनूसमागमें; परस्परांच्या अंगस्पर्शानें.

त्या दंपतीच्या करुणावलोकनें सौमित्रि झाला श्रममुक्त तत्क्षणीं ॥
कीं सानुरागेक्षण हेंचि जाणत्या पुत्रास वाटे बहु लालनाहुनी ॥ ६२ ॥

कीं......लालनाहुनी, कारण जाणत्या मुलाला आईबापांचें (अर्थात् तत्तुल्यांचें) नुसतें प्रेमपूर्वक पाहणेंही लाड केल्यापेक्षां अधिक वाटतें. विकस्वर अलंकार.

नमन करुनी साकेतातें निशाचर-काल ते ।
पथिक यम-दिङ्-मार्गें झाले अनंतर चालते ॥

विमलसलिला स्नानालोकीं त्रिताप-विनाशिनी ।
प्रथम सरयू गंगा गेले पथांत विलंघुनी ॥ ६३ ॥

निशाचरकाल; राक्षसांचे काळ (राम लक्ष्मण). **यमदिङ्मार्गें**; दक्षिण दिशेनें. **स्नानालोकीं त्रितापविनाशिनी**; स्नानानें व दर्शनानें तापत्रयाचा नाश करणारी. हरिणीवृत्त.

झाला संध्यासमय विपिनीं तेथुनी चालतांना ।
आतां कोठें वसति करिजे चिंति हें रामराणा ॥
त्यांच्या झाली तंव गुहपुरी शृंगवेराभिधाना ।
द्वारोत्संग--प्रसृत--महिषा गोचरा लोचनांना ॥ ६४ ॥

गुहपुरी; गुहराजाचें गांव. **शृंगवेराभिधाना**; शृंगवेर नांवाची. **द्वारोत्संग-प्रसृतमहिषा**; जिच्या वेशींतून म्हशी, रेडे बाहेर पडले आहेत अशी. मदाक्रांता वृत्त.

आधीं प्रभूस बघतां भयभीत झाले ।
जे मागुनी कुतुक मानुनि शांत ठेले ॥
अत्यंत हर्ष धरुनी हृदयीं निदानीं ।
वार्ता गुहा कळविली पशु-रक्षकांनीं ॥ ६५ ॥

जे पशुरक्षक रामाला प्रथम पाहतांच (त्याचा वेष व हातांतले धनुष्यबाण पाहून) फारच भ्याले, नंतर (त्याची सौम्य मुद्रा पाहिल्यावर) जे अंमळ शांत होऊन उभे राहिले, त्यांना शेवटीं मोठा हर्ष वाटला व त्यांनीं ती बातमी गुहराजाला जाऊन कळविली. वसंततिलका वृत्त.

तो बालमित्र गुहभूपति राघवाचा ।
सामंतही परम सात्विक भक्त साचा ॥
येऊनि संनिध पदास सहर्ष लागे ।
स्वातिथ्य-सेवन-दया-लव-दान मागे ॥ ६६ ॥

स्वातिथ्य०......मागे; कृपा करून माझा पाहुणचार घ्या, अशी विनंति करता झाला.

कुपित मुनिवरांचा शापही वंद्य मानी ।
क्षितिवरि अवतारां घेत जो चापपाणि ॥
गृह-निकट-समेता त्यास भक्तें करावी ।
विनति मग न देवें ती कशी आदरावी ॥ ६७ ॥

जो धनुर्धारी राम रागावलेल्या ऋषींचा शापसुद्धां वंद्य मानून पृथ्वीवर अवतार घेतो, तो आयता घराजवळ आला असतां भक्तानें जर त्याला विनंति केली तर ती तो कशी मान्य करणार नाहीं ? अर्थात् मानील. काव्यार्थापत्ति अलंकार. मालिनी वृत्त.

जो राममूर्तिस समर्पुनि नित्य पूजा।
सेवी उपायनफलांस निषादराजा॥
येतां क्षुधार्त निजदैवत तें गृहातें।
आजि प्रसाद उरला न तया गुहातें॥ ६८॥

तो कोळ्यांचा राजा गुह नित्य रामाच्या मूर्तीची पूजा करी व त्या मूर्तीपुढें नैवेद्यास्तव ठेवलेलीं फळें स्वतः खात असे. पण आज त्याचें दैवत भुकेलें होऊन स्वतःच त्याच्या घरीं आलें होतें, त्यानें सगळीं फळें खाल्लीं. गुहाला शेष प्रसाद राहिला नाहीं, असा आशय.

सुवर्णी जो मंचीं ललित शयनाभ्यास पढला।
गुहागारीं सीतारमण तृणशेजे पहुडला॥
तयाच्या जों देवी निमिष चरणां होय चुरिती।
पथश्रांता निद्रा त्वरित तंव झालीच वरिती॥ ६९॥

सुवर्णी......पहुडला; ज्याला रोज सोन्याच्या मंचकावर लोळून संवय झाली होती तो राम आज गुहाच्या घरांत तृणशय्येवर निजला. **देवी**; सीता. **निमिष**; क्षणभर. शिखरिणी वृत्त.

सर्ग २ रा.

रात्रीतें क्रमुनि गुहालयीं सुखानें॥ भ्रात्याचें मुख निरखूनि कौतुकानें॥
घेवोनी निजसमवेत तो गुहाला॥ श्रीगंगा-तट-निकटा नृपाल आला॥ १॥

निजसमवेत;आपल्या बरोबर. **श्रीगंगातटानिकटा**; गंगेच्या तीरावर. प्रहर्षिणीवृत्त.

तो प्रातःसमय नितांतरम्य आधीं॥ गंगेचें शुचितम पात्र तें अनादि॥
दोघांच्या मिलितमनोहर श्रियेला॥ हेमंत प्रकटुनि पूर्ण साह्य झाला॥ २॥

नितांतरम्य; अत्यंत सुंदर. **दोघांच्या...झाला**; प्रातःकाल व गंगेचें पात्र या दोघांच्या मिश्र व मनोहर शोभेला हेमंतानें प्रकट होऊन साह्य आरंभिलें.

सूर्याशीं चिरसहकारिता धरोनी॥ पृथ्वीला कण-फल-शालिनी करोनी॥
हा ठेला जडचि तथापि पूर्वरूपें॥ कीं नोहे प्रकृति-विकार-कर्म सोपें॥ ३॥

सहकारिता; जोडीनें काम करणें, भागीदारी. **कणफलशालिनी**; धान्य आणि फळें यांनीं समृद्ध. **प्रकृतिविकारकर्म**; स्वभाव पालटण्याचें काम. या हेमंत ऋतूनें

सूर्याबरोबर भागिदारी पतकरून पृथ्वीला धान्य–फलांनीं समृद्ध केली. पण (इतकें करूनही) हा आपला पूर्वीप्रमाणें थंड राहिला तो राहिलाच, (त्याला सूर्याच्या सहवासानें त्याची चपलता, उष्णता वगैरे कोणचाही गुण लाभला नाहीं). कारण स्वभाव पालटण्याचें काम सोपें नाहीं. अर्थांतरन्यास.

किंवा हा ऋतुवर दृश्य-ताप-लोपें ॥ बाह्यांगें जरि नटला हिम-स्वरूपें ॥
संतापाकुल करि मानवांतराला ॥ श्रेष्ठांची विदित कुणां चरित्र-लीला ॥ ४ ॥

दृश्यतापलोपें; बाहेर दिसणारा ताप नाहींसा करून. हेमंत ऋतु जरी सूर्याचा ताप कमी करून थंडी पाडतो तरी तो लोकांच्या हृदयांत ताप उत्पन्न करतो (या ऋतूंत कमेच्छा प्रबल असते हें प्रसिद्धच आहे). तर थोरांची चरित्रलीला कोणाला कळली आहे ? अर्थात् कोणालाही नाहीं.

थोरांचीं विमल कुलें विपत्तिकालीं ॥ तैसीं तीं कुमुद-वनें विशीर्ण झालीं ॥
क्षुद्रांचा उदय महद्विनाश होतां ॥ धान्यांचा उपचय तेंवि होत आतां ॥ ५ ॥

कुमुदवनें; कमलांचीं वनें. **विशीर्ण**; उध्वस्त. **महद्विनाश**; थोर लोकांचा नाश. **उपचय**; समृद्धि.

सर्वत्र स्फुट कणसें, तुरेहि कांहीं ॥ पुष्पें वा मधुनि, मधूनि मंजरीही ॥
हीं कोठें सुरस फलें अशा सुलक्ष्मीं ॥ संपन्ना करित विहार सस्य-लक्ष्मी ॥ ६ ॥

सुलक्ष्मीं; चांगल्या लक्षणांनीं. **सस्यलक्ष्मी**; धान्यलक्ष्मी. **अशा ...... लक्ष्मी**; अशा प्रकारच्या चांगल्या लक्षणांनीं संपन्न अशी धान्यदेवता चोहींकडे विहार करते.

गावोनी वृषभ-मनो-विनोदकारी ॥ जी, गीतें सुखवि तयां बहुप्रकारीं ॥
ती शेतांतुनि जनता कृषीवलांची ॥ देवीचा सतत कृपाप्रसाद याची ॥ ७ ॥

वृषभमनोविनोदकारी; बैलांचीं मनें रमविणारीं. (शेतकरी लोक मोट जुंपली असतांना, नांगर चालला असतांना वगैरे वेळीं आपल्या बैलावरून गाणीं म्हणत असतात, हें प्रसिद्ध आहे). **जनता कृषीवलांची**; शेतकरी मंडळी. **देवीचा...याची**; त्या, धान्यलक्ष्मींचा नेहमीं कृपाप्रसाद मागतात.

ज्यापाशीं वसु, महिषी तशाच भूरि ॥ जो दंडें सतत निज–प्रजाऽधिकारी ॥
जो भोगी सुख निरुपाधि, निर्गतार्ति ॥ शेताचा कृषिक जुनाट चक्रवर्ती ॥ ८ ॥

वसु; बैल (पक्षीं धन). **महिषी**; म्हशी (पक्षीं राण्या). **निरुपाधि**; अखंडित- **निर्गतार्ति**; काळजीविरहित. ज्यापाशीं पुष्कळ वसु (बैल), महिषी (म्हशी) असतात व जो आपल्या प्रजांवर (जनावरांवर) दंडानें (काठीनें) अधिकार चालवितो, ज्याला

अखंडित व काळजीविरहित सुख मिळतें, असा हा शेतकरी शेताचा जुनाट चक्रवर्ती आहे. कारण राजाजवळ झालें तरी याच गोष्टी असतात. राजाजवळ पुष्कळ वसु (धन) असतें, त्याला पुष्कळ महिषी (राण्या) असतात व तो दंडानें आपल्या प्रजांवर अंमल करतो, असा आशय. श्लेषालंकार.

वर्षांतीं परम जिला प्रसाद आला ॥ त्या प्राचीवरि बहु इंदु लुब्ध झाला ॥
ती त्याचे कुटिल कटाक्ष तुच्छ लेखी ॥ नीहारावरण-पटें स्ववक्त्र झांकी ॥९॥

प्रसाद; शुद्धता, सौन्दर्य. **नीहारावरणपटें**; नीहार म्हणजे धुकें त्याचा आवरण-पट बुरखा, त्यानें. **ती...झांकी**; तिनें त्याचे उद्दाम कटाक्ष झिडकारले; व आपलें मुख धुकेंरूपी बुरख्यांत झांकून घेतलें, असा आशय.

तारुण्या उचित मदांत आम्र आला ॥ स्वीकारी अभिनव मंजरीपटाला ॥
जी त्याच्या निकट लतावधू विराजे ॥ ती ल्याली हिम-कण-मुक्त-हार ताजे १०

अभिनव; नवीन. **मंजरीपटाला**; मंजिरीरूपी वस्त्राला. आम्रतरू यौवनांत आला व त्यानें नवी पालवीरूपी वस्त्र अंगावर धारण केलें. तेव्हां त्याच्याशेजारीं असलेल्या लतावधूनें (प्रियंगु लतेनें) दंव–बिंदुरूपी मोत्यांचे हार आपल्या अंगावर घातले.

जे होते शरदवधींत दीन ठेले ॥ ते आतां कुसुमसमृद्ध लोध्र झाले ॥
कीं अंगांवरि मृगचर्म पांघरोनी ॥ ते योगीजन बसले तटावरोनी ॥ ११ ॥

शरदवधींत; शरदृतूच्या अमदानींत. **कीं...तटावरोनी**; कीं ते लोध्ररूपी योगी अंगावर हरिणांचीं कातडीं पांघरून तटावर बसले आहेत.

पावोनी तुहिन-तुषार-संगमाला ॥ जें होतें क्षणहि न सह्य यामिनीला ॥
तें आतां बनत कवोष्ण गांग वारि ॥ कीं चिंता करि जननी सुतार्थ भारी १२

तुहिनतुषारसंगमाला; दंवाच्या कणांच्या समागमाला. **तें...भारी**; तेंच पाणी पहांटेस आपोआप ऊन झालें, कारण आईला मुलांची फार काळजी असते. स्नानाला येणारे लोक हीं गंगेचीं मुलेंच असल्यामुळें त्यांच्या सुखाकरितां तिनें रात्रीं गार असलेलें आपलें पाणी पहांटेस ऊन केलें, असा भाव. **गांग वारि**; गंगेचें पाणी. अर्थांतरन्यास.

रात्रीचें तिमिर निघून सर्व गेलें ॥ नीहार-प्रचुर-वितान भिन्न झालें ॥
बिंबार्धें उदयगिरीस दीप्तिशाली ॥ तों आला दिनमणि पूर्वचक्रवालीं ॥१३॥

नीहारप्रचुरवितान; धुक्याचें दाट आवरण. **उदयगिरीस**; उगवतीच्या पर्वतावर. **दीप्तिशाली**; तेजःपुंज. **पूर्वचक्रवालीं**; पूर्वक्षितिजांत.

व्योमाचें हृदय न वा हुताशनाचें ॥ तें सार क्षितिज-तपोवनांत सांचे ॥
हेमंतीं धवलित पूर्व-दिक्-तडागीं ॥ कीं झालें प्रकट सरोज रम्यरंगीं ॥ १४ ॥

सूर्यावर उत्प्रेक्षा. तें काय आकाशाचें हृदयच किंवा अग्नीचें सारच क्षितिजरूपी तपोवनांत सांचतें आहे, किंवा हेमंतऋतूंत स्वच्छ झालेल्या पूर्वदिशारूपी सरोवरांत तें सुंदररंगाचें कमळच उगवलें आहे (असा सूर्य वाटला). उत्प्रेक्षा.

ओजाचा नव पुतळाच दृश्य होतो ॥ तेजाचा निधि उकरून काढिला तो ॥
कीं रत्नाकर-जठरांतुनि स्वभावें ॥ तें पावे समुदय रत्न पंधरावें ॥ १५ ॥

ओजाचा; सत्त्वाचा. **कीं ...... पंधरावें**; किंवा समुद्राच्या पोटांतून तें पंधरावें रत्नच बाहेर पडलें आहे. उत्प्रेक्षा.

कीं तारा-पथ-सदनांत कुंभरंध्रीं ॥ जी संमार्जन करि पूर्व-दिक्-पुरंध्री ॥
तीनें जो कलश करांत घेतलाहे ॥ तो तेजोमय सलिलें भरोनि वाहे ॥ १६ ॥

तारापथसदनांत; तारापथ, आकाश, त्या सदनांत, आकाशरूपी गृहांत. **कुंभरंध्रीं**; घागरीच्या भोंकांनीं. **पूर्वादिक्पुरंध्री**; पूर्वदिशारूपी वृद्ध स्त्री. उत्प्रेक्षा.

किंवा आकाशरूपी गृहांत जी पूर्वदिशारूप वृद्ध स्त्री घागरीच्या (झारीच्या) असंख्य भोंकांनीं पाणी उडवून सडासंमार्जन करिते, तिनें जी घागर आपल्या हातांत घेतली आहे ती ही तेजरूपी पाण्यानें भरून वाहते आहे.

तो होतां उदित विकाश-चक्रवर्ती ॥ सर्वांची प्रविलय पावली हिमार्ति ॥
त्याच्या ही प्रथम गुणाभिनंदनाला ॥ आरंभी तटतरुवासि-पक्षि-माला ॥ १७ ॥

विकाशचक्रवर्ती; आकाशाचा सार्वभौम. **सर्वांची.. ...हिमार्ति**; सर्वांची हिमपीडा नाहींशी झाली. **तटतरु०**; तीरावरच्या झाडांवर बसलेला खगसमूह.

आमंद श्वसन सुगंधि वाहताहे ॥ ब्रह्मांडा भरुनि रवि-प्रसाद राहे ॥
गंगेचें पुलिनहि सुप्रभातसंगें ॥ रंगे तें खग-कुल-गायन-प्रसंगें ॥ १८ ॥

श्वसन; वायु. **पुलिन**; वाळवंट.

पूर्वेच्या धवल मुखास येत लाली ॥ बालार्कद्युति मिसळे तिशीं गुलाली ॥
ती गंगा विमल-जलीं प्रविष्ट होतां ॥ तें भासे धवलहि तोय शोण आतां ॥१९॥

बालार्कद्युति; बालसूर्याची प्रभा. **ती......आतां**; ती प्रभा गंगेच्या शुभ्र पाण्यांत शिरल्यावर तें पाणीही आतां तांबडें दिसूं लागलें.

हे कारंडव करिती वगाहलीला ॥ ती क्रीडे तटनिकटीं मरालमाला ॥
सूर्याचे कर पसरोनि शांत कालीं ॥ त्या शोभा अनुपम सैकतास आली ॥२०॥

वगाहलीला; पोहण्याची क्रीडा. **कारंडव**; पाणबदकें. **मरालमाला**; हंसपंक्ति. **सैकत**; वाळवंट.

मीनांतें सहज धरावया मिटोनी ॥ नेत्रां, जो बक टपला जलांत मौनी ॥
चंचूच्या समजुनि मीन सांवलीतें ॥ तो कोपें करि धरण्या वृथा श्रमांतें ॥२१॥

मौनी; शब्द न करणारा, गप्प. **चंचूच्या......श्रमांतें**; तो आपल्या चोंचीच्या पाण्यांत पडलेल्या सांवलीला मासा समजून तिला धरण्याचा प्रयत्न करूं लागला, पण तो खरोखरी मासा नसल्यामुळें त्याचे यत्न फुकट गेले, असा आशय. भ्रांतिमान् अलंकार.

मुक्ताभा विलसति शुक्तिकाच कोठें ॥ तों कोठें चमकति शंख सानमोठे ॥
रौप्याच्या उठुनि छटा तयांवरोनी ॥ शोभेचा अतिशय जातसे भरोनी ॥२२॥

मुक्ताभा; मोत्यांप्रमाणें शोभायमान.

ज्या झाल्या प्रकट जलाऽसमंत-भागीं ॥ गाईच्या पद-खुर-पंक्ति जागजागीं ॥
सांचोनी सलिल तयांत, पल्वलांची ॥ गंगेला सहज मिळे सुरेख कांची॥२३॥

जलाऽसमंतभागीं; पाण्याजवळच्या प्रदेशांत. **पदखुरपंक्ति**; पावलांच्या खुरांची ओळ. पाण्याच्या कडेनें गाईच्या पावलांच्या खुरांची जी ओळ उमटली होती, त्यांत पाणी सांचून त्यांचीं लहान डबकीं झालीं होतीं व तीं गंगेला मेखलेप्रमाणें शोभत होतीं, असा आशय.

तीरींच्या अभिनव मंजु वंजुलांनीं ॥ नीरींच्या तरल-तरंग-विभ्रमांनीं ॥
पात्रींच्या मद-कल-कंठ सारसांनीं ॥ ती शोभे त्रिभुवन-तीर्थ वारिधानी ॥२४॥

अभिनव; कोंवळे. **मंजु**; मंजुल नाद करणारे. **वंजुल**; वेत, देवनळ. **तरलतरंगविभ्रमांनीं**; चंचल अशा लाटांच्या लीलांनीं. **मदकलकंठ**; अस्पष्ट शब्द करणारे आहेत कंठ ज्यांचे अशा. **त्रिभुवनतीर्थ**; सर्व जगाला वंद्य अशी. **वारिधानी**; पाण्याचा सांठा अर्थात् नदी.

नीराची द्युति नयनांस मोहवीते ॥ उर्मींचा कलकल तोषवी श्रुतीतें ॥
जी स्पर्शें सकल तमोमला निवारी ॥ त्या हीचें कवण न रूप सौख्यकारी २५

द्युति; शोभा. **उर्मींचा कलकल**; लाटांचा मंजुळ नाद

स्वच्छंदें महिष जलांत गाहताहे ॥ वाटे कीं घनचि सलील नाहताहे ॥
तो पाण्यावरि शिर दर्शवीत जाई ॥ नौकेचें सहज तयास साम्य येई ॥२६॥

वाटे......नाहताहे; एखादा मेघ पाण्यांत मौजेनें नाहत आहेसें वाटलें.

जें होतें धवल पयापरी स्वभावें ॥ जें हंसां कठिण विवेचना गमावें ॥
तें केलें कलुषित बद्ध-जालकांनीं ॥ गंगेचें सलिल निषाद-बालकांनीं ॥ २७॥

जें हंसां......गमावें; जें गंगेचें पाणी दुधाप्रमाणें शुभ्र असल्यामुळें हंसांना सुद्धां ओळखण्यास कठिण जात होतें. (हंस हे पाणी व दूध वेगळें करण्यांत चतुर असतात हें

प्रसिद्धच आहे.) **बद्धजालकांनीं**; बांधलीं आहेत जाळीं ज्यांनीं अशा, ज्यांनीं जाळीं पसरलीं आहेत अशा. **निषादबालकांनीं**; कोळ्यांच्या पोरांनीं. कोळ्यांच्या पोरांनीं जाळीं टाकून गंगेचें स्वच्छ पाणी गढूळ केलें.

ज्या श्यामा विपुलकचा विलोलनेत्रा॥ज्या मुग्धा लघु-वसन-स्फुटोपगात्रा॥
सीतेच्या निरखुनि रूपवैभवाला॥ त्या झाल्या चकित समस्त दाशबाला॥

श्यामा; काळसांवळ्या. **विपुलकचा**; पुष्कळ केंस असलेल्या. **विलोलनेत्रा**; ज्यांचे नेत्र चंचल आहेत अशा. **मुग्धा**; अजाण, भोळ्या. **लघुवसनस्फुटो०**; नेसलेल्या लहान वस्त्रांतून ज्यांचीं उपांगें (अवयव) स्पष्ट दिसताहेत अशा. **दाशबाला**; कोळ्यांच्या मुली.

रामाला बघुनि न ज्या मनांत धाल्या॥ पाण्याचे घट भरुनी गृहां निघाल्या॥
शीर्षींच्या सरळ करावया घटांतें॥त्या नारी वळति, विलोकिती तयातें॥२९॥

ज्या (कोळ्यांच्या) बायका रामाला पाहून तृप्त झाल्या नाहींत त्या पाण्याच्या घागरी भरून घरांकडे जातांना डोक्यांवरील घागरी सरळ करावयाचें निमित्त करून त्याच्याकडे वळून पाहूं लागल्या.

जों गंगा-जलतरणार्थ काष्ठनौका॥ आणाया गुह नृप तो स्वदासलोका॥
आज्ञापी, तंव सरिदंबुमज्जनाला॥ सौमित्रीसह रघुनाथ सिद्ध झाला॥ ३०॥

सरिदंबुमज्जनाला; नदीच्या पाण्यांत स्नान करण्याला.

तद्वस्त्रां बसुनि तटास जानकी घे॥ लीलेनें मग शिरले नदींत दोघे॥
ती त्यांच्या चरण-रजः-कणांस सेवी॥ मानोनी बहु उदरीं तयांस ठेवी॥३१॥

चरणरजःकणांस; पायधुळीस. **मानोनी बहु**; पूज्य मानून.

जी लीला-लहरि-मनोहराऽवलोका॥ सिंधूही भव-गुरु-सिंधु-दिव्यनौका॥
जी पूर्वी चरणतलाहुनी निघाली॥ती गंगा प्रभु-चरणां पुन्हा मिळाली॥३२॥

लीलालहरिमनोहरावलोका; लीलालहरींनीं म्ह० क्रीडा करणाऱ्या लाटांनीं मनोहर आहे अवलोक म्ह० देखावा जीचा अशी, लहरींनीं शोभणारी. **सिंधूही...... नौका**; स्वतः नदी असून भवरूपी मोठ्या समुद्रांत जी अनुपम अशी नाव आहे. (नदी स्वतः जलरूप असल्याकारणानें बुडविणें हा तिचा धर्म आहे, पण गंगा ही जीवांना भवसमुद्रांतून तारते असा आशय.) **दिव्य**; आकाशांतील अर्थात् श्रेष्ठ, निरुपम. **जी पूर्वी...मिळाली**; जी गंगानदी पूर्वी रामाच्या चरणतलापासून निघाली होती ती पुनः आज त्याला मिळाली. (गंगा विष्णूच्या पायांपासून निघाली आहे हें प्रसिद्धच आहे.) विरोधाभास अलंकार.

रामाचे प्रथम विलीन गुल्फ झाले ॥ जंघाही मग, मग जानुही बुडाले ॥
तो ऐशापरि जंव मग्न-मध्य झाला ॥ त्या तोयोदित-कमलाबभास आला॥३३॥

गुल्फ; घोटे. **विलीन झाले**; पाण्यांत दिसेनासे झाले. **जंघा**; पिंढऱ्या, गुडघ्या खालील पायांचा भाग. **जानु**; मांड्या. **मग्नमध्य**; ज्याचा निमा देह पाण्यांत गेला आहे असा. **तो...आला**; तो याप्रमाणें जेव्हां कमरेपर्यंत पाण्यांत गेला तेव्हां त्याला पाण्यांत उगवलेल्या कमलाची शोभा आली.

अर्धांगें ललित-विलोक्य, मग्न-वक्षें ॥ तेथोनी, पिहितगलें पुढें सुकक्षें ॥
सर्वांगें मग दृगतीत, कीर्ण केशें ॥ शैवालापरि सलिलांत राम भासे ॥ ३४॥

ललितविलोक्य; सुंदर दिसणारा. **मग्नवक्षें**; बुडालेल्या उरःप्रदेशानें. **पिहितगलें**; बुडालेल्या कंठानें. **सुकक्षें**; चांगली आहे कक्षा म्ह० परिघ ज्याचा अशा. (पिहितगलें.) **दृगतीत**; दृष्टीला न दिसणारा. **कीर्ण केशें**; पसरलेल्या केंसांनीं. **शैवालापरि**; शेवाळाप्रमाणें.

अन्वयः—अर्धांगें ललितविलोक्य, तेथोनी मग्नवक्षें, पुढें सुकक्षें पिहितगलें, मग सर्वांगें दृगतीत राम सलिलांत कीर्ण केशें शैवालापरि भासे.

अर्थः—(आधीं) जो पाण्याबाहेर राहिलेल्या अर्ध्या अंगानें सुंदर दिसत होता; नंतर ज्याचें वक्षस्थल पाण्यांत गेलें, नंतर ज्याचा वर्तुलाकार सुंदर कंठ दिसेनासा झाला, व मग जो मुळींच दिसेनासा झाला असा राम पाण्यांत आपल्या पसरलेल्यां शेंडीमुळें शेवाळाप्रमाळें दिसूं लागला.

तो गेला उतरुनि मंद मंद डोहीं ॥ कीं गंगा वरि चढली कळे न कांहीं ॥
तृप्तीचे परि रघुनाथ-संगमानें ॥ उद्गार प्रकटवि बुद्बुद-च्छलानें ॥ ३५ ॥

उद्गार; ढेंकरा. **बुद्बुदच्छलानें**; बुडबुड्यांच्या मिषानें.

राम डोहांत स्वतः उतरून गेले कीं गंगेचें पाणीच वर चढून आलें हें कांहीं कळेना; एवढें खरें कीं त्याच्या संगमानें तिला जी तृप्ति झाली ती तिनें बुडबुडेरूपी ढेंकरा देऊन प्रकट केली.

तो जाई सलिलतला दुराप-पारा ॥ ये पृष्ठावरि चुकवोनि वारिधारा ॥
आवर्तां करि शतभिन्न पाणिघातें ॥ लीलेनें करि विविधावगाहनातें ॥ ३६ ॥

दुरापपारा; ज्याचा अंत लागत नाहीं अशा, फार खोल. **वारिधारा**; पाण्याची ओढ. **आवर्त्तां**; भोंवऱ्यांना. **विविधावगाहनातें करि**; नानाप्रकारांनीं पोंहला.

या रीतीं जंव मनसोक्त नीर-केली ॥ दोघांनीं सुर-तटिनी-जलांत केली ॥
तों नौका गुह-गण-वाहिता निघाली॥ येवोनी प्रभुजवळीं निवांत झाली॥३७॥

नीरकेली; जलक्रीडा. **सुरतटिनीजलांत**; देवांच्या नदीच्या (गंगेच्या) पाण्यांत. **गुहगणवाहिता**; गुहाच्या सेवकांनीं वल्हविलेली. **निवांत झाली**; थांबली.

तो गंगा-शुचि-सलिलांत आर्द्रमौलि ॥ राहोनी अ-निमिष-नेत्र दीप्तिशाली ॥
अर्घ्यांतें सनमन अर्पुनी रवीला ॥ आरोहा झडकरि साप्त सिद्ध झाला ॥३८॥

आर्द्रमौलि; ओलें आहे मस्तक ज्याचें (शेंडी ज्याची) असा. **अनिमिषनेत्र**; निमिष म्ह० पापण्या मिटणें, अ म्ह० नाहींत निमिष ज्यांत ते अनिमिष म्ह० स्थिर; आनिमिष आहेत नेत्र ज्याचे तो आनिमिषनेत्र, स्थिरदृष्टि. **दीप्तिशाली**; तेजस्वी. **अर्घ्यांतें......रवीला**; सूर्याला नमस्कारांसह अर्घ्य देऊन म्ह० नमस्कार करून व अर्घ्य देऊन. **आरोहा**; (नौकेंत) चढण्याला. **साप्त**; आप्तजनांसह. (लक्ष्मण व सीता यांसह.)

संसारोदधि-पटु-कर्णधार जो कां ॥ यत्पादांबुज सुतरी समस्त लोकां ॥
तो गंगाजलतरणार्थ घेत नौका ॥ थोरांची गहन कृती कशी विलोका ॥३९॥

संसारोदधिपटुकर्णधार; भवसागरांतून नेणारा चतुर नावाडी. **सुतरी**; चांगली नौका.

सीतेच्या मग धरुनी करांबुजातें ॥ तो प्रेमें हळु तरणींत घेत तीतें ॥
तीं पृष्ठावरि चढतां अशीं त्रिवर्गें ॥ ती झाली मग निघती तरी स्वमार्गें॥४०॥

त्रिवर्गें; तिघें. (राम लक्ष्मण सीता.) **तरी**; नाव.

ती नौका निज-गुरु-दंड-ताडनांनीं ॥ संचारा करि तटिनी-पयो-वितानीं
जातांना सरळ उचंबळे, कलेही ॥ अंतःस्थां परि भय वाटलेंच नाहीं ॥४१॥

निजगुरुदंडताडनांनीं; आपलीं मोठीं वल्हीं (दंड) आपटीत. **तटिनीपयोवितानीं**; वितान ह्म० विस्तार, तटिनी० वितानीं म्ह० नदीच्या पाण्याच्या प्रवाहांतून. **अंतस्थां**; आंत बसलेल्यांना.

रामाच्या चरणसमागमोत्सुकांनीं ॥ नौकेतें लहरि-करीं नदीजलांनीं ॥
व्यापाया बहुपरि तेथ यत्न केला ॥ दूरत्वें विफल तथापि सर्व गेला ॥ ४२ ॥

रामाच्या......केला; रामाच्या पावलांच्या समागमाविषयीं उत्सुक असलेल्या नदीच्या पाण्यांनीं नावेवर चढून जाण्याचा यत्न आपल्या लहरीरूपी हातांनीं केला. **बहुपरि**; पुष्कळ प्रकारांनीं.

नीरातें करित दुभंग चालतांना ॥ ती नौका अनुसरली निजप्रयाणा ॥
जी तेव्हां उडत नभीं तुषारमाला ॥ ती देई सुख तरणीस्थ राघवाला ॥४३॥

तुषारमाला; जलबिंदूंचा समुदाय. **तरणीस्थ**; नावेंत बसलेल्या. (राघवाला.)

जेव्हां त्या सलिल-तुषार-रम्य-संघीं ॥ सूर्याचे कर पडले अनेकरंगी ॥
तेव्हां ते पसरुनि रंग एक ठायीं ॥ इंद्राचें धनु उठलें जलप्रवाहीं ॥ ४४ ॥

सलिलतुषाररम्यसंघीं; पाण्याच्या उडालेल्या बिंदूंच्या सुंदर समुदायांत. स्वभावोक्ति अलंकार.

रामाच्या वन-गमनोद्भवा वियोगा ॥ जी झाली बघुनि मनांत खिन्न गंगा ॥
ती चित्रीं उतरि तदीय रूपराशि ॥ छायेचें मिष करुनी धरी उराशीं ॥ ४५ ॥

रूपराशि; सौंदर्याचें सर्वस्व. जी गंगा, राम वनाला जाणार हें पाहून मनांत कष्टी झाली तिनें त्याच्या छायेच्या मिषानें त्यांच्या सुंदर देहाचें चित्र काढून तें आपल्या उराशीं धरून ठेवलें. गंगेच्या प्रवाहांत पडलेल्या रामाच्या सांवलीवर उत्प्रेक्षा.

जों नौका अपर तटासमीप आली ॥ साकेत-स्मृति रघुनंदनांस झाली ॥
पंचत्वोन्मुख जनकास आठवोनी ॥ ते झाले परम विषण्ण बंधु दोन्ही ॥ ४६ ॥

अपर; दुसऱ्या, पलीकडच्या. **पंचत्वोन्मुख**; पंचत्व म्ह० पंचमहाभूतांशीं एक होणें, मरणें, त्याला उन्मुख, मरावयास टेकलेला. **विषण्ण**; खिन्न.

तातातें, प्रियगुरुतें, निजांबिकांतें ॥ सर्वांही वडिल जनांस, सज्जनांतें ॥
दोघांनीं मग तरणी-तलावरोनी ॥ सद्भावें नमन समर्पिलें मनांनीं ॥ ४७ ॥

निजांबिकांतें; आपल्या आईंना. **तरणीतलावरोनी**; नावेच्या पृष्ठभागावरून. **सद्भावें**, भक्तिपुरःसर.

या रीतीं क्रमुनि पथास, योग्य कालीं ॥ ती नौका अचल तटासमीप झाली ॥
जें होतें दृढ परिबद्ध शृंखलांनीं ॥ तें केलें शिथिल अरित्र नाविकांनीं ॥ ४८ ॥

अचल झाली; थांबली. **अरित्र**; सुकाणूं. **नाविक**; नावाडी.

नौकेचा शिथिलित नांगर स्वभावें ॥ मुक्ताचें नियमित चित्तसा स्थिरावे ॥
कीं गेला करुनि निनाद गांग कर्णां ॥ तो दूत श्रुत करण्या प्रभु-प्रयाणा ॥ ४९ ॥

शिथिलित; सोडून दिलेला. **गांग कर्णां**; गंगेच्या कानांला.

मुक्त मनुष्याचें, नियमाच्या ताब्यांत आलेलें मन ज्याप्रमाणें मोकळें सोडलें असतां एकाच जागीं (परमात्मस्वरूपावर) थांबतें, त्याप्रमाणें नावेचा (पाण्यांत) सोडलेला नांगर (पाण्याच्या तळाशीं जाऊन) स्थिर झाला, किंवा रामाचें प्रयाण गंगेच्या कानांवर घालण्याकरितां तो नांगररूपी दूतच जणूं काय आवाज करीत पाण्यांत शिरला. श्लोकाच्या प्रथमार्धांत उपमालंकार व दुसऱ्यांत उत्प्रेक्षा.

श्रीरामा सकल-महार्घ-वस्तु-सारा ॥ नेवोनी सुर-तटिनी-जलाऽन्य-तीरा ॥
पाहोनी कुशल कृतावरोहणाला ॥ नौकेचा जणुं गतभार देह झाला ॥ ५० ॥

महार्घ; मोलवान्. **सुरतटिनीजलान्यतीरा**; देवांची नदी गंगा, तिच्या पलीकडच्या तीराला. **पाहोनी......झाला**; सुरक्षित उतरला असें पाहून नावेला आपल्यावरचा भार उतरलासें वाटलें.

तो मागे मग रघुनाथ दाशपाला ॥ मार्गानें पुढति निरोप जावयाला ॥
रामाचे सहजचि शब्द ते तथापि ॥ भक्ताच्या श्रुतिहृदयांस दुःख ओपी॥५१॥

दाशपाला; कोळ्यांच्या राजाला, गुहाला. **भक्ताच्या......ओपी**; रामाचे ते सहज शब्द गुहाच्या कानाला व मनाला दुःखदायक झाले.

हस्तांनीं प्रभुचरणां, मुखास नेत्रें ॥ तो याची प्रभुहृदया विषण्ण वक्त्रें ॥
स्वागारीं पुनरपि वास आदराया ॥ नोपेक्ष्य प्रभु गणि सात्विकादराया ॥५२॥

तो रामाच्या पायाला आपल्या हातांनीं, रामाच्या मुखाला आपल्या डोळ्यांनीं, रामाच्या हृदयाला आपल्या खिन्न मुखानें आपल्या घरीं आणखी राहण्याविषयीं आग्रह करूं लागला. म्हणजे त्यानें आपल्या हातांनीं रामाचे पाय धरले, आपले डोळे त्याच्या मुखाकडे लावले आणि आपल्या खिन्न मुखानें त्याच्या हृदयाला ओढ लावली असा भाव. **नोपेक्ष्य... ...या**; रामास त्याच्या प्रेमळ आग्रहाची उपेक्षा करावी असें वाटलें नाहीं.

या मार्गें पुनरपि पत्तनास जातां ॥ भेटेन प्रथम तुला करी न चिंता ॥
हें रामें स्व-भजक-भक्ति-बद्ध-चित्तें ॥ बोलोनी वच समजाविलें गुहातें ॥५३॥

स्वभजकभक्तिबद्धचित्तें; भक्ताच्या भक्तीनें बांधून टाकलें आहे मन ज्याचें अशा (रामें.)

रामाच्या दृढ धरुनी पुन्हा पदांतें ॥ लोळे तो परिहरण्या निजापदांतें ॥
तत्स्पर्शें निववुनि दग्ध मानसाला ॥ तो गेला परतुनि आपल्या पुराला ॥५४॥

परिहरण्या निजापदांतें; आपलें दुःख कमी करण्याकरितां.

गंगातीरा त्यजुनि पुढतीं चालले ते प्रवासी ॥
भारद्वाजाश्रम-परिसरीं पातले पुण्यवासीं ॥
तेथें सेवी मुनिवर-कृता सत्क्रिया रामराणा ॥
आनंदानें क्रमुनि रजनी चालवी स्व-प्रयाणा ॥ ५५ ॥

भारद्वाजाश्रमपरिसरीं; भारद्वाज ऋषीच्या आश्रमाजवळ. **पुण्यवासीं**; पुण्य म्ह० पावन आहे वास जेथला अशा (परिसरीं). **सत्क्रिया**; सत्कार, आतिथ्य. मंदाक्रांता वृत्त.

पुण्यालोका ललितलहरी संकटीं पावणारी ॥
गंगांगाच्या त्वरित गतिनें संगमा धावणारी ॥
प्राच्यें वातें मृदुल हलती वेत जीच्या तटींचे ॥
त्यांना ऐसें पुढति दिसलें पात्र गंगा-स्वसेचें ॥ ५६ ॥

पुण्यालोका; पावन आहे दर्शन जीचें अशी. **ललितलहरी**; सुंदर आहेत लाटा जीच्या अशी. **गंगांगाच्या**; गंगेच्या पात्राच्या. **प्राच्यें वातें**; पूर्वेकडील वायूनें. **गंगास्वसेचें**; गंगेच्या बहिणीचें (यमुनेचें).

यमुना-सलिलांत पांथ ते करुनी स्नान पथास लागले ॥
क्रमितां निजमार्ग काननीं सुखद श्यामवटीस राहिले ॥ ५७ ॥

श्यामवटीस; श्यामवटी नांवाच्या वनप्रदेशांत. वियोगिनी वृत्त.

त्या सुस्थळीं जरि मनें रममाण झाले ॥
तेथोनि राघव तरी पुढतीं निघाले ॥
त्यांच्या पथीं सहज गोचर लोचनांला ॥
तों चित्रकूट नग सानहि रम्य झाला ॥ ५८ ॥

राघव; रघूचे वंशज (राम–लक्ष्मण). **सानहि रम्य**; लहान असूनही रमणीय. वसंततिलका वृत्त.

तो निर्जनाचल निवास-सुयोग्य पाहे ॥
बांधूनि पर्णकुटिका प्रभु तेथ राहे ॥
तच्चित्त-रंजन निसर्ग-विलोकनानें ॥
झालें तसें प्रियजनानिश संगमानें ॥ ५९ ॥

निवाससुयोग्य; वस्ती करण्यास फार योग्य. **निसर्गविलोकनानें**; सृष्टीची शोभा पाहण्यानें. **प्रियजनानिशसंगमानें**; प्रियजनांच्या सतत सहवासानें.

निरुपाधि सुखासि सेवुनी चिर जो त्या निलयांत राहिला ॥
अथ एक दिनीं नरोत्तमें पुढतीं धूलिसमूह पाहिला ॥ ६० ॥

निरुपाधि; अखंडित. **अथ...पाहिला**; पुढें एके दिवशीं त्यानें समोरून धूळ उठलेली पाहिली. वियोगिनी वृत्त.

हें काय हा प्रभु विचार करी स्वचित्तीं ॥
तों जाहला भरत गोचर बालमूर्ति ॥
तो वल्कलांबर-मृगाजिन-वेषधारी ॥
ये दर्शनास्तव ससैनिक पादचारी ॥ ६१ ॥

वल्कलांबरमृगाजिनवेषधारी; वल्कलें, हरणाचें कातडें वगैरे वेष धारण करणारा. **ससैनिक**; सैन्यासह. वसंततिलका.

तो रामा प्रियभक्तसा, तदनुजा दायादसा मत्सरी, ॥
सीतेला भयहेतुसा, मुनिवरां भक्ति-स्थली-केसरी ॥
पक्ष्यांना मधु मूर्तसा, वनमृगां आप्तेष्टसा वाटला ॥
रामातें बघुनी तदीय सहसा प्रेमें गळा दाटला ॥ ६२ ॥

भरत येतांना कोणास कसा दिसला तें सांगितलें आहे.

दायादसा; भाउबंदासारखा. **भक्तिस्थलीकेसरी**; भक्तिरूपी वनांतला सिंह. **मधु**; वसंत उल्लेख अलंकार. शार्दूलविक्रीडित वृत्त.

प्रभूस अवलोकितां भरत हांक फोडी महा ॥
म्हणे मजसिं कां दिला चिर वियोग ऐसा अहा ॥
जंव प्रभुवरें तयां सजल लोचनें पाहिलें ॥
तदीय भरतें पदीं स्ववपु तोंवरी वाहिलें ॥ ६३ ॥

सजल; अश्रूंनीं भरलेल्या. पृथ्वीवृत्त.

उठवुनि कवटाळी त्या तदा रामराणा ॥
वचन मग वदे कीं बाल हा दीनवाणा ॥
अहह ! विरहदुःखें फार संतप्त झाला ॥
त्वरित तंव तयाचा कंठ दाटून आला ॥ ६४ ॥

त्वरित......आला; (असें बोलतां बोलतां) रामाचा गळा दाटून आला. मालिनी.

भरतासवें स्वगुरुमूर्ति पाहिली ॥
प्रभुनें नमस्कृति तियेसि घातली ॥
भरतानुरागाचि विलंबकारणीं ॥
गुरु-भक्ति मात्र विभुची नसे उणी ॥ ६५ ॥

भरतानुरागचि......उणी; गुरूला नमस्कार करण्याला भरताच्यां प्रेमामुळें उशीर झाला. रामाची गुरुभक्ति मात्र कमी होती असें नाहीं. मंजुभाषिणी वृत्त.

वंदावया प्रथम सद्गुरु-पादुकांला ॥
जो राघवा निमिषमात्र विलंब झाला ॥
तो तेधवां न सुतपा अपराध मानी ॥
दे प्रेमसंगि अवमान न मान-हानि ॥ ६६ ॥

सुतपा; मोठें आहे तप ज्याचें असा (वसिष्ठ). **दे......मानहानि**; दुसऱ्याच्या प्रेमप्रसंगांत आपला झालेला अपमान मानहानि करणारा होत नाहीं.अर्थांतरन्यास अलंकार.

जनकनिधन श्रीरामातें निवेदुनि तो मुनि ॥
कुशल कळवी तन्मातांचें तयाप्रति मागुनी ॥
प्रभु अनुभवी दुःखावेगा अतिव्यथितें मनें ॥
द्विगुण मग तो झाला तेथें प्रियानुजदर्शनें ॥ ६७ ॥

प्रभु...प्रियानुजदर्शनें; रामानें दशरथाच्यां मृत्यूची वार्ता ऐकून अत्यंत व्यथित मनानें दुःखाचा झटका अनुभविला, त्यांतच पोरका झालेल्या आपल्या प्रिय भरताला प्रत्यक्ष पाहून त्याचें दुःख दुप्पट झालें. हरिणवृत्त.

स्वीकारावें मजसि नलगे राज्य तें आपलें कीं ॥
ऐसें रामा भरत विनवी राम तों कर्ण झांकी ॥

तद्वृत्तीनें उपजत मनीं पूर्ण जेव्हां निराशा ॥
झाला सिद्ध त्वरित मग तो भक्त वन्हिप्रवेशा ॥ ६८ ॥

तद्वृत्तीनें......निराशा; रामाच्या वृत्तीनें (राज्यभार नाकारण्यानें) भरताच्या मनांत जेव्हां पूर्ण निराशा उत्पन्न झाली. **वन्हिप्रवेशा**; अग्निप्रवेश करण्यास. मंदाक्रांता.

श्रीरामाचा कथुनि जगदुद्धार-सद्धेतु साचा ॥
कष्टें त्याचें नियमन करी सद्गुरू राघवांचा ॥
गाढाश्लेषीं दृढ धरुनियां राघवेंही तयातें ॥
नंदिग्रामीं मग वसविलें देउनी पादुकांतें ॥ ६९ ॥

जगदुद्धारसद्धेतु; (दुष्ट दैत्यांचा नाश करून) जगाचा उद्धार करण्याविषयींचा चांगला हेतु. **श्रीरामाचा......राघवांचा**; वसिष्ठानें भरताला राम जगदुद्धार करण्याच्या हेतूनें वनास जात आहेत (तर तूं त्यांना आड येऊं नको) असें सांगून मोठ्या कष्टानें त्याला अग्निकाष्ठें भक्षण करण्यापासून परावृत्त केला.

तेथूनि राघव सवेंचि पुढें निघाला ॥
अत्र्याश्रमांत वसता दिन तीन झाला ॥
घेऊनि अत्रिमुनिचा वर चापपाणि ॥
झाला प्रवृत्त पुढतीं विपिन-प्रयाणीं ॥ ७० ॥

वसता......झाला; तीन दिवस राहता झाला. **चापपाणि**; धनुर्धारी. **विपिन-प्रयाणीं**; वनास जाण्यांत.

सीतादेवीप्रति जरि पुढें कष्ट होणार होते ॥
मार्गीं त्यांना शकुन कथिती मंगलां लक्षणांतें ॥
कीं लंकेशें शकुन-कथिनी देवता बद्ध केली ॥
ती साधाया स्वहित बरवें चिन्ह दावीत गेली ॥ ७१ ॥

सीतेला जरी पुढें वनवासांत कष्ट होणार होते तरी त्यांना मार्गांत चांगलेच शकुन झाले. कारण शकुनांची अधिष्ठात्री देवता इतर देवांबरोबर रावणाच्या बंदींत होती, तिला आपली सुटका करून घ्यावयाची असल्यामुळें रामाला पुढें येण्यास उत्तेजन देण्याकरितां तिनें चांगले शकुन दाखविले.

जो जाहला मुनि-तपोविधि-पुण्यराशि ॥
ऐशापरी विचरतां चिर त्या प्रदेशीं ॥
कोठें दिनद्वय. दिनत्रय वास कोठें ॥
केला, अशांत तंव वत्सर एक लोटे ॥ ७२ ॥

मुनितपोविधिपुण्यराशि. मुनींच्या तपश्चर्येमुळें पवित्र.

प्रारंभीं दिवस वनांत घालवीले ॥
ते रामाप्रति सुखहेतु सर्व झाले ॥
तेव्हां तो मनिं सुरकार्य आठवी तें ॥
जाया ये त्वरितचि दक्षिणा-पथातें ॥ ७३ ॥

सुरकार्य; देवांना सोडविण्याचें काम. **दक्षिणापथातें**; दक्षिणेच्या मार्गाला.

सर्ग ३ रा.

त्यां दक्षिणेचा पथ कंठणाऱ्यां पथश्रमें म्लानमुखां जनांला ॥
तपोरतां सिद्धिसमूह, तैसा मार्गांत विंध्याचल आड आला ॥ १ ॥

तपोरतां...... तैसा; तप करणारांना सिद्धि आड येतात तसा. उपमालंकार. उपजातिवृत्त.

ज्याचीं नभश्चुंबन-शील दुर्गें भेदूनि गेलीं जलदावलीला ॥
जो "विंध्य" लीना पशु-पक्षि-जाता, "अविंध्य" इंद्रास परंतु झाला ॥

नभश्चुंबनशील; आकाशाचें चुंबन घेणारीं, गगनचुंबित. **जलदावलीला**; मेघमंडलास. **जो ...... झाला**; जो नम्र अशा पशुपक्ष्यांना विंध्य (भेद्य) होता, पण इंद्राच्या वज्राला अविंध्य (अभेद्य) होता.

जो वाढला शैल विशाल पूर्वी सुवर्ण-सानूस जिणावयाला ॥
स्पर्शे तयाच्या बहुधा असावा तेव्हां विधू ओषधिनाथ झाला ॥ ३ ॥

सुवर्णसानूस; मेरु पर्वतास. **जो... ...झाला**; जो पर्वत मेरुपर्वतास जिंकण्याकरितां पूर्वी फार उंच वाढला होता (आणि त्याचीं शिखरें चंद्रमंडलाला लागं लागलीं) तेव्हां त्याच्या देहस्पर्शानें बहुतकरून चंद्र हा ओषधिनाथ झाला असावा. यावरून विंध्य पर्वतावर विपुल औषधी आहेत असें सुचविलें.

रोधूनियां मार्ग दिवाकराचा तेव्हां तयानें निज-शृंग-गात्रीं ॥
प्रयोजिलें उत्तरभारतांना कंठावयातें दश कालरात्री ॥ ४ ॥

निजशृंगगात्रीं; आपल्या शिखररूपी अवयवांनीं. **प्रयोजिलें**; भाग पाडिलें. **उत्तरभारतांना**; उत्तर हिंदुस्थानांतील लोकांना. **कालरात्री**; अंधेऱ्या रात्री. ज्यानें

आपल्या शिखरांनीं सूर्याचा मार्ग अडवून उत्तर हिंदुस्थानावर दहा दिवस काळोख पाडला होता, असा भाव.

भूपाल कीं उत्तरदक्षिणेचे अन्योन्य-युद्धोद्यत सर्व झाले ॥
मध्यस्थ होऊन तयांस यानें द्विभाग हें भारतवर्ष केलें ॥ ५ ॥

उत्तरदक्षिणेचे; उत्तर हिंदुस्थानांतले व दक्षिण हिंदुस्थानांतले. **अन्योन्ययुद्धोद्यत**; एकमेकांबरोबर युद्ध करण्याला उद्युक्त. **भारतवर्ष**; हिंदुस्थान.

न विस्तृतत्वें, न शिलोच्चयत्वें, न तेंवि वृंदारक-पक्ष-पातें ॥
तो पात्र झाला परि सद्गुणांनीं नगेंद्रबोध्या परमा पदातें ॥ ६ ॥

विस्तृतत्वें; लांबीनें. **शिलोच्चयत्वें**; शिलांच्या उंच समृद्धीनें, उंचीनें. **वृंदारकपक्षपातें**; वृंदारक म्ह० देव त्यांची बाजू धरण्यानें. **नगेंद्रबोध्या**; नगेंद्र म्ह० नगराज या शब्दानें सूचित होणाऱ्या.

विंध्याद्रि हा नगेंद्र पदवीला जो पात्र झाला तो कांहीं उंचीमुळें नव्हे, लांबीमुळें नव्हे अगर हिमालय पर्वताप्रमाणें देवांच्या वशिल्यानें नव्हे, तर आपल्या लोकोपयोगी सद्गुणांनीं झाला, असा भाव.

त्या तेधवां मार्ग-गता नगातें लंघावया राघव सिद्ध झाला ॥
असें असे संकट कोणचें कीं जें आडवील स्थिर निश्चयाला ॥ ७ ॥

मार्गगता; मार्गांत आलेल्या.

शिरीषपुष्पाधिक कोमलेच्या तदा करीं घालुनियां करातें ॥
नभा प्रभायुक्त दिनेशसा त्या क्रमी रघूत्तंस महागिरीतें ॥ ८ ॥

शिरीषपुष्पाधिककोमलेच्या; शिरसाच्या फुलाहून अधिक कोमल अशा सीतेच्या.

सौमित्रि ये मागुनि सावकाशें करूनि त्यांच्याच पथावलंबा ॥
बिंबाधरा ती न थको म्हणोनी दोघेहि मार्गीं करिती विलंबा ॥ ९ ॥

करून......पथावलंबा; त्यांच्याच मार्गाला अनुसरून. **बिंबाधरा...विलंबा**; सीता थकूं नये म्हणून ते थांबत असत.

प्रासाद-सोपान चढावयाला पदें जिचीं तीं असमर्थ होतीं ॥
धरात्मजा दैव-विपाक-योगें क्रमी अशी दुर्गपथा अहो ती ॥ १० ॥

प्रासादसोपान; राजवाड्यांतील जिने **दैवविपाकयोगें**; दैवाच्या परिणामामुळें **दुर्गपथा**; पर्वतमार्गाला. विषम अलंकार.

नीलांग रामासह चारुगात्री ती चालतां त्या अचलप्रदेशीं ॥
साद्दश्य पावे गगनांगणस्था घनानुयाता विधुच्या कलेशीं ॥ ११ ॥

नील वर्णाच्या रामाबरोबर पर्वतावरून चाललेली सीता, मेघाबरोबर आकाशांतून चालणाऱ्या चंद्रकलेप्रमाणें दिसली. उपमा.

अध्व-श्रमें गौर कपोल-देशीं तिच्या तदा घर्मज बिंदु आले ॥
पद्मस्थितां वारिकणांपरी ते समीरणें कंपित-रम्य झाले ॥ १२ ॥

अध्वश्रमें; मार्गांतील श्रमानें. **पद्मस्थितां......झाले**; ते कमळाच्या पानावरील पाण्याच्या बिंदूंप्रमाणें वायूनें हालून रम्य दिसले.

हरावयातें कमलायताक्षी परिश्रमां दुर्गम-मार्ग-जन्यां ॥
शिलेवरी राघवसंनिधानीं क्षणैक बैसे मिथिलेश-कन्या ॥ १३ ॥

कमलायताक्षी; कमलाप्रमाणें मोठे आहेत डोळे जिचे अशी. **दुर्गममार्गजन्यां**; कठिण मार्गामुळें उत्पन्न झालेल्या. **मिथिलेशकन्या**; मिथिला नगरीचा राजा जनक त्याची मुलगी (सीता).

पुसावया स्वेद तिचा प्रभूनें वस्त्रासवें जों कर उंच नेला ॥
रेवाऽनिलें तो तंव शुष्क केला ठेला, तयाचा कर लालनाला ॥ १४ ॥

रेवानिलें; नर्मदा नदीवरून आलेल्या वायूनें.

तिचा स्वेद पुसण्याकरितां रामानें जोंवर आपला हात वस्त्रासह तिच्या मुखाजवळ नेला तोंवर नर्मदेकडून येणाऱ्या वायूनेंच तो तिचा स्वेद वाळवून टाकला; अर्थात् रामाच्या हाताला तिचें मुख कुरवाळणें एवढीच काय ती कामगिरी शिल्लक राहिली.

जलें तृषार्ता, क्षुधिता फलांनीं, घर्माकुला कोमल-मंद-शीतें ॥
वस्त्रानिलें, लक्ष्मण सेविता त्या झाला कुमारापरि दंपतीतें ॥ १५ ॥

घर्माकुला; उन्हानें पीडिलेल्या. **वस्त्रानिलें**; वस्त्राच्या वायूनें. **दंपतीतें**; नवराबायकोंना.

रामाला व सीतेला तहान लागली असतां पाणी देऊन, भूक लागली असतां फळें देऊन व ऊन्ह लागलें असतां आपल्या वस्त्रानें वारा घालून लक्ष्मणानें त्यांची मुलाप्रमाणें सेवा केली.

विश्रांति घेतां स्फटिकाश्म-खंडीं उत्साह आला प्रभुला क्षणांतीं ॥
प्रवर्तला मार्ग पुढें क्रमाया सदार-सापत्य-मृगेंद्र-कांति ॥ १६ ॥

स्फटिकाश्मखंडीं; स्फटिक शिलेच्या तुकड्यावर. **सदारसापत्यमृगेंद्रकांति**; स्त्री व मुलगा यांनीं युक्त अशा सिंहाप्रमाणें शोभणारा. आपली मादी व छावा बरोबर

घेऊन ज्याप्रमाणें सिंह पर्वतावर चढतो त्याप्रमाणें सीता व लक्ष्मण यांसह राम वर चढला, असा भाव.

येतां नगाच्या बहु उंच भागीं नेत्रीं तयांच्या नयनाभिरामा ॥
आली सभोंवार निसर्गशोभा नवी नवी श्रांत-मनो-विरामा ॥ १७ ॥

श्रांतमनोविरामा; थकलेल्या मनाला विसांवा देणारी.

विशाल शृंगें गगनावलंबें, स्थलींस्थलींची हिरवी तृणाली ॥
त्यांच्या तदा गर्द अशी वनश्री चोहींकडे दृष्टिपथास आली ॥ १८ ॥

गगनावलंबें; गगनचुंबित. **तृणाली**; हिरवळ, गवताचे गड्डे.

तेथें विभिन्नां पशु-पक्षि-जातां, वनस्पतींच्या विविध प्रकारां ॥
झाला महीपाल विलोकिता तो जलप्रपातां विचलत्तुषारां ॥ १९ ॥

विचलत्तुषारां जलप्रपातां; विचलत् म्ह० उंच उडताहेत तुषार ज्यांतून अशा जलप्रपातां म्ह० धबधब्यांना.

शृंगें तयाचीं जणुं उंच शीर्षें, महागुहा हीं उदरें वदावीं ॥
अनंतपादान्वित विंध्य रामा तो आपलें ऐश्वर रूप दावी ॥ २० ॥

अनंतपादान्वित; अनंत पायथ्याच्या टेंकड्यांनीं (पक्षीं पायांनीं) युक्त असा. **तो...दावी**; विंध्याद्रीनें रामाला आपलें अनंत मस्तकांनीं युक्त, अनंत उदरांनीं युक्त, व अनंत पायांनीं युक्त असें विराट् स्वरूप दाखविलें.

गंभीर-भीमाकृति-दर्शनें जो पाषंडचित्ताप्रति कूट वाटे, ॥
भासे चमत्कारनिधी तटस्थां, श्रद्धापरां देवनिधान मोठें ॥ २१ ॥

पाषंड; नास्तिक, पाखांडी. **कूट**; कोडें. **तटस्थां**; तिऱ्हाइतांना, धड आस्तिक नाहींत व नास्तिक नाहींत अशांना. **श्रद्धापरां**; आस्तिकांना. **देवनिधान**; ईश्वरी साक्षात्काराची जागा.

विंध्याचें गंभीर व भयानक असें रूप तीन प्रकारच्या लोकांवर तीन प्रकारचा परिणाम करीत होतें. जे नास्तिक होते त्यांना तो एक मोठें कोडें आहेसा वाटत होता, जे आस्तिक नाहींत व नास्तिक नाहींत-तर तटस्थ होते त्यांना तो एक मोठा चमत्कारांचा (मनोरंजक देखाव्यांचा) निधि वाटत होता व जे आस्तिक होते त्यांना तो ईश्वरी साक्षात्काराचें स्थल वाटत असे, असा भाव. उल्लेख अलंकार.

झाला स्वकीयें विविधत्व-योगें निधान जो स्थावरजंगमांचें ॥
त्या पर्वतीं सर्वहि बीज-रूपें प्रतीत झालें जणुं विश्व साचें ॥ २२ ॥

विविधत्वयोगें; अनेकविधतेच्या गुणानें. **त्या...साचें** त्या पर्वताचे ठिकाणीं विश्वांतल्या सर्व पदार्थांचा बीजरूपानें जणूं काय भास होत होता.

गुहा गृहें ज्यावरि, वप्र भिंती, उद्यानशोभा वन-वृक्ष-माला, ॥
जल-प्रपात स्फुट वारियंत्रें, ज्या गोपुरें शृंग-समूह झाला ॥ २३ ॥

अधित्यका या मजले जयाचे, क्रीडांगणें जेथ उपत्यका हीं ॥
रथ्या जयाच्या लवणेंच, खिंडी वेशी, जया निर्झर पाणपोई ॥ २४ ॥

मनुष्यकार्यास विडंबिणाऱ्या अशापरीच्या बहु साधनांनीं ॥
शांतिप्रियां पक्षि-मृगादिकांची तो जाहला शाश्वत राजधानी ॥ २५॥

ज्याच्यावर गुहा हीं घरें आहेत, कडे या भिंती आहेत, वनवृक्षांच्या पंक्ति या बागा आहेत, धबधबे हीं कारंजीं आहेत, शिखरांचा समुदाय हीं गोपुरें आहेत, उंचवटे हे मजले आहेत, सखल जमिनी हीं खेळण्याचीं पटांगणें आहेत, लवणें हे रस्ते आहेत, खिंडी या वेशी आहेत, व झरे या पाणपोई आहेत,– तर अशाप्रकारच्या मनुष्यकृतीला लाजविणाऱ्या साधनांनीं तो पर्वत शांतताप्रिय पशुपक्ष्यांची चिरकाल टिकणारी राजधानी होता.

एकांत-गांभीर्य-मनोहरा ती शोभा गिरीची बघतां तयांसीं ॥
पुनःपुन्हां सौख्य विशेष वाटे साकेत-वासाहुनि दुर्गवासीं ॥ २६ ॥

एकांतगांभीर्यमनोहरा; निर्जन अशाप्रकारच्या भव्यपणामुळें सुंदर.

कोठें गुहा एक विशाल भासे अन्यत्र एक स्फुट वप्र आहे ॥
एके स्थलीं मर्मर-शब्द-शाली नगांतुनी निर्झर मंद वाहे ॥ २७ ॥

मर्मरशब्दशाली; झुळझुळ शब्द करणारा.

उपत्यकाग्रांवरि जागजागीं सवत्स गाई चरतात कोठें ॥
कड्यांवरोनी लवणांत खालीं घेती उड्याही अज सान मोठे ॥ २८ ॥

उपत्यकाग्रांवरि; सखल जमिनींच्या माथ्यांवर. **अज**; बोकड.

नगाग्रभागावरि एक जागीं बसूनियां निश्चल तार्क्ष्य-पक्षी ॥
बिळांतुनी मस्तक काढणाऱ्या सर्पा धरायास्तव संधि लक्षी ॥ २९ ॥

तार्क्ष्यपक्षी; गरुड.

स्वच्छंद देशीं करिती नगाच्या संचार दर्पोद्धत वन्य दंती ॥
गुहांतुनी निद्रित सिंह होते त्यांचीं पिलें खेळति आसमंतीं ॥ ३० ॥

दर्पोद्धत; मदमत्त. **वन्य दंती**; वनांतले हत्ती.

दिसे नगाग्रावरुनी तयांतें विशाल माला नग-दंतकांची ॥
ती भासली पर्वतसुंदरीची निसर्गरम्या जणुं हेम-कांची ॥ ३१ ॥

नगदंतकांची; पर्वताच्या सुळक्यांची. त्यांना पर्वताच्या माथ्यावरून दिसणारी सुळक्यांची लांबच लांब माळ पर्वतरूपी स्त्रीची ईश्वरदत्त अशी सुंदर सुवर्णमेखलाच जणूं काय वाटली.

त्या मध्यगा वेष्टुनियां गिरीतें ज्या राहिल्या पर्वत-पाद-पंक्ति ॥
मध्यें तयांच्या बहु शोभला तो सामंतचक्रीं जणुं चक्रवर्ती ॥ ३२ ॥

पर्वतपादपंक्ति; पर्वताच्या पायथ्याजवळच्या टेंकड्यांची ओळ. **सामंतचक्रीं**; मांडलिक राजांच्या समुदायांत.

तेथूनियां त्यां दिसलीं त्रिवर्गा क्षणक्षणीं चंचल-लोचनांनीं ॥
अधिष्ठितें पर्वतशाद्वलें तीं सर्वत्र सारंग-कदंबकांनीं ॥ ३३ ॥

त्रिवर्गा; तिघांना. **क्षणक्षणीं...तीं**; प्रतिक्षणीं डोळे फिरविणाऱ्या हरिणांच्या कळपांनीं गजबजलेल्या पर्वतावरच्या हिरवळ जमिनी.

त्या राघवा शैल-शिरः-प्रदेशीं पाहूनियां नीरधर-भ्रमानें ॥
निजानना चातक सिद्ध ठेवी, केकीहि नृत्यें करिति क्रमानें ॥ ३४ ॥

शैलशिरःप्रदेशीं; पर्वताच्या शिखरप्रदेशावर. **नीरधरभ्रमानें**; मेघाच्या भ्रांतीनें. भ्रांतिमान् अलंकार.

नगाग्र-भागीं पसरून होते वृक्षांवरी जे घन शुभ्र ठेले ॥
निजोन्नतीला अनुरूपशीं तीं कार्पासवस्त्रें जणुं वृक्ष ल्याले ॥ ३५ ॥

निजोन्नतीला...ल्याले; पर्वतांवरचे वृक्ष उन्नत-उंच जागचे (पक्षीं सुधारलेले) असल्यामुळें त्यांनीं आपल्या उन्नतीला योग्य अशीं कापसाचीं वस्त्रेंच जणूं काय मेघांच्या मिषानें धारण केलीं. पृथ्वीवरचे वृक्ष अवनत (न सुधारलेले) असतात म्हणून ते उघडे राहतात, पण पर्वतावरचे वृक्ष उन्नत असल्यामुळें त्यांनीं वस्त्रें धारण केलीं, असा भाव.

तेथूनियां त्यांस दिसून आली विशाल तापी जशि सान वापी ॥
सलीलगा निर्जर-वंद्य रेवा महानदी निर्झरशी तथापि ॥ ३६ ॥

तापी; तापी नदी. **जशि...वापी**; लहान विहिरीसारखी. **सलीलगा**; लीलेनें वाहणारी. **रेवा**; नर्मदा नदी. **महानदी...तथापि**; महानदी खरी पण ओढ्यासारखी दिसली.

जें दंडकारण्य असे नगाच्या विस्तारलें दक्षिण-भाग-वर्ति ॥
त्यांना अयोध्योपवनापरी तें दिसे नगाग्रावरुनी दिगंतीं ॥ ३७ ॥

नगाच्या दक्षिणभागवर्ति; विंध्याद्रीच्या दक्षिणेच्या बाजूला असलेलें. **अयोध्योपवनापरी**; अयोध्येंतल्या उपवनाप्रमाणें.

त्यां केधवां दुर्गशिरोधिरूढां, वप्रस्थितां, गव्हरगांहि केव्हां ॥
निसर्ग-शोभाऽकुल-लोचनांना दिनांत आला न कळून तेव्हां॥ ३८ ॥

दुर्गशिरोधिरूढां; शिखराच्या माथ्यावर चढलेल्या. **वप्रस्थितां**; कड्यावर बसलेल्या. **गव्हरगां**; गुहेंत शिरलेल्या. **निसर्गशोभाकुललोचनांना**, सृष्टिसौन्दर्य

पाहण्यांत ज्यांचे डोळे मग्न झाले आहेत अशा (त्यां). **दिनांत...तेव्हां**; त्या वेळीं सूर्यास्त झालेला कळला नाहीं.

क्रमें क्रमें जी नयनाभिरामा अस्पष्ट झाली सुषमा नगाची ॥
नेली तिनें ओढुनि पश्चिमेला विचक्षणा दृष्टि रघूत्तमाची ॥ ३९ ॥

नयनाभिरामा; नेत्रांना आल्हाददायक. **सुषमा**; शोभा. **विचक्षणा**; चिकित्सक, चतुर.

तों राघवें पश्चिम-चक्रवालीं आशा-द्वय-न्यस्त-मनोरथातें ॥
दोहींकडे किंतु निराश्रयातें विलोकिलें दीन दिवाकरातें ॥ ४० ॥

आशाद्वयन्यस्तमनोरथातें; दोन आशांच्या ठिकाणीं (पक्षीं दिशांच्या) ठिकाणीं ठेविली आहे इच्छा ज्यानें अशा (दिवाकरात). **दोहींकडे...निराश्रयातें**; दोन आशांच्या ठिकाणीं इच्छा धरणाऱ्या मनुष्याची ज्याप्रमाणें एकही आशा सफल होत नाहीं त्याप्रमाणें सूर्यानेंही दोन आशांच्या-(पूर्व व पश्चिम दिशांच्या) ठिकाणीं नजर ठेवल्यामुळें त्याला एके ठिकाणींही आसरा मिळाला नाहीं.

बाल्यांत जो सर्व वसु-व्ययातें करून तैसाच पुढें निघाला, ॥
परिभ्रमीं मध्यम काल जातां, तो वार्धकीं लाजुनि लाल झाला ॥४१॥

वसुव्ययातें; किरणांच्या (पक्षीं पैशाच्या) व्ययाला. **परिभ्रमीं**; भटकण्यांत. जो मनुष्य लहानपणीं आपलें सर्व वसु (पैसा) उधळून टाकतो त्याचें तारुण्य भटक्या मारण्यांत जातें व तो म्हातारपणीं पश्चात्तापानें लज्जित होतो, त्याचप्रमाणें सूर्यानेंही आपले वसु (किरण) लहानपणींच उधळले तेव्हां त्याचीही अवस्था तशीच झाली. असा भाव.

ज्यानें प्रमत्तें जन-ताप-दानीं निजाधिकार-व्यय पूर्ण केला ॥
होतां पदभ्रष्ट करूनि राही तो मित्र अस्ताचल-संश्रयाला ॥ ४२ ॥

प्रमत्तें; उन्मत्तानें. **जनतापदानीं**; लोकांना ताप देण्यांत. **अस्ताचलसंश्रयाला**; अस्तगिरीवर वसतीला.

सूर्याला मित्र असें नांव असून त्यानें आपल्या अधिकाराचा व्यय लोकांना पीडा करण्यांत केला, आणि जेव्हां त्याचा अधिकार गेला तेव्हां त्यानें अस्ताचलावर वास पतकरला. उन्मत्तपणानें अधिकार गाजवून पदभ्रष्ट झालेले लोक एकांतवास पतकरतात, असा भाव.

किंवा दिवा तो वसु-यज्ञ-कारी आरक्त पीतांबर नेसलेला ॥
आतां निदानावभृथावगाहा समुद्रतीरीं अवतीर्ण झाला ॥ ४३ ॥

दिवा; दिवसा. **वसुयज्ञकारी**; वसूंचा (किरणांचा) यज्ञ करणारा, पक्षीं द्रव्ययज्ञ करणारा. **निदानावभृथावगाहा**, यज्ञाच्या अखेरीचें अवभृथ स्नान करण्याकरितां. **अवतीर्ण झाला**; उतरला.

अस्ताचलस्था रविमंडलाला करूनि नीराजन, भक्तिजन्या ॥
विंध्यस्थ सीतापतिला प्रतीची अर्पूनि संध्याऽऽरति होय धन्या ॥ ४४ ॥

संध्यारति; सायंकाळची आरति. अस्तगिरीवर असलेल्या सूर्यमंडलाला नीरांजन करून पश्चिमादिशेनें विंध्याद्रीवर बसलेल्या रामाची सायंपूजा भक्तिपूर्वक केली व ती धन्य झाली.

जो अंधकारा हुडकीत गेला पूर्वेहुनी पश्चिम चक्रवाला ॥
कोठेंचि आतां गवसे न ऐसें मानूनियां आत्मगृहा निघाला ॥ ४५ ॥
अस्ताद्रिच्या राहुनि पैलभागीं हळूंच तो जों मुरडूनि पाहे ॥
सारा दिनाचा श्रम मोघ गेला, आहे तसें ध्वांत जगांत आहे ॥ ४६ ॥

जो सूर्य पूर्वक्षितिजापासून तों पश्चिमाक्षितिजापर्यंत अंधकाराला हुडकीत गेला आणि तो अंधकार आपल्याला कोठें सांपडत नाहीं असें पाहून, तसाच आपल्या घराला जाण्यास निघाला, तो सूर्य अस्ताचलाच्या पलीकडून जातां जातां मुरडून जों पाहतो ता त्याला दिसून आलें कीं, आपला दिवसाचा सारा श्रम व्यर्थ गेला, पृथ्वीवर काळोख भरलेला आहे तो आहेच.

तें पाहुनी शाठ्य तमोरिपूचें गेली जयाशा वितळून सारी ॥
मानूनियां शल्य पराजयाचें घेई उडी पश्चिम-सिंधु-नीरीं ॥ ४७ ॥

शाठ्य; कावा, लुच्चेगिरी अंधकाररूपी शत्रूचा तो कावा पाहून सूर्य निराश झाला, त्याला पराजयाचें शल्य वाटलें व त्यानें पश्चिमसमुद्रांत उडी टाकली. तेजस्वी पुरुषाला पराभवाहून मरण बरें वाटतें, असा भाव.

समुद्रनीरीं पतनोत्सुकाला त्या आपल्या पावन पूर्वजाला ॥
सौमित्रिनें जाउनि आणलेल्या देता जलें राघव अर्घ्य झाला ॥ ४८ ॥

देता...झाला; राघव अर्घ्य देता झाला, असा अन्वय.

अस्तास गेला जरि अंशुमाली राहे तयाची तरि हेमकांति ॥
गेले महात्मे जरि कालपाशीं मागें तयांची उरतेच कीर्ति ॥ ४९ ॥

अंशुमाली; सूर्य. **हेमकांति**; लाल प्रभा. दृष्टांत अलंकार.

पाहूनियां पात निज प्रियाचा जी जावया त्यासह सिद्ध झाली ॥
सिंदूर त्या पश्चिमभामिनीनें तो लाल वाटे भरला कपाळीं ॥ ५० ॥

पात; नाश. **त्यासह जावया**; त्याच्याबरोबर सती जाण्यास, उत्प्रेक्षा.

शय्यागृहीं नाथ निघून जातां त्यामागुनी जी अथवा निघाली ॥
द्वारास जी लावियली तिनें ती हेमार्गला शोभत चक्रवालीं ॥ ५१ ॥

नवरा शय्यागृहांत निघून गेल्यावर त्याच्यामागून जी स्वतः तेथें जाण्यास निघाली

त्या पश्चिमदिशारूपी स्त्रीनें क्षितिजरूपी दाराला जातांना ती सोन्याची कडी घातली. उत्प्रेक्षा.

कीं प्राग्वधू-प्रेरित कंदुकातें झेलावयातें चुकली प्रतीची ॥
गेला समुद्रांत निघून ऐसें पाहूनि लज्जा स्फुट होय तीची ॥ ५२ ॥

प्राग्वधूप्रेरित; पूर्वदिशारूप स्त्रीनें फेंकलेला. किंवा पूर्वदिशारूपी स्त्रीनें फेंकलेला सूर्यरूपी चेंडू पश्चिमदिग्वधूला झेलतां न येऊन तो समुद्रांत निघून गेला तेव्हां तिचें तोंड लज्जेनें आरक्त झालें. उत्प्रेक्षा.

आकर्षितां त्या समयीं रवीनें विस्तारलेली निज रश्मिमाला ॥
संतोषवाया रघुनंदनातें समीरही मंद सुगंधि झाला ॥ ५३ ॥

रश्मिमाला; किरणांचा समूह.

होता नभीं तापत सूर्य जेव्हां निःशब्द तेव्हां नगराज होता ॥
रवें गृहायात विहंगमांच्या भरूनि गेला परि तोच आतां ॥ ५४ ॥

निःशब्द; शांत. **गृहायात**; घरट्यांत आलेल्या.

दिनातपीं निद्रितकल्प ठेले जे पर्वताच्या घनगव्हरांतीं ॥
ते व्याघ्र संध्यासमयीं निघाले करावयातें जठरोपशांति ॥ ५५ ॥

दिनातपीं; दिवसा, सूर्याच्या उन्हांत. **निद्रितकल्प**; निजल्यासारखे. (वाघांची झोंप हलकी असते हें प्रसिद्ध आहे.) **घनगव्हरांतीं**; निबिड गुहांतून.

करावया त्या नृपदंपतीच्या जो स्वागता उत्सुक विंध्य झाला ॥
त्यानें तदा पेटवुनी लतांना सर्वत्र दीपोत्सव सांग केला ॥ ५६ ॥

नृपदंपतीच्या; राजवंशी वधूवरांच्या. (राम व सीतेच्या.) **लतांना पेटवुनी**; संध्याकाळ झाल्याबरोबर पेटणाऱ्या कांहीं लता पर्वतांवर असतात, त्या पेटवून.

स्पर्धा तयाशीं धरुनी सुरांनीं नक्षत्र-तारा-ग्रह-दीप-पंक्ति ॥
प्रदीप्त केल्या जणुं अंतरालीं विचित्रवर्णा रमणीयकांति ॥ ५७ ॥

नक्षत्रताराग्रहदीपपंक्ति; नक्षत्रें, तारा, ग्रहरूपी दिव्यांच्या ओळी.

स्थलीं स्थलीं तेथ उपत्यकांच्या होतीं तृणाचीं बहु जीं कुटीरें ॥
अल्पावकाशांतचि सर्व गेलीं भरूनि तीं भिल्लजनप्रसारें ॥ ५८ ॥

कुटीरें; झोंपड्या. **भिल्लजनप्रसारें**; भिल्लांच्या हालचालीनें.

त्यांनीं नगाग्रावरि बैसलेल्या सीतान्विता पाहुनि राघवाला ॥
हर्षातिरेकोद्भव गर्जनांनीं तो वज्रतुल्याद्रि दुभंग केला ॥ ५९ ॥

हर्षातिरेकोद्भव; पराकाष्ठेच्या आनंदानें उत्पन्न झालेल्या. **वज्रतुल्याद्रि**; वज्राप्रमाणें कठिण असा पर्वत.

अभ्यर्थना तेंवि निजोटजांच्या त्यांना सनाथीकरणार्थ केली ॥
पाहूनियां भाव तदंतरींचा ती राघवा सत्वर मान्य झाली ॥ ६० ॥

अभ्यर्थना; विनंति. **निजोटजांच्या सनाथीकरणार्थ**; आपल्या झोंपड्यांचा पाहुणचार घेऊन त्यांना कृतकृत्य करण्याकरितां.

पानार्थ वन्योदक, कंदमूलें भक्षावया, आसनही तृणाचें ॥
तें राघवातें रुचलें तथापि साधेंचि आतिथ्य वनेचरांचें ॥ ६१ ॥

वनेचरांचें; वनांत राहणाऱ्या भिल्लांचें.

त्यांचा प्रवासश्रम सर्व गेला विश्रांति घेतां मग अल्प कालें ॥
तों भिल्ल ते सादर लक्ष्मणाला विचारिते वृत्त तदीय झालें ॥ ६२ ॥

सादर; नम्रतापूर्वक.

ऐकूनियां तत्कथिता तदा ती उदारता श्रीरघुनायकाची ॥
श्रद्धा तयाच्या पद-पद्म-युग्मीं झाली स्थिरा सुस्थिरही तयांची ॥६३॥

झाली...तयांची; रामाची कीर्ति पूर्वींच त्यांनीं ऐकिली असल्यामुळें त्या भिल्लांची त्याच्यावर श्रद्धा होतीच, त्यावर लक्ष्मणाच्या तोंडून त्याची उदारता ऐकल्यावर ती ज्यास्तच दृढ झाली.

त्या पर्वतीं सरल-भिल्ल-समागमानें ॥
कालापनोद रघुनाथ करी सुखानें ॥
ऐकूनि भिल्ल-युवती-जन-भिन्न-गोष्टी ॥
सीतासतीहि घडली न मुळींच कष्टी ॥ ६४ ॥

सरल; साधे, एकमार्गी. **भिल्लयुवतीजनभिन्नगोष्टी**; भिल्लांच्या बायकांच्या नानाविध गोष्टी. **कालापनोद**; कालक्रमणा. वसंततिलका वृत्त.

ते मागती मग निरोप वनेचरांतें ॥
जाया पुढें त्वरित दंडककाननातें ॥
तें त्यांस वाक्य परि दुःसह फार झालें ॥
तल्लोचनांतुनि निरंतर अश्रु आले ॥ ६५ ॥
आक्रंदुनी बहु, जगत्त्रय-पुण्य-सद्मीं ॥
त लोळती सकल भक्त तदंघ्रिपद्मीं ॥
प्रस्थान तेथुनि सुदुष्कर राघवाला ॥
झालें, निवास मग तेथ पुनश्च केला ॥ ६६ ॥

जगत्त्रयपुण्यसद्मीं; त्रिभुवनांतल्या पुण्याचें स्थान अशा. **तदंघ्रिपद्मीं**; त्याच्या चरणकमलावर.

ऐसा काल क्रमुनि शिखरीं सर्वशैलोत्तमाच्या ॥
वाटे जेव्हां गमन परमावश्य चित्ता तयाच्या ॥
जाया तेव्हां परम भयदा दंडकाख्या वनाला ॥
प्रस्थानार्थ त्रिभुवनगुरू तेथुनी सिद्ध झाला ॥ ६७ ॥

प्रस्थानार्थ; निघण्याकरितां. **त्रिभुवनगुरू**; त्रिभुवनाचा गुरु राम. मंदाक्रांता वृत्त.

सर्ग ४ था.

सिद्धिसंचय समस्त सोडुनी लागतो परपथासि साधक ॥
तेंवि विंध्यनग लंघुनी पुढें चालला तपन-वंश-नायक ॥ १ ॥

परपथासि; पुढच्या मार्गाला (मोक्षमार्गाला). **तपनवंशनायक**; सूर्यवंशांतला श्रेष्ठ (राम). रथोद्धता वृत्त.

चालली अनुसरोनि जानकी तेंवि लक्ष्मणसखाहि तत्पदा ॥
त्वंपदाऽसि-पद-युग्म जेंवि हें अर्थयुक्त विनटोनि तत्पदा ॥ २ ॥

त्वंपदासिपदयुग्म; " तत् त्वम् असि " या महावाक्यांतील ' त्वम् ' आणि ' असि ' हीं दोन पदें. **अर्थयुक्त विनटोनि**; अर्थानें अवलंबून. **तत्पदा**; तत्त्वमसि या महावाक्यांतील तत् (ब्रह्म) या पदाला. त्वंपद आणि असिपद हीं ज्याप्रमाणें तत् या पदाला अर्थानें अनुसरतात त्याप्रमाणें सीता व लक्ष्मण हीं रामाला गतीनें अनुसरलीं असा भाव. उपमा.

जी भयंकर गभीर दर्शनें भीति पांथहृदयांत दाटवी ॥
ती तयांस मग घोर लागली तेथुनी वितत दंडकाटवि ॥ ३ ॥

पांथहृदयांत; वाटसरूंच्या मनांत. **वितत**; विस्तीर्ण. **दंडकाटवि**; दंडकारण्य.

सिद्ध ठेवि रघुनाथ जोडुनी सायकासि निज सायकासना ॥
संकटोदय न होय जोंवरी तोंचि योग्य तदुपाय-योजना ॥ ४ ॥

सायकासना; धनुष्याला. **तदुपाययोजना**; त्याच्या (संकटाच्या) उपायाची तजवीज. अर्थांतरन्यास.

जी निसर्ग-नवनीत-कोमला चालतां श्रम विशेष पावली ॥
ती रघूत्तमवधू पुनःपुन्हा स्तब्ध राहुनि वनीं विसांवली ॥ ५ ॥

निसर्गनवनीतकोमला; स्वभावतः लोण्याप्रमाणें मृदु अशी. **विसांवली**; विसांवा घेती झाली.

व्याकुला निमिषमात्र होउनी जी समर्थ न पुढें पथ-क्रमा ॥
तत्करा धरुनि, धैर्य देउनी, तीस राघव करी गतश्रमा ॥ ६ ॥

पथक्रमा; मार्गक्रमणास. **गतश्रमा**; जिचे श्रम गेले आहेत अशी, उत्साहयुक्त.

पाय कोमल जिचे तृणांकुरीं भेदुनी रुधिरदिग्ध जाहले ॥
दुःख तद्भव तिचें विलोकुनी राघवा श्रम विशेष वाटले ॥ ७ ॥

रुधिरदिग्ध; रक्तानें माखलेले. **तद्भव दुःख**; तृणांकुर टोंचल्यामुळें होणारें दुःख.

त्यां पथांत दिसले स्थलीं स्थलीं पर्णहीन तरु, भूमि निर्जना, ॥
शुष्क पूर्ण बहुतेक वल्लरी, जीर्ण पुष्पलतिका पुरातना ॥ ८ ॥

वल्लरी; वनस्पती. **पुरातना**; जुन्या, जर्जर झालेल्या.

अस्थि एक पडलें दिसे कुठें, केशही पसरले दुजा स्थलीं ॥
सांडली नरवसा इतस्तता, पल्वलें रुधिरजन्य वाळलीं ॥ ९ ॥

नरवसा; मनुष्यांची चरबी. **इतस्तता**; इकडे तिकडे. **पल्वलें...वाळलीं**; रक्त सांचून झालेलीं डबकीं वाळलेलीं दिसलीं.

दैत्यजात वसतें वनांत हें राघवास कळलें क्षणांतरीं ॥
कीं मनुष्य-वध-कर्म-पातकें कोण त्यासम दुजा अशीं करी ॥ १० ॥

दैत्यजात; दैत्यांची जात. **क्षणांतरीं**; क्षणामध्यें.

स्थंडिल-क्षिति दिसे विदारिली स्रुक्-स्रुवा नर-वसाऽवरूषिता ॥
सर्वही दिसति भग्न जाहल्या वेदिका रुधिर-संग-दूषिता ॥ ११ ॥

स्थंडिलक्षिति; यज्ञांतल्या स्थंडिलाची जागा. **स्रुक्-स्रुवा**; यज्ञांतलीं विशिष्ट उपकरणें. **नरवसावरूषिता**; मनुष्याच्या चरबीनें माखलेल्या. **वेदिका**; वेदी.

अंगणीं घटसमूह भंगिले, आश्रमांत नवनीत सांडिलें ॥
सृष्टि-नाश-कटु-कर्म राक्षसीं स्वैर केवळ वनांत मांडलें ॥ १२ ॥

सृष्टिनाशकटुकर्म; सृष्टीचा नाश करण्याचें वाईट कर्म. **स्वैर**; यथेच्छ.

भिन्न-शृंग-शकलाऽवशेषिकें राहिलीं सकल तेथ गोधनें ॥
शीर्ण पर्णकुटिका निवेदिती काल-पाश-पतितें तपोधनें ॥ १३ ॥

भिन्नशृंगशकलावशेषिकें; मोडक्या शिंगांचे तुकडे हेच आहेत अवशेष ज्यांचे अशीं. **गोधनें**; गाईचीं खिल्लारें. **शीर्ण**; उध्वस्त. **तपोधनें**; तपाचे निधि (मोठे ऋषि). त्या वनांत पूर्वी गाईचीं खिल्लारें होतीं हें त्यांच्या कोठें कोठें पडलेल्या शिंगांच्या तुकड्यांवरून कळत होतें व मोठमोठे ऋषि रहात असत हें त्यांच्या उध्वस्त झालेल्या पर्णकुटिकांवरून कळत होतें.

योगसाधन करावयास्तव ब्राह्मण स्थिर वनांत बैसले ॥
जे, तयांस असुरीं स्थलीं स्थलीं मारुनी यमपुरीस धाडिलें ॥ १४ ॥

स्थिर; ध्यानतत्पर, निश्चल.

दीर्घ-वृक्ष-विटपा दिसे कुठें लोंबतां जटिल एक टांगला ॥
तत्कलेवर कुजोनि काननीं तीव्र दर्प पसरून राहिला ॥ १५ ॥

दीर्घवृक्षविटपां; मोठ्या वृक्षाच्या डहाळीला. **जटिलें**; जटाधारी, तपस्वी.

दंड एक पुरिला, तयावरी ठेविलें मनुज-शीर्ष खोंवुनी ॥
नेत्रयुग्म फुटलें तदीय जें स्वैर वावरति कीट त्यांतुनी ॥ १६ ॥

मनुजशीर्ष; नरमस्तक.

हिंस्रही पशु न राहिले वनीं, कोंवि तेथ वसिजे शशोपमीं ॥
स्थूल वृक्ष, लघुकाष्ठ भेद हा काय राहत कृशानु-संगमीं ॥ १७ ॥

शशोपमीं; सशासारख्या क्षुद्र प्राण्यांनीं. **कृशानुसंगमीं**; अग्नीच्या समागमांत. त्या वनांत हिंस्र पशूसुद्धां राहिले नाहींत, मग सशांसारखे निरुपद्रवी प्राणी कसे रहावेत? अग्नीच्या तडाक्यांत मोठा वृक्ष आणि छोटी ढलपी हा भेद रहात नाहीं. दृष्टांत अलंकार.

क्षुद्र जीव उरले तशांत जे राक्षसांस नव्हते न भक्ष्य ते, ॥
सोडिले न अथवा दया-लवें, पातलेचि न तदीय लक्ष्यते ॥ १८ ॥

त्यांतूनही त्या वनांत कांहीं बारीक सारीक जीवजंतु उरले होते, पण ते त्यांचें भक्ष्य नव्हतें असें नाहीं किंवा दैत्यांना त्यांची थोडी दया येऊन त्यांनीं त्यांना सोडलें असेंही नाहीं, तर ते जीव त्यांच्या नजरेंतच आले नव्हते म्हणून वांचले होते असा भाव.

घूक भीषण रवें दिनोदयीं तेथ निर्भय बसोनि ओरडे ॥
हंस--सारस--विहीन राहिले नष्टपंकज तडाग कोरडे ॥ १९ ॥

घूक; घुबड. **दिनोदयीं**; दिवसां. **नष्टपंकज**; ज्यांतील कमलें नाश पावलीं आहेत असे. **तडाग**; तळीं.

दीर्घरोदन दिवा करी शिवा, दंदशूकहि विशंक हिंडती ॥
राक्षसां करुनि दंश जाहली तद्विशालरसना द्विखंड ती ॥ २० ॥

दिवा; दिवसां. **शिवा**; कोल्ही. **दंदशूक**; सर्प. **राक्षसां......ती**; (वनांत सर्प हिंडत होते तर राक्षसांना त्यांची पीडा झाली नाहीं का? असा कोणी आक्षेप काढल्यास,) राक्षसांना दंश करून त्यांच्याच जिभेचे दोन तुकडे झाले. राक्षसांस कांहींएक अपाय झाला नाहीं. अतिशयोक्ति अलंकार.

माल्य-कुंकुम-फलें वधूजनें जीं वनांत तुलसीस वाहिलीं ॥
पूज्य-पूजक-विनाश-दर्शनें म्लान तीं पडुनि आजि राहिलीं ॥ २१ ॥

माल्यकुंकुमफलें; फुलें, कुंकू व फळें, पूजा-द्रव्यें असा अर्थ. **पूज्यपूजकविनाशदर्शनें**; पूज्य अशी तुळस व पूजा करणाऱ्या ऋषि-स्त्रिया या दोन्ही नाहींशा झाल्या असतांना.

वाळुनी कलमकाननें वनीं काल कंठित तटस्थ राहिलीं ॥
ताल-पत्र-शकलें, कमंडलु-खंडही पसरले स्थलीं स्थलीं ॥ २२ ॥

कलमकाननें; कलम नांवाच्या धान्याचीं पिकें. **तालपत्रशकलें**; ताडाच्या पानांचे तुकडे. **कमंडलुखंड**; कमंडलूंचे तुकडे.

सृष्टिनाश पुरता करावया राक्षसां शिशिर साह्य जाहला ॥
तन्निषिक्त-हिम-वारि-बिंदुंनी शुष्क पादपसमूह नाहला ॥ २३ ॥

तन्निषिक्तहिमवारिबिंदुंनीं; त्यानें शिंपडलेल्या दंवाच्या बिंदूंनीं. **तन्निषिक्त०... नाहला**; राक्षसांना शिशिर ऋतु साह्य झाला तो त्यानें पहिलें काम हें केलें कीं, आधींच वाळून गेलेल्या वृक्षांना त्यानें दंवाचें स्नान घातलें (शुष्क झालेल्याला थंड पाण्याचें स्नान मानवणार नाहीं हें उघडच आहे.)

म्लान होउनि विनाश पावलीं पल्वलीं निखिल पद्मिनी-कुलें ॥
त्यां त्यजोनि सहकार-पल्लवीं चंचल भ्रमर सर्व चालले ॥ २४ ॥

चंचल; ज्यांची एके ठिकाणीं भक्ति नाहीं असे. कमलिनींना विपत्ति आल्याबरोबर भृंगे आम्रवृक्षावर निघाले. आपल्यास विपत्ति आल्यास चंचल मित्र त्याची पर्वा न करतां सोडून जातात असा आशय.

दांडग्या बघुनियां हिमर्तुचे मल्लिकेसह विनोद चालती ॥
थांबवोनि मृदु हास्य आपलें राहिली वरुनि मौन मालती ॥ २५ ॥

दांडग्या शिशिरऋतूचे मोगरीच्या लतेबरोबर विलास सुरू झाले हें पाहून मालतीनें आपलें मृदु हास्य थांबविलें व ती मौन धरून राहिली. (मोगरीला एखाद दुसरी कळी येऊं लागली व मालती फुलण्याची बंद झाली.) दुराचरणी राजा सुंदर स्त्रियांवर लोलुप आहे असें कळतांच कुलीन स्त्रिया गुप्त राहतात असा भाव.

ताप ते शिशिरदत्त मार्दवें वारिता प्रथम आम्र जाहला ॥
आर्जवें पुढति काल काढुनी शेवटीं अवगणोनि राहिला ॥ २६ ॥

शिशिर ऋतूची ती पीडा आम्रवृक्षानें प्रथम मार्दवानें निवारण केली. पुढें त्यानें आर्जवानें दिवस काढले, व शेवटीं तो शिशिरऋतूला जुमानीनासा झाला. आम्रवृक्षाला नवी पालवी फुटली होती तें त्याचें मार्दव, पुढें तो सरळ वाढूं लागला तें त्याचें आर्जव. या दोन्हीच्यायोगानें त्यानें प्रथम शिशिराचा लोभ संपादन केला व त्याची साल टणक होतांच तो त्याला जुमानीनासा झाला. मूर्खांना धूर्त लोक मार्दवानें व आर्जवानें फसवितात हा भाव.

कामिलोक मिळतां न पीडना वल्लरींस हिमवात झोंबला ॥
कोपपात्र सुटल्या करांतुनी गांजिती खल तदर्थ कोमलां ॥ २७ ॥

कामी लोकांना पीडा करण्याचा शिशिरवायूचा उद्देश होता, ते तर त्याला दंडकारण्यांत कोठें मिळेनात. तेव्हां तो वायु लतांना झोंबूं लागला. आपलें कोपपात्र हातांतून

निसटलें असतां दुष्ट लोक " वड्याचें तेल वांग्यावर " या न्यायानें गोरगरिबांना पीडा करतात. दृष्टांत व अर्थांतरन्यास यांचा संकर.

मातरिश्व-परिरंभ-भाजना जाहल्या निज वधू विलोकुनी ॥
गाळिती गलित-पर्ण-कैतवें बाष्पवारि जणुं वृक्ष काननीं ॥ २८ ॥

आपल्या लतारूपी स्त्रिया वायूच्या आलिंगनाला पात्र झाल्या हें पाहून वृक्षांनीं गलित पर्णाच्या मिषानें अश्रु ढाळण्यास सुरुवात केली. उत्प्रेक्षा.

मातरि ह्म० आकाशांत श्वयते ह्म० वाहतो तो मातरिश्वा.

कर्कशानिल, हिमातितीव्रता, दाहही बहु, तथा तनुव्यथा ॥
सद्गुणांस अतिरेक होउनी लागला जणुं हिमर्तु दुष्पथा ॥ २९ ॥

कर्कशानिल; रुक्ष वायु. **हिमातितीव्रता**; थंडीचा कडाका. **तनुव्यथा**; देहाला पीडा. शिशिरऋतु जातीचा चांगला पण त्याच्या सद्गुणांचा अतिरेक होऊन तो वाईट झाला.

पावनाश्रम तपोवनांतले जाळिले प्रथम ते निशाचरीं ॥
दाववन्हि अवशिष्ट काननां भस्मशेष निज विक्रमें करी ॥ ३० ॥

पावनाश्रम; ऋषींचे पवित्र आश्रम. **दाववन्हि.......करी**; उरलीं सुरलीं वनें दवानलानें जाळून खाक केलीं.

गर्वनाश परमोद्धत द्रुमां, पर्वनाश नत-वेतसी-वनां ॥
सर्वनाश लघु शालि-कानना, दुष्टनीति बहुधा विलक्षणा ॥ ३१ ॥

पवनाश; सांधे मोडणें. **वेतसीवनां**; बोरूच्या वनांना. **शालिकानना**; भाताच्या पिकांना. शिशिरऋतूची दंड करण्याची रीतही चमत्कारिकच होती. ती अशी कीं, दांडगे असे जे वृक्ष त्यांची त्यानें नुसती मानखंडना केली, ह्म० २८ व्या श्लोकांत सांगितल्या-प्रमाणें त्यांना अश्रु ढाळण्यास लावलें. वृक्षांच्या मानानें क्षुद्र अशीं बोरूंचीं वनें होतीं त्यांचीं त्यानें पेरीं मोडून टाकलीं अर्थात् त्यांना जबर शिक्षा केली. पण सर्वांत क्षुद्र अशीं जीं भाताचीं पिकें त्यांचा तर त्यानें सत्यनाशच केला. अर्थांतरन्यास.

भस्मराशि दिसती पदीं पदीं, लागलीं वितत दग्ध काननें ॥
जेथ तेथ पडलीं कलेवरें काय तें वन विशेष वानणें ॥ ३२ ॥

काय......वानणें; त्या वनाचें विशेष वर्णन काय करावें ?

राक्षसाचरित तें विलोकुनी राम चिंतित मनांत आपण ॥
मद्विलंब अवतारधारणीं जाहला खचित दोषभाजन ॥ ३३ ॥

राक्षसाचरित; राक्षसांची कृति.**अवतारधारणीं......दोषभाजन**; मीं अवतार घेण्यास उशीर केला ही मोठी चूक केली.

खालती करुनि मान चालला जो विचार कटु आणुनी मनीं ॥
जाहला सपदि राम ऐकता तो प्रिया-सभय-रोदन-ध्वनि ॥ ३४ ॥

सपदि; एकाएकीं. **प्रियासभयरोदनध्वनि**; सीतेची भीतियुक्त किंकाळी.

दुःखकारण-विलोकनार्थ जों एकचि क्षण असह्य साहिला ॥
तों विराधदितिपुत्र राघवें मार्गरोधक समीप पाहिला ॥ ३५ ॥

दुःखकारणविलोकनार्थ; दुःखाचें कारण काय आहे तें पाहण्याकारितां. **विराधदितिपुत्र**; विराध नांवाचा राक्षस. **मार्गरोधक**; वाट आडवून उभा राहिलेला. **दुःखकारणविलोकनार्थ...साहिला**; सीतेला दुःख झालेलें रामाला एक क्षणभरही सहन होत नसे. त्याचें तो लगेच निवारण करी. पण या वेळीं तिच्या किंकाळीचें कारण त्याला ठाऊक नसल्यामुळें तें काय आहे तें पाहीपर्यंतचा असह्य क्षण त्याला सहन करावा लागला.

भीमकाय घन-घर्घर-ध्वनि-ध्वस्त-कानन विशालबाहुही ॥
उग्रदंष्ट्र जणुं कज्जलाद्रि तो चालतां प्रतिपदीं चळे मही ॥ ३६ ॥

घनघर्घरध्वनिध्वस्तकानन; मेघाप्रमाणें गडगडणाऱ्या आवाजानें उध्वस्त करून टाकलें होतें वन ज्यानें असा. **कज्जलाद्रि**; काजळाचा पर्वत.

घूर्णिताक्ष, बहुलोमशाकृति, रुंड-माल-धर, चंडपातकी ॥
अस्थिकुंडल-विभूषित-श्रुति, व्यक्त मूर्त यमदंड घातकी ॥ ३७ ॥

घूर्णिताक्ष; तारवटलेले आहेत डोळे ज्याचे असा. **बहुलोमशाकृति**; अत्यंत केंसाळ आहे आकार ज्याचा असा. **रुंडमालधर**, मनुष्याच्या मस्तकांची माळ धारण करणारा. **चंडपातकी**; अघोर पातकी. **अस्थिकुंडलविभूषितश्रुति**; हाडकांच्या कुंडलांनीं भूषविले आहेत कान ज्यानें असा. **व्यक्त...घातकी**; घातकी असा यमाचा दंडच जणूं काय अवतरलेला.

रामहस्त असुरा विलोकितां घेत कार्मुक-गुणास ओढुनी ॥
कोपतंत्र न विवेकतंत्र हि क्षत्रहस्त निजशत्रुदर्शनीं ॥ ३८ ॥

कार्मुकगुणास; धनुष्याच्या दोरीस. **कोपतंत्र**; कोपाधीन. **विवेकतंत्र**; विवेकाधीन. **क्षत्रहस्त**; क्षत्रियाचा हात. राक्षसास पाहतांच रामाच्या हातानें धनुष्याची दोरी (आकर्ण) ओढली; कारण शत्रु पुढें दिसला असतां क्षत्रियाचा हात हा विवेकाधीन रहात नाहीं तर कोपाधीन होतो. क्षत्रियाला शत्रु दिसल्यावर तो विशेष विचार न करतां आपलें हत्यार एकदम उपसतो असा भाव.

तद्वधार्थ शर-मोचनोत्सुका कार्मुकासह धरूनि मत्सरा ॥
राघव-भ्रुकुटि वक्र जाहली स्वापमानकुपिता भयंकरा ॥ ३९ ॥

त्या राक्षसाला मारण्याकरितां बाण सोडण्यास उत्सुक झालेल्या धनुष्याबरोबर मत्सर धरून रामाची भुंवई अपमानानें क्रुद्ध होत्साती वक्र होऊन भयंकर दिसूं लागली. आपल्यासही बाण सोडतां येत असतां हें धनुष्यच आधीं बाण सोडणार कोण अस तिला मत्सर वाटला, असा भाव.

लक्ष्मण स्वधनु सांवरूनियां राक्षसा करि शरव्य जोंवरी ॥
राममुक्त शरयुग्म जाहलें तत्करांस हरितेंहि तोंवरी ॥ ४० ॥

शरव्य; लक्ष्य, जीवर बाण सोडावयाचा ती वस्तु. **राममुक्त...तोंवरी**; तोंवर रामानें सोडलेल्या दोन बाणांनीं राक्षसाचे हात तोडूनही टाकले.

आत्मकार्य करुनी शरासनीं बाण येउनि सर्वेचि बैसले ॥
हस्तहीन दनुजांग तेधवां नष्टशाख तरुसें विराजलें ॥ ४१ ॥

दनुजांग; राक्षसाचें शरीर. **नष्टशाख**; ज्याच्या फांद्या नाहींशा झाल्या आहेत असा.

छेदितां निज करांस राघवें दैत्य तो परम कोप पावला ॥
राघवावरि अहस्त तेधवां आननास पसरूनि धांवला ॥ ४२ ॥

अहस्त; ज्याचे हात तुटले आहेत असा.

धांवतां मग वदे तयास तो मानवा ! शिरुनि या वनांतरीं ॥
तूं सजीव सुटशील एथुनी ही नसेचि भवितव्यता खरी ॥ ४३ ॥

भवितव्यता; होण्यासारखी गोष्ट.

मन्निवास जंव येथ जाहला कोण मानव वसेल तोंवरी ॥
काय कानन शशास गम्य तें ज्या वनीं करि निवास केसरी ॥ ४४ ॥

शशास; सशाला. दृष्टांत अलंकार.

भक्ष्यहीन चिरकाल बैसलों संकटें करुनि जीवधारणा ॥
आजि भाग्यसुफलेंचि लाधली मानवी मजसि येथ पारणा ॥ ४५ ॥

लाधली......पारणा; (पुष्कळ दिवसांचा) उपवास सोडण्यास मनुष्याचें मांस मिळालें.

वार्धकें मम न गंध ओळखे नासिकेसि, न दिसेचि लोचना ॥
भक्ष्य यास्तव समीप येउनी पात्र आजवरि होय मोचना ॥ ४६ ॥

भक्ष्य...मोचना; माझे भक्ष्य जीव आजपर्यंत जवळ आले तरी सुटून जात असत.

त्वां परी मदपराधकारकें योजिलाचि उपकार हा मला ॥
कीं तवागमन येथ जाणण्या हस्तनाश मम हेतु जाहला ॥ ४७ ॥

परंतु तूं माझा अपराध करूनही माझ्यावर हा उपकार केलास कीं, माझे हात तुटले यावरून तूं येथें आला आहेस हें मला जाणतां आलें. विषमालंकार.

बोलुनी वच असें निशाचरें भीषणा उघडिलें निजानना ॥
राघवें निशित बाण काढुनी लाविला त्वरित सायकासना ॥ ४८ ॥
रामकार्मुक-विमुक्त बाण तो दैत्यकंठ-परिघास लागला ॥
तत्कलेवर-निपात-निस्वनें भूप्रदेश बहु कंप पावला ॥ ४९ ॥

तत्कलेवरनिपातनिस्वनें; त्याच्या धडाच्या पडण्याच्या आवाजानें.

चालतां शिर उडोनियां नभीं रक्तवृष्टि बहुसाल जाहली ॥
तच्छव–प्रसव शोणितापगा भूवरोनि निमिषैक वाहिली ॥ ५० ॥

तच्छवप्रसव शोणितापगा; त्याच्या प्रेतापासून निघालेली रक्ताची नदी.

अंबुदावरण फोडुनी जसा पावतो समुदया निशापति ॥
त्या शवांतुनि यथाक्रमें तशी जाहली प्रकट खेचराकृति ॥ ५१ ॥

अंबुदावरण...निशापति; मेघांचें आवरण फोडून ज्याप्रमाणें चंद्र बाहेर पडतो. **खेचराकृति**; यक्षाची आकृति.

तो नमस्कृति करूनि राघवा नम्र वाक्य भवसिंधु-सेतुला ॥
बोलला मदुपकारकारका गौरवास तुझिया नसे तुला ॥ ५२ ॥

भवसिंधुसेतुला; भवसमुद्रांतील सेतूच अशा (राघवा). **मदुपकारकारका**; मजवर उपकार करणाऱ्या. **तुला**; उपमा.

यक्ष मी त्रिदिववासि एकदां मद्यसेवन करूनि माजलों ॥
यक्षराज अवमानिला मदें शाप दारुण तदीय पावलों ॥ ५३ ॥

त्रिदिववासी; स्वर्गवासी. **यक्षराज**; कुबेर.

प्रार्थितां मग पदावलंबनें तो दयार्द्र धननाथ जाहला ॥
त्वत्करें मरण पावतां मिळे मुक्ति हें मधुर वाक्य बोलला ॥ ५४ ॥

पदावलंबनें; पायावर डोकें ठेवून. **धननाथ**; कुबेर.

मी वनांत मग दैत्य होउनी शापकाल बहुसाल कंठला ॥
त्वत्करें मरण आज पावतां शापमुक्त मम देह जाहला ॥ ५५ ॥

बहुसाल; मोठा, फार दिवसांचा.

यक्ष वाक्य जंव बोलुनी असें राघवांघ्रिकमलीं विरामला ॥
तों विमान समवेत घेउनी भृत्यसंघहि तदीय पातला ॥ ५६ ॥

भृत्यसंघ; किंकरांचा समुदाय.

यक्ष होउनि विमानरूढ तो चालला मग सुखें निजालया ॥
रामही त्वरित सिद्ध जाहला आपला पथ पुढें क्रमावया ॥ ५७ ॥
जो विराध वधिला रघूत्तमें दंडकाटवि-कलंक थोरला ॥
जीवसृष्टिंतिल जो विरोध तो तन्मिषें गलितमात्र जाहला ॥ ५८ ॥

गलितमात्र; गळल्यासारखा, (पक्षीं) ज्यांतील मात्रा निघून गेली आहे असा. रामानें दंडकारण्याचा मोठा कलंक असा जो विराध मारिला त्याच्या मिषानें जीवसृष्टींतल्या विरोधाचें मूळच नाहींसें झालें (पक्षीं विरोधाची मात्रा निघून गेली; विरोध या शब्दांतील मात्रा गेल्यावर विराध असा शब्द राहतो, हें उघडच आहे).

राक्षसास बघुनी अलौकिका जी भयार्त बनली निज प्रिया ॥
तीस आश्वसुनि पाणिबंधनें चालवी रघुकुलेश तद्भया ॥ ५९ ॥

अलौकिका; विचित्र, कधीं लोकांत न पाहिलेल्या. **पाणिबंधनें आश्वसुनि**; आलिंगनाच्या योगानें धीर देऊन.

सांगनानुज वनांत तेथुनी सांवरूनि धनु राम चालला ॥
विप्र-सूर्य-शरभंग-वासिता आश्रमास रजनीस पातला ॥ ६० ॥

सांगनानुज; बायको व धाकटा भाऊ यांसहित. **विप्रसूर्यशरभंगवासिता**; ब्राह्मणांतला सूर्य असा जो शरभंगऋषि त्यानें वसविलेल्या.

दंडकाख्य वन या तपोवनासंनिधीस बहुतेक संपलें ॥
तत्स्मृतीस करुनी पुनःपुन्हां जानकीवपु तथापि कंपलें ॥ ६१ ॥

या तपोवनासंनिधीस; शरभंगऋषीच्या तपोवनाच्या सुमारास.

कुष्ठजर्जर मुनीस त्या तदा रोगमुक्त करि राम तो वशी ॥
जो भवार्तिहर काय ती तया दुष्करा कृति घडेल फारशी ॥ ६२ ॥

कुष्ठजर्जर; कोडानें पीडलेला. **वशी**; इंद्रियें ज्याच्या अधीन आहेत तो, (पर्यायानें) सिद्धींवर सत्ता चालविणारा. **जो...फारशी**; जो भवरूपी व्याधीची पीडा शमन करण्यास समर्थ आहे त्याला लौकिक क्षुद्र व्याधि नाहींशा करणें अवघड आहे काय ?

क्रमुनि रजनि तेथें जावयातें पुढारां ।
त्यजुनि मुनिवराच्या पुण्यरूपा बिढारा ॥

अवगणुनि न मार्गीं जाहलेल्या श्रमाला ।
रघु-तिलक निघाला तो सुतीक्षणाश्रमाला ॥ ६३ ॥

पुण्यरूपा बिढारा; पवित्र आश्रमाला. **सुतीक्षणाश्रमाला**; सुतीक्ष्ण ऋषींच्या आश्रमाला. मालिनीवृत्त.

भ्रमर विजनारण्यीं जैसा परिभ्रमुनी श्रमे ।
कुवलय-वनीं शेखीं पावे सुखास, मुदें रमे ॥
रघुपति तसा संचारातें भयंकर काननीं ।
करुनि वसता झाला मार्गीं सुतीक्षणतपोवनीं ॥ ६४ ॥

कुवलयवनीं; कमलवनांत **मुदें**; आनंदानें. हरिणीवृत्त.

सर्ग ५ वा

पुढतीं सुतीक्ष्ण-निलयास सोडुनी ॥ स्वशरासना निशित बाण जोडुनी ॥
मग चालला रघुपती तपोवना ॥ बुध-कामिता विबुध-कार्य-साधना ॥ १ ॥

सुतीक्ष्णनिलयास; सुतीक्ष्ण ऋषीच्या आश्रमाला. **बुध०...०साधना** ऋषींनीं इच्छिलेल्या देवांच्या कार्यांच्या सिद्धीकरितां (रावणवधाकरितां). मंजुभाषिणी वृत्त.

जगदीश्वरी पतिपदानुगामिनी ॥ विलसे समीप रघुराजकामिनी ॥
पतिला निघे अनुसरून कानना ॥ वसुधा-सुता नव-सुधाकराऽनना ॥ २ ॥

पतिपदानुगामिनी; पतीच्या पावलांमागून चालणारी, (पतीच्या इच्छेनुरूप सर्वथा वागणारी). **नवसुधाकरानना**; नवचंद्राप्रमाणें आहे मुख जिचें अशी.

अथवा पुराणपुरुषैक-संश्रिता ॥ कशि ती वसे पतिविणें पतिव्रता ॥
कमला स्वयेंहि अवतार घेउनी ॥ रमली वनीं परमलीन होउनी ॥ ३ ॥

पुराणपुरुषैकसंश्रिता; परमात्म्या महाविष्णूंचे ठिकाणीं एकनिष्ठ अशी. जी स्त्री पतीचे ठिकाणीं एकनिष्ठ आहे ती पतीवांचून राहणार नाहीं हें उघडच आहे. तेव्हां याच न्यायानें लक्ष्मीनेंही आपला मोठेपणा बाजूस ठेवून पृथ्वीवर अवतार घेतला आणि वनांत सुख मानलें.

पतिच्या सवें विचरतां वनांतुनी ॥ श्रमली, तरी लव न दुःख मानुनी ॥
जनकात्मजा कुतुकयुक्त चालली ॥ जगतीवरी गजगती विराजली ॥ ४ ॥

कुतुकयुक्त; हौसेनें. सीता वनवासास निघाली असूनही तिची गजगति कायम राहिली, असा भाव.

रमणी-विलास-सुख सर्व सोडुनी ॥ रघुनायकासह फिरे वनोवनीं ॥
कृतकृत्य लक्ष्मण, तदीय भूवरी ॥ महिमा दुराक्रम हिमाचलापरी ॥ ५ ॥

रमणीविलाससुख; सुंदर स्त्रीसह विलासभोगांचें सुख. **कृतकृत्य**; धन्य. **दुराक्रम**; अवर्णनीय.

विकचांबुजापरि विशाललोचना ॥ शरधारका जलद-नील-रोचना ॥
रघुनंदना बघुनि पुष्पकोमला ॥ मदनान्तरांत मदनाश जाहला ॥ ६ ॥

विकचांबुजापरि; विकसलेल्या कमलांप्रमाणें. **जलदनीलरोचना**; मेघाप्रमाणें निळी आहे कांति ज्याची अशा. **मदनांतरांत...जाहला**; आपल्या सर्व गुणांनीं संपन्न अशा रामाला पाहून मदनाचा सौन्दर्यमद जिरला.

सशरासनाहि करुणार्द्रलोचना ॥ मृगयापरा न मृग-बाण-मोचना ॥
फिरतां सलील गतिनें वनांतुनी ॥ रमणीयुता नरमणीस पाहुनी ॥ ७ ॥
अवलोकनीं चपल, धावनीं तथा ॥ तृण भक्षितां फिरत जी इतस्तता ॥
हृदयांत ती लव न भीति पावली ॥ हरिणी, सुखें विहरिणीच राहिली ॥८॥

सशरासनाहि करुणार्द्रलोचना; धनुर्धारी असूनही स्नेहपूर्ण आहेत डोळे ज्याचे अशा. **मृगयापरा न मृगबाणलोचना**; शिकार करणाऱ्या पण मृगांवर बाण न टाकणाऱ्या अशा. सीतायुक्त रामाला पाहून जिची दृष्टि व गति चपल होती व जी गवत खात खात वनांत इकडे तिकडे फिरत होती त्या हरिणीनें यत्किंचितूही भय न मानतां आपलें निर्भय फिरणें तसेंच चालूं ठेविलें. परिकर अलंकार.

सुखवावया स्ववपु फार तापलें ॥ रघुराज आश्रयिल मूळ आपलें ॥
परिरंभसौख्य हृदयांत आणिती ॥ पवनाढ्य पादप वनांत डोलती ॥ ९ ॥

पवनाढ्य; वायूनें संपन्न. आपल्या उन्हानें तापलेल्या शरीराला सुख देण्यासाठीं राम आपल्या सांवलीला येईल त्या वेळीं त्याचें आपल्याला जें आलिंगन मिळेल त्याचें सुख मनांत आणून वायुसंपन्न वृक्ष डोलूं लागले.

करुनी तदीय कुशलार्थ तत्क्षणीं ॥ मग लिंबलोण निज-पुष्प-वर्षणीं ॥
पथिकोत्तमावरुनि दृष्ट काढिली ॥ तरुनीं जणों उतरुनीहि टाकिली ॥ १० ॥

पथिकोत्तमावरुनि; प्रवास करणारांत श्रेष्ठ अशा रामावरून. वृक्षांनीं रामाच्या कुशलाकरितां आपल्या पुष्पवृष्टींच्या मिषानें त्याच्यावरून लिंबलोण करून त्याची तात्काळ दृष्ट काढली व ती उतरूनही टाकिली.

**स्वसुता स्वभारहरणार्थ मानिनी ॥ फिरते अशी पतिसवें वनोवनीं ॥
बघुनी तिचें चरित थोर, मेदिनी ॥ हंसली महीरुह-सलील-कूजनीं ॥ ११ ॥**

महीरुहसलीलकूजनीं; महीरुह ह्म० वृक्ष, त्यांतून निघणाऱ्या मंजुळ नादांनीं. आपली कन्या आपला भार कमी करण्यास साह्य करण्याकरितां पतीबरोबर अशी (वस्त्रें, भूषणें टाकून वल्कलें नेसून) फिरते आहे, तें तिचें उदार चरित्र पाहून पृथ्वी वृक्षांच्या मंजुळ नादांच्या रूपानें हंसली. उत्प्रेक्षा.

**निज सायकीं निवटितो खलांस जो ॥ गतराज्य राघव सुखें वना भजो ॥
जगतीस शासन वनस्थही परी ॥ कुटिलानत-भ्रुकुटि-लाघवें करी ॥ १२ ॥**

कुटिलानतभ्रुकुटिलाघवें; वांकड्या झालेल्या भुंवईच्या लीलामात्रानें. आपल्या बाणांनीं दुष्टांना मारणाऱ्या रामाचीं राज्यभूषणें जाऊन तो खुशाल वनांत येवो; परंतु तशा वनवासी स्थितींतही तो आपल्या नुसत्या वक्र भृकुटीच्या लीलेनें पृथ्वीवर सत्ता चालवीत होता. तशी सत्ता चालविण्यास त्याला राज्यवैभवांची उणीव आड आली नाहीं, असा भाव.

**वननिर्झरांत जल-पान-तत्परा ॥ कर-खेलनें चलित-धूलि-धूसरा ॥
बघुनी विदेह-तनया-पद-क्रमा ॥ करि-कामिनी न करि काम-विभ्रमा ॥१३॥**

करखेलनें चलितधूलिधूसरा; सोंडेच्या लीलेनें उडालेल्या धूलीमुळें मलिन झालेली. **बघुनी...कामविभ्रमा**, सीतेच्या मंद गतीला पाहून हत्तिणीनें आपली शृंगारचेष्टा बंद केली. आपल्याहून चतुर अशा दुसरीला पाहिल्यावर स्त्रियांच्या रंगाचा भंग होतो, असा भाव. व्यतिरेक अलंकार.

**जवळी वसंत ऋतुराज पावला ॥ पिक-दूत हें श्रुत करीत धांवला ॥
सजला तदा अनुसरून यौवना ॥ सहकार वल्लिसह कामसेवना ॥ १४ ॥**

सजला...कामसेवना; त्या वेळीं आपल्या तारुण्याला अनुसरून आम्रवृक्ष लते-बरोबर क्रीडा करण्यास सज्ज झाला.

**परि माधवी निकट जी विराजली ॥ परिरंभणा विमुखशीच भासली ॥
मग आम्र तो विटप-पाणि-पल्लवीं ॥ रुसली प्रिया तरु सलील खेळवी ॥१५॥**

विटपपाणिपल्लवीं; शाखारूपी हातांच्या बोटांनीं. परंतु जवळच असलेली माधवी-लता आपणास आलिंगन देण्यास नाखुष आहे असें पाहून आम्रतरूनें आपल्या शाखा-रूपी हातांच्या पल्लवांनीं त्या रागावलेल्या प्रियेची समजूत काढण्यास सुरुवात केली.

**सुखमग्नही तरु रघूत्तमावरी ॥ करि सांवली, निज शिरीं उन्हा धरी ॥
जन जेंवि थोर दुसऱ्यांस रक्षितो ॥ हित-साधनांतहि तसा न दक्ष तो ॥१६॥**

जन......तो; उदार मनुष्य दुसऱ्यांचें रक्षण करण्यांत जितकी दक्षता दाखवितो तितकी आपल हित साधण्यांतसुद्धां दाखवीत नाहीं. अर्थांतरन्यास.

अथवा करोनि तरुकाष्ठ दंड हा ॥ छदसंघ हें पट-वितानही महा ॥
जणुं राघवावरि दिनातपत्र तें ॥ सुमती धरी वसुमती सदीप्सितें ॥ १७ ॥

तरुकाष्ठ; झाडाचें खोड. **छदसंघ**; पानांचा समुदाय. **पटवितान**; अभ्रा. **दिनातपत्र**; छत्री. **सदीप्सितें**; चांगल्या बुद्धीनें. अथवा झाडाच्या खोडास छत्रीचा दांडा करून व पानांच्या समुदायास अभ्रा करून पृथ्वीनें रामावर चांगल्या मनानें ती आम्रवृक्षरूपी छत्रीच जणूं काय धरली. उत्प्रेक्षा.

निज-पंचम-स्वर-विलास पोषवी ॥ रघुनायका सुरसिकास तोषवी ॥
परमप्रसादमय गान गाउनी ॥ कविराजसा पिक विराजला वनीं ॥ १८ ॥
विपिनीं तिघांहि पथिकांस संप्रति ॥ मृदु मारुतें सुखविलें तयां अति ॥
विविधें तथा मधुर पक्षि-कूजितें ॥ निलयोदरांतुनि लयोपपूरितें ॥ १९ ॥

निलयोदरांतुनि; घरट्यांच्या आंतून. **लयोपपूरितें**; लय म्हणजे ठराविक अंतरानें उत्पन्न होणें त्यानें युक्त अशा (पक्षिकूजितें). **विविधें.......लयोपपूरितें**; त्याचप्रमाणें घरट्यांतून सारख्या प्रमाणानें ऐकूं येणाऱ्या पक्ष्यांच्या नानाप्रकारच्या मधुर गायनानेंही त्यांना सुखविलें.

वनकुंज एक निकटीं विलोकुनी ॥ बसले सुखें पथिक त्यांत जाउनी ॥
बहु सांवली पसरली तदंतरीं ॥ रवितीव्रता नुरवि ती तयांवरी ॥ २० ॥

वनकुंज; वनलतांची जाळी. **रवितीव्रता ...... तयांवरी**; त्या सांवलीनें त्यांना सूर्याची तीव्रता मुळींच भासूं दिली नाहीं.

लतिकाप्रतान जिस रज्जु शोभती ॥ पट पर्णपल्लव जिच्यासभोंवतीं ॥
वनभूमिनें नरवरार्थ निर्मिली ॥ वनिं काय ती जवनिकाच भासली ॥ २१ ॥

लतिकाप्रतान; लतांचे तंतु. **रज्जु**; दोऱ्या. **जवनिका**; पडदे लावून केलेली खोली. जिला लतांचे तंतू या दोऱ्या आहेत व पानें आणि पल्लव हे पडदे आहेत अशी ती कुंजरूपी पडद्याची खोलीच वनभूमीनें जणूं काय रामाकरितांच तयार करून ठेविली होती.

अनुजांगनासहित तो निरातपीं ॥ रघुवंशदीप वन-वल्लि-मंडपीं ॥
घडि एक शांत हृदयें विसांवुनी ॥ विपिनांत घालवि पिनाकिचिंतनीं ॥२२॥

निरातपीं; ज्यांत ऊन्ह येत नाहीं अशा. **पिनाकिचिंतनीं**; शंकराच्या स्मरणांत.

दिसली तयांस तिथुनी मनोहरा ॥ वनभूमि ती विविध-पुष्प-सुंदरा ॥
तिलकें दिसे तरि खरी विलासिनी ॥ तिलकाविना न तिल कांत कामिनी॥

विविधपुष्पसुंदरा; नानाप्रकारच्या फुलांनीं सुंदर दिसणारी. **तिलकें**; तिलक नांवाच्या झाडानें. **तिलकें......कामिनी**; तरी ती वनभूमि तिलकाच्या वृक्षामुळें

खरी मनोहर दिसत होती. स्त्रीजातीला तिलक (कुंकवाचा टिळा) असल्याशिवाय लवमात्रही शोभा नाहीं. विनोक्ति अलंकार.

वनकष्ट साहुनि समस्त मैथिली ॥ पतिला सबाह्य निरखूनि मीनली ॥
वश राहिली निज पतीस होउनी ॥ कलहंकरा हि कलहंसकामिनी ॥ २४ ॥

सबाह्य मीनली; अंतरंगानें व बहिरंगानें मिळालेली. **कलहंकरा**; भांडण करणारी. **कलहंसकामिनी**; हंसी.

लतिकांतरीं फिरुनि फार भागली ॥ तपनातपें व्यथित फार जाहली ॥
निज गुंजिता त्यजुनि षट्पदावली ॥ वलयीकृता कुवलयीं विसांवली ॥२५॥

तपनातपें; सूर्याच्या उन्हानें. **षट्पदावली**; भुंग्यांची पंक्ति. **षट्पदावली... विसांवली**; भुंग्यांची पंक्ति कमलाच्या पुष्पावर वर्तुळाकार बसली.

गजपीडिता गलित पूर्ण जाहली ॥ जनकात्मजाक्षियुगलें विलोकिली ॥
मग ती स्वजातिकृत शांति लाधली ॥ मलिनीकृता कमलिनी विकासली २६

जनकात्मजाक्षियुगलें; सीतेच्या दोन्ही डोळ्यांनीं. **मलिनीकृता**; विशोभित झालेली. **मग ती... विकासली**; सीतेचे डोळे कमळांप्रमाणें असल्यामुळें ते कमलिनीकडे लागतांच तिला आपल्या दुःखाचें स्वजातीयांनीं शांतवन केल्याप्रमाणें वाटून ती टवटवीत दिसूं लागली.

निकटीं असे मुनिकुटीर पातलें ॥ रघुनायकास हृदयांत वाटलें ॥
अथवा दिसेल मग केंवि अन्यथा ॥ रुचिरा अशी तरु-चिराभिरामता ॥२७॥

मुनिकुटीर; ऋषींचा आश्रम. **तरुचिराभिरामता**; झाडांची एकसारखी शोभा. रामानें तर्क केला कीं, एखाद्या ऋषीचा आश्रम जवळ आला असला पाहिजे. एरवीं निर्जन दंडकारण्यांत असली सृष्टिशोभा कशी दिसावी ?

रस लोपला सकलही जयांतला ॥ नव-पुष्प-निर्गम यदीय थांबला ॥
अथवा अशा मग कशा पुरातना ॥ लतिका वनीं फुलति कारणाविना ॥२८॥

नवपुष्पनिर्गम...थांबला; ज्यांचा फुलांचा बहार बंद झाला आहे, अशा लता फुलताहेत हेंही ऋषीचा आश्रम जवळ आला असल्याचेंच लक्षण होय. कारण ऋषिसामर्थ्याशिवाय असें कसें घडेल ? विभावना अलंकार.

फिरतो विदारित नगां नखोत्करीं ॥ जवळीं निसर्गरिपु आपला हरि ॥
परि मानसीं भय मुळीं न मानिती ॥ भवनांपरी इभ वनांत वागती ॥ २९ ॥

नखोत्करीं; नखांच्या समुदायांनीं. **निसर्गरिपु**; जन्मतः शत्रु. **हरि**; सिंह. **परि... वागती**; परंतु त्याचें मुळींच भय न मानतां हत्ती अगदीं घरांत असल्यासारखे वनांत वावरत आहेत. हेंही आश्रम जवळ आल्याचेंच चिन्ह. विशेषोक्ति अलंकार.

वनसृष्टिचें मधुर रूप पाहुनी ॥ मग योजिती निज निवास काननीं ॥
दिवसांतकाल निकट प्रवर्तला ॥ रविही तसा करविहीन जाहला ॥ ३० ॥

करविहीन; ज्याचे किरण गेले आहेत असा. **दिवसांत...प्रवर्तला;** सूर्यास्ताचा काळ जवळ आला.

क्रमिजे कुठें परि वनांत यामिनी ॥ रघुनाथ मग्न जंव होय चिंतनीं ॥
तंव जाहली दुरुनि तच्छ्रुतीवरी ॥ कल-नाद-मंद-कलना वनांतरीं ॥ ३१ ॥

कलनादमंदकलना; अस्पष्ट शब्दांची मंद अशी जाणीव. **तंव...वनांतरीं;** तोंवर त्यांच्या कानाला दूर कोठें तरी अस्पष्ट व मंद असे शब्द ऐकल्याचा भास झाला.

मग शब्द-सूचित दिशेस चालले ॥ प्रथम स्फुटाविशद नाद वाटले ॥
जंव पातली निकट नादिनी मही ॥ निगमेतर ध्वनि गमे न एकही ॥ ३२ ॥

शब्दसूचित; शब्दांनीं सुचविलेल्या. **स्फुटाविशद;** मोठे पण अस्पष्ट. **नादिनी;** नाद करणारी. मग ते जिकडून शब्द ऐकूं येत होता त्या दिशेकडे चालले तेव्हां त्यांना मोठे पण अस्पष्ट असे शब्द प्रथम प्रथम ऐकूं आले, पण शब्दांची जागा जसजशी जवळ येऊं लागली तसतसा वेदांवांचून त्यांना एकही ध्वनि ऐकूं येईना (ते शब्द वेदपठनाचे आहेत अशी त्यांची खात्री झाली).

घटसंभवें वसविला वनस्थलीं ॥ परिवेष्टिला मुनि-महेंद्र-मंडलीं ॥
मग जाहला प्रकट तो यथाक्रम ॥ नग-भीम-दर्शन-गभीर आश्रम ॥ ३३ ॥

घटसंभवें वसविला; घटापासून जन्मलेल्या (अगस्त्य) ऋषीनें वसविलेला. **मुनिमहेंद्रमंडलीं परिवेष्टिला;** मोठमोठ्या महर्षींनीं ज्याच्याभोंवतीं वस्ती केली आहे असा. **नगभीमदर्शनगभीर;** पर्वताप्रमाणें मोठा दिसणारा व भव्य.

रघुराज तो तदनुसार चालला ॥ निकटीं सहानुज सदार पातला ॥
मग तो करी निज तनू गतश्रमा ॥ मुनिपालिता नमुनि पावनाश्रमा ॥ ३४ ॥

मग.....पावनाश्रमा; ऋषीच्या पवित्र आश्रमाला लोटांगण घालण्यानें रामाला आपले सर्व श्रम नाहींसे झाल्याप्रमाणें वाटले.

पुढतीं उठून रघुनाथ चालतां ॥ जटिलाश्रमानिकट होय पाहता ॥
जननी-पयोधर-चतुष्टयोन्मुखा ॥ कुश-लास्य-केलि-कुशला मृगार्भका ॥ ३४ ॥

जननी०.....आईच्या चारी स्तनांकडे वळविलीं आहेत मुखें ज्यांनीं अशा. **कुश-लास्यकेलिकुशला;** गवतांमधून नाचण्याबागडण्यांत कुशल अशा.

दिसली तयां पुढति जी शुचि स्थलीं ॥ सदनांगणीं जपुनि फार रक्षिली ॥
मुनि-कामिनी-निचय-कुंकुमार्चिता ॥ तुलसीलता अतुल-सीकरांऽकिता ३६

मुनिकामिनी०...; ऋषींच्या बायकांनीं कुंकुमादिकांनीं पूजिलेली. **अतुल०...;** मोठ्या मोठ्या पाण्याच्या तुषारांनीं युक्त अशी.

कपिला अरज्जुकृत–कंठ–बंधना ॥ दिवसोदयीं जनकृताभिवंदना ॥
मुनिलालिता रघुवरें विलोकिली ॥ सुरभी न जी असुरभीति पावली ॥३७॥

कपिला; काळी. **अरज्जुकृतकंठबंधना**; जिच्या गळ्यांत दोरीनें लोढणें अडकविलें नाहीं अशी, मोकळी. **सुरभी**; कामधेनु.

घटनंदनें निज मनीं विचारिलें ॥ रघुराज कीं अतिथि आज पातले ॥
म्हणवोनि सत्वर समीप पावला ॥ शमि–तात तो प्रशमितारिमंडला ॥३८॥

विचारिलें; विचार केला. **शमितात**; शमी म्हणजे शांत अशा ऋषींचा तात, गुरु. **प्रशमितारिमंडला**; जिंकलें आहे शत्रुमंडल ज्यानें अशा रामासमीप, असा अन्वय.

निगमावतार जणुं मूर्त काय तो ॥ प्रणव स्वयंभु मुनिरूप नांदतो ॥
जणुं मंगलायतन तें तपोधना ॥ गुरुराजही अगुरु–राशिसा जनां ॥ ३९ ॥

निगमावतार; वेदांचा अवतार. **प्रणव**; ओंकार. **तपोधनां मंगलायतन**; सर्व तपःसामर्थ्याचें पवित्र माहेरघर. **गुरुराजही० ...जनां**; तो स्वतः लोकांना गुरुराज असून अगुरुराशीप्रमाणें–कृष्णागुरूच्या राशीप्रमाणें शीतल होता.

जड सोडवील सुतपा अघांतुनी ॥ बहु हें न तादृश महा–तपोधनीं ॥
भवसागरासहि परंतु तूर्ण ती ॥ सुकवी तदीय सुकवीरिता स्तुति ॥ ४० ॥

तो महर्षि जडांना पापांतून सोडवील यांत त्याच्यासारख्या तपोधनाला विशेष असें कांहींच नाहीं; पण सुकवींनीं केलेली त्याची स्तुति भवसमुद्राला सुद्धां आटवून टाकील.

लतिकेसि पल्लव, लताहि शोभवी ॥ अचलास पर्वत महीस भूषवी ॥
मुनिलाहि शोभवित तेंवि राहिली ॥ वलिता जरा–धवलिता जटावली॥४१॥

वलिता; वळलेली. **जराधवलिता**; वार्धक्यानें पांढरी झालेली. मालोपमा.

अतिथिक्रियेस्तव समीप राहिला ॥ रघुनंदनें मुनिमहेंद्र पाहिला ॥
भरलें कृपामृत तदीय लोचनीं ॥ तरती तदाहित–रती भवांतुनी ॥ ४२ ॥

अतिथिक्रियेस्तव; आतिथ्य करण्याकरितां. **मुनिमहेंद्र**; ऋषींतला इंद्र (अगस्त्य). **तदाहितरती**; त्याच्या ठिकाणीं ठेवली आहे भक्ति ज्यांनीं असे.

मुनि–पाद–पंकज–युगीं रघूत्तमें ॥ शिर ठेविलें, तदनुजेंहि संभ्रमें ॥
ऋषिराजही मग नमी सुरप्रिया ॥ नमनीं दिसे मन, मनीं नमस्क्रिया ॥४३॥

तदनुजेंहि संभ्रमें; लक्ष्मणानेंही ऋषीला गोंधळून नमस्कार केला. **सुरप्रिया**; देवांना प्रिय अशा (रामाला). **नमनीं...नमस्क्रिया**; त्यांनीं परस्परांना जे नमस्कार केले त्यांत त्यांचीं मनें उतरलीं होतीं, ह्मणजे ते त्यांच्या मनापासून होते व त्यांच्या मनांत नमस्कार उतरले होते, म्ह० त्यांचीं मनें आदरपूर्ण होतीं.

नृपदर्शनें मुनिवरास जाहला ॥ बहु मोद तो न जठरांत मावला ॥
जरि यामिनी-चर-वधार्थ सेविला ॥ उद-राशि सर्व उदरांत राहिला ४४

यामिनीचर; राक्षस. **उदराशि**; उदकांचा निधि, समुद्र. **जरि...राहिला**; जरि वातापी राक्षसाला मारण्याकारितां प्राशन केलेला समुद्र पूर्वी ऋषीच्या पोटात मावला होता. अधिक अलंकार.

विनयान्विता नतमुखी मनोहरा ॥ पतिमागुनी अविकलेंदुसुंदरा ॥
जनकात्मजा नमितसे महर्षिला ॥ वर दे मुनिप्रवर देय जो तिला ॥ ४५ ॥

वर....तिला; मुनिश्रेष्ठानें त्या वेळीं तिला जो देण्यास योग्य तोच वर दिला. ' पुत्रवती हो ' असें म्हटलें, असा भाव.

रघुनायका धरुनि दक्षिणीं करीं ॥ शुचि लक्ष्मणा धरुनि दक्षिणेतरीं ॥
मुनि शोभला बहु तदंतरीं तसा ॥ परमार्थ शांत्युपरमान्वयीं जसा ॥ ४६ ॥

दक्षिणीं करीं; उजव्या हातांत. **दक्षिणेतरीं**; डाव्या हातांत. **परमार्थ...जसा**; शांति व वैराग्य यांच्या दरम्यान ज्याप्रमाणें परमार्थ शोभतो (त्याप्रमाणें).

तंव शांत-वीर-रस-राज-संगमीं ॥ जवळील विप्र दुसरेहि संयमी ॥
द्रुत पातले धरुनि हेतु गाहनीं ॥ मतिमंत ते रमति मंगलार्जनीं ॥ ४७ ॥

शांतवीररसराजसंगमीं; अगस्त्य हा शांत रसाचा दर्शक व राम हा वीर-रसाचा दर्शक; या दोन्ही रसश्रेष्ठांच्या संगमांत. **मतिमंत...मंगलार्जनीं**; बुद्धिवान् जे ते पुण्यार्जनाच्या नादांत असतात म्ह० तशी संधि दवडीत नाहींत. अर्थांतर-न्यास अलंकार.

अभिवंदिलें सकल तेंहि राघवें ॥ मुनिवृंद त्या वरद होय आघवें ॥
वरदान तें प्रसव-वीर्य आपलें ॥ वितथा न घालवि तथाविधें दिलें ॥ ४८ ॥

वरदान...दिलें; त्यांच्यासारख्यांनीं दिलेलें वरदान आपली फल देण्याची शक्ति फुकट घालवीत नाहीं.

पुढतीं जगत् त्रितय-वंद्य तो मुनि ॥ नृप-वासवा मधुर वाक्य बोलुनी ॥
मग आपल्या रघुवरासि पापहा ॥ सदनास नेत सदनादि-विग्रहा ॥ ४९ ॥

नृपवासवा; राजांचा इंद्र अशा (रघुवरास). **पापहा**; पापांचा नाश करणारा (मुनि). **सदनादिविग्रहा**; शाश्वत आणि अनादि आहे देह ज्याचा अशा (रघु-वरास). पापहा मुनि सदनादिविग्रहा रघुवरास आपल्या सदनास नेत, असा अन्वय.

जटिलालयीं प्रथम राघवें तदा ॥ अवलोकिला अनल दीप्त सर्वदा ॥
भडके यदीय विविधा शिखावली ॥ शरणीं, निरंकुश रणीं जसा कलि ॥

जटिलालयीं; ऋषीच्या आश्रमांत. **सर्वदा दीप्त**; सदा पेटलेला (ज्याच्या घरीं अग्निहोत्र असतें त्याला अग्नि सर्वदा सिद्ध ठेवावा लागतो.) **शरणीं**; अग्निकुंडांत. **भडके**

......**कलि;** बेफिकीर अशा युद्धांत ज्याप्रमाणें कलह भडकतो त्याप्रमाणें अग्निकुंडांत अग्नीच्या ज्वाला भडकत होत्या. उपमा.

बहु कुशसमिधांनीं दीप्त जो जाहलासे।
मुनि-वर-कृत पूजा घेउनी जो विलासे॥
निज विशद शिखांनीं संहरी जो तमाला।
रघुपति नमिता त्या जाहला पावकाला॥ ५१॥

कुशसमिधांनीं; कुश गवतानें व औदुंबरादिकांच्या काष्ठांनीं. **निज......तमाला;** आपल्या तेजःपुंज ज्वालांनीं जो अंधकाराचा (अज्ञानाचा) संहार करीत होता. मालिनी वृत्त.

वेदिका मुनिगृहीं बहुरूपा॥ राघवा दिसति तेथ अमूपा॥
तालपत्रलिखितागमराशि॥ सांग गोचर घडे नयनांसि॥ ५२॥

तालपत्रलिखितागमराशि; ताडपत्रांवर लिहिलेले वेद. **सांग;** संपूर्ण. स्वागता वृत्त.

उच्चस्वराभिहित सामऋचा मुनींची।
रामश्रुतीवरि पडे क्षितिपावनांची॥
ते मानिती मुनि तदा कृत-ताप-सादा।
रामागमीं निगम-पाठ-फल-प्रसादा॥ ५३॥

उच्चस्वराभिहित; उंच स्वरानें म्हटलेली. **सामऋचा;** सामवेदाची ऋचा. **कृततापसादा;** केला आहे तापाचा शेवट ज्यानें अशा. **रामागमीं;** रामाच्या आगमनांत- **निगमपाठफलप्रसादा;** वेदपठनाच्या पुण्याचा फललाभ. राम आल्यानें त्यांना आपल्या वेदपठनाच्या परिश्रमांची फलश्रुति मिळाल्याप्रमाणें वाटलें. वसंततिलका वृत्त.

जी एकदां श्रवणगोचर मात्र होतां।
द्वैतांधकार निवटी नभ जेंवि वाता॥
गंगाप्रवाहसम ओघ अखंड जीचा।
ती चालली मुनिगृहीं निगमांतचर्चा॥ ५४॥

निगमांतचर्चा; वेदांताची चर्चा.

जंव मुनि रत साक्षि-चैतन्य-वादीं तिथें जाहले।
तंव वसति करी कुठें साक्षि? किंरूप तो? नाकळे॥
ह्मणुनि वदत एक अन्या, तया तो तदाबोधनीं।
स्फुरदधर विलोकुनी राघवा मूक ठेला मुनि॥ ५५॥

त्या वेळीं ऋषींचा साक्षिचैतन्यवाद सुरू होता. इतक्यांत एक ऋषि दुसऱ्याला म्हणालाः–" अहो तो साक्षी आहे कोठें व असतो कसा? कांहीं समजत नाहीं." तेव्हां त्याचें समाधान करण्याकरितां त्या ऋषीच्या ओंठावर शब्द आले होते इतक्यांत राम तेथें

आला. तेव्हां ऋषि स्वस्थ राहिला. पृच्छकानें विचारलेला साक्षी तो हाच, असा ऋषीचा अभिप्राय. महामालिनी वृत्त.

रामाच्या विपिन-निवास-कारणाची॥जिज्ञासा स्फुट करि तो त्रिकाल-वाची॥
तें त्यातें न विदित-पूर्व काय होतें॥ प्रेमाची विदित-कथा-प्रवृत्ति हो ! ते॥

त्रिकालवाची; भूत, भविष्य व वर्तमान सांगणारा, सर्वज्ञ. (ऋषि). **जिज्ञासा... त्रि० वाची**; त्या सर्वज्ञ ऋषीनें आपली जाणण्याची इच्छा व्यक्त केली. **तें...ते**; तें त्याला पूर्वींच ठाऊक नव्हतें काय ! अर्थातच होतें. पण प्रेमाचा स्वभावच ऐकलेल्या गोष्टी ऐकण्याचा असतो. प्रहर्षिणी वृत्त.

इंद्र-प्रदत्त शर-चाप- निषंग-खड्गें॥ तीं देत तो रघुवरास मुनि प्रसंगें॥
तीं जाहलीं न परि तत्परिपालनाला॥त्यांचाच मात्र बहुमान तयांत झाला॥

निषंग; तूणीर **प्रसंगें**; प्रसंगानुसार. **तीं...झाला**; तीं आयुधें म्हणजे रामाला मोठीं संरक्षक झालीं असें नाहीं, पण रामाजवळ जाण्यांत त्यांचा मात्र बहुमान झाला.

लोकोत्तरें शमयुतें चरितें मुनींचीं॥ योगप्रवृत्तिकर वृत्ति उदार साची॥
तच्छांति-बीज-परिपोषक जाहलीं तीं॥ वीर्यास शोषक तथापि मुळीं न होतीं॥

शमयुतें; क्षमाशील. **तच्छांति०...... होतीं**; ऋषींच्या सान्निध्यानें रामाच्या हृदयांत जो शांतवृत्तीचा अंकुर होता तो वाढला, पण वीर्याचा अंकुर होता त्याला मात्र कांहीं अपाय झाला नाहीं.

वेदांतबोध, हवनें सवनें, त्रिशुद्धि॥ एकाग्र-चित्त-कृत-योग-समाधि-सिद्धि॥
त्या पावनीं मुनि-गृहीं क्षितिजाधवाचा॥ झाला असा अवसरक्रम राघवाचा॥

हवनें सवनें; यज्ञयाग. **त्रिशुद्धि**; त्रिकाल स्नान. **अवसरक्रम**; कालक्रम, दिनचर्या

लोपामुद्रा धर्मपत्नी मुनीची॥ सीतेला ती जाहली माय साची॥
तीच्या संगें तीस जें सौख्य झालें॥ त्यानें कष्टां पूर्ण नावीन्य आलें॥

माय; आई. **तीच्या...आलें**; तिच्या संगतीनें सीतेला जें सुख झालें त्याच्या-योगानें तिच्या कष्टांना पूर्ण नवीनपणा आला. आपले पहिले श्रम ती विसरून गेली व पुढें येणारे तिला नवे झाले. शालिनी वृत्त.

क्रमुनि मुनिसमीपीं यापरी काल कांहीं।
करुनि निज वपूतें पावना पावनाही॥
शुभचरित अशा त्या वंदुनि ब्रह्मविज्ञा।
रघुपति मग मागे जावयातें अनुज्ञा॥ ६१॥

करुनि...पावनाही; आपल्या आधींच पवित्र असलेल्या देहाला पवित्र करून. **अनुज्ञा**; परवानगी. मालिनी.

प्रकृतिरुचिरही मुनि-प्रसादें अधिक करी स्फुट जो तनुप्रभेला ॥
अनुसरुनि मुनिप्रदिष्ट वेला नरवर पंचवटीस राम गेला ॥ ६२ ॥

प्रकृतिरुचिरही...तनुप्रभेला; जो जात्या तेजःपुंज असूनही ऋषीच्या प्रसादानें अधिकच तेजस्वी दिसूं लागला. **मुनिप्रदिष्ट वेला अनुसरुनि**; ऋषीनें सांगितलेलां मुहूर्त साधून. पुष्पिताग्रा वृत्त.

सर्ग ६ वा.

अनंतर श्रीमदनंगसुंदरा रघूत्तमा पंचवटी वनस्थली ॥
नितांत-विश्रांति-सुखार्थ मानली मधुव्रता जेंवि सरोरुहावली ॥ १ ॥

श्रीमदनंगसुंदरा; ऐश्वर्यसंपन्न आणि मदनाप्रमाणें सुंदर अशा. **नितांत**; पूर्ण. **मानली**; रुचली. वंशस्थ वृत्त.

तया स्थलीं राघव पूर्ण जाहला निमग्न मृत्युंजय-रूप-चिंतनीं ॥
तदीय सेवेंत रमे विदेहजा, उदारधी लक्ष्मण युग्म-सेवनीं ॥ २ ॥

मृत्युंजय; शंकर. **युग्मसेवनीं**; राम व सीता यां दोघांची सेवा करण्यांत.

त्यजूनि सर्वस्व, वनांत राहुनी, समीप साऱ्या व्यसनांत वागला ॥
गणोनि शीतोष्ण न भक्तराज तो तदीय सेवेंत कदापि भागला ॥

भागला; कंटाळला. न भागला, असा अन्वय.

सहोदरत्व प्रभुशीं असूनियां अनन्य दासासम दक्ष राहिला ॥
असा महाभक्तशिरोमणी जगीं रघूत्तमानेंहि कधीं न पाहिला ॥ ४ ॥

सहोदरत्व...असूनियां; रामाबरोबर भावाचें नातें असून.

वनीं निजोदात्त-पवित्र-वर्तनें उदार-शीलें विनयोपसंगतें ॥
गुरूपरि क्षत्रकुमार होय तो जितेंद्रियत्वें जरठां महर्षितें ॥ ५ ॥

उदात्त; थोर. **क्षत्रकुमार**; क्षत्रियाचा मुलगा. **गुरूपरि......महर्षितें**; तो क्षत्रियाचा मुलगा असूनही आपल्या गुणांनीं मोठमोठ्या ब्रह्मर्षींना गुरूसारखा झाला.

कृपाकटाक्षें नुसत्याच आपल्या समर्थ जो संतत विश्वनिग्रहा ॥
तयाहि तो होय सुदक्ष रक्षिता निशीथ-कालीं रघुनाथविग्रहा ॥ ६ ॥

जो आपल्या नुसत्या कृपाकटाक्षानें साऱ्या विश्वाचें नियमन करण्यास समर्थ होता त्या रामाच्या देहाचें रक्षण लक्ष्मण रात्रीं करीत असे.

प्रवृत्ति सर्वा विषयीं सुधीर तो निजाग्रजाज्ञापरिपालनीं धरी ॥
परंतु निद्राशनपानसेवनीं निदेशभंग प्रभुचा सदा करी ॥ ७ ॥

परंतु...करी; परंतु निद्रा, भोजन आणि पान या गोष्टींत मात्र तो रामाची आज्ञा नेहमीं मोडीत असे. रामानें त्यास झोंप घे किंवा फळें खा, वगैरे कांहीं सांगितलें असतां तो तें ऐकत नसे, असा हेतु.

जरी कधीं रामतृषा हरावया जलार्थ संचार वनांत तो करी ॥
तरी असे रामपदस्थितासु तो, शरीरमात्रेंचि फिरे वनांतरीं ॥ ८॥

रामपदस्थितासु; रामाच्या पायाजवळ ठेवले आहेत प्राण ज्यानें असा. **तरी... वनांतरीं**; तरी तो आपले प्राण रामाजवळ ठेवून नुसत्या देहानें वनांतून हिंडत असे.

मदीय सेवा बहु तापदायिनी किमर्थ बा कष्टवितोस विग्रहा ॥
निवारिलें या वचनें रघूत्तमें, परी त्यजी तो न निजव्रताग्रहा ॥ ९ ॥

निजव्रताग्रहा; आपल्या व्रताचा हट्ट.

मग स्वपादांबुजयुग्मसंस्थिता पहावया तेथ परीक्षुनी पुरी ॥
तदीय निष्ठा अचला चला हि वा धरी मती तो बुधराज अंतरीं ॥

स्वपादांबुजयुग्मसंस्थिता; आपल्या चरणकमलांचे ठिकाणीं असलेली.

रघूत्तमें हेतु मनांत आणिला असा असामान्यनियोग जोंवरी ॥
तयास सर्वायुधसज्ज होउनी वसंत साह्योद्यत होय तोंवरी ॥ ११ ॥

असामान्यनियोग; अलौकिक आहे योजना ज्याची असा (हेतु).

विलुप्त-निश्शेष-रसा अपुष्पिणी कृशांगभासा शिशिराऽर्ति-जर्जरा॥
वसंत-योगीं बनली पुनर्नवा अशी वनश्रीरमणी मनोहरा ॥ १२ ॥

विलुप्तनिश्शेषरसा; जिच्यांतील सर्व रस लोपला आहे अशी. **अपुष्पिणी**; जिचीं फुलें बंद झालीं आहेत अशी, (पक्षीं) जिचें रजोदर्शन थांबलें आहे अशी. **कृशांगभासा**; रोडकी दिसणारी. **शिशिरार्तिजर्जरा**; शिशिर ऋतूनें पीडिलेली, (पक्षीं) थंडीनें पीडिलेली. **वसंतयोगीं**; वसंत ऋतूचा, (पक्षीं) वसंताच्या मात्रेचा योग झाला असतां. वरील सर्व लक्षणांनीं युक्त अशी एखादी स्त्री वसंताच्या मात्रेनें ज्याप्रमाणें पुनः तरुण बनते त्याप्रमाणें वसंत ऋतूच्या योगानें वनश्रीरूपी सुंदरी पुनः तरुण बनली, असा श्लेष.

शिरे वसंतीं रस वल्लरींतुनी, रसांतुनी पुष्पसमूह थाटला ॥
सुगंध पुष्पांतुनि दाटला वनीं, प्रमोद गंधांतुनि मूर्त लोटला ॥ १३ ॥

प्रमोद; अत्यंत आनंद. कारणमाला अलंकार.

द्विरेफ-झंकार, रसाल-मंजरी, नवांकुरश्री, पिकगायनें वनीं ॥
समस्त एकावसरें मिळून हीं प्रवृत्त झालीं मदनप्रदीपनीं ॥ १४ ॥

द्विरेफझंकार; भुंग्यांचीं गुंजितें. रसालमंजरी; आम्रमंजिरी.

अशोक-नीलोत्पल-चूत-मल्लिका-सरोरुहांचे स्फुट रेणु वाहती ॥
वनीं व्यथा कामिजनां करावया स्मरायुधें तीं जणुं सज्ज राहती ॥

नीलोत्पल; निळें कमळ. चूत; आंबा. मल्लिका; मोगरी.

सरोनि गेला शिशिराधिकार तो, वसंतसाम्राज्य महीस जाहलें ॥
यथेच्छ सेवा सुख येथुनी पुढें असें पिकांनीं मधु-गीत गाइलें ॥ १६ ॥

मधुगीत; वसंताचें गाणें.

प्रतिक्षणीं भिन्न लतांसि जाउनी नवासवाची क्षणमात्र घे चवी ॥
असा सदाचारपथाहुनी तदा अली मदाचारविशेष सूचवी ॥ १७ ॥

सदाचारविशेष; यथेच्छ वागण्यापासून फायदा. असा......सूचवी; असा भुंगा एकनिष्ठ आचरणापेक्षां मनसोक्त आचरणांत विशेष फायदा आहे, असें सुचविता झाला.

भरून गेलें वन पुष्पसौरभें, न ये स्वकार्यां अवकाश, पाहुनी ॥
वसंतमंत्री समयज्ञ वायु जो स्वमान तो रक्षित मंद वाहुनी ॥ १८ ॥

त्या वनांत चोहोंकडे फुलांचा सुगंध पसरल्यामुळें वायूला आपलें कार्य (सुगंध पसरविण्याचें) करण्यास अवकाश मिळेना, पण तो वसंताचा समयसूचक मंत्री असल्यामुळें त्यानें मंद वाहून आपला मान राखला. मंद वाहून कां होईना पण इतरांना सुख दिलें, असा भाव.

अगंधही केवळ वर्णभूषणें रसालवृक्षा बहुदूर सारतो ॥
स्वकीय सौंदर्यचि दाखवावया नटूनि ठेला नव कर्णिकार तो॥१९॥

कण्हेरीच्या वृक्षाला गंध नव्हता तरी तो आपल्या वर्णभूषणामुळें (भपकेदार तांबड्या वर्णामुळें) आम्रवृक्षाला तुच्छ मानीत होता, असा आशय.

मरंद पानार्थ, फलेंहि भक्षणा, फुलें सुगंधा, शयनार्थ सांवली ॥
सुखातुरां साधनसिद्धता अशी वनांत एक्या बकुलेंच ठेवली ॥

साधनसिद्धता; सुखोपभोगाच्या सामग्रीची तयारी.

अधोमुखी होउनि बैसली वनीं सुशील वाटे जरि मोगरीलता ॥
प्रदर्शवी जी स्फुट पुष्पभूषणें दिसे तिची त्याचमुळें कुशीलता ॥ २१ ॥

मोगरी खालीं मान घालून बसली होती म्हणून ती सुशील आहे, असें कोणासही वाटेल. पण ती आपलीं पुष्पभूषणें अगदीं उघडीं करून दाखवीत होती हाच तिच्या

कुशीलतेचा मोठा पुरावा होता. सुशील स्त्रियांना नटण्यामुरडण्याची हौस नसते, असा भाव.

न कोमला वा न सुरूप फारशी तथापि गंधास्तव वंद्य पाटली ॥
गुणाढ्य जी ती प्रिय होय शेवटीं जनास आधीं जरि तुच्छ वाटली ॥

स्वगंधिता, शीतलताहि ठेविली निजांतरंगीं लपवोनि चंदनें ॥
असेहि कांहीं असती जगीं गुणी विमर्दनें जे वळती, न वंदनें ॥ २३ ॥

चंदनानें आपला सुगंध आणि मार्दव हीं आपल्या कठिण त्वचेच्या आंत लपवून ठेवलीं होतीं. जगांत असेही कांहीं गुणी लोक असतात कीं, त्यांचे गुण बाहेर पडण्याकरितां त्यांचें मर्दनच करावें लागतें. ते वंदनानें कधीं वळावयाचे नाहींत. दृष्टांत व अर्थांतरन्यास यांचा संकर.

सरोवरीं वास करूनि देउनी रसज्ञ हंसां बिसतंतु भक्षणा ॥
महाजनाधार–बलें करी वनीं सरोज पुष्पीं निज-मान-रक्षणा ॥ २४ ॥

त्या वनांत इतकीं फुलें फुललीं होतीं कीं, कमळाला आपला मान राखणें कठिण झालें. तेव्हां त्यानें मोठ्या लोकांचा आश्रय करून त्याच्या बळावर तो राखला. असा कीं त्यानें आधीं सरोवरांत वास केला व रसिक अशा हंसांना आपले बिसतंतु खावयाला दिले. प्रसिद्ध मनुष्याला प्रतिस्पर्धी उत्पन्न झाले असतां तो थोर लोकांच्या आश्रयास जाऊन त्यांना लांच देऊन आपला मान राखतो, असा भाव.

लताद्रुम प्राप्त-वसंत-कौतुकें परागचूर्णें त्यजुनी परस्परीं ॥
मधूत्सवीं व्यक्त करूनि आपुली प्रदर्शिती काम-विलास-चातुरी ॥२५॥

प्राप्तवसंतकौतुकें; अधिकारावर आलेल्या वसंताचें कौतुक करण्याच्या हेतूनें. **कामविलासचातुरी**: कामविलासांत निपुणता.

वसंत आम्रा, सहकार कोकिला, करी जनांना पिक मत्त विभ्रमें ॥
परंपरा-प्राप्त मदापगा अशी वनांतुनी त्या अनपायिनी भ्रमे ॥ २६ ॥

मदापगा; मदाची नदी. **अनपायिनी**; अविनाश, अखंड. तुल्ययोगिता अलंकार.

नवासवीं, शीतल मंद मारुतीं, परागचूर्णीं, स्फुट पल्लवांतुनी; ॥
जगद्विकारांतुनि आत्मबिंबसा अनंग झाला अवतीर्ण काननीं ॥ २७ ॥

जगद्विकारांतुनि आत्मबिंबसा; सृष्टीच्या विकारांतून परमात्म्याचें बिंब ज्याप्रमाणें अवतीर्ण होतें त्याप्रमाणें. उपमालंकार.

फलें खगांनीं, मकरंद षट्पदीं, समीरणें गंधहि चुंबिला वनीं ॥
नरास कोठें बहुधा न राहिली अभुक्तशी वस्तु वसंतशासनीं ॥ २८ ॥

अभुक्तशी; दुसऱ्यानें न उपभोगिलेली.

अबोध्य संताप, अतर्क्य वेदना, अतींद्रिय भ्रांति, मनोमयी गति ॥
विलक्षणीं या नव लक्षणीं तदा ज्वराकुल प्राणिसमूह वागती ॥ २९ ॥

त्या वेळीं सर्व प्राण्यांना ज्वर आला होता. मात्र त्या ज्वराचीं लक्षणें सामान्य ज्वराहून अगदीं विलक्षण होतीं. या ज्वरांत ताप होता तो लागत नव्हता, वेदना होत्या त्या कळत नव्हत्या, भ्रांति होती पण ती इंद्रियांना नव्हती, आणि देहाला नव्हे तर मनाला गति होती.

विराग नाशी, मदना प्रदीपवी, हरी उपाधी, चिर दुःख घालवी ॥
निजासनीं बैसुनि यापरी वनीं वसंतराजा अधिकार चालवी ॥ ३० ॥

विराग; वैराग्य.

फलोपलब्धिच्छल दर्शवोनियां वनांत गेला रघुनाथ एकदां ॥
सलक्ष्मणा पर्णकुटींत राहिली धरात्मजा विश्वमनोहरा तदा ॥ ३१ ॥

फलोपलब्धिच्छल; फळें आणण्याचें मिष.

दिनेश तों अर्ध पथ क्रमूनियां निवांत विश्रांतिस घेत राहिला ॥
तया न कीं विश्वविदाहि आपुला जणुं प्रसारी परिताप साहिला ॥३२॥

प्रसारी; पसरलेला. **तया......साहिला**; विश्वाचा दाह करणारा प्रखर ताप त्याचा त्यालाच जणूं सहन झाला नाहीं.

जलांत घर्माकुल-काय चालले मराल-कारंडव-संघ गाहना ॥
तयांसवें पल्वल-केलि-कामुका तदीप्सितज्ञा निघती तदंगना ॥ ३३ ॥

घर्माकुलकाय; उन्हानें व्याकुळ झाले आहेत देह ज्यांचे असे. **मरालकारंडवसंघ**; हंस व बदकें यांचे समुदाय. **तदीप्सितज्ञा**; त्यांची इच्छा ओळखणाऱ्या.

विहंग तप्त प्रखरें दिनातपें विलीन झाले तरु-गर्भ-कोटरीं ॥
अजातपक्षां निज शावकांसवें करूनि गोष्टी रमती हृदंतरीं ॥ ३४ ॥

अजातपक्षां निज शावकांसवें; ज्यांना पंख फुटले नाहींत अशा आपल्या पिलांबरोबर.

मिलिंद गुंजारव-कार्य सोडुनी प्रवृत्त झाला मकरंदसेवनीं ॥
अशांत सर्वत्र अशब्द शांतता क्षणैक विस्तारुनि राहिली वनीं ॥३५॥

अशांत; या संधीस.

न भृंग गाई, न समीर वाहतो, मृगी न हिंडे, शुक मूक राहिला ॥
दिनातपीं व्याकुल सृष्टिसुंदरी गमे जणों सेवित वामकुक्षिला ॥ ३६ ॥

दिनातपीं......वामकुक्षिला; उन्हानें व्याकुल झालेली सृष्टिसुंदरी दुपारची सुखनिद्रा घेत आहे असें वाटलें.

उठे कठोर ध्वनि बर्हिचा कधीं कधीं कुहूशब्द करीत कोकिला ॥
ध्वनिद्वयें त्या लवमात्र शांतिचा न भंग, भंगोदित पोष जाहला ॥३७॥

बर्हिचा; मोराचा. **ध्वनिद्वयें......जाहला**; त्या दोन्ही आवाजांनीं शांतीचा तर लवमात्र भंग झाला नाहींच, पण उलट भंगामुळें उत्पन्न होणारा पोषच झाला.

सुरम्य कुंजीं उटजांगणांतल्या रमे तदा लक्ष्मण योगसाधनीं ॥
शिलेवरी ठेवुनियां स्वमस्तका अदूर ठेली रघुनाथकामिनी ॥ ३८ ॥

अदूर; जवळच.

निजेश्वराच्या असतां पथाकडे तथाविधा लावुनि दृष्टि राहिली ॥
क्रमें क्रमें तेथ निमीलितेक्षणा क्षणांत ती निद्रित पूर्ण जाहली ॥३९॥

क्रमें...... जाहली; क्रमाक्रमानें डोळे उघडण्याचें बंद होत होत तिला क्षणांत गाढ झोंपली.

समीरणें केश सलील हालतां मुखप्रभा लोल यदीय भासली ॥
विनोदलीला पतिच्या निजांतरीं स्मरोनि निद्रेंतहि मंद हांसली ॥४०॥

समीरणें...भासली; (जिच्या मुखावर आलेले) केश वायूनें हालूं लागले असतां मुखप्रभाच मागें पुढें सरकत आहे, असा भास होत होता.

समीर तत्स्पर्शसुखें धिटावुनी, हरूनि तीच्या कुच-कोटि-रक्षका ॥
पटांचला, यत्न करी पुनःपुन्हा करावया तीस अनंगदीपिका ॥ ४१ ॥

समीर...धिटावुनी; तिच्या स्पर्शाच्या सुखानें धीट होऊन. **कुचकोटिरक्षका पटांचला**; स्तनमंडलाचें रक्षण करणाऱ्या (उरावरील) पदराला. **अनंगदीपिका**; मदनाला चेतविणारी.

सुलक्षणीं त्या परि राघवानुजीं जितेंद्रियीं योग-विलीन-मानसीं ॥
समीरचेष्टा विफलाचि जाहली अदत्तकर्णावरि रागतानसी ॥ ४२ ॥

अदत्तकर्णावरि रागतानसी; ज्यानें कान दिला नाहीं अशा इसमावर ज्याप्रमाणें रागाची तान व्यर्थ जाते, त्याप्रमाणें.

अपूर्व-माधुर्यगुणें तयास तों करीत जी विस्मित सस्मिताक्षरा ॥
समीप-वृक्षावरुनी पडे अशी तदीय कर्णीं स्फुट मानवी गिरा ॥४३॥

सस्मिताक्षरा; जिचीं अक्षरें स्मितयुक्त उच्चारलीं आहेत अशी (गिरा).

वनीं अशा या समयीं कुठून ही मनुष्यवाणी पडली श्रुतीवरी ॥
पहावया तें उघडूनि लोचनां इतस्तता दृष्टिनिपात तो करी ॥ ४४ ॥

इतस्तता; इकडेतिकडे.

परिस्फुरच्छोणित-चंचु तोंवरी रसालशाखेवरि उंच बैसला ॥
समीप ऐसा शुक एक लक्ष्मणें निजेक्षणीं प्रेरितदृष्टि पाहिला ॥ ४५ ॥
परिस्फुरच्छोणितचंचु; ज्याची लाल चोंच (बोलण्याकरितां) फुरफुरते आहे असा (शुक). **निजेक्षणीं प्रेरितदृष्टि**; आपल्या नजरेकडे ज्यानें नजर लावली आहे असा.

समाधिभंगा परि हेतु हाचि वा न वा स्वकीया खग वन्य जाहला ॥
अशा तया संशय-लोल-मानसा नरोक्तिनें तो शुक वाक्य बोलला ॥४६॥
हरिच्छवि प्रस्फुट-कंठ-मंडल क्षणोक्षणीं पंख वळूनि खाजवी ॥
प्रगल्भ-वाक्पाटव दाखवोनियां नरासही तो शुकराज लाजवी ॥४७॥
हरिच्छवि; हिरव्या रंगाचा. **प्रस्फुटकंठमंडल**; ज्याच्या गळ्याभोंवतीं काळा कंठ फुटला आहे असा.

अहो कृती भाससि तूं नरोत्तमा कृती तुझी ही ललना वराकृति ॥
परस्परां योग्य तुह्मांस जो सृजी तया विधीची बहु योग्य ही कृती ॥
कृती; धन्य. **वराकृति**; सुंदर.

तशांतुनी यौवन भासतें हिच्या प्रतिस्थलीं व्यापुनि पूर्ण राहिलें ॥
असें जगन्मानसहारि रूप मीं जगांत पूर्वी न कधींच पाहिलें ॥ ४९ ॥
करूनि आतृप्ति विलाससेवना सुखी करावा तरि जन्म आपुला ॥
तुझा असा जाणुनि हेतु चांगला वसंतही होउनि साह्य पातला ॥५०॥
आतृप्ति; यथेच्छ.

तथापि केला वनवास जो तुवां न येचि माझ्या क्षण तो मनाप्रति ॥
न वा पुरोद्यानविलास भोगुनी वनीं विलासास्तव जाहली रति ॥५१॥
न...रति; नगरांतल्या उपवनांत विलास भोगून कंटाळल्यामुळें तुला वनांत विलास करण्याची इच्छा तर झाली नसेल ?

परंतु एका विषयीं अजूनही मदंतरीं संशय राहिला जरा ॥
असूनियां तूं नृप ही तवांगना किमर्थ झाली वद वल्कलांबरा ॥५२॥
तदा शुकाचें परिसूनि वाक्य तें निजाननें सस्मितदंतमंडितें ॥
तयास ऐसें प्रतिवाक्य अर्पिलें खगोत्तमा वीरकुलैकपंडितें ॥ ५३ ॥
सस्मितदंतमंडितें; हास्ययुक्त दांतांनीं शोभणाऱ्या. खगोत्तमा तयास, असा अन्वय.

विदग्ध-वाचा-निपुणा विहंगमा मदर्थ जें तूं वदलास संप्रति ॥
असे जरी योग्य तथापि मन्मना तयांतुनी वस्तुविरोध भासती ॥५४॥
विदग्धवाचानिपुणा; शहाणपणाचे शब्द बोलण्यांत कुशल अशा. **वस्तुविरोध**; वस्तुस्थितीचे विपर्यास.

असे कृती मी परि ही मदंगना न, किंतु माता करिते कृती मला, ॥
अयोनिजा ही मिथिलेशकन्यका रघूत्तमाची रमणीय चित्कला ॥५५॥

अयोनिजा; आईच्या उदरांतून उत्पन्न न झालेली, स्वयंभु. **चित्कला**; ज्ञानकला, (प्रिय स्त्री).

कृती विधाता म्हणतोसि, तें खरें, परंतु तो निर्मुनि मात्र ना हिला ॥
स्वयंभु आदर्श हिच्या मिषें मिळे म्हणूनियां होउनि धन्य राहिला ॥५६॥

ब्रह्मदेव धन्य आहे हें तुझें ह्मणणें खरें आहे, पण तो हिचा निर्माणकर्ता ह्मणून धन्य नव्हे, तर हिच्या निमित्तानें आपल्याला इतर स्त्रिया उत्पन्न करण्याला स्वयंभु नमुना मिळाला म्हणून तो आपल्याला धन्य मानतो.

म्हणून ही मज्जननी शुकोत्तमा, मदग्रजाची रमणी विलासिनी ॥
त्रपाकटाक्षें मजला न मोहिते कृपाकटाक्षें परि पोषिते वनीं ॥ ५७ ॥

त्रपाकटाक्षें; सलज्ज कटाक्षानें.

विलासभोगास्तव यांस पंडिता ! वनागमीं हेतु न जाहली रति ॥
करावयातें जनकोक्ति सार्थ हीं वनेचरें वल्कलवास दंपती ॥ ५८ ॥

करावयातें......दंपती; वडिलांचें वाक्य खरें करण्याकरितां या नवराबायकोनीं वल्कलें नेसून वनवास पत्करिला आहे.

वदूनि ऐसें प्रतिवाक्य साधु तो पुनश्च झाला रत आत्मसाधनीं ॥
शुकें तदा डोलविलें स्वमस्तका परंतु नेणे कवि काय कारणीं ॥ ५९ ॥

त्यजूनि तैसा मग भाषणौघ तो शुकें वचा मार्ग दुजाच काढला ॥
नरोत्तमा सादर हांक मारुनी असें पुन्हा वाक्य तयास बोलला ॥६०॥

अहा बरीच स्मृति आज जाहली चरित्र जें जें भवदीय जाहलें ॥
समस्त साकेतपुरींत राहतां मला मदीयें सुहृदें निवेदिलें ॥ ६१ ॥

तरी मनीं तूंच विचार लक्ष्मणा त्यजूनि राज्यादिक सर्व वैभवा ॥
वनांत जो या रघुनाथ पातला नव्हे कसा तो अतिमूढधी युवा ॥६२॥

वधूविलासीं रमला सदैव जो तया पित्याचे वर मोहदत्त ते ॥
गणूनि जो वंद्य वनास सेवितो तयास हें योग्य न राज्य आयतें ॥ ६३ ॥

जो सर्वदा स्त्रीलंपट होता अशा बापानें तिला मोहानें दिलेले वर वंद्य मानून जो राम वनांत आला तो त्या आयत्या आलेल्या राज्याला नालायकच होता स्त्रीलंपट बापाचें वाक्य वंद्य मानूं नये, असा शुकाचा अभिप्राय.

तथापि धर्मास्तव कर्म मान्य हें जरी तयाचें क्षण एक मानिलें ॥
तरी वधूरत्न वनांत कष्टवी असें तुवां कर्म कसें समर्थिलें ॥ ६४ ॥
अलक्तका-भूषित-चारु शोभले जिचे स्व-लीला-सदनांत पाय ते ॥
विलोकुनी सांप्रत कंटकाकुल द्रवे न जें दुष्ट न चित्त काय तें ॥६५॥

अलक्तकाभूषितचारु; लाखेनें रंगविलेले व त्यामुळेंच सुंदर दिसणारे.

महार्घ वस्त्राभरणीं विभूषिता वधू जिला पौर तटस्थ पाहती ॥
विलोकुनी तीस कुवल्कलांबरा मदीय नेत्रांतुनि अश्रु वाहती ॥ ६६ ॥
असेंहि तूं आणिक आण मानसीं, विदेहभूपें दिधली स्वनंदिनी ॥
त्वदग्रजा, ती वनवाससेवना सुखोपभोगा अथवा विलोकुनी ॥ ६७ ॥

विदेहभूपें...विलोकुनी; जनक राजानें आपली मुलगी तुझ्या थोरल्या भावाला दिली ती काय वनांत पाठविण्याकरितां दिली कीं तिच्या सुखाकडे पाहून दिली !

बघूनियां दुःस्थिति ही सुदुर्धरा स्वकन्यकेची निज-चित्त-भेदिनी ॥
नितांत शोकें बघ आजि सोडिते अशीत निश्वास न काय मेदिनी ६८

आपल्या मुलीची हृदयविदारण करणारी दुर्दशा पाहून पृथ्वीसुद्धां आज उष्ण निःश्वास टाकीत नाहीं आहे काय पहा!

विशालनेत्रा कमनीयविग्रहा वधू कुठें, राम कुठें वराक तो ॥
अहो तयांचा मज योग पद्मिनी-कृशानु-योगापरि वाम भासतो ॥६९॥

कमनीयविग्रहा; सुंदर. **पद्मिनीकृशानुयोगापरि**; कमलिनी व अग्नि यांच्या योगाप्रमाणें. **वाम**; विषम. **वराक**; दरिद्री. निदर्शना अलंकार.

तयासवें काननिं राहतां तुझी उदारता ये दिसुनी तयाप्रति ॥
परंतु जो कष्टवितो तुला सदा तदीय नीती कुटिला न काय ती॥७०॥
करूनि कौटिल्य खलास वंचिजे असा असे न्याय जगांत लक्ष्मणा ॥
म्हणूनि साकेतपुरीस जाय तूं हरूनियां ही युवती सुलक्षणा ॥ ७१ ॥
घडेल कीं कर्म न गर्हणीय हें अशी कुशंका जरि जाहली तुला ॥
परांगना-धर्षण सर्व-संमत क्षितींत आहे तरि राजसा कुला ॥ ७२ ॥

परांगनाधर्षण; परस्त्रीचें हरण. **राजसा कुला**; राजे लोकांच्या (क्षत्रियांच्या) कुलाला.

बलें हिचा तूं अपहार केलिया तथापि होशील न पात्र दूषणा ॥
घडोनि भोक्त्यासह भोग्य वस्तुचा सुयोग येतां प्रिय तो महाजनां ॥

घडोनि...महाजनां; भोक्त्याचा आणि भोग्य वस्तूचा सुंदर योग जमून आला असतां शहाणे लोक (तो योग कसा जमून आला याची चौकशी न करतां) त्याचें कौतुकच करतात.

अशा वधूचे चिर कष्ट पाहतां नसे मनीं काय पहा विचारुनी ॥
निजाग्रजस्त्रीहरणोत्थ होय जो क्षणानुताप प्रिय तो तयाहुनी ॥ ७४ ॥

अशा सुंदर स्त्रीचे हाल पाहिल्यावर, त्यापेक्षां आपल्या थोरल्या भावाची बायको हरण केल्यामुळें होईल तो क्षणिक पश्चात्ताप बरा नव्हे काय, याचा तूं विचार कर.

हरूनि नेतां रमणीललाम हें घडेन मी भाजन रामशासना ॥
असा मनीं संशय आणिसी जरी कथीन मी युक्ति तदीय वारणा ७५

रमणीललाम; स्त्रीरत्न.

दिली असे शक्ति अमोघविक्रमा ममेश्वरें खेचरनायकें मला ॥
तिच्या बळें तूं रघुनायका त्वरें वधून टाकी नव-पुष्प-कोमला ॥ ७६ ॥

अमोघविक्रमा; अचूक आहे पराक्रम जिचा अशी (शक्ति). **खेचरनायक**; यक्षराज.

अदेय हें अस्त्र मदीय सर्वथा असे जरी मत्सुहृदां तथा प्रियां ॥
त्वदीय-चारित्र्य-विलुब्ध होउनी तथापि देतों तुज तें शुभोदया ॥७७॥

चारित्र्य; उत्तम शील. **शुभोदया**; कल्याणसाधनाकरितां.

प्रवृत्त नोहे मति ही तुझी जरी स्वबंधुघातीं अथवा दयावती ॥
हरूनि हीतें तरि सेवि मत्पुरी सुदुष्प्रवेश्या रघुनायकास ती ॥ ७८ ॥

सुदुष्प्रवेश्या; प्रवेश करण्यास अत्यंत कठिण.

असो तुला जें हितसार काढुनी शुभेप्सितें येथवरी निवेदिलें ॥
पुनःपुन्हा चिंतुनि तें निजांतरीं पहा मतीतें तंव काय मानलें ॥ ७९ ॥
वसंतसंचार, वधूसमीपता, निवांत एकांत, विकासि यौवन ॥
तशांत गेहीं नसणें पती तिचा असें न येतें बहुवार साधन ॥ ८० ॥

वधूसमीपता; इच्छित स्त्री जवळ असणें.

वदूनि ऐसें शुक वाक्य लक्ष्मणा तदुत्तराकांक्षिमनें विरामला ॥
क्षणैक शाखेवरि, वीर संयमी तथापि तो तेथ उगाच राहिला ॥८१॥

तदुत्तराकांक्षिमनें; त्याचें उत्तर ऐकण्याच्या इच्छेनें.

विलोकितो जों शुक लक्ष्मणाकडे तयास तों गोचर मात्र जाहला ॥
क्षतीं तयाचा अधरोष्ठ रक्त तो नितांत कोपें बहु कंप पावला ॥ ८२ ॥
अगाधही शांति तदीय सर्वथा तया प्रसंगीं ठरलीच ती वृथा ॥
समीरणें जो खवळे महोदधी न शांतवी त्यास तदीय निम्नता ॥ ८३ ॥

लक्ष्मणानें आपला राग संयमन केला होता पण शेवटीं शेवटीं तो ओठ चावूं लागला. त्याच्या शांतीला त्याचा राग आटपेना. समुद्र खोल असल्यामुळें शांत असतो पण वाऱ्यानें

त्याला पीडा करण्यास सुरवात केल्यावर त्याची खोली त्यास शांत ठेवण्यास असमर्थ होते. दृष्टांतालंकार

जसा नदीचा नगरुद्धमार्गही पथांतरा काढुनि ओघ चालतो ॥
तदीय वक्षांतिल त्यापरी निघे मुखें तयाच्या अतिवृद्ध कोप तो ॥८४॥

नगरुद्धमार्ग; पर्वतानें अडविला आहे मार्ग ज्याचा असा (ओघ). **पथांतरा काढुनि**; दुसरा मार्ग काढून.

खगाधमा ! दुर्गति मार्ग-सूचका! खला ! तुला स्यां नसतां विचारिलें॥
अतर्क्य अश्राव्य अवाच्य जें तुवां मदीय कल्याणमिषें निवेदिलें ॥८५॥
असह्य नीचत्व पदोपदीं असे भरुनियां पूर्ण तयांत राहिलें ॥
असा खला निश्चय तूं मनीं करी तवासु तेणेंचि अजूनि वांचले ॥

त्या तुझ्या भाषणांत अक्षरागणिक असह्य नीचत्व भरून राहिलें आहे. पण तूं हें लक्षांत ठेव कीं, तो तुझा नीचपणाच आतांपर्यंत तुला वांचविण्यास कारण झाला आहे. कारण कीं तूं नीच आहेस असें समजूनच मी तुला इतके शब्द बोलूं दिले, असा आशय.

असो मला राघवनीति तापदा, धरात्मजेची अथवा विडंबना ॥
तरी जनीं राम-विनिंदक-स्थिती तयाहुनी दे बहुताप मन्मना ॥ ८७ ॥

तरी...मन्मना; तरी जगांत रामाचा एक निंदक जिवंत आहे या गोष्टीनें मला त्याहून अधिक ताप होतो अधिक अलंकार.

निजेतरस्त्री तितुकी परांगना, परांगना भोग्यचि राजसा कुला ॥
अशी असे नीति जरी खला तुझी सदैव होवो लखलाभ ती तुला ८८

आपल्या स्त्रीवांचून बाकीच्या सर्व स्त्रिया परांगना (अर्थात् आई, बहिणी, भावजयी याही परांगनाच) आणि परांगना तेवढ्या क्षत्रियांना भोग्य अशीच जर तुझी नीति असेल तर ती तुझी तुला लखलाभ असो.

परांगनाधर्षणवृत्ति जाहले न सूर्यवंशीं अजुनी, न वा पुढें ॥
नृपाल होतील, करी भवादृश प्रगल्भ-चित्त-भ्रम केंवि बापुडें ॥ ८९ ॥

परांगनाधर्षणवृत्ति; परस्त्रियांचा अपहार करण्याकडे प्रवृत्ति आहे ज्यांची असे. **करी...बापुडें**; तुझ्यासारख्या बापड्यानें प्रौढ मनाला काय मोह उत्पन्न करावयाचा आहे.

जगत्त्रयीं रामविनिंदकास जें महाजनीं शासन योग्य मानिलें ॥
तदीय भोगार्थ म्हणून सिद्ध तूं करी खगा निंद्य शरीर आपुलें ॥ ९० ॥
वदूनि ऐसें वच भक्तराज तो करांत घेई निज सायकासना ॥
दयालुही कोपुनि रामदूषणें प्रवृत्त झाला शुकराजशासना ॥ ॥ ९१ ॥

निशित शर धनुष्या जोंवरी वीर जोडी ॥
त्वरित शुकतनूतें तोंवरी राम सोडी ॥
दृढतर परिरंभीं घेउनी लक्ष्मणाला ॥
रघुपति निज चित्तीं हर्षसंपन्न झाला ॥ ९२ ॥

मालिनी वृत्त.

बंधुश्रेष्ठा हे सख्या एकनिष्ठा ॥
माझ्यासाठीं सोशिसी फार कष्टां ॥
रामें ऐशा बोलुनी भाषणाला ॥
प्रेमाश्रूंनीं न्हाणिलें लक्ष्मणाला ॥ ९३ ॥

शालिनी वृत्त.

सर्ग ७ वा.

प्रियजनांसह पंचवटीवनीं ॥ रघुपती रमला सुखजीवनीं ॥
वननिवास असा जंव ओसरे ॥ सरति तीन तशीं द्रुत वत्सरें ॥ १ ॥

सुखजीवनीं; सुखाच्या राहण्यांत. द्रुतविलंबित वृत्त.

दिवस जाउनि पावत यामिनी ॥ रजनि संपुनि ये दिन मागुनी ॥
उगवता दिन नित्य नवा नवा ॥ सुखनिधी गमला रघुपुंगवा ॥ २ ॥

यामिनी; रात्र.

सम सुखासुख मानित जो तया ॥ सुखचि मात्र मिळे रघुराजया ॥
बुधमनीं न विकार न जन्मती ॥ कटुसि गोड करी परि तन्मति ॥ ३ ॥

सम......तया; सुख आणि दुःख हीं जो सारखीं मानीत होता अशा. **बुधमनीं ......तन्मति**; शहाण्या मनुष्यांच्या मनांत विकार उत्पन्न होत नाहींत असें नाहीं, पण जें कडू असेल त्याला त्यांची बुद्धि गोड करून घेते. म्हणून वनांतल्या कष्टांपासून रामाला सुखच घेतां आलें, हा भाव. अर्थांतरन्यास.

जनकजेस गृहाविण राहणें ॥ उचित होय न, यास्तव लक्ष्मणें ॥
गलित-पर्ण-मयी विजन स्थलीं ॥ तृणकुटी विपिनांत विनिर्मिली ॥ ४ ॥

गलितपर्णमयी; गळलेल्या पानांची. **तृणकुटी**; पर्णकुटी.

युवतिचीं मृदु मंजुल भाषणें ॥ परिसुनी स्मितपूर्वक पाहणें ॥
प्रभुसि सात्विकबंधुसमागमें ॥ उटज तें प्रतिनंदनसें गमे ॥ ५ ॥

जनकजांकतलावरि लोळुनी ॥ रघुपतीसह निर्भर खेळुनी ॥
मृगकुलें बहु धन्य वनांतलीं ॥ शिशुपदाप्रति भाजन जाहलीं ॥ ६ ॥
शिशिर चंड अशा समयांतुनी ॥ प्रभुसि आश्रय देउनि काननीं ॥
सम समीं विषमीं समयीं भले ॥ अढळ मित्र तया तरु जाहले ॥ ७ ॥

सम......जाहले; चांगल्या व वाईट काळीं सारखे उपयोगी पडणारे वृक्ष रामाला अढळ मित्र झाले. **शिशिर**; थंड. **चंड**; ऊन्ह.

कधिं कधीं अति मंद, जवें कधीं ॥ मधुर शीतल सांद्र पदीं पदीं ॥
मधुनि शीत सुगंधित वाहुनी ॥ पवन किंकरसा रत सेवनीं ॥ ८ ॥
खग तनूवरि बैसुनि खेळती ॥ हरिण बागडतात सभोंवतीं ॥
विसरुनी सुखदुःख मनांतुनी ॥ प्रभु-विशाल-कुटुंब रमे वनीं ॥ ९ ॥
विमल वारि, निसर्गभवें फळें, ॥ विजनवास, सपुष्प लताकुलें, ॥
सरल-सत्त्व-समागम सर्वथा ॥ सुखनिवास अशापरि कोणता ॥ १० ॥

निसर्गभवें; स्वाभाविक उत्पन्न झालेलीं, वन्य. **सरलसत्त्वसमागम**; साध्या निरुपद्रवी प्राण्यांचा सहवास.

गुणवती गृहिणी वशमानसा ॥ विनत सोदर निष्कपटी तसा ॥
मृगसमूह मुलांपरि खेळता ॥ सुखनिवास अशापरि कोणता ॥ ११ ॥
सरस यौवन, सुंदररूपता ॥ वपु निरामय, कीर्ति दिवंगता ॥
मुदित मानस शांति अखंडिता ॥ सुखनिवास अशापरि कोणता ॥१२॥

निरामय; रोगरहित. **दिवंगता**; स्वर्गापर्यंत पोंचलेली.

स्वकरिंचा शुक मूकहि बोलका ॥ शिखियुवा रुसला तरि लाडका ॥
हरिणपाडस मुग्ध जरी खुळें ॥ क्षितिसुतेप्रति पंडित वाटलें ॥ १३ ॥

हातावर बसलेला राघू जरी मुका असला तरी सीतेला तो बोलका वाटे, लहानगा मोर रुसला तरी तिच्या मर्जीतून उतरत नसे, व हरिणपाडस जरी खुळें वेडें असलें तरी तिला तें मोठें चतुर वाटत असे. आपल्या आवडत्या वस्तूंचें स्त्रिया कौतुक करतात, हा भाव.

जनकजा-कर-लालन-सेवनीं ॥ प्रकट मत्सर होय मृगांतुनी ॥
मिळवितां स्थल तत्पदसंनिधीं ॥ कलह गोचर होय कधीं कधीं ॥१४॥

जनकजा०......सेवनीं; सीतेच्या हातच्या कुरवाळण्याचा लाभ मिळविण्यांत.

रघुपतीस वधू सुखदा गमे ॥ जनकजा रघुनाथसुखें रमे ॥
रमण तो रमणीस, तयास ती ॥ निजसुखाप्रति कारण मानिती ॥१५॥

प्रियजनस्मित केलि मृगांसवें ॥ परिसणें खगगान सदा नवें ॥
सतत सृष्टिनिरीक्षण कौतुकें ॥ विजन होय असें गृह तें निकें ॥ १६ ॥

विजन......निकें; या रीतीनें तें निर्जन स्थल रम्य गृह झालें.

तरुलता गृहसंनिध लावुनी ॥ जनकजा रमली जलसिंचनीं ॥
पुरविणें प्रिय वाटत जें तिला ॥ पतिस हा व्यवसायचि जाहला ॥१७॥
कुसुमहार करूनि कधीं नवा ॥ क्षितिसुता करि अर्पण राघवा ॥
कमल तोडुनि एक वनांतलें ॥ तिजासि दे रघुनाथ कुतूहलें ॥ १८ ॥
प्रथम जे दिन दुर्धर वाटले ॥ गतकथास्मरणें द्रुत लोटले ॥
दिवस जे पुढतीं मग पातले ॥ प्रियवचें वदतां गत जाहले ॥ १९ ॥
प्रबल जो अनुराग तिघांतला ॥ जवळिं हास्यमुखीं स्फुट जाहला ॥
प्रकटला दुरुनी अवलोकनीं ॥ अतिदुरी असतां स्मरणांतुनी ॥ २० ॥

त्या तिघांमध्यें जें अत्यंत प्रेम होतें तें तीं एकमेकांच्या जवळ असतांना हास्याच्या रूपानें स्फुट होत असे, दूर असतांना अवलोकनाच्या रूपानें स्फुट होत असे व अत्यंत दूर असतांना स्मरणाच्या रूपानें स्फुट होत असे.

वननिवास सरूं जंव लागला ॥ कटुचि तो प्रभुबंधुस वाटला ॥
निज निवेश पुरीं घडतां पुढें ॥ प्रियसहोदरदास्य कसें घडे ॥ २१ ॥

वनवास सरूं लागला हें लक्ष्मणास पसंत पडलें नाहीं. त्यास वाटलें कीं, आपण अयोध्येंत गेल्यावर रामाच्या सेवेस इतर दास असल्यामुळें आपणास सेवेची संधि मिळणार नाहीं.

परतले ऋतु, मासहि लोटले ॥ दिवस याम भराभर चालले ॥
प्रकटलें नव वर्ष, तिघांतला ॥ प्रणय मात्र अखंडित राहिला ॥ २२ ॥

तिघांतला......राहिला; इतर सर्व गोष्टी जरी बदलत होत्या तरी त्या तिघांतलें प्रेम मात्र जसेंच्या तसेंच राहिलें.

पुढतिं एक दिनीं फलसंचया ॥ रघुपतीस्तव साधु करावया ॥
त्वरित लक्ष्मण पद्मवनांतरीं ॥ भ्रमरसा शिरला विपिनोदरीं ॥ २३ ॥

साधु लक्ष्मण पद्मवनांतरीं भ्रमरसा विपिनोदरीं शिरला, असा अन्वय.

मधुर कूजन पक्षि जयांतुनी ॥ करिति सादर निर्भय बैसुनी ॥
फल-समृद्धि-भरें नत जाहले ॥ विविध तेथ बुधें तरु पाहिले ॥ २४ ॥
मुख यदीय उन्हांतुनि वाळलें ॥ करि फलांस्तव याचन आपलें ॥
स्वपदसंश्रित तो तरुमंडला ॥ अतिथि पूजन-भाजन जाहला ॥ २५ ॥

स्वपद०......जाहला; ज्यानें आपल्या पायाचा (पायथ्याच्या सावलीचा) आश्रय केला असा तो अतिथि वृक्षांच्या पूजेस पात्र झाला. अतिथीची पूजा करणें हा गृहस्थांचा धर्मच होय, असा आशय.

कुसुमकेशर अक्षतकारणीं ॥ मधुमरंद जलास्तव योजुनी ॥
स्वकुसुमें स्वफलें मग अर्पिती ॥ तरु अशापरि पूजन साधिती ॥ २६ ॥

अक्षतकारणीं कुसुमकेशर योजुनी; अक्षतांच्या कामीं फुलांचे केसर योजून.

भ्रमरगुंजित कोकिलगायनें ॥ श्रुतिसुखार्थ फलेंहि उपायनें ॥
सदतिथीप्रति सादर ठेविता ॥ प्रकटवी सहकार गृहस्थता ॥ २७ ॥

आम्रवृक्षानें त्या श्रेष्ठ पाहुण्याला भुंग्यांचे गुंजारव व कोकिलांचीं गायनें ऐकवून व आपलीं फळें हीं उपायनें ठेवून आपली गृहस्थता व्यक्त केली. आम्रवृक्षाला माधवी लता ही स्त्री असल्यामुळें तो गृहस्थाश्रमीच होय, असा भाव.

कठिण कर्कश फार दिसावया ॥ विजनवास सदैव रुचे जया ॥
बघुनियां अतिथी परि चांगला ॥ फणस त्या मधुरांतर जाहला ॥२८॥

मधुरांतर......जाहला; गोड हृदयाचा झाला.

मधुफलें मम पाहुनि पाहुणा ॥ प्रथम येउनि याचिल आपणा ॥
धरुनि गर्व असा स्वफलाननीं ॥ करि जणुं स्मित दाडिम काननीं २९

धरुनि......काननीं; असा मनांत गर्व धरून डाळिंबाचा वृक्ष आपल्या फलरूपी मुखांनीं जणूं काय हांसत होता ! त्याचीं फळें उमलून त्यांतले दाणे दांताप्रमाणें दिसत होते, अशी उत्प्रेक्षा.

जनकजा-रघुनंदन-नामकें ॥ प्रसवती सुफलें बहु कौतुकें ॥
निकट राहुनि संगम साधिती ॥ बुध अशी निरखी तरुदंपती ॥ ३० ॥

जनकजारघुनंदननामकें; रामसीता नांवाचीं (सुफलें). **तरुदंपती**; वृक्षांची जोडी (रामफळी व सीताफळी).

निज फलां घन-पर्ण-मयांऽबरीं ॥ बदर तौं लपवी बहुतांपरी ॥
सरस तीं नव्हतीं न च याचिलीं ॥ कृपणबुद्धि कधींच नसे भली॥३१॥

घनपर्णमयांबरीं; दाट पानांच्या वस्त्रांत. लक्ष्मण इतर फळें गोळा करीत असतां बोराच्या वृक्षानें आपलीं फळें पर्णरूपी वस्त्रांत लपविण्याची खटपट चालविली होती. तीं फळें ह्मणजे मोठीं सरस होतीं असें नाहीं व तीं लक्ष्मणास पाहिजेच होतीं असेंही नाहीं, पण कृपणाची बुद्धिच खोटी असते.

क्षितिसुताधरसेवन जो करी ॥ निज फलीं प्रभु तो न रती धरी ॥
म्हणुनियां करि निष्फलकामना ॥ मधुलता स्वरसाश्रुविमोचना ॥३२॥

मधुलता; द्राक्षलता. सीतेचें अधरपान करणाऱ्या रामाला आपलीं फळें रुचणार नाहींत, या विचारानें निराश झालेली द्राक्षाची लता जणूं काय आपले रसरूपी अश्रु ढाळीत होती.

तरुकुलीं परमोन्नत मी जरी ॥ विमुख जाइल याचक हा तरी ॥
धरुनि नारळ भीति अशी मनीं ॥ विरघळे अतिलज्जित होउनी ॥३३॥

सगळ्या वृक्षांमध्यें मी जरी उंच असलों तरी त्या माझ्या उंचपणामुळेंच (माझीं फळें हाताला येण्यासारखीं नसल्यामुळें) हा अतिथि विमुख जाईल, या भीतीनें नारळाला लाज वाटली व त्याच्या हृदयाचें जणूं पाणी झालें!

जनकजाधरशोणित होउनी ॥ मधुरतेस्तव गर्व करी मनीं ॥
निकट-दर्शन-साध्वस पावलें ॥ मलिन सांप्रत जांभळ जाहलें ॥ ३४ ॥

सीतेच्या ओंठाप्रमाणें लाल झाल्यामुळें जांभळाला आपल्या सौंदर्याचा गर्व झाला होता पण आतां समक्ष तुलनेचा प्रसंग येणार, या विचारानें तें काळें ठिक्कर पडलें.

पपनसें सरसें बहु लागलीं ॥ अननसें घनदाट उभारलीं ॥
कवठ जांब उदुंबर यांमधीं ॥ पसरला जणुं मूर्त रसोदधि ॥ ३५ ॥
क्षुधित रामवधू विपिनांतरीं ॥ विहगभक्ष्य फलें न हरूं परी ॥
उचलिला कर यास्तव ओढिला ॥ द्रुतविलंबित लक्ष्मण जाहला ।३६।

सीता वनांत भुकेली आहे या विचारानें फळें तोडण्याकरितां लक्ष्मणानें आपला हात वर केला, पण हीं फळें पाखरांचें भक्ष्य होत व तीं आपण हरण करणें रास्त नाहीं, या विचारानें त्यानें तो मागें घेतला. अशा रीतीनें लक्ष्मण द्रुतविलंबित झाला.

आतिथि यासम सांप्रत कोणता ॥ परि मिळेल अह्मां विपिनास्थितां ॥
करुनि निश्चय हा निज मानसीं ॥ तरु तदा करिती फलवृष्टिसी ॥३७॥
तरुकृती बरवी अवलोकुनी ॥ विहगही रतले फलवर्षणीं ॥
परदया जरि एककृतादरा ॥ उपजवी उपकारपरंपरा ॥ ३८ ॥

एककृतादरा; एकानें केला आहे अंगीकार जिचा अशी. **परदया...उपकारपरंपरा**; परदयेचें उदाहरण एकानें जरी घालून दिलें तरी तें अनेक उपकारांना घडवून आणितें. अर्थांतरन्यास.

निमिषमात्र तया विपिनीं भलें ॥ सुफलवर्षण हें जंव जाहलें ॥
विविध-वर्ण-विचित्रित तोंवरी ॥ पसरला फलविस्तर भूवरी ॥ ३९ ॥

विविधवर्णविचित्रित; नानाप्रकारच्या रंगांनीं चित्रविचित्र दिसणारा. **फलविस्तर**; फळांचा गालिचा.

रससमृद्ध फलें अति चांगलीं ॥ नरवरें पडतां बहु झेलिलीं ॥
पडुनि जीं उडतीं धरि तीं करीं ॥ निजपटीं मग संचय तो करी॥४०॥
रघुपतिप्रिय तेथुनि तो मुनि ॥ सुफलसंचय सत्वर घेउनी ॥
निजमनीं कृतकृत्यहि होउनी ॥ परतला रघुनायकदर्शनीं ॥ ४१ ॥

रघुपतिप्रिय मुनि; रामाचा आवडता ऋषि (लक्ष्मण).

अवचित त्रिदिवांतुनि तोंवरी ॥ उतरली द्युति एक महीवरी ॥
असहनीय विलोकुनि तेज जें ॥ रघुवरें मिटलीं नयनें निजें ॥ ४२ ॥

त्रिदिव; आकाश. **द्युति**; तेजःपुंज वस्तु.

कडकडाटरवाविण चंचला ॥ उतरली, न नभीं घन सांचला ॥
तरि कशी म्हणुनी जंव पाहिलें ॥ तरल खड्ग पुढें तंव राहिलें ॥४३॥

तरल; तेजस्वी.

कुठिल हें तरि कोठुनि पातलें ॥ मजपुढेंच किमर्थ विरामलें ॥
करि विचार असा निज मानसीं ॥ निमिषमात्र वनांत उभा वशी ४४
विजन जें विपिनीं गगनांतुनी ॥ उतरलें करवाल न त्या धनी ॥
मजसि लब्ध, मदर्थ नसेल ना ॥ कवण जाणिल ईश्वरयोजना ॥४५॥
मग विचारुनियां स्वमनीं असें ॥ उचलिलें करवाल असाध्वसें ॥
परजुनी जंव उज्वल पाहिलें ॥ तंव तदीय मना बहु मानलें ॥ ४६ ॥
परि परीक्षुनि खड्गवरा तया ॥ मति धरी रघुवीर पहावया ॥
अति चिकित्सक तो नव्हता स्वता ॥ बुध न विश्वसिती अपरीक्षिता

अति......अपरीक्षिता; तो अति चिकित्सेखोर होता असें नाहीं, पण कोणत्याही वस्तूची परीक्षा केल्याशिवाय तिजवर विश्वास न टाकणें, हा शहाण्या लोकांचा स्वभावच होय.

पवन-सूक्ष्म-गतीस अभेद्य जें ॥ न पशु हिंस्र जया सहसा भजे ॥
नरवरें घनदाट उभारलें ॥ निकट कीचकजाल विलोकिलें ॥ ४८ ॥

कीचकजाल; कळकाचें बेट.

उचलुनी मग खड्ग करें निजें ॥ करि निघात बलेंचि निसर्गजें ॥
कठिण जे परि वंश दुभंगले ॥ रुधिरपूर तयांतुनि चालले ॥ ४९ ॥

निसर्गजें बलेंचि; आपल्या साहजिक शक्तीनें. **वंश**; वेळू.

विहित कानन-वंश-कुलावरी ॥ सहज घावहि तो गमला परि ॥
प्रथम राक्षस-वंश-कुलाचला ॥ रगडिता पविपातचि जाहला ॥ ५० ॥

राक्षसवंशकुलाचला; राक्षसांच्या वंशरूपी महापर्वताला. **पविपात**; वज्राघात. लक्ष्मणानें अरण्यांतल्या वंशांवर (वेळूंवर) तो घाव सहजच घातला खरा, पण तो राक्षसांच्या वंशरूपी महापर्वताला रगडणारा पहिला वज्राघातच झाला.

रुधिरपूर न तो जणुं तेधवां ॥ दनुज-मंडल-कर्म-सरो-भवा ॥
पतित-वंश-विलब्ध-मुखा जगा ॥ वरि तदा प्रकटे दुरितापगा ॥ ५१ ॥

दनुज० भवा; राक्षसांच्या कर्मरूपी सरोवरांत उत्पन्न झालेली. **पतितवंश० मुखा**; पडलेल्या वेळवांतून बाहेर निघालेली. **दुरितापगा**; पातकाची नदी. तो रक्ताचा पूर

नव्हे तर राक्षसांच्या कर्मरूपी सरोवरांत उत्पन्न झालेली ती पापांची नदीच त्या पडलेल्या वेळवांतून बाहेर निघून जगावर प्रकटली. उत्प्रेक्षा.

स्वकृत शस्त्रपरीक्षण संयमी ॥ बघुनियां फळलें रुधिरोद्गमीं ॥
चकित होउनि निश्चल राहिला ॥ असि करांतुनि भूवरि सांडिला ५२

स्वकृत शस्त्रपरीक्षण रुधिरोद्गमीं फळलें बघुनियां; आपण केलेली शस्त्र-परीक्षा रक्तस्रावाला कारण झाली हें पाहून.

मग म्हणे प्रभु हे रघुनायका ॥ भवदवांतक संश्रयदायका ॥
कवण मीं अधमें मुनि मारिला ॥ चपल-चित्त-विकार न वारिला॥५३॥

करुनि शोक असा बहु काननीं ॥ परतला अति दुःखित होउनी ॥
रघुपतीस विलोकुनि लौकरी ॥ सकल-वृत्तनिवेदन तो करी ॥ ५४ ॥

प्रथम वृत्त तदीय रघूत्तमें ॥ परिशिलें सगळेंच यथाक्रमें ॥
मग विचार करूनि मनीं जरा ॥ मधुर सांत्वनपूर्ण वदे गिरा ॥ ५५ ॥

न करि शोक वृथा नयपालका ॥ न वधिला मुनि तो वनिं बालका ॥
निवटिला खल एक तुवां असे ॥ असुखकारण तेथ मुळीं नसे ॥५६॥

नयपालका; नीतीला पाळणाऱ्या.

दशमुखाप्रति शूर्पनखाभिधा ॥ कुभगिनी कुगुणाहि तथाविधा ॥
असत एक, तिचा सुत हा वनीं ॥ चिर असे रतला शिवचिंतनीं॥५७॥

तथाविधा कुगुणा; त्याच्याप्रमाणेंच दुर्गुणी.

त्रिभुवनाप्रति पीडनकामना ॥ धरुनि हा करि शंकरचिंतना ॥
शिवहि चिंतितया अशिवेप्सिता ॥ कटु फला वितरी शिव सर्वथा ॥

शिवहि......सर्वथा; शिवाचें चिंतन करणाऱ्या पण अशिव हेतु धरणाऱ्या अशा त्याला शिवानें अत्यंत वाईट फळ दिलें.

भडकणारचि मानव-दानवीं ॥ विषम यज्ञ इथोनि महाहवीं ॥
वधुनि शंबरराक्षस हा तुवां ॥ वितरिली प्रथमाहुति आहवा ॥ ५९ ॥

महाहवीं; मोठ्या समरांत. **आहवा**; यज्ञाला. येथून पुढें राक्षस आणि मनुष्य यांच्यामध्यें जो मोठा रणयज्ञ भडकणार आहे त्याला पहिली आहुति आज तूं या शंबर राक्षसाला मारून दिलीस.

अशुभ जें ह्मणसी घडलें करें ॥ शुभचि होउनि तें फळलें खरें ॥
परि पुढें बहु सावध तूं रहा ॥ कुटिलनीतिक राक्षस कीं महा ॥६०॥

भयदवार्त मधुव्रत तेधवां ॥ पिउनि राममुखांबुज-संभवां ॥
मधुर-वाङ्‌मकरंद-रजःकणां ॥ सहज-लब्ध करी सुखपारणा ॥६१॥

भयरूपी दवानलानें त्रस्त झालेला तो लक्ष्मणरूपी भ्रमर रामाच्या मुखकमलांतून बाहेर पडलेल्या मधुरशब्दरूपी मकरंदाच्या कणांचें सेवन करून अनायासानें आपला उपास सोडता झाला.

दैत्यांशीं कलि घडणार कल्पनांना ॥
या आणी, मग धरि जी विकल्प नाना ॥
त्या भार्येप्रति कुरवाळुनी कपोलीं ॥
प्रेमानें कवल मुखांत राम घाली ॥ ६२ ॥

प्रहर्षिणी वृत्त.

सर्ग ८ वा.

दुजा दिनीं रघुपतिच्या शिवार्चनीं ॥ करावया कुसुमसमृद्धि सन्मणि ॥
फिरूनियां घनगहनीं वनोवनीं ॥ प्रवेशला विकच-सरोज-काननीं ॥ १ ॥

सन्मणि; सज्जनशिरोमाणि (लक्ष्मण). रुचिरा वृत्त.

फुलोनि जीं दलवलयांत शोभलीं ॥ वनास जीं परिमल देत राहिलीं ॥
मनोहरें अमित अशीं तया स्थलीं ॥ नरोत्तमें कमलकुलें विलोकिलीं ॥ २ ॥

दलवलयांत; पांकळ्यांच्या मंडलांत.

तळीं जलाशय रमणीय एक तो ॥ तयावरी नलिनसमूह शोभतो ॥
हळूं हळूं तदुपरि वायु वाहतो ॥ तयांतुनी मधुकर मत्त गाहतो ॥ ३ ॥

नलिनसमूह; कमळांचा समुदाय.

सुखें तटीं करिति विहंग गायना ॥ बिसांवरी करिति मराल पारणा ॥
कलस्वरें परभृत मंजु बोलती ॥ समीरणें कमललताहि डोलती ॥ ४ ॥

बिस; कमलतंतु. **परभृत**; कोकिळा.

कधीं उठे सलिलतरंग खालतीं ॥ तयासवें कमलकदंब हालती ॥
नवासवीं मधुकर दंग राहती ॥ तयांसही सहज तदा मिळे गती ॥ ५ ॥

कदंब; समुदाय. **गति**; चलन.

जलातलीं पसरुनि पंक राहिला ॥ तटावरी मलिन तृणौघ वाढला ॥
अशा स्थलीं वसति रमा सुखें करी ॥ गुणान्वितांप्रति न निवास-माधुरी ६

गुणान्वितांप्रति न निवासमाधुरी; गुणिजन आपलें वसतिस्थान चांगलें आहे अगर वाईट आहे, याविषयीं बेफिकीर असतात. त्यांच्यामुळें कसल्याही स्थानाला महत्व येतें, असा भाव. अर्थांतरन्यास.

जलावरी अरुण पतंग हिंडती ॥ स्थलीं स्थलीं सकुतुक भेक बैसती ॥
तटावरी सकल मिळून खेळती ॥ पुन्हां उड्या मग सलिलांत मारिती॥७॥
सरोरुहें धवल कितीक तांबडीं ॥ मनोहरें किति घननील चोखडीं ॥
नभांतल्या विकसित तारकांपरी ॥ विराजलीं मधुर अशा सरोवरीं ॥ ८ ॥

मधुर; गोड.

जल-स्थली नचि, जणुं गंधसिंधु तो ॥ वनांतला जणुं मधुकोश शोभतो ॥
न वा स्थिता सरसिज-मुद्रिका-वती ॥ हरिप्रियांकित जणुं टांकसाळ ती॥९॥

जलस्थली; सरोवर. तें सरोवर नव्हे तर गंधाचा जणू कांहीं एक समुद्रच होता, किंवा तें एक मकरंदाचें सांठवण होतें, अथवा ती कमलरूपी नाण्यांनीं युक्त अशी लक्ष्मीच्या मालकीची टांकसाळच होती. उत्प्रेक्षा.

तटावरी विलसत केतकीतती ॥ तदंतरीं करिति भुजंग फूत्कृति ॥
जलार्थ जें मृगकुल येत पल्वलीं ॥ तदीय ती वितत दिसे पदावली ॥ १० ॥

वितत; लांबच लांब.

क्षिती दिसे विषम तटीं चिराळुनी ॥ जमे तयावरि बहु फेंस वाळुनी ॥
पदीं पदीं पसरुनि पल्वलीं शिला ॥ प्रवेशना सुखकर मार्ग जाहला ॥ ११ ॥

क्षिती......चिराळुनी; तटावरील जमिनीला भेगा पडल्यामुळें ती वाईट दिसत होती.

विलोकुनी ललित तडाग यापरी ॥ बुधाग्रणी निमिष विराम तो करी ॥
जलांतरीं हळुंच पुढें शिरूनियां ॥ प्रवर्तला कमल-कुलोपसंचया ॥ १२ ॥

कमलकुलोपसंचया; वेगवेगळीं कमळें तोडण्यास.

खुडोनियां परि पहिल्या नवांबुजा ॥ बुधें न जों कर सरसाविला दुजा ॥
तदीय तों अवचित येत मागुनी ॥ श्रुतीवरी मदकल नूपुरध्वनि ॥ १३ ॥

खुडोनियां......दुजा; पहिलें ताजें कमळ तोडून दुसरें तोडण्याला त्यानें आपला हात जों पुढें केला नाहीं तोंच.

वळूनियां नरवर होय पाहता ॥ दिसे तया तंव युवती तटस्थिता ॥
मनोहरा बहु जरि वल्क नेसली ॥ तयास जी निरखुनि मंद हांसली ॥१४॥

न जी वधू प्रथम मुळींच पाहिली ॥ समीप ती अविदित कैंवि राहिली ॥
तपस्विनी कवण असेल सुंदरी ॥ असा मनीं सहज विचार तो करी ॥१५॥

न......राहिली; जी स्त्री आपणास आसपास कोठेंही दिसली नव्हती ती इतक्या जवळ न कळतां कशी राहिली.

कुणी असो परललनाच ती खरी ॥ म्हणूनि तो नमन तिला सुधी करी ॥
परस्त्रियांसह रघुवीर वागतां ॥ निजांजली विरचिति साक्षिदेवता ॥ १६ ॥

ती कोणीही असली तरी परस्त्रीच होती हें जाणून लक्ष्मणानें तिला नमस्कार केला. परस्त्रीशीं वागतांना रघुवंशीय पुरुष आपले हात जोडून त्या अंजुलीच्या रूपानें एक देवता साक्षीला ठेवीत असत. देवतेच्या समोर कोणीही पुरुष स्त्रीशीं शृंगारचेष्टा करणार नाहीं व नमस्काराला देवता केल्यानें त्या स्त्रीविषयीं पूज्यबुद्धि प्रकट झाली.

तदीय ती निरखुनि वृत्ति चांगली ॥ तपस्विनी चकित मनांत जाहली ॥
वरूनियां स्मित परि आननावरी ॥ गिरा अशी वदत तयास सुंदरी ॥ १७ ॥

आननावरी स्मित वरूनियां; मुखानें मृदुहास्य करून.

नमस्क्रिया मज करितां नरोत्तमा ॥ खरी घडे तव गुणसागरोपमा ॥
अभागिनी असुनिहि यक्षसंभवा ॥ न पात्र मी तव बहुमान-गौरवा ॥ १८ ॥

अहो नरवरा ! तुह्मीं मला नमस्कार केलात त्यानें तुमचें 'गुणसागर' हें नांव यथार्थ दिसून आलें. पण मी यक्षकुळांतली असूनही अभागी असल्यामुळें तुमच्या गौरवाला पात्र नाहीं.

प्रियात्मजा गुरुजननींस मी खरी ॥ उपेक्षिजे क्षण मजला न खेचरीं ॥
गृहीं वसे मम कमला अखंडिता ॥ तथापि मी सकल सुखांस वंचिता॥१९॥

उपेक्षिजे...... खेचरीं; गंधर्व लोक माझ्या सेवेस सदा सादर असत.

स्वकामना सफल तपें करावया ॥ वनांत मी चिर करिते तपस्क्रिया ॥
व्रतांत या समय कितीक लोटला ॥ तपःफलोदय न अजूनि जाहला ॥२०॥

तपस्क्रिया; तपश्चर्या. **तपःफलोदय**; तपाचें साफल्य.

अहो जिला अवगणिलें तपः-फलें ॥ अशा मला नृवर किमर्थ वंदिलें ॥
वदूनियां वचन असें तपस्विनी ॥ प्रवर्तली क्षणभरि अश्रुमोचनीं ॥ २१ ॥

अहो......वंदिलें; जिला तपसुद्धां फळ देत नाहीं (इतकी जी पापी) तिला तुह्मीं कशास वंदन केलें ?

करूनियां श्रवण तिची कथा मनीं ॥ दयालु तो कळवळला महन्मणि ॥
विचारणा करुनि मनांत तत्वतां ॥ असें तिला मग वच होय बोलता ॥२२॥

महन्मणि; सज्जनशिरोमणि. **विचारणा**; विचार.

शुचिस्मिते ! कठिन तपा प्रवर्ततां ॥ तुझा असे वद तरि हेतु कोणता ॥
न राघव प्रकटवि शाद्बिकी दया ॥ कथी असें समजुनि तो जनास या २३

न......दया; रघुवंशीय पुरुष आपली दया शब्दांनीं प्रकट करीत नाहीं तर कृतीनें करितो.

गमे तुला समुचित मोक्ष योगिनी ॥ न वा मति त्रिदिव-निवास-कांक्षिणी ॥
तुला मम व्रतफल सर्व अर्पुनी ॥ घडेन मी त्वरित सहाय साधनीं ॥ २४ ॥

समुचित गमे; इष्ट आहे. **त्रिदिवनिवासकांक्षिणी;** स्वर्गांत राहण्याविषयीं उत्सुक.

नवा कुणी तुज तरुणें विमोहिलें ॥ त्यजूनियां मग कुदशेंत लोटिलें ॥
मला कथी कवण युवा, तुला तया ॥ क्षणांत मी वळविन गे वरावया॥२५॥
तदीय या परिसुनि रम्य भाषणा ॥ वदे तया पुनरपि पंकजानना ॥
कितीतरी मनुजमणे दयावती ॥ अभागिनीवरि घडली भवन्मति ॥ २६ ॥
असे न मी लवभरि मोक्षकामुका ॥ त्रिविष्टपीं मजसि निवास हो फुका ॥
भवत्तपें मज मिळणार काय तें ॥ न जें करीं पडत असूनि आयतें ॥ २७ ॥

त्रिविष्टपीं; स्वर्गांत.

नरोत्तमें क्षितिवलयैकभूषणें ॥ हरूनियां मम मन जिंकिलें गुणें ॥
तया परी पर-रति-बद्ध पाहुनी ॥ करीत मी तप विफलानुरागिणी ॥ २८ ॥

क्षितिवलयैकभूषणें; पृथ्वीला अलंकारभूत झालेल्या. **पररतिबद्ध;** दुसरीच्या प्रेमानें बांधलेला. **विफलानुरागिणी,** जिचें प्रेम फुकट गेलें आहे अशी.

त्यजूनियां मम सदनास तेथुनी ॥ तपस्विनीसमुचित वेष घेउनी ॥
कसेतरी परिहरिले वनांतुनी ॥ पुढील मी दिवस तदीय चिंतनीं ॥ २९ ॥

तपस्विनीसमुचित; योगिनीला योग्य असा. **परिहरिले;** घालविले.

भ्रमिष्टशी विहरत मी कधीं कधीं ॥ विलोकिली गगनपथांत कौमुदी ॥
असूनि ती नव-शशि-बिंब-शालिनी ॥ गमे मला परि जणुं कालयामिनी॥३०॥

नवशशिबिंबशालिनी; जिच्यामध्यें नवचंद्राचें बिंब चमकतें आहे अशी. **कालयामिनी;** काळरात्र.

विकासती विमल नभांत तारका ॥ न जाहल्या परि मम दुःखहारका ॥
मनोहरें मृदु कुसुमें वनांतलीं ॥ अनेकदां तुडवुनि मीं विमर्दिलीं ॥ ३१ ॥
कधीं कधीं अनिमिष नेत्र लावुनी ॥ नदीतटावरि बसले अभागिनी ॥
गमे मला कृश परिपूर्णजीवना ॥ महानदी मम हृदयेश्वराविना ॥ ३२ ॥

गमे......०विना; माझ्या प्राणेश्वराशिवाय मला पाण्यानें भरून चाललेली महानदी कोरडी दिसली.

कधीं तरी अशन निपान वा न वा ॥ विदाह तों मम घडला नवा नवा ॥
निराशता मजसि वरूनि राहिली ॥ न एकही सुखकर वस्तु पाहिली ॥३३॥
नरोत्तमा प्रियकर जो मदीय तो ॥ अहर्निशीं मम निकटींच राहतो ॥
अलभ्य तो मजसि तथापि होतसे ॥ अदृष्ट हें खडतर कोणतें असें ॥ ३४ ॥
नकोत हीं क्षणभरि मुग्ध भाषणें ॥ जनें जया मजसि विमोहिलें गुणें ॥
मदीय जो नयन-चकोर-चंद्रमा ॥ तुह्मीच ते प्रियकर हो नरोत्तमा ॥ ३५ ॥
मदंतरा जनकसुतास्वयंवरीं ॥ हरीत जो विभु नरवीरकेसरी ॥
तपोव्रतीं वश न अजून जो घडे ॥ विलोकिते मम हृदयेश तो पुढें ॥ ३६ ॥
खरीं प्रिया जरि घडतीं ममेप्सितें ॥ गळ्यांत मी तरि मग माळ घालिते ॥
मदर्थ वा जरि करुणाचि शाब्दिकी ॥ न जीवनीं मज तरि हेतु लौकिकीं ॥

प्रियकरा ! माझी इच्छा सफळ व्हावयाची असेल (तुम्ही अनुकूल असाल) तर गळ्यांत माळ घालतें, आणि तुमची जर मजवर शाब्दिकच दया असेल तर मला जगांत राहण्याचें कारण उरलें नाहीं.

अशा तिच्या श्रवण वचा करूनियां ॥ घडे तदा नरवर पात्र विस्मया ॥
करूनियां निमिष मनीं विचारणा ॥ वदे अशा तिजसि गभीर भाषणा ॥२८॥
असूनि हे शुभमुखि यक्षकन्यका ॥ नरार्थ हा श्रम करितेसि कां फुका ॥
त्यजूनियां सुरवर, मानवार्थनीं ॥ प्रवर्तसी अनुचित-योग-कांक्षिणी ॥ ३९ ॥

मानवार्थनीं; मनुष्याला साध्य करून घेण्यांत. **अनुचितयोगकांक्षिणी**; अननुरूप विवाहाची इच्छा करणारी.

न रूप, ना धन, नहि राज्य राहिलें ॥ जया तया हृदय किमर्थ वाहिलें ॥
वरूनियां मजसि अशा वनेचरा ॥ मिळे तुला सुखलव कोणता खरा ॥४०॥

कोणता सुखलव; कोणच्या सुखाचा लवलेश.

ह्मणून या त्यजुनि हठास किंनरि ॥ निजालया गमन इथूनि तूं करी ॥
निजोचिता तरि कवणा वरा वरी ॥ घडे तुझें कुशल तरीच सुंदरी ॥ ४१ ॥
करूनि ती श्रवण तदीय वैखरी ॥ त्यजीत निःश्वसित सुदीर्घ किंनरी ॥
करूनियां अविरत बाष्पमोचना ॥ करी सगद्गद–पद-युक्त भाषणा ॥ ४२ ॥

सगद्गदपदयुक्त; अडखळणाऱ्या अक्षरांनीं युक्त.

नरोत्तमा चतुर असांच आपण ॥ वचांतुनी दिसत विरोध हा पण ॥
मनोमय प्रभव जयास लागतो ॥ कसा फिरे सहज दृढानुराग तो ॥ ४३ ॥

मनोमय......तो; जें (पूर्वसंस्कारामुळें) मनांत उत्पन्न होतें तें स्थिरप्रेम सहजासहजीं कसें पालटेल.

निदर्शनें प्रथम धरी प्ररोह तो ॥ समागमें दृढतर पोष पावतो ॥
वियोगही द्विगुण करी जया असा ॥ दुजा स्थलीं प्रणय जडेल हो कसा ॥

जें दर्शनानें प्रथम उद्भवतें, समागमानें वाढतें व वियोगांतही दुणावतें, तें प्रेम एका ठिकाणचें दुसऱ्या ठिकाणीं कसें जडेल ?

तया नसे विभव-विलास-कामना ॥ न रूपही करित तदीय मोहना ॥
विलोभनें सकलहि तुच्छ तो करी ॥ तरंगतो प्रिय-गुण-सागरांवरी ॥ ४५ ॥

त्या प्रेमाला विभवाची अपेक्षा नाहीं. तें रूपाला भुलत नाहीं. तें सगळ्या मोहक वस्तूंना तुच्छ करून आपल्या प्रियकराच्या गुणरूपी समुद्रावर तरंगत असतें.

प्रिया किती अजुनि ममांत पाहतां ॥ मदार्ति ही बघुनि निवांत राहतां ॥
कुमारिका करि अनुराग-याचना ॥ करा स्मित क्षण तिज आपुली ह्मणा ४६

कितीतरी दिवस अदृश्य राहुनी ॥ निरीक्षण-द्विगुणित ताप साहुनी ॥
अहो प्रिया मम निलयास सोडुनी ॥ तुह्मांसवें विहरत मी वनोवनीं ॥ ४७॥

निरीक्षणद्विगुणित; दर्शनामुळें दुप्पट वाटणारे.

जलीं करां तृषित निपान आपण ॥ तटासि मी करि भवदीय चिंतन ॥
तरूतळीं तनु तुमची विसांवली ॥ वरूनि मी नयनजलेंहि ढाळिलीं ॥ ४८ ॥
दिनातपें व्यथित विशेष होउनी ॥ प्रिया फलांस्तव विहरां वनांतुनी ॥
भवत्तनूवरि मृदु वात वाहिले ॥ मदीय निःश्वसित तयांत राहिलें ॥ ४९ ॥
वनीं फुलें पसरुनियां तयांवरी ॥ सुखार्थ मी शयन कधीं कधीं करी ॥
समागमें मम परि तींच तापतीं ॥ मदंगकें व्यथित तशींच राहती ॥ ५० ॥

मदंगकें; माझीं गात्रें.

व्रतस्थितां बघुनि तुह्मांस आपली ॥ मनांत मी रति चिरकाल ठेविली ॥
न सोसवे मज विरहार्ति यामुळें ॥ प्रिया अतां प्रकट समीप जाहले ॥ ५१ ॥
भवत्पदांवरि हृदयेश आपुलें ॥ कधींच मी तनु मन पूर्ण वाहिलें ॥
करा प्रिया मजसि कृतार्थ आदरा, ॥ नवा त्यजा उचित गमेल तें करा ५३

करा......करा; आतां मला अंगीकारानें धन्य करा अथवा दूर लोटा, जें तुम्हांला बरें दिसेल तें करा.

ऐकूनि भाषण सगद्गद कामिनीचें ॥
वैराग्यशीलहि मन द्रवलें तयाचें ॥
तेव्हां मनीं करुनि निश्चय पूर्ण, ऐसें ॥
त्यानें दिलें तिजसि उत्तर वाग्विलासें ॥ ५४ ॥

वाग्विलासें; भाषाचातुर्यानें. वसंततिलकावृत्त.

भार्या असे मजसि एक, दुजी कशाला ? ॥
शास्त्रीं निदेश पुरुषांस असा न केला ॥
शास्त्रांस संमत कलत्र-समृद्धि आहे ॥
आज्ञापितीं अनुमतीं तरि भेद राहे ॥ ५५ ॥

शास्त्रांस......राहे; अनेक स्त्रिया करण्याला शास्त्रांची संमति आहे, पण आज्ञा नाहीं. एखादी गोष्ट करा म्हणून स्पष्ट आज्ञा करणें व ती केल्यास आपली नुसती संमति देणें यांत फार तफावत आहे. ज्या गोष्टी मनुष्यानें केल्याच पाहिजेत असें शास्त्रांस वाटतें, त्या करण्याबद्धल शास्त्राच्या स्पष्ट आज्ञा आहेत तशी अनेक स्त्रिया करण्याविषयीं त्यांची आज्ञा नसल्यामुळें तसें करणें गौण होय, असा लक्ष्मणाचा अभिप्राय.

राहो तथापि, तव निश्चित मानसातें ॥
मी भग्नकाम न करीन, परंतु येथें ॥
अस्मद्विवाह-विधि साध्य घडावयाला ॥
अद्यापि एक अविलंघित किंतु ठेला ॥ ५६ ॥

अविलंघित किंतु; न निवारण केलेली अडचण.

आहे ममाग्रज समीप वनांत या गे ॥
जो मद्धितास्तव निरंतर तात जागे ॥
त्याची जरी मजसि संमति लाधताहे ॥
त्वत्कामना सफल तैं घडणार आहे ॥ ५७ ॥
तूं प्रार्थना करुनि यास्तव गे तयाची ॥
त्वत्कामनेसि अनुमोदन-दान याची ॥
तद्दत्त चिन्ह जरि आणिसि एथ कांहीं ॥
इच्छेसि मी तरि तुझ्या प्रतिकूल नाहीं ॥ ५८ ॥
त्याचें ऐसें ऐकुनियां तें वच रामा ॥
बोले आतां साधुनि येते निजकामा ॥
ऐसें त्यातें बोलुनि ती सत्वर गेली ॥
श्रीरामाच्या जाउनियां संनिध ठेली ॥ ५९ ॥

मत्तमयूर वृत्त.

रामा नमस्कृति करोनि मनोभिरामा ॥
कामा निवेदन करी परिपूर्ण-कामा ॥
वंदूनियां मग सवेंचि महासतीतें ॥
मागे तयांप्रति निजेप्सित-संमतीतें ॥ ६० ॥

निजेप्सितसंमतीतें; आपल्या इच्छेस अनुमोदन. वसंततिलका वृत्त.

वदतां वच यापरि ती सुमुखी ॥ रघुवीर तिच्या वदना निरखी ॥
करुनी मग निश्चय तो स्वमनीं ॥ वदला वच यापरि सूज्ञमणि ॥ ६१ ॥

तोटक वृत्त.

तूं लक्ष्मणास अनुरूप वधू खरी गे, ॥
तूंतें न तो अननुरूप, तया वरी गे ॥
यद्दर्शनें वरिल लक्ष्मण तूर्ण तूतें ॥
ऐसें न देय परि एकहि चिन्ह येथें ॥ ६२ ॥

तूंतें न तो अननुरूप; तो तुला अनुरूप नाहीं असें नाहीं. (अनुरूपच आहे.) **न देय**; देण्यासारखें नाहीं. वसंततिलका.

पृष्ठावरी लिहुनि यास्तव संमतीतें ॥
देईन मी तुजसि दाखवि ती तयातें ॥
तें वाक्य तीस मग सत्वर मान्य झालें ॥
चित्तीं ह्मणे मम तपा फळ आजि आलें ॥ ६३ ॥

"ही राक्षसी कुटिल शूर्पनखाभिधाना ॥
हीच्या समूळ हरिजे श्रुति नासिकांना ॥ "
पृष्ठावरी लिहुनि यापरि जानकीशें ॥
तीतें निरोप दिधला मग मंद हासें ॥ ६४ ॥

जाहली ही सखी आपणा काननीं ॥
जानकीच्या असा हर्ष वाटे मनीं ॥
जाउनी दाखवा भाउजींना पदें ॥
बाइ या लौकरी तीस ऐसें वदे ॥ ६५ ॥

पदें; अक्षरें. स्रग्विणी वृत्त.

जीस रघूत्तम-लेख-पदांचा ॥ भाव मुळीं कळलाच न साचा ॥
मानव-रक्त-वसा-धृत-रागा ॥ चालत ती द्विगुणीकृत-वेगा ॥ ६६ ॥

रघूत्तमलेखपदांचा; रामाच्या लेखांतील अक्षरांचा. **मानवरक्तवसाधृतरागा**; मनुष्याचें रक्त व चरबी या ठिकाणीं धरिला आहे लोभ जिनें अशी. **द्विगुणीकृतवेगा**; जिची गति दुप्पट झाली आहे अशी. दोधक वृत्त.

ती राक्षसी परत येउनि लक्ष्मणासि ॥ दावी स्वपृष्ठ-लिखित-प्रभु-शब्द-राशि
तें वाचुनी लिखित विस्मित लक्ष्मणानें ॥ तन्नासिका-श्रुतिपुटा हरिलें त्वरेनें॥

प्रभुशब्दराशि; रामाचा लेख. **हरिलें**; छेदिलें. वसंततिलका.

नासाग्र-कृंतन असें करितां पतीनें ॥
आरंभिला घन-गभीर विलाप तीनें ॥
सक्रोध होउनि सवेंचि निज स्वरूपा ॥
ती जाहली प्रकटिती कुगुणैक-कूपा ॥ ६८ ॥

घनगभीर; मेघगर्जनेप्रमाणें भयंकर. **कुगुणैककूपा**; दुर्गुणांची खाण.

तें रूप पाहुनि तिचें नर-वासवानें ॥
खड्गा पुन्हां उचलिलें परम त्वरेनें ॥
पाहूनि त्यास मग निष्ठुर-खड्ग-शाली ॥
ती राक्षसी पळुनि पद्मपुरास गेली ॥ ६९ ॥

नरवासवानें; नरेंद्रानें (नरश्रेष्ठ लक्ष्मणानें.) **निष्ठुरखड्गशाली**; निर्दयपणानें तरवारीचा उपयोग करणारा.

खर-त्रिशिर–दूषण-प्रमुख बंधु तीचे सखे ॥
तयांस कळवीत ती सकल वृत्त भग्नें मुखें ॥
करूनि दळ सिद्ध ते दनुज तेधवां आपलें ॥
रघूत्तम-वधोत्सुक प्रबल संगरा चालले ॥ ७० ॥

पृथ्वी वृत्त.

सर्ग ९ वा.

शस्त्रास्त्रांनीं पूर्ण जे सज्ज झाले ॥ दैत्यांचे ते वीर संगें निघाले ॥
संख्यातीता राघवाऽवास-मार्गें ॥ सेना त्यांची चालली वायुवेगें ॥१॥

संख्यातीता; असंख्य. **राघवावासमार्गें**; रामाच्या वसतिस्थानाच्या मार्गानें.
शालिनी वृत्त.

झाले वीर स्यंदनारूढ कोणी ॥ कोणी झाले स्वार वाजींवरोनी ॥
कोणी नागारूढ होवोनि येती ॥ त्यांच्या मागें पादचारी पदाति ॥ २॥

नागारूढ; हत्तीवर बसलेले.

उल्हाटाख्या भीषणा यंत्रधारा ॥ ती सेनाग्रीं चालती होय घोरा ॥
दंती गेले तीस जे, कां बुजोनी ॥ त्यांना कष्टें वारिलें हस्तिपांनीं ॥ ३॥

उल्हाटाख्या यंत्रधारा; उल्हाट नांवाच्या तोफांसारख्या यंत्रांची माळ.

घंटानादें, शंखनादें गभीरें, ॥ दैत्यांनीं त्या तेंवि पुष्पोपचारें ॥
युद्धारंभीं विघ्ननाशार्थ साची ॥ पूजा केली भव्य नागाननाची ॥ ४ ॥

नागाननाची; हत्तीच्या तोंडाची. (पक्षीं गणपतीची.) दैत्यांनीं हत्ती सजविले होते. त्यांवर घंटा होत्या. सैन्यांत शंखनाद सुरू होताच. पुष्पमाला हत्तींच्या सोंडेवर घातल्या होत्या. सारांश पूजेची सामग्री सर्व येथें असल्यानें त्यांनीं नागाननाचें (पक्षीं गणपतीचें) पूजन केलें, असा भाव.

ढक्का भेरी वाजती आसमंतीं ॥ गर्जोयातें लागले मत्त दंती ॥
तद्घंटांच्या नादकोलाहलाची ॥ वार्ता लागे शंखनादांत कैची ॥ ५ ॥
कोणी धन्वी शूलधारीहि कोणी ॥ कोणी तेथें वीर आला कृपाणी ॥
कोणी योद्धा मल्लयुद्धाभिमानी ॥ तो अन्यांच्या आयुधां तुच्छ मानी॥

कृपाणी; कृपाण नांवाचें हत्यार धारण करणारा.

युद्धालोकें त्या तदा दैत्यलोका ॥ आला होता संगरोत्साह जो कां ॥
मार्गें जातां तेथ नानाविधांनीं ॥ झाला त्यांच्या व्यक्त तो चेष्टितांनीं ७

भावी युद्धाच्या कल्पनेनें त्या दैत्यांना जो रणोत्साह आला होता तो त्यांनीं मार्गांत नाना प्रकारचीं चेष्टितें करून व्यक्त केला.

एकें अश्वारूढ वीरें सुधीरें ॥ जातां जातां स्वीय खड्ग-प्रहारें ॥
होता मार्गीं वृक्ष जो आड आला ॥ तो लीलेनें छेदुनी दूर केला ॥८॥
अन्या दैत्या वीर्यवंता लढाई ॥ झाली मार्गीं दाखवाया वढाई ॥
त्यानें एका मुष्टिघातें सलीलें ॥ शेजारीचें चूर्ण शैलाग्र केलें ॥ ९ ॥

शैलाग्र; पर्वतशिखर.

कोणी मार्गें चालला मंदचारी ॥ कोणी चाले वीर लत्ताप्रहारीं ॥
कोणी झाला चालता फार वेगें ॥ कोणी दावी चाल आवेशयोगें॥१०॥

लत्ताप्रहारीं चाले; लत्ताप्रहार करीत चालला. **कोणी......आवेशयोगें**; कोणी आपली जोरकस चाल नुसत्या आविर्भावानेंच दाखविली.

एकें दैत्यें जीवहत्याप्रमोदें ॥ क्रूरालोकें हस्त-लीला-विनोदें ॥
नीडाग्रीं जी बैसली स्वस्थ होती ॥ शूलाघातें मारिली सारिका ती ११

जीवहत्याप्रमोदें; जीवहत्येपासून होणाऱ्या आनंदानें. **क्रूरालोकें**; क्रूर दिसणाऱ्या (दैत्यें.) **नीडाग्रीं**; घरट्याच्या दारांत. **सारिका**; मैना.

एकें रात्रीं वारुणीपान केलें ॥ त्यातें देतें तें नवोत्साह झालें ॥
त्याच्या मार्गीं रक्तनेत्रांपुढोनी ॥ युद्धांगें तीं भावि गेलीं घडोनी ॥१२॥

त्याच्या......घडोनी; मार्गांत त्याच्या लाल डोळ्यांपुढून पुढें होणाऱ्या युद्धांतील गोष्टी अगोदरच घडून गेल्या.

एका वांछा फार मांसाशनाची ॥ त्याला ऊर्मी आवरेना मनाची ॥
मांसाहारा कल्पुनी स्वीय चित्तें ॥ लागे जिव्हालौल्य दावावयातें १३॥

ऊर्मी; ओढ.

एकें द्याया धीर मित्रां निघाल्या ॥ उत्साहाच्या वल्गना फार केल्या॥
खड्गें हस्तीं काढुनी रक्तरेषा ॥ तो अन्यांच्या साधितो धैर्यपोषा ॥१४

खड्गें......धैर्यपोषा; त्यानें आपल्या खड्गानें आपल्या हाताचें रक्त काढून दाखवून इतरांनाही खूप आवेश आणिला.

एकें अश्वा मारिली टांच वेगें ॥ टोंचायातें कुंजरा एक लागे ॥
णीरातें सांवरी वीर कोणी ॥ सारे झाले दक्ष ऐसे प्रयाणीं ॥ १५ ॥
सेना-पारावार तो चालता कीं ॥ वाटे अद्री चालला बोलता कीं ॥
कीं तो दैत्यांभोद-संघ स्वनादें ॥ भेदूं पाहे सप्त पाताल-वृंदें ॥ १६ ॥

पारावार; समुद्र. **दैत्यांभोदसंघ**; दैत्यरूपी मेघांचा समूह.

सौधाग्रांची मत्त गंडें गजांचीं ॥ उद्यानाची मस्तकें सैनिकांचीं ॥
अस्त्रें शोभा पावती गोपुरांची ॥ सेना पावे चालत्या पत्तनाची ॥१७॥

हत्तींच्या मत्त गंडस्थळांना घरांच्या सज्जांची शोभा आली, सैनिकांच्या मस्तकांना उद्यानांची शोभा आली, त्यांच्या अस्त्रांना गोपुरांची शोभा आली व एकंदर सेनेला चालणाऱ्या नगराची शोभा आली.

सेना ऐशी चालतां तीव्र-वाहा ॥ सोडी मागें स्थूल रेणु-प्रवाहा ॥
तन्मेघांनीं फांकुनी अंतरालीं ॥ विश्वव्यापी झांकिला अंशुमाली ॥१८॥

तीव्रवाहा; झपाट्यानें चालणारी. **तन्मेघांनीं......अंशुमाली**; त्या धुळीच्या मेघांनीं विश्वव्यापी सूर्य झांकला.

धूलि-स्तंभाऽक्रांत भूदेश कांहीं ॥ शीर्णोद्यानें पौरमुक्तें पुरेंही ॥
क्षेत्रें सारीं सस्यहीनें प्रयाणीं ॥ चिन्हें मागें ठेविलीं सैनिकांनीं ॥१९॥

धुळीनें भरून गेलेले कांहीं प्रदेश, छिन्नविच्छिन्न झालेल्या बागा, व नागरिकांनीं सोडलेलीं नगरें हीं चिन्हें दैत्यसेनेच्या प्रयाणाचीं दर्शक मागें राहिलीं.

श्रीरामातें चालतां दूषणाची ॥ जिव्हा वाहे मालिका दूषणांची ॥
मोठ्या नादें तों खराच्या रथाचा ॥ एकाएकीं मोडला केतु साचा २०

श्रीरामातें......दूषणांची; वाटेनें चालतांना दूषण राक्षसाची जीभ रामाला दूषणें देत होती. **केतु**; ध्वज.

आधीं युद्धीं रामनामास्रवें त्या ॥ दुश्चिन्हाच्या दर्शनें युद्धवेत्या ॥
भीति-प्रादुर्भाव झाला, तयाची ॥ गेली आशा मूर्त युद्धीं जयाची ॥२१॥

त्या दैत्यांनीं रामाच्या नांवाबरोबर जें युद्ध चालविलें होतें (त्याला दूषणें देऊन) त्यांत हा मोठा अपशकुन झालेला पाहून युद्धशास्त्रविशारद जो खर त्याला मोठी भीति वाटली व त्याला रामाबरोबर प्रत्यक्ष युद्धांत जयाची आशा राहिली नाहीं.

धीरोद्गारीं बोधिला दूषणानें ॥ उत्साहा तो दैत्य नेघे मनानें ॥
मार्गीं झाला स्तब्ध घेवोनि भीति ॥ आली तेव्हां तत्खराख्या–प्रतीति॥

धीरोद्गारीं......मनानें; त्या खराला दूषणानें धीराच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या तरी त्याला उत्साह आला नाहीं. **तत्खराख्याप्रतीति**; त्याच्या खर (गाढव) या नांवाची प्रचीत.

एका वक्त्रें त्यास बोधावयाला ॥ येना ऐसें वाटलें दूषणाला ॥
योजी त्याच्या तो तदा भीतिनाशा ॥ चित्तभ्रंशाऽदान–दक्षा त्रिशीर्षा ॥

चित्तभ्रंशादानदक्षा; दुसऱ्याचा बुद्धिभ्रंश करण्यांत निपुण अशा. आपल्या एका तोंडानें खर ताळ्यावर येत नाहीं असें दूषणाला वाटलें तेव्हां त्यानें दुसऱ्याचा चित्तभ्रंश करण्यांत कुशल अशा तीन तोंडांच्या त्रिशिरा राक्षसाची योजना त्याचें मन वळवून त्याला धीर देण्याकडे केली.

धीरोद्गारें वाक्य–कौटिल्ययोगें ॥ नाना निंदा–पूर्ण शब्द-प्रयोगें ॥
त्या दोघांनीं यत्न मोठा करोनी ॥ जागा केला तन्मनीं वीर्यवन्हि २४॥

वाक्यकौटिल्ययोगें; कुटिल शब्दांचा वर्षाव करून.

मध्यान्हींचा सूर्य विश्रांति सेवी॥ रश्मींसंगें चालता होय जेंवि ॥
उत्साहातें पावला तेंवि तोही ॥ चालूं झाला दैत्य सेनाप्रवाहीं ॥२५॥

मध्यान्हींचा......जेंवि; दुपारचा सूर्य क्षणभर थांबून ज्याप्रमाणें आपले किरण घेऊन पुढें चालूं लागतो.

या रीतीनें दैत्य मार्ग क्रमोनी ॥ श्रीरामाच्या पातले संनिधानीं ॥
तेव्हां त्यांनीं जो जयाराव केला ॥ दिङ्-नागांना तो भया हेतु झाला॥

दिङ्नागांना......झाला; त्यानें दिग्गजांना मोठी भीति उत्पन्न केली.

त्याचा प्रत्याराव मोठा उठोनी ॥ भूगोलातें व्यापि दाही दिशांनीं ॥
श्रीरामा तो सर्ववीरोत्तमाला ॥ युद्धोदंत-प्रापनीं दूत झाला ॥२७॥

श्रीरामा......झाला; तो प्रतिध्वनि वीरश्रेष्ठ रामाला युद्धाची वार्ता कळविणारा जणूं काय दूतच झाला.

सौमित्रीला जानकीरक्षणातें ॥ योजी तेव्हां राम निर्भीक चित्तें ॥
कष्टालोकीं भावि युद्धप्रसंगीं ॥ जाया सांगे त्यां समीपाद्रिशृंगीं ॥२८॥

निर्भीक; भीतिरहित. **कष्टालोकीं**; दुःखदायक आहे देखावा ज्याचा अशा. **समीपाद्रिशृंगीं**; शेजारच्या पर्वतशिखरावर.

आली जेव्हां सांनिधीं दैत्यसेना ॥ कोदंडा घे तेधवां रामराणा ॥
येतां त्याचा किंकिणीनाद कानीं ॥ चित्तीं भीती घेतली राक्षसांनीं २९

श्रीरामातें लक्षिते दैत्यसेना ॥ दैत्यानीका लक्षितो रामराणा ॥
वाटे सेना ती जयश्रीवधूतें ॥ आली तेथें अर्पिण्या राघवातें ॥ ३० ॥

नारीकेलाऽदान बाण-प्रयोगें ॥ पुण्याहातें वाचिती पक्षिभृंगें ॥
छिन्नें गात्रें दक्षिणारूप केली ॥ सीमंतार्चा यापरी सांग झाली ॥३१॥

नारीकेलादान; नारळांचा स्वीकार. त्या व्याघ्रांनीं बाणरूपी नारळांचा स्वीकार केला, पक्षी व भुंगे पुण्याहवाचन करूं लागले, तुटलेल्या गात्रांची दक्षिणा वांटण्यांत आली. अशा रीतीनें सीमांतपूजन पार पडलें.

श्रीरामानें बाण-मुक्ति-प्रणामें ॥ व्याही सारे वंदिले वीर्यधामें ॥
शीर्षें केलीं खालती थोरसानीं ॥ शिष्टाचारप्रेरितां राक्षसांनीं ॥ ३२ ॥

बाणमुक्तिप्रणामें; बाण सोडणें याच नमस्कारांनीं. **खालती केलीं**; वांकविलीं (पक्षीं) उतरून ठेविलीं.

सैरावैरा धांवती बाणधारा ॥ मध्यें मध्यें शक्ति वाजे सरारा ॥
उल्हाटांचा जाहला थोर मारा ॥ अस्त्रें तेथें वर्षती जेंवि गारा ॥३३॥

दैत्यांचीं जीं मस्तकें अंतरालीं ॥ बाणाभ्रातें फोडुनी उंच गेलीं ॥
आकाशीं जी पातली देवसृष्टि ॥ ती उल्कांची वाटली तीस वृष्टि ३४

बाणाभ्रातें; बाणांच्यां ढगांना.

देवांनीं जो पुष्पवर्षाव केला ॥ तो येतांना सायकीं रुद्ध झाला ॥
नानावर्णें तेधवां रम्यरूपें ॥ त्यांचीं व्योमीं भासलीं इंद्रचापें ॥ ३५ ॥

नानावर्णें......इंद्रचापें; त्या वेळीं त्या पुष्पांच्या नानारंगांच्या इंद्रधनुष्यासारख्या आकृति आकाशांत दिसूं लागल्या.

देवीं रामा वाहिल्या पुष्पमुष्टी ॥ रामें त्यांना अर्पिली रुंडवृष्टि ॥
गीर्वाणांशीं राघवाची विलासें ॥ पुष्पक्रीडा चालली सावकाशें ॥३६॥

रुंडवृष्टि; मस्तकांची वृष्टि. **गीर्वाणांशीं**; देवांबरोबर.

तो अग्रस्थीं वेढिला आसमंतीं ॥ युद्धीं योद्धा कोटिशीर्षावपातीं ॥
पार्श्वस्थांच्या लोचनां दृश्य झाला ॥ सर्वांगांनीं रक्तगंगेंत न्हाला ३७॥

अग्रस्थीं; पुढें उभे राहिलेल्या लोकांनीं. **कोटिशीर्षावपातीं**; कोट्यवधि मस्तकें लोळविल्यावर. **पार्श्वस्थांच्या**; मागें उभे राहिलेल्या लोकांच्या.

उल्हाटांचे शब्द, हांका भटांच्या ॥ विद्धांगांच्या गर्जना वारणांच्या ॥
सर्वांनीं या एक कल्लोळ केला ॥ ऐसा कांहीं काळ संग्राम झाला ३८

विद्धांगांच्या वारणांच्या; जखमी झालेल्या हत्तींच्या.

अश्वारूढां, कुंजरस्थां, रथस्थां, ॥ रामेषूंनीं एक लाधे अवस्था ॥
आकाशींचें, भूतळींचें, वनींचें, ॥ सूर्यस्पर्शें नासतें ध्वांत साचें ॥३९॥

एक अवस्था; मृत्यु. दृष्टांत अलंकार.

दंती झाले मूढ बाणप्रहारें ॥ युद्धीं होती भीतिनें पाठमोरे ॥
त्यांच्या पायांखालती सांपडोनी ॥ मोठे मोठे वीर गेले मरोनी ॥४०॥
गेलें शीर्ष च्छिन्न जें अंतरालीं ॥ येतां झालें सायकीं रुद्ध खालीं ॥
आकाशाची घे पुन्हा प्रेरणा तें, ॥ आलें थोडें, मागुती स्वल्प जातें ॥

आकाशांत उडालेलें मस्तक खालीं येत असतां त्यास बाण लागले तेव्हां तें पुन्हां वर उडालें, पुन्हां थोडें खालीं आलें व पुन्हां थोडें वर गेलें.

गेला जेव्हां वीर कोदंडपाणि ॥ तो दैत्यांच्या रक्तपूरीं बुडोनी ॥
त्याला तेव्हां रक्त-पंकोद्भवाची ॥ आली शोभा रम्य नीलोत्पलाची ४२

रक्तपंकोद्भवाची रम्य नीलोत्पलाची; तांबड्या चिखलांत असणाऱ्या सुंदर निळ्या कमळाची.

सेना-पत्रीं लेखनीभूत बाणें ॥ मर्मस्थानें फांसुनी रक्त वर्णें ॥
नानावस्था व्यक्त पाडीत दृष्टी ॥ वाटे रामें काढिली चित्रसृष्टि ॥४३॥

सेनारूपी चित्रफलकावर बाणरूपी लेखणीनें तांबड्या रंगांत मर्मस्थानें रंगवून, चित्रांतील वेगवेगळ्या अवस्था स्पष्ट दाखवून रामानें जणूं काय एक चित्रच तयार केलें !

उल्हाटांचे मार, उद्दाम फेंका ॥ शस्त्रास्त्रांच्या, सायकांच्या शलाका ॥
एकानेंही शस्त्र-धारा-प्रवाहीं ॥ नाहीं झाला विद्ध तो वज्रदेही ॥ ४४ ॥

शलाका; टोंकें, फळें (बाणांचीं.).

त्या युद्धाचा अंत होईल केव्हां ॥ ऐसें झालें लोकयुग्मास तेव्हां ॥
व्योमामध्यें पातलेल्या सुरांना ॥ शेजारींच्या तेंवि गृध्रादिकांना॥४५॥

लोकयुग्मास; दोन लोकांना. (देवांना व पक्ष्यांना–देवांना, रामाला जय मिळावा म्हणून व पक्ष्यांना, मांस मिळावें म्हणून.)

जे दैत्यांचे वीर नावाजलेले ॥ युद्धारंभीं सर्व ते नष्ट झाले ॥
श्रीरामाचे सोशितां बाण नाना ॥ पंचत्वातें पावली शेष सेना. ॥४६॥
अवलोकुनि दूषण स्वसेना-निधनातें सरसावला पुढारां ॥
रणधीर यमासही न होतो, रिपुला होइल कैंवि पाठमोरा ॥ ४७ ॥

माल्यभारा वृत्त.

आस्फालुनी निज शरासन दूषणानें ॥
आरंभिलें समर दैत्यविभूषणानें ॥
झालें न तें किमपि कष्टद राघवातें ॥
पावे हिमाचल विकंपन काय वातें ॥४८ ॥

वसंततिलका वृत्त.

रामें सवाजि रथ मात्र निशाचराचा ॥
मोडोनियां उडविला गगनांत साचा ॥
दैतेय तो रथविहीन तसाच आला ॥
पायीं, गदा उचलुनी झगडावयाला ॥ ४९ ॥
रे मानवा तुजसि मी वध हा वधाया ॥
आलों असें उघडिलें मुख जों वदाया ॥
तों घेउनी मुख तसेंच निशाचराचें ॥
रामेषु जाय, समरांत कबंध नाचे ॥ ५० ॥
त्रिशिरा मग दूषणावसानीं बहु कोपा चढुनी पुढें निघाला ॥
गुह-लब्ध-कराल-शक्ति-मोक्षा करिता राम-वधार्थ तूर्ण झाला॥५१॥

दूषणावसानीं; दूषणाच्या मरणानंतर. **गुह०**; स्कंदाकडून मिळालेल्या भयंकर शक्तीचें मोचन. माल्यभारा वृत्त.

रामावरी दनुज-शक्ति चढून आली ॥
येतां समीप मृदुला क्षणमात्र झाली ॥
लाहोनियां पद-समागम ती निवाली ॥
शेखीं पडून धरणीस निवांत ठेली ॥ ५२ ॥

वसंततिलका.

दैतेय तो निरखुनी निज-शक्ति-पाता ॥
कोपें त्यजी मग करालतराऽस्त्रजाता ॥
तें वारुनी सकल पाणि-विपाटवानें ॥
संयोजिला शर तयावरि राघवानें ॥ ५३ ॥

करालतरास्त्रजाता; अधिक भयंकर शस्त्रास्त्रें. **पाणिविपाटवानें**; हस्तकौशल्यानें.

तो लागतां शर निशाचर-कंठ-नाला ॥
शीर्षत्रयास हरताचि तदीय झाला ॥
तीं मस्तकें उडुनियां गगनीं, सुरांच्या ॥
पुष्पांसवें उतरलीं चरणीं प्रभूच्या ॥ ५४ ॥

उरला खर एकटा रणीं त्या मग रामासह संगरा कराया ॥
परि मित्र-विनाश-दर्शनानें विजयाशा न धजे मनीं धराया ॥ ५५ ॥

होती मनीं उपजली मग जी निराशा ॥
ती जाहली प्रकट घेउनि कोप-वेषा ॥
शक्ति-प्रदत्त-शित-बाण-चतुष्टयातें ॥
सोडी निशाचर नियोजुनि कार्मुकातें ॥ ५६ ॥

शक्ति०......चतुष्टयातें; शक्तीनें (देवीनें) दिलेल्या चार भयंकर बाणांना.

ते बाण दूत सुटले जणुं अंतकाचे ॥
विद्युल्लता-कवल वा दनुजांबुदाचे ॥
रामावरी भुजगसे तनु-दंश-कामी ॥
तद्दर्शनें नुपजली परि भीति रामीं ॥ ५७ ॥

दनुजांबुदाचे विद्युल्लताकवल; दैत्यरूपी मेघापासून निघालेले विजेचे तुकडे.

दैतेय-सायक समीप रघूत्तमाच्या ॥
येतां महाभय मनीं उठलें सुरांच्या ॥
रामें विलोकुनि शर स्ववधा भुकेले ॥
तिर्यक्-कटाक्ष-परिमोचन मात्र केलें ॥ ५८ ॥

तिर्यक्कटाक्षपरिमोचन; वांकडा दृष्टिपात.

राम-नेत्र-शतपत्र-कटाक्षें ॥ शत्रु-भाव-परिमार्जन-दक्षें ॥
पावले जणुं शिलीमुख वेधा ॥ सर्व ते विसरले स्वविरोधा ॥ ५९ ॥

रामनेत्रशतपत्रकटाक्षें; रामाच्या नेत्रकमलाच्या कटाक्षानें. **शत्रुभावपरिमार्जनदक्षें**; शत्रुत्वाच्या वृत्तीचा लोप करण्यांत कुशल अशा. **शिलीमुख**; बाण (पक्षीं भुंगे.) **वेधा पावले**; मोह पावले. स्वागता वृत्त.

निषंगीं रामाच्या दनुज-शर ते तूर्ण शिरती ॥
तयांतें पाहोनी सकल सुर आश्चर्य करिती ॥
स्व-युक्त-द्रोहातें बघुनि खर हाणी कर शिरीं ॥
ह्मणे कैसे माझे शर उलटले हे मजवरी ॥ ६० ॥

स्वयुक्तद्रोहातें; आपण कामगिरीवर योजलेल्या (बाणां)च्या द्रोहाला. शिखरिणी वृत्त.

सूर्यमुख वाण रघुराज मग जोडी॥ कार्मुकगुणास,दनुजाभिमुख सोडी॥
वृक्षसम दैत्य पडतांच धरणीला ॥ देव नभिं वाजविति दीर्घ करतालां ॥
दुंदुभि नभांत बहुसाल झडताती ॥ पुष्पतति रामशिरिं रम्य पडताती ॥
विद्धतनु दैत्य समरांत रडताती ॥ गृध्र अवलोकुनि तयांस उडताती॥६२॥

करतालां; टाळ्या. इंदुवदना वृत्त.

आला समीप मग लक्ष्मण, जानकीहि, ॥
ती विस्मय-स्तिमित-नेत्र रणास पाही ॥
झाली भयाकुल विलोकुनि राक्षसांतें ॥
दे राघवा दृढतरा परिरंभणातें ॥ ६३ ॥

विस्मयस्तिमितनेत्र; आश्चर्यचकित दृष्टीनें.

अन्या वधू परिणिली बघुनी पतीनें ॥
त्या अर्पिले कुटिल-नेत्र-कटाक्ष तीनें ॥
झाली परी सवत ही न, तुझीच दासी ॥
ऐसें कर-ग्रह-मिषें सुचवी प्रियेसी ॥ ६४ ॥

अन्या वधू; जयश्रीरूपी दुसरी बायको. **झाली......प्रियेसी**; रामानें सीतेचा हात धरून तिला सुचविलें कीं, जयश्री ही तुझी सवत होऊं शकणार नाहीं तर तुझी दासी आहे.

बहु भागला दितिसुतांसी ॥ तुमुल समरा करूनियां ॥
राम तृषित बहु होउनियां ॥ रमला प्रियानन-सुधा-निषेवणीं ॥ ६५ ॥

दितिसुतांसी; राक्षसांसह. उद्गता वृत्त.

गेला राम रणांतुनी जयवधू पर्णूनियां नोवरी ॥
गेले देव नभांतुनी परतुनी सानंद अभ्यंतरीं ॥
स्वर्गाला मृत चालले व्रणयुतां लोटूनियां संकटीं ॥
राहे शूर्पनखा रणांत करण्या तों रोदना एकटी ॥ ६६ ॥

व्रणयुतां संकटीं लोटूनियां; जखमी झालेल्यांना (गृध्रादिकांच्या) संकटांत सोडून. शार्दूलविक्रीडित वृत्त.

सर्ग १० वा

विमलवित जगा करप्रसादें दिनमणि जों उदयाचलासि आला ॥
निज मणिमय मंचकीं सुखें तों दशमुख निद्रित मंदिरांत ठेला ॥ १ ॥

विमलवित......करप्रसादें; जगाला आपल्या हस्तप्रसादानें (पक्षीं किरणांच्या प्रसादानें) शुद्ध करीत (पक्षीं उजळवीत.). पुष्पिताग्रा वृत्त.

मरकत-मय मंच रावणाचा उपकरणें शयनास रम्य साचीं ॥
कुसुम-परिमलांत सौख्यनिद्रा दशमुख सेवित राजवैभवाची ॥ २ ॥

मरकत पाच.

तंव रजनि सरून चालली हें कथन तया करण्यास दैत्यराया ॥
पवन जणुं गवाक्ष-रंध्र-मार्गें मधुरवगायन लागला कराया ॥ ३ ॥

गवाक्षरंध्रमार्गें; जाळीच्या भोंकांच्या वाटेनें.

उपवन-लतिकाऽवलींतुनी जो परिमल घेउनि मंद मंद आला ॥
अनिल उठविता न तो तयाला परि करिता दृढ सुप्त मात्र झाला ॥ ४ ॥

उपवनांतून सुगंध घेऊन मंद मंद येणारा तो वायू रावणास जागा तर करूं शकला नाहींच, पण त्याची झोंप मात्र अधिक गाढ करता झाला. **मंद मंद**; हळूं हळूं (पक्षीं) मठ्ठ डोक्याचा, व्यवहारशून्य. रावणास जागें करण्याचा जर वायूचा हेतु होता तर त्यानें सुगंध घेऊन येण्यांत चूक केली असा आशय.

पवन विफल यत्न जेथ झाला मग करण्यास्तव तें स्वगायनांनीं ॥
रजनिपरिणतीस चालवीलें दनुज-विबोधन-कार्य मागधांनीं ॥ ५ ॥

रजनिपरिणतीस; रात्रीच्या अखेरीस. **दनुजविबोधनकार्य**; रावणास जागा करण्याचें काम. **मागधांनीं**; भाटांनीं.

पसरुनि निज नाद आसमंतीं बनुनि समस्वर वल्लकी-गुणाशीं ॥
प्रथम रजनि शांततेसि तेव्हां श्रुति-सुख-कारि मृदंगनाद नाशी ॥ ६ ॥

बनुनि......वल्लकीगुणाशीं; विण्याच्या तारेशीं मिळता होऊन.

मधुर तरल तान-मूर्च्छनांनीं मग समयोचित भैरवाख्य रागा ॥
अवतरविति भाट मूर्त तेथें कवण सुखीं धरि तादृशीं विरागा ॥ ७ ॥

भैरवाख्य रागा अवतरविति; भैरव नामक राग प्रत्यक्ष उभा केला. **कवण... विरागा**; अशा प्रकारच्या सुखाविषयीं कोण उदासीनता धरील ?

जय जय भुवनैक-चक्रवर्त्ती हळु हळु ओसरली पहा त्रियामा ॥
अनुचित शयना प्रसंग हा कीं झडकरि जागृत होय वीर्यधामा ॥ ८ ॥
उदयवश सहस्त्ररश्मि झाला, शुक तव गौरव पंजरस्थ गाती ॥
तव-सदय-कटाक्ष-कांक्षिणीशी अशरण पूर्व दिशा गमे पहा ती ॥ ९ ॥

सहस्त्ररश्मि; सूर्य. **तवसदय०**......तुझ्या कृपाकटाक्षाची इच्छा करणारी. **अशरण**; अनाथ. पूर्वदिशेचा स्वामी इंद्र बंदींत असल्यामुळें ती अनाथ हा हेतु.

तिमिर-रिपु-तनूवरी प्रहारां प्रखर करीं करितो मरीचिमाली ॥
प्रथम रुधिरपूर लोटला हा बघ समरांगण-भूत चक्रवालीं ॥ १० ॥

मरीचिमाली; सूर्य. सूर्य आपल्या प्रखर हातांनीं (किरणांनीं) अंधकाररूपी शत्रूच्या अंगावर प्रहार करतो आहे. त्या युद्धांत समरांगण झालेल्या क्षितिजांत रक्ताचा पूर प्रथम लोटला आहे पहा. उत्प्रेक्षा.

तरणि-किरण-तीव्र-खड्ग-धारा चिरुनि करी शतखंड अंधकारा ॥
निज-तनु-शकलें अदृश्य कोनीं लपवुनि तो मग राहिला बिचारा ॥ ११ ॥

तरणि०......सूर्याच्या किरणरूपी तीव्र खड्गाची धार. **अदृश्य कोनीं**; अदृश्य अशा कोन्या कोपऱ्यांतून.

उघडुनि अथवा प्रभो ! पहा हें तिमिर-कपाट-युग प्रभातकालीं ॥
तव नगर-कपाटसें जनांना पथ करितें तरणीस चक्रवालीं ॥ १२ ॥

तिमिरकपाटयुग; अंधकाररूपी दरवाजाचीं झडपें. अथवा हे राजा तुझ्या नगरांतील वेशी ज्याप्रमाणें पहाटेस उघडून लोकांना येण्या–जाण्यास वाट करतात त्याप्रमाणें क्षितिजांतील अंधकाररूपी वेशीचीं झडपें उघडून त्यांनीं सूर्याला येण्यास वाट दिली. उपमाश्रित उत्प्रेक्षा.

पसरुनि अथवा क्षितीवरी जें तिमिर-महोदधि-कृष्ण-वारि होतें ॥
अवचित उगवोनि भक्षिण्याला रवि–वडवानल लागला तयातें ॥ १३ ॥

तिमिर०......अंधकाररूपी समुद्राचें काळें पाणी. उत्प्रेक्षा.

धरुनि हरिपदीं स्थिर स्थितीतें ध्रुवशिशु होय मुनींस वंद्य साचा ॥
अनुसरति तयास सर्वदा ते, बुध गुण घे, मग तो असो मुलाचा ॥ १४ ॥

धरुनि......साचा; हरिपदाचे ठायीं (पक्षीं आकाशांत) अचल स्थिति ठेवल्यामुळें ध्रुवाचा तारा सप्तर्षींना वंद्य झाला आहे. सप्तर्षींचे तारे ध्रुवाजवळ असतात हें प्रसिद्धच आहे. अर्थांतरन्यास.

गगन परिषदीं अनेक तारा-ग्रह निज तेज विशेष दाखवीती ॥
निरखुनि परि भास्करा दिगंतीं उठुनि हळू हळु एक एक जाती ॥ १५ ॥
शयनगत रवीस पाहुनी जो तदखिल-राज-विलास-भोग भोगी ॥
तदुदय-भय घेउनी अतां तो जणुं बनला बघ चंद्रमा विरागी ॥ १६ ॥

सूर्य निजण्यास गेलासें पाहून चंद्र त्याचे राजभोग भोगूं लागला पण आतां सूर्य उठून येणार हें पाहतांच त्यानें वैराग्याचें सोंग घेतलें. उत्प्रेक्षा.

करिति कलकलाट नीडगर्भीं खगतति लब्ध-विलोचना पहा या ॥
सकल दिसति जीव आर्त झाले जणुं भुवन-त्रय-लोचना पहाया ॥ १७ ॥

लब्धविलोचना; ज्यांना दिसूं लागलें आहे अशा.

क्षितितलपतितीं घनांधकारीं तव विजय-ध्वज लोपला असे तो ॥
अरुण-किरण-दीप्त सौध-शृंगीं स्फुट नयनांस अतां दिसून येतो ॥ १८ ॥

क्षितितलपतितीं; पृथ्वीवर पसरलेल्या.

द्विरद उठुनि राहिले उभे हे रजनि विलोकुनि चालली लयातें ॥
करुनि सतत शृंखलारवातें सुचविति हस्तिपकां उठावयातें ॥ १९ ॥

द्विरद; हत्ती. **हस्तिपकां**; माहुतांस.

विकसित कमलांतुनी सुटोनी अलि रमती मकरंद-रेणु-पानीं ॥
उपवन-कुसुमोत्थ सौरभानें दरवळली तव रम्य राजधानी ॥ २० ॥
उठुनि पुरवधू घरोघरींच्या निज-सदनांगण-मार्जनादिकातें ॥
परम शुचि अशा प्रभातकालीं करिति उपक्रम सुप्रसन्न चित्तें ॥ २१ ॥
बहु दधिमथनांत गुंगलेल्या जरठ वधू ह्मणती सुरम्य गाणीं ॥
सहज करित नृत्य तेथ मंथा, मथन-निनाद मृदंगभास आणी ॥ २२ ॥

मंथा; रवी. **मथननिनाद**; घुसळण्याचा आवाज.

अवचित करि कुक्कुट ध्वनीतें, मधुनि पडे करताल-नाद कानीं ॥
तरणि-समुदया निवेदिलें जी ! प्रहर-समाप्ति-निनाद-वादकांनीं ॥ २३ ॥

तरणि०......वादकांनीं; प्रहर संपल्याचे दर्शक ठोके वाजविणारांनीं ठोके वाजवून सूर्योदय झाल्याचें सुचविलें आहे.

मुखर विहग, बोलकीं गवाक्षें, कल करितें जलयंत्र, साधनांनीं ॥
करित जणुं तुझा अशा अनेकीं जयजयकार सुरम्य हेमधानी ॥ २४ ॥

मुखर; बोलणारे. **कल करितें जलयंत्र**; मंजुळ आवाज करणारें कारंजें. **बोलकीं गवाक्षें**; (वाऱ्यामुळें) ज्यांतून आवाज निघतो आहे अशा जाळ्या.

मधुर काधिं, कधीं कठोर, किंवा काधिं काधिं कोमल तीव्र रागभेदें ॥
नगर-जन-विबोधनास यत्नें करि बुधसा बघ चौघडा स्वनादें ॥ २५ ॥
रागभेदें; रागांतील वर्ज्यावर्ज्य स्वरांचे अनुरोधानें.

शिवभजन कुठूनि येत कर्णीं, मधुनिं मनोहर गान-तान वाहे ॥
उठुनि शिशुगण प्रभातकालीं रुचिपरि अध्ययनास लागलाहे ॥ २६ ॥
करुनि विपुल जागरास रात्रीं सचिवसभा क्षणमात्र सुप्त झाली ॥
लवकरि उठली परि प्रभातीं शयनपरा त्यजिते रमा अकालीं ॥ २७ ॥
शयनपरा......अकालीं; तुझे सचिव जरी रात्रीं जागले होते तरी सकाळीं लवकर उठले कारण अवेळीं निजणाराला लक्ष्मी सोडून जाते.

करुनि जणुं निज-प्रयुक्त कर्मा अविरत सादर सांग शर्वरीला ॥
व्यथित बहु घडोनि जागरानें निज नयनां मिटते प्रदीपमाला ॥ २८ ॥
आपणाकडे सोंपविलेलें काम रात्रभर जागून दिव्यांनीं सर्व प्रकारें बजावलें पण आतां तेच दिवे स्वतः जागरणानें पीडित होऊन डोळे मिटूं लागले आहेत.

विकसति कुसुमें, विहंग गाती, अनुसरतें नरजात उद्यमातें ॥
धरिति निज-पथ-क्रमा प्रवासी, सकल चराचर घेत चेतनेतें ॥ २९ ॥
धवलित बघ दिङ्-मुखेंहि होती, मति विमला अति सुप्रसन्न होते ॥
क्षितिवरि नवजीवनौघ वाहे सहज विकास मिळे सचेतनांतें ॥ ३० ॥
तव-चरण-सरोज-सेवनार्थी द्रुहिण उभा गृहदेहलीवरी तो ॥
प्रथम तिथिनिवेदना कराया वदन-चतुष्टय-सावधान होतो ॥ ३१ ॥
तवचरण०......तुझ्या पायाची सेवा करूं इच्छिणारा. **द्रुहिण**; ब्रह्मदेव. **वदन-चतुष्टय**; चारी तोंडें सिद्ध ठेवतो. **देहली**; देवडी.

सकल सुर तुझ्या प्रभो निदेशा अनुसरती लघु किंकरांपरी ते ॥
त्यजुनि शयन ऊठ दैत्यराया सकलहि ओसरली विभावरी ते ॥ ३२ ॥
विभावरी; रात्र.

सुरभि कुसुमसंघ, बिल्व-पत्रें अभिनव मेळविलीं तुझ्या गणांनीं ॥
उचित समय हा शिवार्चनातें शयन-समाश्रित राहिला न कोणी ॥३३॥
मेळविलीं; आणून ठेवलीं.

चिर समय विबोधिलाहि ऐसा दशमुख जागृत जेधवां न झाला ॥
श्रमुनि सकल बंदिलोक तेव्हां परम विषण्ण बनोनि मूक ठेला ॥ ३४ ॥
तंव हृदय-विदारिणी महीतें करि परिकंपित जी कठोर नादें ॥
करुण-खर विलाप हांक ऐसी अवचित जागृतता दशानना दे ॥ ३५ ॥
करुणखर; करुणायुक्त पण कर्कश.

प्रतिरव उठला तिचा दिगंतीं, गजबजुनी भय पावली पुरी ती ॥
खडबडुनि दशास्य होय जागा, त्यजुनि विबोधनकार्य भाट जाती ॥३६॥
व्यसन उदित काय जाहलें हें म्हणुनि करी दशवक्त्र जों विचारा ॥
तंव दिसत तया उभी समीपीं प्रियकर शूर्पनखा विरूप-घोरा ॥ ३७ ॥
चिकुर विखुरले समस्त जीचे, नयन रडूनि सुजोनि लाल झाले ॥
मलिन-वसन-धारिणी, कपोलांवरि नयनांतुनि अश्रुबिंदु आले ॥ ३८ ॥

चिकुर; केश.

बघुनि अवदशा अशी स्वसेची कळवळला हृदयीं दशास्य भारी ॥
प्रथम मग तदीय लोचनानीं अनुभविलें विपदश्रु-तप्त वारि ॥ ३९ ॥

प्रथम......वारि; त्या वेळीं त्याच्या डोळ्यांना दुःखजन्य उष्ण अश्रूंचा पहिल्यानेंच अनुभव आला. आजपर्यंत त्याला हर्षाश्रूंशिवाय अश्रु माहीत नव्हते असा भाव.

विकल दशमुखास आपलें ती कथित विडंबन सर्व हावभावें ॥
व्यथित हृदयभूमि कोपबीजें दृढ धरि हें कुटिलांस पूर्ण ठावें ॥ ४० ॥

व्यथित......ठावें; व्यथित झालेल्या मनरूपी शेतांत कोपाचें बीं चांगलें रुजतें हें कुटिल लोक जाणून असतात. अर्थांतरन्यास.

खर वच वदली तयास, बंधो ! शयन तुझें सरणार केधवां हें ॥
परिहर शयनास, होय जागा, तव विभवास दवाग्नि लागलाहे ॥ ४१ ॥
जनक-नृप-सभेंत बंधुराया तुजसि विडंबन-हेतु कोण झाला ॥
स्मृतिगत तुज काय होतसे तें परिणुनि कोण वधूललाम गेला ॥ ४२ ॥

परिणुनि; लग्नांत मिळवून. **वधूललाम**; स्त्रीरत्न (सीता.)

तुजविण न कुणा गुणानुरूपा जनकसुता असता पितामहानें ॥
जणुं तुजकरितांच निर्मिलेली, हरुनि तिला जड राम तेधवां ने ॥ ४३ ॥
परि गत अपमान एक राहो, मम हरुनी तरि आजि नासिकेला ॥
वद सकलहि तो निशाचरांचा रघुपतिंनीं अपराध कां न केला ॥ ४४ ॥
तुजसि न भगिनी कथी स्ववृत्ता, मृतचि तिचें शव जाण शब्द बोले ॥
प्रिय तनय हि जीव जो तिचा तो हरुनि नराधम ते कधींच गेले ॥ ४५ ॥

जी तुला आपलें वृत्त सांगते आहे ती तुझी बहीण नसून तिचें प्रेत बोलतें आहे असें समज; कारण तिच्या देहांतील जीवच असा जो पुत्र तो त्या नराधमांनीं (राम-लक्ष्मणांनीं) कधींच हरून नेला आहे.

मम न विकृति दुःख मन्मना दे, जडतम तें बनलें सुतावसानें ॥
परि तव अपकीर्ति होय जी कां कळकळतें मम चित्त तद्भयानें ॥ ४६ ॥
विकृति; विटंबना.

परिसुनि मम वृत्त रामभार्या मज हसली बहुधा तशीच तूतें ॥
उठुनि मम मनांत कल्पना ही मज सखया अनिवार दुःख देते ॥ ४७ ॥
वधि रघुपतिला, वधी न किंवा, अवधिपरी करि तें, तदंगनेला ॥
हरुनि न जंव आणशील येथें तव अपमान भरोनि तों न आला ॥ ४८ ॥
अवधिपरि करि तें; तें सवडीप्रमाणें कर. रामाला मारणें किंवा न मारणें यांतून तुला बनेल तसें कर पण त्याच्या स्त्रीला हरून आणल्याशिवाय राहूं नको असा आशय.

दनुज-कुल-ललाम चक्रवर्ती असुनि महीवरि तूं प्रतापशाली ॥
असुर तुडविजेत मानवांहीं ! कवण उरे न तयांस आज वाली ॥ ४९ ॥
शिव शिव ! कुदशा निशाचरां ही वदुनि असें कुटिला स्ववक्त्र झांकी॥
करुनि करनिघातही कपाळीं झडकरि देह महीतलासि टाकी ॥ ५० ॥
परिसुनि कटु वृत्त तें तियेचें दशमुख कोपपरीत-चित्त झाला ॥
अरुण-वदन-संचयें तदा ये विकसितपुष्प-पलाश-तुल्यतेला ॥ ५१ ॥
कोपपरीतचित्त; कोपानें व्याप्त झालें आहे चित्त ज्याचें असा. **अरुण०...... तुल्यतेला;** कोपानें लाल झालेल्या मुखांनीं युक्त असा रावण फुललेल्या पळसाच्या झाडासारखा दिसूं लागला.

करकर बहुसाल खाय दाढा, थरथर ओष्ठहि पावती विकंपा, ॥
गरगर फिरवी विलोचनांतें, झडकर जात विवेक पूर्ण लोपा ॥ ५२ ॥
क्षितिवरि चरणप्रहार कोपें करि, बहु खाजवि तो स्वमस्तकांतें ॥
व्यथित करि बळेंचि सात्विकातें तरि मग कोप कसा न तामसातें ॥५३॥
मग वचन वदे निशाचरीला भगिनि ! करी मुळिं शोक तूं न आतां ॥
रघुपतिललनेसि आणितों मी हरुनि दिनावधि आजचा न होतां ॥ ५४ ॥
दनुज-युवति-नासिका-श्रुतीतें हरुनि उपस्थित राघवेंचि केला ॥
प्रथम कलह, आजि तद्वधूतें तरि हरण्यास्तव मी असे भुकेला ॥ ५५ ॥
करुनि समर राघवा वधोनी, हरुनि तदीय वधूस येथ आणी ॥
बघ तव दशवक्त्र बंधु हा मी मम करण्यास्तव तीस पट्टराणी ॥ ५६ ॥
वदुनि वचन राक्षसीस ऐसें दशमुख योजितसे पुढें विचारा ॥
पुरुष कवण कोप-सर्प-दष्ट क्षणभरि लाधतसे सुखा विचारा ॥ ५७ ॥
पाचारी तो दशमुख निजा मातुला ज्ञानवृद्धा ॥
मारीचाख्या, सकलहि करी त्यास वृत्तप्रबोधा ॥
याची सीता-हरण-समयीं साह्य तो दैत्य मानी ॥
अन्याची जो कुटिलमति तो बुद्धि खोटीच मानी ॥ ५८॥
मानी; रावण मानी असूनही या वेळीं मामाजवळ साहाय्याची याचना करूं लागला. कार्यसाधु लोक फायद्याचे वेळीं मानापमान गुंडाळून ठेवतात. मंदाक्रांता वृत्त.

सगळें परिसूनि रावणाचें वच मारीच तया सखेद बोले ॥
वचनें हितसार-बोध-पूर्णें, लघु जीं शब्द-पदें हि थोर मोलें ॥ ५९ ॥

लघु..... मोलें; ज्यांतील शब्द थोडे होते पण अर्थ फार होता अशीं. माल्यभारा वृत्त.

सहसा करणें विरोध नोहे उचित प्राज्ञ नरा भवादृशातें ॥
कलि कारण होय वंशनाशा तुजला तत्व कसें कळेचिना तें ॥ ६० ॥
पर-दार-विलुब्ध दानवातें अपकीर्ति प्रथमा वधू मिळे कीं ॥
करितो निज तो कुलक्षयातें, मग पंचत्वहि पावतोच शेखीं ॥ ६१ ॥
गणना करि तूं न राघवाची तरि साधारण मानवांत राया ॥
भव-सिंधु-जलांत लाधली हे सुतरी दानव-मानवां तराया ॥ ६२ ॥
परमेश्वर राम मूर्त आहे, क्षितिकन्याहि तदीय चित्कला ती ॥
तिजला ह्मणसी हरीन ऐसें, गजमुक्ता शशलभ्य काय होती ॥ ६३ ॥

गजमुक्ता......होती; हत्तीच्या गंडस्थळांतील मोत्यें सशाला कशीं मिळतील ?

तरि हा पथ दुष्ट सोड वेगें, धरिली त्वां मति जी बरी न गा ती ॥
पुरुषा विपरीत काल येतां मतिविभ्रंश असे अनेक होती ॥ ६४ ॥
श्रवण करुनि वाक्य मातुलाचें दशवदना बहुसाल कोप आला ॥
प्रतिवचन कठोर कोपपूर्ण त्वरित वदे मग वंद्य मातुलाला ॥ ६५ ॥

पुष्पिताग्रा वृत्त.

तूं शत्रूला असुसि साह्य निजांतरंगीं ॥
होसी प्रवृत्त ह्मणुनी मम चित्तभंगीं ॥
टाकीन यास्तव तुलाच वधून आधीं ॥
व्याधीहुनी अधिक दे परिताप आधी ॥ ६६ ॥

व्याधीहुनी......आधी; बाह्योपाधीपेक्षां अंतर्गत उपाधी अधिक पीडा करते.

निज-वध-कृत-चित्ता पाहुनी राक्षसातें ॥
करित मनिं विचारा मातुल क्षुब्ध चित्तें ॥
दशमुख-करवालाह्नि कोदंडपाणि-॥
शर निज निधनातें तो महायोग्य मानी ॥ ६७ ॥

दशमुख०......मानी; रावणाच्या तरवारीला बळी पडण्यापेक्षां रामाच्या बाणानें मरणें फार उत्तम असा त्यानें विचार केला. मालिनी वृत्त.

तो चित्तीं करुनि अशा सुनिश्चयातें ॥
बोले त्या प्रतिवच राक्षसाधिपातें ॥
आहे मी तव अनुकूल मानसातें ॥
मीं केलें सहज विनोद-भाषणातें ॥ ६८ ॥

प्रहर्षिणी वृत्त.

या भाषणें परम तुष्ट दशास्य झाला ॥
सारा तदीय हृदयांतिल कोप गेला ॥
दैत्यासवें बसुनियां मग तो निवांतीं ॥
रामांगना हरण-कार्य-विधान चिंती ॥ ६९ ॥

रामांगनाहरणकार्यविधान; सीतेचें हरण कसें करावें याविषयीं उपाय. वसंततिलका वृत्त.

सर्ग ११वा.

राक्षसां निवटुनी घन युद्धीं राम रक्षित सुखें स्वजनांना ॥
राहिला सुखद पंचवटीला वत्सरार्ध उरलें पुरयाना ॥ १ ॥

पुरयाना; अयोध्येला जाण्यास. स्वागता वृत्त.

जों वसंतऋतु राघवपादा सेवितां गलित होउनि ठेला ॥
घेउनी निज शिरावरि त्याचें ग्रीष्म कार्य तंव सादर झाला ॥ २ ॥
पावतां सकल-मान-पदातें ग्रीष्मरूप मधुला जणुं आलें ॥
कीं अनेक-जन-सेवित-पादा गर्व हें फल कुणा न मिळालें ॥ ३ ॥

सर्व लोकांनीं मान दिल्याकारणानें जणूं काय वसंतऋतुच ग्रीष्मऋतु होऊन बसला; पुष्कळ लोक ज्याची वाखाणणी करतात तो हटकून गर्वानें फुगून जाऊन इतरांना पीडा करूं लागतो हें उघडच आहे.

सूर्य तीव्र-तर-भूत करांनीं जाहला कवळिता जगतीला ॥
कीं क्षमेसि परितापचि देणें ही बलिष्ठग्रहिंची नय-लीला ॥ ४ ॥

क्षमेसि; पृथ्वीला (पक्षीं सहनशीलतेला. अर्थात् सहन करणाऱ्या मनुष्याला. **नयलीला**; नीतीचा खेळ.

दीपवोनि समरांत मृगांक-भार्गवादिक धुरंधर राजे ॥
एकटा विगत-कंटक राज्यीं सार्वभौमसम सूर्य विराजे ॥ ५ ॥

मृगांकभार्गवादिक; चंद्रशुक्रादि.

तत्प्रताप दिवसा प्रखरत्वें घर्मबिंदुजननें सकलांतें ॥
शर्वरीस तनुदाह करोनी येत तेंवि अनुभूतिपथातें ॥ ६ ॥

अनुभूतिपथातें अनुभवांला.

श्वापदीं गिरिगुहा, विहगांनीं कोटरें, घनलता भ्रमरांनीं ॥
सेविल्या, बहु मृगांप्रति झाला तप्त भूवरि जलभ्रम रानीं ॥ ७ ॥

जलभ्रम; पाण्याचा भ्रम, मृगजळाचा भास.

ताप केवळ न तो धरणीतें, जाहला गगनगांहि घनांतें ॥
ते नभीं गुरुविराव करोनी आत्मताप कथितात जनांतें ॥ ८ ॥

आत्मताप०......; मेघ आकाशांत राहणारे व पाण्यानें भरलेले खरे, पण त्यांना देखील सूर्याचा ताप असह्य होऊं लागला व ते लोकांना ओरडून सांगूं लागले कीं, तुमच्याप्रमाणें आम्हांसही ताप होत आहे, असा भाव.

ते परोपकृतिदक्षहि आतां दर्शनेंचि घन तापद आधीं, ॥
वर्षलेचि तरि वर्षति गारा, संगदोष कवणास न बाधी ॥ ९ ॥

मेघ हे परोपकारी खरे; पण या ग्रीष्मऋतूंत मात्र ते आपल्या दर्शनानेंच प्रथम पीडा करूं लागले, बरं कदाचित् त्यांनीं वृष्टि केली तर ते गारांची करूं लागले. तेव्हां संगदोष कोणाला बाधक झाला नाहीं ?

गाउनी मधुर गान वसंतीं जो यथेष्ट विपिनांतुनि नाचे ॥
त्या विपन्निकट-दर्शन-कालीं जाहलें विरल गान पिकाचें ॥ १० ॥

विपन्निकटदर्शनकालीं; विपत्तिकाळ जवळ आलेला असतां. विपत्ति जवळ आलेली पाहतांच धूर्त मनुष्य लोकांत विशेष मिसळेनासा होतो, असा भाव.

ग्रीष्म-ताप-परितप्त-शरीरां पाहुनी प्रियकरां भ्रमरांसी ॥
स्त्रीजनोचित गुणां वनभागीं मल्लिका प्रकटवी गुणराशि ॥ ११ ॥

ग्रीष्मतापानें पोळलेल्या आपल्या प्रियकर भुंग्यांना पाहून मोगरीनें स्त्रीजातीला उचित असे मार्दव, प्रसन्नता, हास्य वगैरे गुण प्रकट करून त्यांचें सांत्वन केलें. विपत्तीनें त्रस्त झालेल्या पतीला स्त्रियांच्या गुणांनीं शांति मिळते, असा भाव.

वारि दुर्लभ, मही परितप्ता, वातही विषम, मेघ विदाही ॥
एक मित्र फिरतां मनुजांना राहिलेंचि अनुकूल न कांहीं ॥ १२ ॥

एक मित्र; एक सूर्य. (पक्षीं एकटा मित्र)

धूलियुक्त बहु वाहुनि वेगें अंधवीत सगळ्या जगताला ॥
सूर्य-भूमि-कलहीं कुटिलत्वें वायु साह्य सबलासचि झाला ॥ १३ ॥

सूर्यभूमि०......झाला; सूर्य आणि पृथ्वी यांच्या भांडणांत वायूनें अधिक बलवान् जो सूर्य त्याचीच बाजू उचलली म्हणजे मंद व शीतल न वाहतां तो वेगयुक्त व उष्ण वाहूं लागला

जाहल्या गलितपुष्कर वापी, हंसहीन सलिलाशय झाले ॥
सोडुनी मग वनोदकवासा दर्दुर द्रुत पुरांत निघाले ॥ १४ ॥

गलितपुष्कर; ज्यांतील कमळें गळलीं आहेत अशा.

जानकी बहु मनांत अयोध्या-दर्शनास्तव समुत्सुक झाली ॥
ग्रीष्मजन्य परितापभरानें तन्मति द्विगुणिताकुल केली ॥ १५ ॥
ठेविली चिर मनीं बहु यत्नें या तथापि परितापद कालीं ॥
प्रश्नरूप धरुनीच तदार्ति प्रत्ययासि पतिच्या स्फुट आली ॥ १६ ॥

तिनें आपली उत्सुकता मोठ्या यत्नानें दाबून ठेवली होती पण या त्रासदायक समयांत तिचा धीर सुटला.

काय जाहलि असेल अवस्था नाथ ! आजि तिकडे जननींची ॥
एक एक असतील करीत भाउजी विगणना दिवसाची ॥ १७ ॥

भाउजी; भरत.

पावली किति असेल अयोध्या भिन्न रूप तरि आजवरी ती ॥
आपुल्या सदय सद्गुरुजींचे हे कसे विरहवासर जाती ॥ १८ ॥
लालना करुनि संतत आम्ही पाळिला शुकशिशू प्रिय जो तो ॥
आमचा विरह हा क्रमितांना काय न व्यथित फारचि होतो ॥ १९ ॥
आमच्याच कर-लालन-लाभा पात्र जो प्रथमपासुनि झाला ॥
पारिजातकतरूस असेल केवढा बहर सांप्रत आला ॥ २० ॥
हा कुरंगशिशु, हा शश, दोघे प्राणसे प्रिय मला सहवासें ॥
आपणांसह तयांसहि नेऊं; राहतील विरहीं तरि कैसे ॥ २१ ॥
प्रश्न यापरि सहेतुक वा जे ती अहेतुक तसे करि कांहीं ॥
तत्पुराभिगमन-प्रबलेच्छा त्यांतुनी अविदित स्फुट होई ॥ २२ ॥

तत्पुराभिगमन०......होई; त्या प्रश्नांतून तिची अयोध्येस जाण्याविषयीं उत्कट इच्छा आपोआप दिसून येत असे.

पांथ दृष्टि पडतांच तयाचें स्थान ती धरुनि आस विचारी ॥
"पश्चिमेकडिल मी " वच ऐसें होय आयकुनि खिन्न बिचारी ॥

तिला कोणी वाटसरू दृष्टी पडतांच ती त्याला ' तुझा कोठलें ' असें मोठ्या आशेनें विचारी; हेतु हा कीं, तो जर अयोध्येच्या जवळपासचा असेल तर त्याला तिकडील वार्ता विचारून घ्यावी. पण ' मी पश्चिमेकडून आलों ' असें त्यानें उत्तर दिलें म्हणजे तिची मोठी निराशा होत असे.

एकदां रघुपती प्रिय-कांता-सुंदरोरुवरि ठेउनि शाषा ॥
तत्-पटांचल-समीर-सुखातें सेवितां धरि मनीं बहु हर्षा ॥ २४ ॥

ततपटांचलसमीरसुखातें; तिच्या पदराच्या वाऱ्याचें सुख.

लक्ष्मण प्रिय सखा जंव लागे बंधुचे ललित पाय चुराया ॥
तों करूनि मधुर स्मित सीता बोलली वच असें रघुराया ॥ २५ ॥
जाहले दिन कितीतरि नाथा आपणांस निघुनी वनवासा ॥
ते समस्त निमिषांपरि गेले, घालवूं सहज शेषहि मासां ॥ २६ ॥
या पुढें विरहकाल सरोनी मीलनावसर संनिध येतो ॥
कल्पितां सहज मोदभरें तो मूर्तसा मजसि गोचर होतो ॥ २७ ॥

मीलनावसर; गांठी पडण्याची वेळ. **मूर्तसा......होतो**; आज प्रत्यक्ष घडतो आहेसा वाटतो. भाविक अलंकार.

पाहिलीं अमित पावन तीर्थें, एवढ्या अवसरांतचि हर्षें ॥
गाहिलीं बहु-नदी-शुचि-नीरें, ठेविलीं मुनिपदीं निज शीर्षें ॥ २८ ॥
काननें गहन, घोर अरण्यें, तुंग पर्वत, विशाल नद्याही ॥
या निसर्ग-भयदायक रूपीं प्राप्त सौख्यचि अह्मांप्रति होई ॥ २९ ॥
काननासि निघतेसमयीं जी घातली मज तुम्ही बहु भीति ॥
या समस्त समयांत न नाथा प्रत्ययास मम येत कधीं ती ॥ ३० ॥
जे तुह्मी अमित दानव युद्धीं मारिले मशकसे स्वकरानें ॥
तेच ना मज वनीं खल होते दुष्टबुद्धि हरणार बलानें ॥ ३१ ॥

वनवासास निघतांना सीतेनें आपणाबरोबर न यावें म्हणून रामानें तिला वनांत राक्षस असतात, ते तुला हरण करून नेतील वगैरे जी भीति घातली होती तिचा सीता विनोदपूर्वक उल्लेख करीत आहे.

भेटला वनपथांत विराध क्षोभहेतु तंव एकचि आह्मां ॥
भीतिहेतु जरि तो जड व्हावा, विंध्य कां मग नसो भयजन्मा ॥३२॥

भीतिहेतु......भयजन्मा; त्या जड अशा विराध राक्षसाची जर मला भीति वाटावी तर त्याच मासल्याच्या विंध्य पर्वतांची कां वाटूं नये ? असा सीतेचा आशय.

भेटतील पशु हिंसक तूतें ही मला स्मरतसे भवदुक्ति ॥
सारिका-शुक-मयूर-मृगींच्या दर्शनींच परि सार्थ घडे ती ॥ ३३ ॥

वनांत मोठे हिंसक पशु वावरतात असें आपण सांगितलें होतें ते पशु म्हणजे सारिका, पोपट, मोर वगैरे तर नव्हेतना ? असा सीता विनोदानें प्रश्न करते.

तीव्र-ताप-शिशिराऽतप-पीडा कल्पिली प्रथम जी बहु आह्मी ॥
काननीं अनुभवास न आली लेशमात्र परि ती परिणामीं ॥ ३४ ॥
हास्यहेतु मज सांप्रत होते आपुली विपिन-कंटक-भीति ॥
संकटें सकल कल्पित मोठीं पावलीं विलय काय नभीं तीं ॥ ३५ ॥

हास्यहेतु......भीति; मार्गांत कांटे लागतील अशी आपण मला जी प्रथम भीति घातली होती तिची आठवण झाली म्हणजे मला हंसूं येतें.

वर्णिल्या मजसि राक्षसिणी ज्या त्याचि या न तरि ना वनदेवी ॥
लेशमात्र निकटीं न तयांच्या मी कधीं भय, परी सुख सेवी ॥

वर्णिल्या......वनदेवी; तुम्हीं मला ज्या राक्षसिणींची भीति घातली होती त्या या वनदेवता तर नव्हेतना ? अशी सीतेची पृच्छा.

घातलीं शत भयें मज तेव्हां शर्थ हो इकडची तरि बाई ॥
राहवे न वदल्याविण मातें लागते मग हवी तर पायीं ॥ ३७ ॥
बोलुनी वच असें शशिवक्त्रा ती करी स्फुट मनोहर हासा ॥
तें विलोल-लहरी-तरलत्वें पावलें बहु वनांत विकासा ॥ ३८ ॥

तें.....विकासा; त्यांच्या एकामागून एक लहरी उठून तें साऱ्या वनांतून पसरलें.

शब्द ते परिसतां ललनेचे राघव स्मित करूनि सुखानें ॥
द्यावया तिजसि उत्तर झाला सिद्ध दंत-रमणीय मुखानें ॥ ३९ ॥
चित्रवर्ण तंव एक समीपीं जो वनांतुनि जलास्तव आला ॥
तप्त-कांचन-तनु-च्छवि ऐसा एण तन्नयनगोचर झाला ॥ ४० ॥

तप्तकांचनतनुच्छवि; तप्त सोन्याप्रमाणें आहे अंगकांति ज्याची असा. **एण**; हरिण.

कंदुकापरि उडे गगनीं जो, मागुता पुनरपि क्षितिला ये ॥
स्पर्शती खुर न जों जगतीला तों तदीय तनु उद्गत आहे ॥ ४१ ॥
लोल लोचन सदा फिरवी जो एकहि क्षण उभा नच राहे ॥
खालवी शिर कुशांकुर-मूलीं मागुती उचलुनी वरि पाहे ॥ ४२ ॥
भीतिकारण नसोनि पळे जो, क्षोभकारण नसोनि उडेही ॥
शब्दकारण नसोनि वळे जो, निर्जनाहि विपिनांत न राही ॥ ४३ ॥
वायुतुल्य गतिनें पळतांना जो वनांत उठवी खुरनादा ॥
पाहुनी मृग असा जनकाची नंदिनी धरि मनीं बहु मोदा ॥ ४४ ॥
चर्म काढुनि तया हरिणाचें कंचुकी निज तनूसि कराया ॥
कामना उपजली बहु चित्तीं ती निवेदन करी रघुराया ॥ ४५ ॥

कंचुकीस्तव सुवर्णचि देतों, मागसी सखि सवर्ण कशाला ॥
बोलुनी तिज असें रघुराजें वारिलें त्यजि परी न हठाला ॥ ४६ ॥

कंचुकीस्तव......कशाला; चोळी करण्यास प्रत्यक्ष सोनें तुला देतों, सोन्याच्या रंगाचें मृगचर्म कशाला मागतेस ?

घेउनी मग शरासन हातीं वीर तो मृगवधार्थ निघाला ॥
रक्षणार्थ अनुजास सखीच्या ठेविता परि समीपचि झाला ॥ ४७ ॥

परि अनुजास सखीच्या समीपचि रक्षणार्थ ठेविता झाला, असा अन्वय.

राघवा बघुनि कार्मुक-युक्ता एण घोर विपिनांत रिघाला ॥
धांवतां सरल-कांचन-रेषा-मार्गसा नयनगोचर झाला ॥ ४८ ॥

धांवतां......झाला; तो पळतांना सोन्याच्या लांब रेषेसारखा दिसूं लागला.

राम मंदगतिनें जंव चाले तो करी शिथिल तों स्वगतीतें ॥
पाहुनी द्रुतगता रघुनाथा तो जवें पळतसे दृगतीतें ॥ ४९ ॥

दृगतीतें; दृष्टीला अगम्य अशा (जवें.)

बाणलक्ष्य हरिणासि कराया राम कार्मुकगुणा जंव ओढी ॥
तों दिसे हरिण दूर पळाला तेथुनी वळुनियां करि खोडी ॥ ५० ॥
यापरी मृगपथें वनिं जातां राघवा बहु परिश्रम झाला ॥
सांपडे न मृग, आश्रम मागें योजनद्वय असे दुरि ठेला ॥ ५१ ॥
क्रुद्ध होउनि तदा रघुराजें योजिला निशित बाण कुरंगीं ॥
मारुनी त्वरित तो हरिणातें येउनी शिरत रामनिषंगीं ॥ ५२ ॥
राम जों निकट जाउनि पाहे तों कलेवर दिसे न मृगाचें ॥
दैत्य एक पडला मृत तेथें जाहलें चकित चित्त तयाचें ॥ ५३ ॥
काय अद्भुत असें घडलें हें ! मारिलें तरि न कां हरिणा मी ॥
लक्ष्य वा मम चुकोनि निमाला दैत्य हा मम शरें परिणामीं ॥ ५४ ॥
यापरी करि विचार मनीं जों राम तों दनुज-मस्तक-देशीं ॥
मर्मभेद अवलोकुनि जाणे कीं असे कुटिल हा मृगवेषी ॥ ५५ ॥
आश्रमा त्यजुनि दूर मला वा आणण्यास्तव असें दनुजानें ॥
हें असे कपट केवळ केलें, अंधता च्युतिपथा मनुजा ने ॥ ५६ ॥

अंधता; अविचार. अर्थांतरन्यास.

मादृशा ठकविलें कुटिलांनीं, काय ते ठकविती न कुमारा ॥
जानकीवरि तरी कुदशेचा हा अलाच ! अति निष्ठुर फेरा ॥ ५७ ॥

श्रांत होउनि वनीं बहु धन्वी पावला तरुतलासि विरामा ॥
निर्मुनी विविध दुर्गविकल्पां चित्त कष्ट बहु दे गुणधामा ॥

निर्मुनी......गुणधामा; त्याचें मन नाना प्रकारचीं संकटें कल्पून त्यास ताप देऊं लागलें.

आश्रमा त्यजुनि राघव आधीं जेधवां मृगवधास्तव गेला ॥
एक तों कवण संनिध होता काननीं जटिल निश्चल ठेला ॥ ५९ ॥
राघवानुज सुदक्षचि होता आश्रमीं क्षितिसुतेसि जपाया ॥
त्यासही त्वरित दूर कराया तो जटी करि विचित्र उपाया ॥ ६० ॥

जटी; तपस्वी.

राघवासम विराव करोनी लक्ष्मणा जटिल मारित हांका ॥
धांव लक्ष्मण सख्या बहु वेगें वारि या सकल राक्षसलोका ॥ ६१ ॥
वेढिलें मजसि दैत्यसमूहें भासती मजसि अंतक सारे ॥
धांव पाव सखया लवलाहें, पाहसी तरि मदंत कसा रे ॥ ६२ ॥
तो रव श्रवणगोचर होतां जानकी गजबजे हरिणीशी ॥
लक्ष्मणास वदली तुह्मि जा हो ! सोडवा त्वरित आर्यसुतांसी ॥६३॥
लक्ष्मणासि कळली परि माया, भीति तो न हृदयीं क्षण आणी ॥
कीं मृगेंद्र-वध-वृत्त शशांहीं साच कोण जगतीं नर मानी ॥ ६४ ॥

कीं......मानी; कारण सशांनीं सिंहास मारल्याची वार्ता कोण खरी मानील. दृष्टांत अलंकार.

तो वदे मग तिला जननी हा रामशब्द गमतो न मला गे ॥
राक्षसीं रघुपतीस जिणावें मानितां ऋत मतिभ्रम लागे ॥ ६५ ॥

राक्षसीं......लागे; राक्षसांनीं रामाला जिंकलें असें मानणें हें बुद्धीला भ्रम झाल्याचें लक्षण आहे. **ऋत**; सत्य.

जो पुराणपुरुष प्रभु माझा, नाथ तो तव कसा दनुजांहीं ॥
संगरीं वद पराभव पावे हें अशक्य गमतें मज पाहीं ॥ ६६ ॥
राम-भक्ति-मधु-गर्भ वचें हीं पापगर्भ गमलीं क्षितिजेला ॥
क्रोधरूप धरुनी भडके तो जो विवेक हृदयांत निजेला ॥ ६७ ॥

रामभक्तिमधुगर्भ; रामभक्तीनें ओथंबलेलीं, ज्यांच्या मुळाशीं मधुर रामभक्ति आहे अशीं (वचें.)

ताडिती मग तयाप्रति झाली ती कठोरतम शब्दशरांहीं ॥
कीं स्वकोपपद साधु असाधु हा विवेक कुपिताप्रति नाहीं ॥ ६८ ॥

बांधवापसद तूं बकवेषी, राघव व्यसनगोचर होतां ॥
स्वस्थ एथ बसलासि खला मी भाव तो समजले तव आतां ॥ ६९ ॥
टाकितां रघुपतीस वधोनी राक्षसीं मग तुला अबला मी ॥
सांपडेन अभिलाष असा तूं बसलास धरुनी खल कामी ॥ ७० ॥
राम-सेवन-भव श्रम सारा यास्तव प्रिय तुला जणुं झाला ॥
छद्मवेष धरुनी खल ऐसे भोंदिती सरल साधुजनांला ॥ ७१ ॥

रामसेवनभव......झाला; या हेतूनेंच तूं आजपर्यंत रामाची सेवा करण्याचे कष्ट आनंदानें सहन केलेस.

जा करी वदन एथुनि काळें, त्वादृशाधम-विलोकन-मात्रें ॥
पावती खचितचि व्यभिचार-पातका कुलवधू-शुचि-गात्रें ॥ ७२ ॥

त्वादृशाधम......गात्रें; तुझ्यासारख्या अधमाच्या नुसत्या दर्शनानें कुलस्त्रियांच्या देहाला व्यभिचाराचें पाप लागेल.

सायकासम वचें करिती तीं लक्ष्मण-श्रुति-पुट-प्रतिभेदा ॥
अश्रुपात करि तो मग साधु मानुनी बहु मनांत विषादा ॥ ७३ ॥

लक्ष्मण०......प्रतिभेदा; लक्ष्मणाच्या कानांचा भेद.

तीं कठोर वचनें न तियेचीं साधु-मानस-धराऽहित बीजें ॥
सिंचिलीं नयन-बाष्प-जलानें लाधती कटु-फलांकुर ताजे ॥ ७४ ॥

साधुमानसधराऽहित; साधूच्या मनोरूपी भूमींत पेरलेलीं. तीं तिचीं कठोर वचनें नव्हतीं तर लक्ष्मणाच्या मनोभूमींत तिनें अपशब्दरूपी बीजेंच पेरलीं, त्या बीजांना लक्ष्मणाच्या दुःखाश्रूंचें पाणी मिळालें व त्यांना लवकरच कडू फळें आलीं.

बोलला मग सगद्गद कंठें तीस, मी तरि तुला जननीचा ॥
मान आजवरि सत्य दिला गे राघवासहि तसा जनकाचा ॥ ७५ ॥
लावितो त्वदभिलाष न मातें राम-पाद-दृढ-भक्ति कराया ॥
तेंचि एक जगतीवरि होती सेतु संसृतिजला उतराया ॥ ७६ ॥

तेंचि०......;संसार समुद्रांतून तरून जाण्याला रामाचे पायच एक साधन आहेत म्हणून मी त्याची भक्ति करतों, असा भाव.

कासया त्वरित मी अथवा गे चाललों परि सुदक्ष असे तूं ॥
संकटावसर-गोचर जीवां सावधान मन रक्षण-हेतु ॥ ७७ ॥

संकटावसर०......; संकटप्रसंगांत सांपडलेल्या जीवाला सावध मन असणें, हाच संकटांतून सुटण्याचा उपाय होय अर्थांतरन्यास.

मी तथापि तुज काढुनि देतों आश्रमक्षितिपुढें शररेषा ॥
ती विलंघुनि पुढें जरि जाशी तत्क्षणीं पडसि संकटपाशां ॥ ७८ ॥
यापरी वचन बोलुनि रेषा काढिता बुध महीवरि झाला ॥
कीं तदीय-शर-दर्शित-सीमा-लंघनीं बल नसे कवणाला ॥ ७९ ॥
राम-दार-परिरक्षण-कार्या साधुनी त्वरित साधु निघाला ॥
तों वनस्थित जटी वघताहे घालण्या समय साधुनि घाला ॥ ८० ॥
रौरवाऽजिन-कमंडलुधारी येउनी निकट आश्रम-देशीं ॥
तो बुभुक्षुसम कंदफलांचीं याचना करितसे क्षितिजेशी ॥ ८१ ॥

रौरवाजिन; रुरु (हरिण) त्याचें कातडें, मृगाजिन.

अर्पिण्यास्तव फलें अतिथीला जानकी त्वरित धांवुनि आली ॥
लक्ष्मणेषुरचिता परिघातें लंघुनी न पुढतीं पद घाली ॥ ८२ ॥

लक्ष्मणेषुरचिता परिघातें; लक्ष्मणाच्या बाणानें केलेल्या मंडळास.

तत्कर-ग्रहण-कामुकही तो स्पर्शन-क्षम न तापस झाला ॥
क्षुब्धही जलधि काय पुढें ये लंघुनी क्षितिवरी निज वेला ॥ ८३ ॥

स्पर्शनक्षम; स्पर्श करण्यास समर्थ. **वेला**; सीमा, मर्यादा.

जानकी त्यजुनि येत न सीमा पाहुनी मग असें जटिलानें ॥
मूर्च्छनामिष-महीवरि केलें देह टाकुनि तया कुटिलानें ॥ ८४ ॥
लोळल्या स्फुट जटा क्षितिधूलीं, नेत्रही फिरुनियां वरि गेले ॥
भासलें कृश महोदरही तें, वाळुनी मुख गतप्रभ झालें ॥ ८५ ॥
चालले जणुं उपोषणयोगें प्राण केवळ तया अतिथीचे ॥
आश्रमानिकट, पाहुनि ऐसें कोवळें कळवळे मन तीचें ॥ ८६ ॥
लागला क्रमुनियां शरसीमा जावया क्षण विलंब न तीला ॥
कीं परोपकृतिहून तनूचें रक्षण प्रिय गमे न सतीला ॥ ८७ ॥

तों टाकुनी अतिथिरूप उठे स्वरूपा ॥
घेवोनि रावण, सतीतनु घेत कंपा ॥
तैसीच घे उचलुनी मग दैत्य तीला ॥
स्कंधावरी बसवुनी स्वपुरा निघाला ॥ ८८ ॥

वसंततिलका वृत्त.

जातां तिला उचलुनी खल अंतरालीं ॥
ती श्येन-चंचु-पतिता गमली मराली ॥
लंकापथा धरुनि राक्षस चाललासे ॥
तो चंचलान्वित घनासम कृष्ण भासे ॥ ८९ ॥

नाथा याहो ! मजवरि खलें घातला आजि घाला ॥
माझ्या छंदें कुठवरि अहा काननीं दूर गेलां ॥
राहो मेला हरिण नलगे कंचुकी ती तयाची ॥
धांवा नाथा त्वरित परता चाल मोठी खलाची ॥ ९० ॥

चाल......खलाची; या दुष्टाची (रावणाची) चाल जबर आहे. मंदाक्रांता.

भावोजी हो ! रुसुनि विपिनीं केउते दूर गेलां ॥
मी तों तुह्मां कठिण वदुनी घात माझाच केला ॥
हांका मारूं कशितरि तुह्मां आपल्या काळतोंडें ॥
दुष्टे सीते ! तुजसि विधिनें दंडिलें योग्य दंडें ॥ ९१ ॥
हा ! हा ! दैवा मजसि कुदशा काय ही प्राप्त झाली ॥
कैशीं माझीं सकल दुरितें आज भोगास आलीं ॥
दैत्यस्कंधावरि बसुनियां शोक ऐशा प्रकारीं ॥
झाली तेव्हां विपुल करिती दीन पृथ्वीकुमारी ॥ ९२ ॥
मार्गी होता करित तप जो भक्षुनी प्राणवायु ॥
सीताक्रोशा श्रवण करि तो गृध्रराजा जटायू ॥
दैत्यासंगें बहु झगडुनी यत्न केला तयानें ॥
शेवीं त्यातें कपट करुनी जिंकिलें राक्षसानें ॥ ९३ ॥
धांवा ! धांवा ! त्वरित मजला या कुणी सोडवा हो ॥
नेतो मातें हरुनि कपटी या कुणी आडवा हो ॥
ऐशा शोका करुनि वधुचा कंठ गेला सुकोनी ॥
तों लंकेशें त्वरित गतिनें गांठली राजधानी ॥ ९४ ॥

सर्ग १२ वा.

निज आश्रम सोडिल्यावरी शिरला लक्ष्मण घोर काननीं ॥
हृदयीं परिताप पावला उठले घर्मज बिंदु आननीं ॥ १ ॥

वियोगिनी वृत्त.

उतरे सकला मुखप्रभा, दिसती लोचन लाल रोदनें ॥
व्रण तद्धृदयांत जाहले बहु सीता-कटु-शब्द-तोदनें ॥ २ ॥

सीताकटुशब्द०......; सीतेच्या कटू शब्द-ताडनानें.

पथ कंठित सावकाश तो स्मृति-निश्वास-जडें पदक्रमें ॥
बुधमानस मूर्तताडनाहुनि दुर्वाक्य-लवें बहु श्रमे ॥ ३ ॥

स्मृतिनिश्वासजडें पदक्रमें; दुःखाच्या आठवणीनें निघणाऱ्या उष्णश्वासां(उसाशां)मुळें जड अशा पावलांनीं. **मूर्त ताडन**; प्रत्यक्ष प्रहार. अर्थांतरन्यास.

निज बंधु पहावया वनीं पुढतीं दृष्टिनिपात पाठवी ॥
व्यथिता मुरडूनि मानसा बहु सीताकुशलासि आठवी ॥ ४ ॥

तो रामाला वनांत हुडकून काढण्याकरितां आपली दृष्टि पुढें लावून चालला होता, पण सीतेचें कुशल चिंतीत त्यानें आपलें मन मागें मुरडून पाठविलें होतें.

अवलोकुनियां अनुक्रमें ध्वज-वज्रादि-सुचिन्ह-मंडिता ॥
चरणाकृति, मार्ग बंधुचा कळला त्या व्यवहारपंडिता ॥ ५ ॥

ध्वजवज्रादि-सुचिन्ह-मंडिता चरणाकृति; ध्वज, वज्र वगैरे चिन्हांनीं युक्त अशा पावलांच्या आकृति. चक्रवर्ती राजाच्या पावलावर ध्वज, वज्र, छत्र वगैरे आकृति असतात. तशाच रामाच्या पावलांवर असल्यामुळें त्या आकृतींवरून लक्ष्मणाला रामाचा मार्ग ओळखतां आला.

मग त्या निघतां पथें पुढें विपिनीं दृष्टिपथासि पातली ॥
रघुनायकमूर्ति शेवटीं बसलेली निबिडद्रुमातलीं ॥ ६ ॥

अति सद्गद कंठ जाहला प्रभु-पादांबुज-युग्म-दर्शनीं ॥
मग लोळण तेथ घेउनी रमला अश्रु-तुषार-वर्षणीं ॥ ७ ॥

निज दुःख तयास सांगिजे तंव तें ओळखिलें विचक्षणें ॥
बहुधा नयनाश्रुदर्शनें गुरु-निश्वास-जडत्व-लक्षणें ॥ ८ ॥

परिरंभ तयास देउनी कुरवाळी स्वकरें रमापती ॥
सखया तुज दुःख जाहलें न उगे गात्रविभाग कांपती ॥ ९ ॥

गात्रविभाग; वेगवेगळे अवयव, सर्व अवयव.

तरि काय तुला निशाचरीं वद केलें शर-मर्म-पीडना ॥
अथवा करिती धरात्मजा तुज झाली कटु-शब्द-ताडना ॥ १० ॥

अथवा स्मृति हेतु जाहली जननींची तव बाष्पमोचना ॥
सरतां वनवास पारणा द्रुत लाधे भवदीय लोचनां ॥ ११ ॥

पारणा......लोचनां; तुझ्या डोळ्यांचें पारणें फिटेल, तुला मातुश्रींचें दर्शन होईल.

कुशला परि काय वर्तते विपिनीं सांग सख्या मम प्रिया ॥
पुसतां रघुनाथ-लोचनीं करिती अश्रु असें नवोदया ॥ १२ ॥

मग लक्ष्मण वृत्त सांगता निजबंधूप्रति सर्व जाहला ॥
श्रवणें रघुनाथ-मानसाचल मूलासह कंप पावला ॥ १३ ॥

रघुनाथ-मानसाचल; रामाचा मनोरूपी पर्वत, पर्वतासारखें दृढ मन.

भवितव्य चुके न मानवा वदुनी शब्द असे रुतस्वरें ॥
मग सानुज तो निजाश्रमा परताया उठला अतित्वरें ॥ १४ ॥
कर घालुनियां करांतरीं निघतां सोदर ते वनांतरीं ॥
बहुधा समरूप भासले वनजीवां मधुमाधवांपरी ॥ १५ ॥

मधुमाधवांपरी; चैत्र व वैशाख महिन्यांप्रमाणें.

निज शून्य कराल दर्शनें प्रसवे जो सहजा महाभया ॥
पथ तो पथिकांपुढें करी तंव दुश्चिन्ह-परंपरोदया ॥ १६ ॥

आपल्या ओसाड व भयानक दर्शनानें भीति उत्पन्न करणारा असा तो मार्ग त्या रामलक्ष्मणांपुढें दुश्चिन्हांची परंपरा उभी करता झाला.

विपिनांतुनि जो क्षणक्षणीं ललनाऽलोक-सुधेंत नाहला ॥
रघुनंदन-वाम-नेत्र तो प्रथम प्रस्फुरणार्त जाहला ॥ १७ ॥

ललनालोकसुधेंत; सीतेच्या कटाक्षरूपी अमृतांत.

अतिभीषण शब्द काढुनी दिवसा जीव करीत घाबरे ॥
रडती क्षणमात्र जाहली विपिनीं एक शिवा कटु स्वरें ॥ १८ ॥

शिवा; कोल्ही.

तनुचीं वलयें रचूनियां करि जो दारुण भीम तांडवा ॥
मग दृष्टिस पातला असा पुढतीं एक भुजंग आडवा ॥ १९ ॥
उजवीकडच्या तरूवरी चिर जी शांतपणें विसांवली ॥
अपसव्य उडोनि चालली भयहेतूविण वायसावली ॥ २० ॥

अपसव्य......वायसावली; ती कावळ्यांची पंक्ति कारणाशिवाय डावीकडे उडून चालली.

नभ दुर्दिनरूप जाहलें, दिसती सर्व दिशा भयंकरा ॥
रघुनंदन खिन्न होउनी मग चिंती हृदयांत शंकरा ॥ २१ ॥
तंव दक्षिण-दिग्-वधू पुढें विकटोलूक-रव-च्छलें करी ॥
मलिनांबर-धारिणी पथीं विधवाशी स्फुट हास्यवैखरी ॥ २२ ॥

तोंवर पुढें मार्गांत मलिन वस्त्र (पक्षीं आकाश) धारण करणारी विधवेसारखी दक्षिण दिशारूप स्त्री, घुबडाच्या घूत्काराच्या मिषानें जणूं विकट हास्यनाद करिती झाली.

सरला अपलक्षणांसवें पथ, आवास समीप पातला ॥
प्रथम प्रभु होय पाहता निलय-द्वार-मुखा अनर्गला ॥ २३ ॥

आवास; आश्रम. **निलयद्वारमुखा अनर्गला**; आश्रमाचें दार बंद न केलेलें, उघडें. (सीता आश्रमांत असती तर तिनें आश्रमाच्या दाराला अर्गला लावली असती हें उघड आहे.)

प्रथम द्रुत चित्त, मागुतीं नयनाधीर-कटाक्ष, आश्रमीं ॥
शिरला प्रभु-देह शेवटीं जड केला बहु जो पथश्रमीं ॥ २४ ॥

रामाचें त्वरित मन आधीं आश्रमांत शिरलें, नंतर त्याचे अधीर असे दृष्टिक्षेप शिरले आणि अखेर त्याचा मार्गातील श्रमानें फार जड झालेला असा देह शिरला. त्यानें दूर असतांना मनानें, नंतर दृष्टीनं व शेवटीं शरीरानें आश्रमांत प्रवेश, केला असा भाव.

तंव आश्रम शून्य पाहतां त्यजिता होय सगद्गद-स्वरें ॥
नयनाश्रुजलासवें प्रभु स्वतनूतें धरणीस सत्वरें ॥ २५ ॥

त्यजिता......सत्वरें; रामानें सद्गदित होऊन आपल्या अश्रूंबरोबरच आपला देहही पृथ्वीवर टाकला. सहोक्ति अलंकार.

पविपातित पादपापरी पडतांना प्रिय बंधु पाहिला ॥
अनुजें सरसाविला पुढें कर जो तोहि तसाच राहिला ॥ २६ ॥

पविपातित; विजेनें पाडलेला. **सरसाविला**; रामास धरण्याकरितां पुढें केला.

मग आठवुनी नयोन्नतां प्रभु तो दार-गुणां परोपरी ॥
करि रोदन दुःखित स्वरें बुध साधारण मानवापरी ॥ २७ ॥

नयोन्नतां; नीतीनें संपन्न.

तंव तत्-करुणाऽकुलाऽरवीं सकल-श्रोतृ-मनो-विपाटकीं ॥
क्षितिमंडल सर्व भेदिलें. प्रभुऐसा प्रभु एक नाटकी ॥ २८ ॥

सकलश्रोतृमनोविपाटकीं तत्करुणाकुलारवीं; सर्व श्रोत्यांच्या मनांचें विदारण करणाऱ्या त्याच्या करुणालापांनीं. अनन्वय अलंकार.

करभोरु ! मदालसे ! प्रिये ! वद गेलीस कुठें शुभानने ॥
त्यजुनी मज घोर काननीं विरहाग्नि-प्रलयीं मदंगने ॥ २९ ॥

करभोरु; हत्तीच्या सोंडेप्रमाणें आहेत मांड्या जिच्या अशी.

वनवास-निषेवण-श्रमें रुसलीस क्षणमात्र भामिनि ॥
मम यास्तव दृकपथापुढें नच येसी तरि मंदगामिनी ॥ ३० ॥

लपलीस कुठें लतांतरीं ? परिहासा नच मार्ग हा बरा ॥
क्षणही तव पावतां प्रिये विरहा मी बघ होय घावरा ॥ ३१ ॥

परिहासा; थट्टेला.

अवलोकुनि एकटी तुला हरिली काय निशाचरीं वनीं ॥
तरि अर्थ मला न राहिला तव-मंद-स्मित-शून्य जीवनीं ॥ ३२ ॥

तवमंदास्मितशून्य जीवनीं; ज्यांत तुझें मंदहास्य नाहीं अशा जगण्यांत.

बहुधा तव कष्ट पाहुनी क्षितिनें सांठविली निजोदरीं ॥
जरि वत्सलता दिसून ये अभिधा नष्ट तिची क्षमा तरी ॥ ३३ ॥

जरि......तरी; तुला आपल्या पोटांत घेण्यांत पृथ्वीची वत्सलता दिसून आली, पण ती आपल्या क्षमा (सहन करणारी) या नांवाला मुकली.

अथवा स्वविमान-वाहिता तुज नेली गगनांत खेचरीं ॥
मुख-सौरभ-मोहिता भ्रमे अलिमाला न कशी नभीं तरी ॥ ३४ ॥

मुख०......तरी; तर तुझ्या मुखसुगंधानें मूढ केलेली भुंग्यांची माळ आकाशांत कां भ्रमण करीत नाहीं ? तुला जर गंधर्वांनीं नेली असती तर त्या मार्गानें भुंगे भ्रमण करीत राहते, असा भाव.

दगडांतुनि जन्मली वधू चरणाची मम धूळ लागतां ॥
मुकलों ललनेसि आज मी विधिची ही विपरीतता अतां ॥ ३५ ॥

दगडांतुनि वधू जन्मली; शिळेंतून अहल्या बाहेर पडली.

अथवा तुज काय भक्षिलें पशुंनीं हिंस्र वनांत जानकि ॥
मम काय तरी नसे प्रिये प्रथम-ग्रास-पदास मान कीं ॥ ३६ ॥

मम...कीं; मग माझा त्या पशूंच्या पहिल्या घांसाच्या पदाचा मान नव्हता कीं काय ? माझा त्यांनीं पहिला घांस कां केला नाहीं ?

मज दक्षिणमारुतांत या कल-कंठी-निधि-चौर सांपडे ॥
कल-कूजित-नाद या पथें अथवा मच्छ्रवणीं कसा पडे ॥ ३७ ॥

कलकंठीनिधिचोर; मृदु कंठाच्या माझ्या स्त्रीरूप निधानाचा चोर.

कलकूजित-नाद, अस्पष्ट असा आलाप. दक्षिणेकडून जो अस्पष्ट आवाज ऐकूं येतो आहे तो तुझ्या रोदनाचा असावा, हा हेतु.

कलहंस-मृगेंद्र-कोकिला-हरिणींनीं विपिनांत गांठुनी ॥
अथवा तव काय घेतली गुणलुब्धीं प्रिय मूर्ति वांटुनी ॥ ३८ ॥

गुणलुब्धीं; हंसाला गति, सिंहाला कटि, कोकिलेला कंठ, हरिणीला डोळे अशांचा लोभ आहे. तेव्हां त्यांनीं आपआपसांत तुझी वांटणी करून ते ते गुण घेतले कीं काय?

बहु मी भवदीयसंगमीं सुखदायी वनवास मानिला ॥
सुखतंतु हरूनि दुष्ट हा विधि देतो मम काय हानिला ॥ ३९ ॥
सरला वनवास मानुनी बहु मी कष्ट तदुत्थ साहिला ॥
तंव जीवनवास संपला विजनावास तसाच राहिला ॥ ४० ॥

वनवास सरला असें मानून मीं त्याचे सर्व कष्ट सहन केले, तोंच माझा जीवितवासच एकाएकीं संपला आणि वनवास मात्र कायमच राहिला.

तुज मी तरि काय शोधिजे मजला त्वां वद कां न शोधिजे ॥
मम विग्रहदाह जो करी विरहें त्या तुज कां न बाधिजे ॥ ४१ ॥
अथवा पडलीस संकटीं करिसी गे ! मम नामचिंतना ॥
सुटण्या असमर्थ होउनी बहुधा सोशिसि बंधयातना ॥ ४२ ॥
तव शोध करूं कुठें जनीं, गगनीं, या अथवा महावनीं ॥
अथवा तव मूर्ति सांपडे मजला केवळ शून्यधावनीं ॥ ४३ ॥

शून्यधावनीं; भ्रमिष्टासारखें भटकण्यांत.

तरि कां सफला न होय ही मम सीतापरिरंभकामना ॥
वदतां वच हें महास्वरें प्रभुला ये अतिगाढ मूर्च्छना ॥ ४४ ॥
तंव यासमयीं शिवासवें शिव कैलास-विलास-मंदिरीं ॥
वसली सहजें कुतूहलें गिरिजा प्रश्न महेश्वरा करी ॥ ४५ ॥

वसली; बसलेली

सकलामर-सार्वभौमता तुमची, सिद्धि तुह्मांस सेविती ॥
मुनिगीत महेश्वराभिधा प्रभुजी सार्थ असेच तेंवि ती ॥ ४६ ॥
तरि नाथ ! तुह्मी जपच्छलें कवणाची करितां उपासना ॥
अथवा प्रभुनांच जाहली निज-नाम-स्मरणार्थ वासना ॥ ४७ ॥
तव चिंतनपात्र जाहली कवणाची तरि मूर्ति शंकरा ॥
जरि ती लघुदेवता, त्यजा तिज, नाथें भजिजे न किंकरा ॥ ४८ ॥
तिजला शिव होय बोलता गिरिजे सार्थ महेश्वराभिधा ॥
परि तो प्रभु वेगळा असे करितो जो तिजला तथाविधा ॥ ४९ ॥

परि ... तथाविधा; पण मला महेश्वर हें नांव ज्याच्या गुणानें मिळालें तो प्रभु वेगळाच आहे.

जपतों तरि रामनाम मी मज तें सार शिवे ! तपोधना ॥
मम वैभव सर्व तेथुनी, करितें तें मम चित्तशोधना ॥ ५० ॥
रडली जननी-पयोधरास्तव साकेतपुरींत जेवतां ॥
मग चुंबनमूक जाहली गिरिजे ती मम सेव्य देवता ॥ ५१ ॥

अज-नंदन-मंदिरांगणीं पडली जी बहुवार धांवतां ॥
मजला व्यसनोदयीं तिला परि लागे न विलंब पावतां ॥ ५२ ॥

ती दशरथाच्या वाड्याच्या अंगणांत धांवतांना पुष्कळदां पडली आहे पण मला संकटांत येथें पावण्यास तिला विलंब लागत नाहीं. विरोधाभास.

मम कार्मुक पाणिविक्रमें तरि जीच्या निमिषांत भंगलें ॥
मम मानस सर्वदा तिच्या स्मरणीं पार्वति जाण रंगलें ॥५३॥

स्मरणें स्मरशत्रु मी तिच्या, भजनानें भवभंग जाहलों ॥
सुरपूज्यहि पूजनें तिच्या, परमोदार-पदास पावलों ॥ ५४ ॥

शिववाक्य असें महेश्वरी-परिहासाप्रति पात्र जाहलें ॥
प्रतिभाषण अर्पिलें असें गिरिजेनें गिरिशा कुतूहलें ॥ ५५ ॥

प्रतिभाषण; प्रत्युत्तर. **गिरिशा**; शिवाला.

कळली मज सेव्य देवता तुमची सत्य अहो महेश्वरा ! ॥
करि रोदन ती महावनीं निज भार्या-परिमार्गणाऽतुरा ॥ ५६ ॥

निज०......; आपल्या स्त्रीचा शोध करण्यांत गुंतलेली.

हरिली दशकंधरें वधू, गवसे ज्यास तिचा न ठाव तो ॥
तरि तो जड जीव राघव व्यसनीं केंवि तुम्हांस पावतो ॥ ५७ ॥
बहुवार निजांगना-गुण-स्मरणें कंठ यदीय दाटतो ॥
तरि मानव राम तो कसा हृदयाराम तुम्हांस वाटतो ॥ ५८ ॥

निज० ...; आपल्या स्त्रीचे गुण वरचेवर आठवून सद्गदित होतो आहे तो राम तुमच्या हृदयाला काय आराम देणार ?

बहु वादविवाद कासया अथवा, मीच वनांत जाउनी ॥
निमिषार्ध न लावितां तया द्रुत येते पुरता परीक्षुनी ॥ ५९ ॥

वच बोलुनि हें महेश्वर-स्मित-दत्तानुमतीस घेउनी ॥
क्षितिला अवतीर्ण जाहली मग सीताऽकृति-वेष- धारिणी ॥ ६० ॥

महेश्वरस्मितदत्तानुमतीस; शंकरांनीं स्मितरूपानें दिलेली संमति घेऊन. **सीताकृतिवेषधारिणी**; सीतेचें रूप व वेष धारण करणारी.

करि आत्म--पटांचलाऽनिलें तंव जो लक्ष्मण रामबोधना ॥
बघुनी क्षितिजेस संनिधीं बहु हर्षे धनलुब्धसा धना ॥ ६१ ॥

आत्मपटांचलानिलें; आपल्या वस्त्राच्या पदराच्या वायूनें. **हर्षे**; आनंदला.

तंव तन्नयनद्वयांतुनी पडणाऱ्या सुख-वाष्प-बिंदुनीं ॥
जल-सिंचन-कार्य साधिलें, उठला सावध राम होउनी ॥ ६२ ॥

तंव ....साधिलें; लक्ष्मणाच्या डोळ्यांतून जे आनंदाश्रु रामाच्या अंगावर पडले त्यांनीं जलसिंचनाचें काम आयतेंच झालें.

जंव चालविला प्रियेस्तव प्रथमाक्रोश पुनश्च राघवें ॥
प्रतिनाद मिषें रडावया तंव लागे वन तेंहि आघवें ॥ ६३ ॥

प्रतिनादमिषें आघवें; प्रतिध्वनीच्या मिषानें तें सारें वन रामाबरोबर रडूं लागलें. रामाच्या रोदनाचा प्रतिध्वनि रोदनात्मक उठत होता त्यावरून तें वन जणूं काय समदुःखी होऊन रडतें आहे असें वाटलें.

क्षितिजा-परिरंभणोत्सुका रघुनाथापुढतीं महेश्वरी ॥
सरसावुनि बाहु पावतां स्मित लज्जावनताननें करी ॥ ६४ ॥

लज्जावनताननें; लाजेनें खालीं केलेल्या मुखानें.

निकटीं क्षितिजा उभी असे, प्रभुजी सांप्रत शोक आंवरा ॥
वच लक्ष्मण जों वदे असें तंव धांवे जणुं राम हांवरा ॥ ६५ ॥
बहु लक्ष्मण इच्छि पाहण्या प्रिय युग्मा परिबद्ध-हस्तका ॥
परि विस्मित होय पाहुनी क्षितिजांघ्रीवरि राममस्तका ॥ ६६ ॥

आपल्या आवडत्या जोडप्यानें (राम व सीता यांनीं) एकमेकांना आलिंगन दिलेलें पाहण्याची लक्ष्मणाची फार इच्छा होती, पण रामानें सीतेच्या पायावर मस्तक ठेवलेलें पाहून त्यास आश्चर्य वाटलें.

तरि काय सुषुप्तिजन्य हें, भ्रम रामासचि काय जाहला ॥
करि विस्मय जो असा तया तंव सीतापति वाक्य बोलला ॥ ६७ ॥

तरि...जाहला; तर हें काय स्वप्नांत दिसतें आहे (मी झोंपेंत पाहतों आहे) कीं रामालाच भ्रम झाला आहे.

प्रथम प्रिय मूर्ति लक्ष्मणा जननीची चिरलब्ध पाहुनी ॥
मग काय असें प्रदर्शिसी निज मंदत्व निवांत राहुनी ॥ ६८ ॥
तरि धांवत ये, धरी हिच्या सुर-नारी-नमितांघ्रि-सारसा ॥
न मिळेल पुनःपुन्हा अम्हां असला दर्शन-लाभ फारसा ॥ ६९ ॥

सुरनारीनमितांघ्रिसारसा; देवस्त्रियांनीं वंदन केलेल्या चरणकमलांस.

दयिता मज भेटवी अशी बहु मी आळ शिवास घेतली ॥
मम सांत्वन हीं करावया गिरिजा यास्तव जाण पातली ॥ ७० ॥

आळ; हट्ट.

जननि ! प्रिय-बालकांस या दिधलें दर्शन-लाभ-दान तें ॥
कुशलेक्षण-हेतु-मूलसें स्वसुतांचें मज सत्य वाटतें ॥ ७१ ॥

स्वसुतांचें कुशलेक्षणहेतुमूलसें वाटतें; मला वाटतें आपल्या आगमनाचें प्रयोजन आपल्या बालकांचें (आमचें) कुशल पाहणें हेंच आहे.

भुवन-त्रय-वृत्त आणतो निमिषीं ज्ञानमयाक्षि आपला ॥
तरि आगमनश्रमास या मग घेऊन किमर्थ पातलां ? ॥ ७२ ॥

भुवनत्रयवृत्त; त्रिभुवनांतली बातमी. **ज्ञानमयाक्षि;** ज्ञानदृष्टि.

बहुधा स्वसुतार्ति पाहुनी घडला जीव विशेष बावरा ॥
ह्मणुनी जरि एथ पातलां तरि या छद्मतनूस कां वरां ? ॥ ७३ ॥

आमचें दुःख पाहून आह्मांला भेटण्याच्या इच्छेनें आपण आलां असाल; पण मग हा छद्मवेष (सीतेचा वेष) कां घेतला ?

क्षितिजाकृति-दर्शनें मला अथवा मंगल चिन्ह दाविजे ॥
तरि केंवि अजाण बालकें तव सर्वज्ञ मतीस जाणिजे ॥ ७४ ॥

अथवा सीतेचें रूप धरण्यानें आपण मला शुभ चिन्हच (सीता लवकर भेटण्याचें) दाखविलें असावें; मला अजाण बालकाला झालें तरी आपल्या सर्वज्ञ बुद्धीचा काय थांग लागणार आहे ?

सुखरूप वनांत नांदतों तरि आम्ही तव नाम चिंतितां ॥
व्यसनें न अह्मांस मोहिती तव कारुण्य-कटाक्ष-रक्षितां ॥ ७५ ॥
बहु लोभ असाचि बालकांवरि राहो चिरकाल आपला ॥
करुणामृत-सिंचनें असा निववावा मम जीव तापला ॥ ७६ ॥
पुढतींहि असेंच पाहिजे स्वसुतांच्या जनकें सदा शिवा ॥
सदनाप्रति गेलिया असा मम संदेश कथा सदाशिवा ॥ ७७ ॥
श्रुतिरुच्य विनीत भाषणें प्रभुनें जे मृदु शब्द अर्पिले ॥
गिरिजाहृदयास बाणसे सगळे जाउनि फार लागले ॥ ७८ ॥
मग लज्जित होउनी उमा प्रभुपादांस करी नमस्कृति
निकट-स्थित रामबंधुही अवलोकी कुतुकें चमत्कृति ॥ ७९ ॥
वरदान समर्पितां तया गिरिजा फार मनांत लाजली ॥
मग वानित रामगौरवा निजधामाप्रति तूर्ण चालली ॥ ८० ॥
रघुवीरहि चालवी पुन्हा मग सीता-विरहार्ति-रोदना ॥
अनपेक्षित-भंग-वारणीं नट जैसा नव-नाट्य-दर्शना ॥ ८१ ॥

अनपेक्षित०...दर्शना; आकस्मिक आलेलें विघ्न दूर झाल्याबरोबर नट ज्याप्रमाणें नवीन अभिनय दाखवितो त्याप्रमाणें.

तरुहो ! मम दाखवा प्रिया, खगहो ! काय तुह्मांस ठाउकी ॥
बहुसाल असोनि बोलकीं मजसीं कां बनतां अशीं मुकीं ॥ ८२ ॥
दयिता वनदेवता ! तुम्हां मम झाली तरि काय गोचरा ॥
सखिचें शुभ वृत्त सांगुनी मज दीनावरती कृपा करां ॥ ८३ ॥
गिरिहो ! सरसी-तडागहो ! पशुपक्ष्यादि समस्त जीवहो !
पर-सांत्वन-शील आपलें जड रामावरि या उणें न हो ॥ ८४ ॥

सरसी; सरोवर.

करितां बहु शोक यापरी भ्रम रामाप्रति पूर्ण जाहला ॥
नयनांस वनप्रदेश तो मग सीतामय सर्व भासला ॥ ८५ ॥
दयिते ! मज भेट ये असें वदुनी, तो परिरंभविभ्रमीं ॥
जणुं दावुनि पाणिपल्लवें कवटाळी मग काननद्रुमां ॥ ८६ ॥

परिरंभविभ्रमा दावुनि; आलिंगनाचा अभिनय करून.

बोले त्यातें अनुज, करितां काय हें आजि ताता ! ॥
देवी कैसी रडुनि गवसे आंवरा शोक आतां ॥
शोधूं आतां गहन विपिनें, गव्हरेंही नगांचीं ॥
घालूं देवीस्तव नव पुरें पालथीं पन्नगांचीं ॥ ८७ ॥

पन्नगांचीं; सर्पांचीं (शेषाचीं). मंदाक्रांता वृत्त.

मग पंचवटीस सोडुनी ते निघती सोदर जावया पुढारां ॥
तंव रावणविद्ध गृध्रराजा कथिता होय पथीं उदंत सारा ॥ ८८ ॥

उदंत; बातमी. माल्यभारा वृत्त.

भार्या नेली हरुनि तुमची दैत्यराजें पुराला ॥
तेथें आहे कुशल गमतें हेंचि माझ्या मनाला ॥
ऐसी वार्ता कथुनि सगळी गृध्र तेव्हां तनूला ॥
श्रीरामाच्या चरणकमलीं ठेवुनी धन्य झाला ॥ ८९ ॥

मंदाक्रांता.

व्यथित प्रभु हर्ष पावला बहु सीताकुशलास ऐकितां ॥
प्रिय काय न फार मानिती बुध नष्टाहुनि दूर-संस्थिता ॥ ९० ॥

प्रिय...संस्थिता; अजिबात एखादी वस्तु नाहींशी झाल्यापेक्षां दूर असलेली बरी असें शहाणे लोक मानीत नाहींत काय ! वियोगिनी.

फिरति गहनें, शैलाग्रेंही तयां न दुराक्रमें, ॥
क्रमिति विपिनें मोठीं मोठीं परिश्रमविक्रमें ॥

पुसति विपिनीं मार्गा दोघे पुराणमहर्षितें ॥
करिति दयिताशोधा ऐशा पथें खगदर्शितें ॥ ९१ ॥

परिश्रमविक्रमें; श्रमांची शिकस्त करून. **खगदर्शितें पथें**; जटायूनें दाखविलेल्या मार्गानें. हरिणी वृत्त.

तापा हरूनि करि पापास मुक्त अनुतापातिपूतहृदया ॥
जोपासुनी भजकें जो पाळितो व्यथित तो पावला शुचिपया ॥
कंपाकुला अननुकंपा करीतचि निलिंपावली-प्रतिभटा ॥
शंपा-विलोल-दर-संपात-संकुलित पंपासरोवर-तटा ॥ ९२ ॥

पापास; पापी मनुष्यास. **अनुतापातिपूतहृदया**; पश्चात्तापानें ज्याचें हृदय पवित्र झालें आहे अशा (पापा). **जोपासुनी**; काळजी घेऊन. **शुचिपया**; पवित्र आहे पाणी जेथील अशा (पंपासरोवरतटा). **अननुकंपा निलिंपावलीप्रतिभटा कंपाकुला करीत**; निर्दय अशा देवलोकांच्या शत्रूला (रावणाला) कंपायमान करीत. **शंपा०...**; विजेप्रमाणें लकलकणाऱ्या शंखांच्या समुदायानें भरलेल्या (पंपासरोवरतटा). अमृतध्वनि वृत्त.

सर्ग १३ वा.

मागील सर्गाचे शेवटीं श्रीराम सीतावियोगानें विव्हल होऊन पंपासरोवराच्या तटापर्यंत आले असें सांगितलें. आतां कवि पंपासरोवराचें वर्णन यमक- अनुप्रासादि शब्दालंकारांनीं युक्त अशा चित्रकाव्यांत करितो.

आहेर सुरलोकींचा राहे जें धरणीवर ॥
माहेर इंदिरेचें तो पाहे पंपासरोवर ॥ १ ॥

आहेर...धरणीवर; जें स्वर्गलोकांतून पृथ्वीला आहेरादाखल येऊन राहिलें आहे **इंदिरेचें माहर**; लक्ष्माच (वेनेंश्राचे) माहेरघरच आहे. अनुष्टुभ् वृत्त.

सरसाकार, सद्वृत्त, सद्बंध, सुमनोहर, ॥
सप्रसाद, बहु शोभे महाकाव्य-सरोवर ॥ २ ॥

सरसाकार; सुंदर आहे आकार ज्याचा असें, (पक्षीं) रसभरित आहे रचना ज्याची असें. **सद्वृत्त**; चांगलें वर्तुलाकार, (पक्षीं) चांगलीं आहेत वृत्तें ज्यांत असें. **सद्बंध**; चांगली आहे ठेवण ज्याची असें, (पक्षीं) चांगले आहेत बंध (सर्वतोभद्र,

गोमूत्रिका वगैरे) ज्यांत असें. **सुमनोहर**; फुलांमुळें सुंदर दिसणारें, (पक्षीं) अत्यंत मनोहर. **सप्रसाद**; स्वच्छ, (पक्षीं) प्रसादगुणानें युक्त. **महाकाव्यसरोवर**; महाकाव्यासारखें सरोवर; (पक्षीं) महाकाव्यरूपी सरोवर. वरील विशेषणें सरोवरास व महाकाव्यास सारखींच लागतात. श्लेषालंकार.

महोपलमय स्वच्छ रम्याकार सरोवर ॥
निसर्गदेवतेचें तें गमे आदर्श सुंदर ॥ ३ ॥

महोपलमय; मोठमोठ्या दगडांनीं व्याप्त.

विस्तार वर्तुळाकार ज्याचा थोर नभापरी ॥
मृगर्षि-खग-ऋक्षाऽब्ज सेविती ज्या परोपरी ॥ ४ ॥

मृगर्षिखगऋक्षाब्ज; मृग ह्म० हरिण, (पक्षीं) मृगनक्षत्र. ऋषि ह्म० तपस्वी, (पक्षीं) आकाशांतील सप्तर्षि. खग ह्म० पक्षी, (पक्षीं) सूर्य. ऋक्ष म्ह० अस्वलें, वनमृग असा अर्थ, (पक्षीं) नक्षत्रें. अब्ज म्ह० कमळें, (पक्षीं) चंद्र. श्लेष.

सर्वदा भरुनी राहे ज्यामध्यें स्वच्छ जीवन ॥
प्रतिबिंबित त्यामाजीं जाहलें सर्वही वन ॥ ५ ॥

जीवन; पाणी.

जें आनील-मुखांभोज-संगमें लक्ष्मणान्वयें ॥
कांताशोकार्त रामातें अभिराम गमे स्वयें ॥ ६ ॥

जें सरोवर **आनीलमुखांभोजसंगमें**; आनील म्हणजे निळसर आहेत मुखें ज्यांचीं अशीं अंभोजें म्ह० कमलें त्यांच्या संगमानें, (पक्षीं) निळसर अशा मुखकमलाच्या संगमानें; **लक्ष्मणान्वयें**; लक्ष्मणा म्ह० हंसी तिच्या अन्वयें संगतीनें, (पक्षीं) लक्ष्मणाच्या संगतीनें; **कांताशोकार्त**; कांत म्ह० सुंदर अशा अशोकवृक्षांनीं व्याप्त, (पक्षीं) कांता ह्म० स्त्री सीता तिच्या शोकानें व्याप्त अशा रामाला अभिराम ह्म० सुंदर (पक्षीं) आपलें अनुकरण करणारें वाटलें.

अनंत भुवनातें जें वागवोनि निजोदरीं ॥
शंख-चक्राऽढ्य सश्रीक विष्णूची पावलें सरी ॥ ७ ॥

भुवनातें; लोकांना (पक्षीं) पाण्याला, (' जीवनं भुवनं वनम् ' अमर). **शंखचक्राढ्य**; शंख व चक्र या आयुधांनीं संपन्न, (पक्षीं) शंख व भोंवरे यांनीं युक्त. **सश्रीक**; लक्ष्मीनें युक्त, (पक्षीं) शोभायमान. विष्णु ज्याप्रमाणें शंखचक्रांकित आहे त्याचप्रमाणें हेंही शंखचक्रांकित आहे, असा भाव.

रंगलें जल पीयूषसम वेतससेवनीं ॥
तीरींचे खेळती कांतांसमवेत ससे वनीं ॥ ८ ॥

संदानित यमक.

रंगलें......वेतससेवनीं; (या सरोवराचें) अमृततुल्य पाणी वेतस म्ह० देवनळ त्यांच्या सेवनांत–लालनांत रंगलें आहे.

मारी यांत बुडी जो तो तरे, यास सकर्दमा ॥
मानवाधमही पावे पाहतां गति उत्तमा, ॥ ९ ॥
मायासिंधु–जलातें हें आटवी, भय दे यमा ॥
माधवा हें मान्य फार हांसतें नियमा यमा ॥ १० ॥

खड्गबंध.

यांत–या सरोवरांत जो बुडी मारी तो तरे; विरोध. यास सकर्दमा पाहतां याला गढूळ स्थितींत पाहूनही मानवाधमही एखादा अधम मनुष्यसुद्धां उत्तमा गति पावे, हें स्वतः गढूळ असलें तरी दुसऱ्याला शुद्ध करतें असा विरोध. हें मायासिंधुजलातें आटवी, स्वतः पाणी असून दुसऱ्या पाण्याला आटवितें असा विरोध. यमा भय दे, यमालासुद्धां भय उत्पन्न करतें, यम सर्वांचा काळ असून त्यालाही हें भय देतें असा विरोध. माधवा विष्णूला हें फार मान्य असल्यानें नियमा यमा हांसतें, यमनियम वगैरे योगसाधनांना कोणी तुच्छ करणार नाहीं पण हें करतें असा विरोध.

तरंग तेथ वाजीसा धांवे, रम्यांतरंग तें ॥
तरंगतें फुल्ल पद्म, भृंगाली त्यांत रंगते ॥ ११ ॥

तरंग वाजीसा धांवे; लाट घोड्यासारखी धांवते आहे. **रम्यांतरंग फुल्ल पद्म**; ज्याचें अंतरंग मनोहर आहे असें उमललेलें कमळ.

वायूनें नीर संरब्ध होतसे, लतिका महा ॥
या डोलताति तीरींच्या वानीरतति हालती ॥ १२ ॥

गूढचतुर्थ.

संरब्ध; क्षुब्ध. **वानीरतति**; शेवाळाच्या पंक्ति. या श्लोकांतील पहिलें अक्षर व पुढें प्रत्येक तिसरें अक्षर घेत गेलें म्हणजे पहिल्या तीन चरणांतून चवथा चरण निघतो.

सेवोनियां सुधासार सारसें जल बोलति, ॥
लतिका मारुतें मंद मंदराश्रित डोलति ॥ १३ ॥

दामयमक.

सारसें सारसपक्षी, **सुधासार** अमृतोपम जल सेवोनियां बोलति. **मंदराश्रित**; मंदर वृक्षावर लटकणाऱ्या लतिका मारुतें मंद डोलति.

मारुतें सलिला, नीरें कमलां, कमलीं अली ॥
चुंबिला, चुंबनांनीं त्या उठे कलरवाऽवली ॥ १४ ॥

वायूनें पाण्याला चुंबिलें, पाण्यानें कमळांना चुंबिलें, कमलांनीं भुंग्यांना चुंबिलें, व त्या चुंबनांपासून एक प्रकारची मंजुल नादपरंपरा उठली.

हत्तींच्या कर्णथापांनीं धरिला ताल, गायनें ॥
गाती षट्पद, वेणूंनीं दिधलीं वाद्य-साधनें ॥ १५ ॥
घेती विहंग तानांना, भरला रंग गायनीं ॥
सर्वांशीं मिळता झाला जलाशय-कल-ध्वनि ॥ १६ ॥
एकांत-निर्भरानंदें भारिली सृष्टिकामिनी ॥
नादाच्या लहरीमध्यें ठेली निश्चल गुंगुनी ॥ १७ ॥

वेणूंनीं वाद्यसाधनें दिधलीं; जवळच्या कळकांतून (वेळूंतून) नाद निघत होते त्यांनीं वीणादि वाद्यांचें काम केलें.

गुंजानाद करी भृंग, फुललीं नव सारसें ॥
मुंजास्पद-परीतांग कूललीन ससा वसे ॥ १८ ॥

गोमूत्रिका बंध.

मुंजास्पदपरीतांग; मुंज नांवाचें गवत त्याचें आस्पद घर, त्यानें परीत म्ह० वेढलें आहे आंग ज्याचें असा (ससा). **कूललीन वसे**; तटाशीं दबून बसला आहे.

शैवालें व्यापिलेलें तें सरोवर जरी रवि ॥
शोषी करसहस्रेंही न तरी लेश आटवी ॥ १९ ॥
निकटींच्या नगाग्रींचे मिळती त्यास निर्झर ॥
गज दानव्ययें त्याचें घेती जल निरंतर ॥ २० ॥

दानव्ययें; गंडस्थळांतील स्रवणारा मद मोबदला देऊन. परिवृत्ति अलंकार.

कोठें तरंगसंयुक्त, कोठें शांत मुनीपरी ॥
कोठें धवल तें भासे फेनयुक्त हिमापरी ॥ २१ ॥
कोठें पीत, कुठें रक्त, कोठें नील नभापरी ॥
नानावर्ण सरोजांनीं कोठें इंद्रधनूपरी ॥ २२ ॥
क्रीडेनें नित्य मत्स्यांच्या जन्मती तेथ भोंवरे ॥
कळेना पाहणारांना लाटा कीं मीन धांवरे ॥ २३ ॥
लहरी उठती मंद वेटांवरि अनाविल ॥
लता-पराग-संयुक्त आदळे तेथवां जल ॥ २४ ॥

लवली वाढली, गंध पसरी केतकीदल ॥
लतांतें ताल आलिंगी रम्य तें विमल स्थल ॥ २५ ॥

खड्गबंध.

अनाविल; स्वच्छ (जल). **लवली**; लवली नामक लता. **ताल**; ताडाचा वृक्ष.

होते सरोवरीं त्या जे मधुरोदक सेवुनी ॥
मधुरस्वर ते झाले पक्षी सर्व तया वनीं ॥ २६ ॥
सहसा साहसी हांसे हाहासाहि हुहूसही ॥
हंस, हासाऽसहा हंसी हंससिंहास ही हंसे ॥ २७ ॥

द्व्यक्षर.

सहसा साहसी; एकाएकीं साहसास प्रवृत्त; होणारा, **हंस**, **हाहासहि हुहूसाहि**, हाहा व हुहू नांवाच्या गंधर्वांना **हांसे** हांसूं लागला. पूर्वीच्या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें तेथील पक्ष्यांचे स्वर मधुर होते तेव्हां एका हंसाला आपण हाहा व हुहू या गंधर्वांना गाण्यांत हटवूं असें वाटून तो हंसला, असा भाव. **हासासहा**; त्याचें हंसणें जिला सहन झालें नाहीं अशी **हंसी हंससिंहास** त्या श्रेष्ठ हंसास **हंसे** हंसली. त्याचा उन्मत्तपणा तिला सहन झाला नाहीं, असा आशय.

हंसांचीं जोडपीं संगें आनंदें तेथ पोहती ॥
पतींच्या प्रतिबिंबांना हंसी सक्रोध पाहती ॥ २८ ॥

पतींच्या...पाहती; हंसांचीं प्रतिबिंबें पाण्यांत पाहून हंसींना असें वाटलें कीं, हंसांनीं या कोणी दुसऱ्याच स्त्रिया आणिल्या आहेत, तेव्हां त्या त्यांच्याकडे रागानें पाहूं लागल्या.

तदा कृतक रागानें त्यांतला खग एकला ॥
येतां तीराकडे झाली खगी खिन्ना चलाचला ॥ २९ ॥

निरोष्ठ्य.

कृतक रागानें; खोटा राग दाखवून. **झाली...चलाचला**; त्याची मादी त्याच्याकडे जावें न जावें अशा विचारांत पडली.

नवभान जलीं राम देखे या दक्ष सारसा ॥
सारसाक्ष दया-खेदें मराली जनभावन ॥ ३० ॥

अनुलोमार्ध.

जनभावन; जनांचा उत्पत्तिकर्ता, **दक्ष**; **सारसाक्ष**, कमलनयन, असा राम या **नवभान**; अपूर्व आहे शोभा ज्याची अशा जलीं, **सारसा मराली**; पाणहंसी, **दयाखेदें**; दयेपासून उत्पन्न होणाऱ्या खेदानें, **देखे**; पाहता झाला. वरच्या श्लोकांत खिन्न झाली म्हणून सांगितलेल्या हंसीला तिच्या नरानें टाकलेली पाहून रामाला तिची दया आली

तो तिजकडे खेदानें पाहूं लागला, असा आशय. हा श्लोक शेवटाकडून मागें वाचला तरी तसाच राहतो.

क्षणैक पाहुनी प्रेमें यापरी स्वप्रियार्तिला ॥
परते तो, तदा मोठा हर्ष रामास वाटला ॥ ३१ ॥

स्वप्रियार्तिला; आपल्या प्रियकरणीच्या (हंसीच्या) दुःखाला. **तो**; तो रागानें निघून गेलेला हंस.

तीराशीं शुभ्र जें भासे निळें अन्यत्र साजिरें ॥
तें शोभे जेंवि दंतांनीं विष्णूचें मुख हांसरें ॥ ३२ ॥

तें सरोवर कडेला पांढुरकें व बाकी सर्व ठिकाणीं निळसर दिसत असल्यामुळें, विष्णूच्या, स्मितयुक्त व ज्याचा एकच भाग दंतावलीनें पांढरा दिसतो अशा मुखाप्रमाणें शोभत होतें. उपमालंकार.

हेमाच्या सूक्ष्म रेणूंनीं, गजांच्या पदपंक्तिनीं ॥
रम्य सैकत तें वाटे हंस-सारस-कूजनीं ॥ ३३ ॥

पदपंक्तिनीं; पावलांच्या ओळींनीं. **सैकत**; वाळवंट.

फेंसाच्या वाळल्या रेषा दिसती बहु जीवर ॥
पाहे सरोवराची ती तटी राम मनोहर ॥ ३४ ॥
मृगांचीं पाडसें तेथें आनंदें नित्य खेळती ॥
करुनी सलिलीं क्रीडा वन्य माहिष लोळती ॥ ३५ ॥

माहिष; रेडे.

तरु-राजींतुनी गर्द खालीं जे पथ चालले ॥
वनश्रीनें ललाटीं ते भासती भांग काढले ॥ ३६ ॥

तटावरील गर्द अशा झाडांच्या दाटींतून सरोवराकडे खालीं ज्या पायवाटा होत्या त्या वनश्रीरूपी स्त्रीच्या तटरूपी मस्तकावर भांगांप्रमाणें शोभत होत्या.

वरती रय तीर-द्रु, करती व्रतती रती ॥
ती रती तंव तीव्रत्वें स्मर-तीर-यतीं व्रण ॥ ३७ ॥

मुरजबंध.

तीरद्रु; तीरावरील वृक्ष, **रय वरती**, वेगाला वरतात म्ह० वायूनें हलतात असा भाव; **व्रतती** लता, **रती करती**, त्या वृक्षांवर प्रेम करतात; **ती रती**, त्या लतांचें प्रेम **तंव** तर, **तीव्रत्वें** उत्कटपणानें, **स्मरतीरयतीं** मदनाच्या बाणांनीं जिंकलेल्या (लोकां) चे अंगावर **व्रण** करी. वाऱ्यानें वृक्ष हलले म्हणजे त्यांना चिकटलेल्या लता हलत व कामीजनांना व्रण होत, असा भाव.

वन हें नव नीपांनीं नीडांनीं भरलें रभ ॥
तरुमारुत दे नादें नारींना रहसीं हर ॥३८॥

उलट वाचला तरी हाच अर्थ.

हें वन, **नव नीपांनीं**, नवीन कदंब वृक्षांनीं व **नीडांनीं**, पक्ष्यांच्या घरट्यांनीं, **भरलें**, भरलें आहे, **हर**, रमणीय असा **तरुमारुत**, वृक्षांवरून येणारा वारा, **रहसीं**, एकांतांत, **नारींना**, स्त्रियांना, **नादें**, आपल्या शब्दानें **रभ**, उतावीळपणा, **दे** देतो; कामेच्छा उपन्न करतो, असा आशय. या श्लोकांत तरुमारुत स्त्रियांना कामेच्छा उत्पन्न करतो असें म्हटलें आहे, त्याचीं एक दोन उदाहरणें कवि देतो.

विहगा विट आणी हा पीतांना ललनाजन ॥
विरहें नव जे ते न लतांना तरु मारती ॥ ३९ ॥

हा ललनाजन; स्त्रीसमूह (पक्षिणी). **पीतांना**; पाणी पीत असतां; **विहगा**; पक्ष्यांना (जातीबद्दल एकवचन). **विट आणी** वीट आणतात, कंटाळा आणतात; **जे नव तरु** जे वृक्ष तरुण होते; **ते लतांना विरहें न मारती**; त्यांनीं लतांना दूर लोटलें नाहीं. पक्षिणींनीं व लतांनीं आपली कामेच्छा सारखीच प्रकट केली, पण पक्षी बहुपत्नीक असल्याकारणानें त्यांना वीट आला व तरु प्रायः एकपत्नीक असल्यानें त्यांना लतांच्या सहवासाचें सुख वाटलें, असा भाव.

तीर मारुत ना ताल, न तेजें वन हें रवि ॥
न जना ललना तापीं-हाणी, आटवि, गाहवि ॥ ४० ॥

गतप्रत्यागत.

तीरमारुत ताल ना हाणी; तीरावरील वायूनें तालवृक्ष पाडले नाहींत. **रवि तेजें हें वन न आटवि**; सूर्यानें आपल्या तेजानें हें वन शुष्क केलं नाहीं. **ललना जना तापीं न गाहवि**; स्त्रियांनीं आपल्या प्रियकरांना तापांत पाडलें नाहीं. वारा मंद वाहत होता, झाडी गर्द होती, व स्त्रीजन प्रियजनाला सर्वथा अनुकूल झाला होता, असा भाव. यथासंख्य अलंकार. हा श्लोक उलटा वाचला तर वरचा श्लोक होतो व वरचा उलटा वाचला तर हा होतो.

मंदारतरुतें नित्य दोले बांधून सुंदर ॥
घेती सुरांगना झोंके वल्लभांच्या मनांसह ॥ ४१ ॥

दोले; झोंपाळे. सहोक्ति अलंकार.

संकेताप्रति जातांना त्यांतली एक दुर्लभा ॥
स्वर्वधू पाहती झाली तेधवां निजवल्लभा ॥ ४२ ॥

स्वर्वधू; अप्सरा.

लोलोल्लोलीं लोललोल लीलेलेला ललालिला ॥
लोल-लालि-ललाऽलोलाऽली लालाला ललालि ले ॥४३॥

एकाक्षर.

अन्वयः—**ललालिला, लोलोल्लोलीं लोललोल लीलेलेला, लालाला लोललालिलाऽलोलाली ललालि ले.**

अर्थः–लल म्ह० चंचल आहेत अलि भुंगे जीच्यावर ती ललालि तिला ललालिला (चतुर्थी); लोल म्ह० चंचल असे उल्लोल म्ह० लाटा त्यांनीं लोललोल म्ह० अत्यंत चंचल–हलतीशी दिसणारी अशी जी लीलेची इला म्ह० भूमि तिला लोलोल्लोलीं लोललोल लीलेलेला; लोल म्ह० अस्थिर मनाचा असा लाली म्ह० प्रियकर त्याच्या ठिकाणीं लला म्ह० उत्सुक अशी, व अलोलाली अलोल म्ह० एकनिष्ठ आहे आली म्ह० सखी जीची ती लोललालिललाऽलोलाली (द्वंद्वबहुव्रीहि समास) वरील श्लोकांत वर्णिलेली स्त्री (कर्ता) लालाला प्रियकराकरितां, ललालि लल म्ह० सुंदर असें अलि म्ह० मद्य, ले घेती झाली (लेणें या धातूचा भूतकाळ). ती स्त्री आपल्या प्रियकराकरितां मद्य घेऊन, जिच्यावर भुंगे हिंडत होते व लाटा हापटत होत्या अशा क्रीडाभूमीकडे आपल्या एकनिष्ठ सखीसह गेली, असा अर्थ.

ही भूमि केवळ विलासोपयोगी नसून तपश्चर्येलाही होती हें सांगतो,

तपा तीव्र व्रती पात-रुगुपेत तपे गुरु ॥
रक्षी कपि पिक क्षीरतरु चारु-रुचाऽरुत ॥ ४४ ॥

अनुलोमार्धपाद.

पातरुगुपेत व्रती तीव्र गुरु तपा तपे; अधःपातरूपी व्याधीनें ग्रस्त झालेला व्रती ह्म० ऋषि (व्रत धारण करणारा) खडतर अशी दांडगी तपश्चर्या करीत होता; हें स्थल कामपोषकच नसून तपश्चर्येलाही साधक होतें असा भाव. **क्षीरतरु कपि चारुरुचारुत पिक रक्षी**; क्षीर नांवाच्या वृक्षानें वानर व सुस्वरकंठ कोकिला यांना रक्षिलें होतें; ते त्या वृक्षावर बसले होते.

साधुनी पवना योगी रमे पद्मनिषवणीं ॥
पवमानजन ध्यात माधवास वसे वनीं ॥ ४५ ॥

पवमानजन; पावन होताहेत जन ज्यानें तो **योगी पवना साधुनी** प्राणवायू निरोधून **पद्मनिषवणीं** पद्मासनाचा आश्रय करण्यांत **रमे**; (आणि) **माधवास ध्यात** विष्णूचें स्मरण करीत **वनीं** वसे.

साधु-नीप-वनाऽयोगी रमे पद्मनिषेवणीं ॥
पवमान जनध्यात माधवाऽसव-सेवनीं ॥ ४६ ॥

महायमक.

साधुनीपवनायोगी; चांगल्या कदंब वृक्षांचा संयोग पावणारा म्ह० त्यांवरून येणारा. **जनध्यात**; लोकांनीं चिंतिलेला, **पवमान**; वारा; **पद्मनिषेवणीं**; कमलांच्या लालनांत (व) **माधवासवसेवनीं**; वसंतकालीन मकरंद चाटून घेण्यांत **रमे** रमला.

गंगापान महर्षींना, मधुपान मधुव्रतां ॥
अमरांना सुधापान लाधलें तेथ सर्वथा ॥ ४७ ॥
द्विजां, द्विजां, मान्य मान्यकाम कामहरा हरा ॥
सुरासुरास वासवा रमारमा सहा सहा ॥ ४८ ॥

आवलि यमक.

द्विजां, पक्ष्यांना **मान्यकाम** मानी आणि अकाम–निरिच्छ अशा **द्विजां** ब्राह्मणांना, **कामहरा हरा** मदनांतक शंकराला, **सुरासुरास**; देवदैत्यांना (जातीबद्दल एकवचन), **वासवा**; इंद्राला, **रमारमा** रमाकांत विष्णूला, या **सहा** सहाजणांना ही **सहा** भूमि **मान्य** प्रिय (आहे). यांचा वास येथ आहे, असा आशय.

रसाऽरसाऽसार-सार-सार-सार-र-सारसा ॥
रसा-सरारास-सार-सार-रास-सरा रसा ॥ ४९ ॥

सर्वतोभद्र (द्व्यक्षर)

रसाऽरसाऽसाररसाररसाररसाररसारसा; रस आणि अरस यांचा आसार म्ह० समुदाय त्यांचें सार म्ह० सत्व आहे ज्यांत तें रसारसासारसार, असें सार म्ह० पाणी त्यांत सारर म्ह० अमृत टाकणारीं–मकरंद गाळणारीं (सारं राति सार टाकतात तीं सारर) सारसें कमलें आहेत जिच्यावर ती **रसारसासारसारसारसाररसारसा**; आणि कशी, **रसासरा**; रसा म्ह. द्राक्षलता याच आहेत सर म्ह० माळा जिच्या ती रसासरा; आणि कशी, **राससारसाररासरा**; रास म्ह० शब्द आहे सारांत ज्याच्या तें राससार (सर) आणि अर म्ह० त्वरित रास म्ह० नृत्य त्यानें स म्ह० सहित तें सारारास (सर) राससार व साररास असें सर म्ह० सरोवर आहे जिच्यावर ती **राससारसाररासरा** अशी **रसा** पृथ्वी (आहे) अशी ही भूमि आहे, असा अर्थ.

स्वर्गलोकांतले कामी भूलोकींचे तपोव्रती ॥
साधावया निजेच्छेला तेथें जाऊन राहती ॥ ५० ॥

कामी; कामुक. **तपोव्रती**; तप आहे व्रत ज्यांचें ते. तपस्वी असा अर्थ.

नेत्रांस रंजवि, सुखीं श्रवणास लोटी ॥
मोही मना, गुदगुल्या करि फार पोटीं ॥
आनंदवी हृदय, किंबहुना समस्ता ॥
पाडी स्वविस्मृति सरोवर जीवजाता ॥ ५१ ॥

जीवजाता; प्राणिमात्राला. वसंततिलका वृत्त.

करी रवातें हल, तीर-यानें ॥
करीर वातें हलती रयानें, ॥
करीर-वातेह लती रया ने, ॥
करी रवातें हल तीर-यानें ॥ ५२ ॥

सर्व यमक.

हल रेडा, **रवातें** करी ओरडतो आहे; **तीरयानें वातें करीर रयानें हलती** तीरयानें म्ह० तीरावर आहे यान म्ह० गमन ज्याचें अशा, तीरावरून वाहणाऱ्या वायूनें करीर म्ह० वेळूचे कोंब रयानें म्ह० वेगानें हलताहेत; **करीरवातेह लती रया ने,** करीर म्ह० पल्लव, त्यांच्या वातानें ईहा म्ह० गति, आहे ज्याला; वायूनें हलणाऱ्या पल्लवामुळें जो स्वतः हलतो आहे असा, लती म्ह० वृक्ष (लता आहे ज्यावर तो) रया म्ह० वेगाला, ने नेतो, जोरानें हलतो असा अर्थ; **हल** नांगर **तीरयानें** तीरावर जाण्यानें **रवातें करी** वाजतो आहे. तेथ जे शेतकरी आपलीं शेतें नांगरीत होते त्यांचा नांगर तीरावर आला ह्मणजे दगडाला लागून वाजे, असा भाव. उपेंद्रवज्रा वृत्त.

द्विरद-रद रणीं करकर करती ॥
उरग-रय-रवें शर थरथरती ॥
स्थिर-चर-हरणातुर झर पुरता ॥
हर ! हर ! धरणीवर पर परता ॥ ५३ ॥

अम्लान पंकजमाला.

द्विरदरद, हत्तींचे दांत **रणीं** लढाईत **करकर करती** करकर असा शब्द करताहेत. **उरगरयरवें** सर्पांच्या वेगाच्या शब्दान **शर** गवत **थरथरती** थरथरतें आहे; **स्थिरचरहरणातुर** अचल व चल वस्तूंना गुंग करण्याविषयीं उत्सुक असा **झर** जलप्रवाह **पुरता** पूर्ण (असून) **हरहर ! धरणीवर** पृथ्वीपति राम, **पर** पण, **परता** वेगळाच आहे. वरील गोष्टींचा त्याचे मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं, असा भाव. प्रहरणकलिका वृत्त.

सर्वांगसुंदर सरोवर मोदकारी ॥
दे राघवासि परि दुःख बहु प्रकारीं ॥

केलें निजार्ति-जड-शब्द-पद-क्रमानें ॥
हें सोदरास मग भाषण राघवानें ॥ ५४ ॥

निजार्तिजडशब्दपदक्रमानें, आपल्या दुःखामुळें जड येताहेत शब्द जींतून अशा रीतीनें. वसंततिलका वृत्त.

लक्ष्मणा बा ! कर्मगति ही काय माझी ओढवे ॥
प्राणिमात्रा रम्य सर हें दुःख मातें दे नवें ॥
जीवनाचें जीवनचि जी मूर्त माझी जानकी ॥
तीविणें हें जीवन विषप्राय मातें घातकी ॥ ५५ ॥

सर; सरोवर. रमल वृत्त.

दशरथतनय ! अमलतर-कमल ॥
चपल-झष मरकत-रस-सम-जल ॥
भ्रमर-पटल-तत-तट धवल-शर ॥
हरत न मम मन सरसतम सर ॥ ५६ ॥

एकस्वर.

दशरथतनय लक्ष्मणा ! **अमलतरकमल** अति स्वच्छ आहेत कमलें ज्यांत असें; **चपलझष** चपल आहेत मासे ज्यांत असें; **मरकतरससमजल** मरकत पाच, तिच्या रसाप्रमाणें आहे पाणी ज्याचें असें. **भ्रमरपटलतततट** भुंग्यांच्या पटलानें भरला आहे तट ज्याचा असें; **धवलशर** पांढरें गवत ज्यावर आहे असें; **सरसतम** अत्यंत सरस. **सर** सरोवर **मम मन न हरत;** माझें मन हरीत नाहीं. शशिकला वृत्त.

बिलगुनि सहकार-शाखि-शाखेवरि करि नर्तन जी स्वपल्लवांनीं ॥
मधुकर-कुल-सेव्य पुष्पिताग्रा मज लतिका सजलीच तापदानीं ॥५७॥

सहकारशाखिशाखेवरि; आम्रवृक्षाच्या डहाळीवर. **मधुकर०......तापदानीं;** भुंग्यांच्या कुलाला प्रिय अशी फुलांनीं गजबजलेली लता मला ताप देण्यास सजली आहे. पुष्पिताग्रा वृत्त.

सरस सुरम्य-तडाग-विकाशी ॥ विकसित तामरस द्युतिराशि ॥
मजसि विदेह-सुता-वदनाची ॥ स्मृति सुखहारक देउनि जाची ॥५८॥

सुरम्यतडागविकाशी; रमणीय सरोवरांत शोभणारें. तामरस वृत्त.

मृदु पवनें बहुवार डोलते ॥ शुचि कुसुमें जणुं मंद हांसते ॥
विकसित-पुष्प-पराग-धूसरा ॥ सुख नच दे मज मालती जरा ॥५९॥

विकसितपुष्पपरागधूसरा; उमललेल्या फुलांच्या परागांनीं पांढुरकी दिसणारी. मालती वृत्त.

करुनी विहार सलिलीं श्रम पावे ॥ वहु जी वधू, तिजासि देखुनि धांवे ॥
बिस-खंड देउनि सुखी करि तीस ॥ परि ताप देत मज तो कलहंस ६०

बिसखंड; कमळातल्या तंतूंचे तुकडे. कलहंस वृत्त.

गुंजारावां सतत परिसुनी ॥ सौख्या पावो कवण जन मनीं ॥
हीं तप्तायस्सम परि दुरितें ॥ होतीं मातें भ्रमरविलसितें ॥ ६१ ॥

तप्तायस्सम; तापलेल्या लोखंडाप्रमाणें. **दुरितें**; दुष्ट. भ्रमरविलसित वृत्त.

न सरोवर डोह हा विषाचा न लता दुर्धर पाश हे यमाचे ॥
न विहंगम-मंजु-गान बा ! हें वचन प्रेमळ वारकामिनीचें ॥ ६२ ॥

न विहंगम०......; हें पक्षांचें मधुर कूजन नव्हे तर एखाद्या वेश्येचें प्रेमळ भाषण आहे. अपन्हुति अलंकार. माल्यभारा वृत्त.

तृषिता मृगतृष्णिकेपरी प्रभुला मोद न दे सरस्थली ॥
अवलोकुनि लक्ष्मणें अशीं वचनें त्याप्रति गोड अर्पिलीं ॥ ६३ ॥

तृषिता मृगतृष्णिकेपरी; तृषार्तीला मृगजळ ज्याप्रमाणें सुख देत नाहीं त्याप्रमाणें. वियोगिनी वृत्त.

शोक किती करितां प्रभुजी ? मज योग्य गमे तंव तो न, उठावें ॥
सुज्ञ नरें व्यसनांतुनि घेउनि धीर, तुह्मांप्रति काय न ठावें ॥
धुंडुनियां सगळेंहि चराचर भूमिसुतेप्रति शोधुनि काढूं ॥
स्वर्ग महीवरि आणुं बळें, फणि-राज-मुखांतिल दंतहि पाडूं ॥ ६४ ॥
दुःख पुरे रमणीय सरोवर पाहुनि द्या हृदयासि विरामा ॥
धीर धरा, क्षण शांति वरा, मनिं कांहिं विवेक करा गुणधामा ॥
रम्य तटी निकटीं बहु शोभत पात्र मनोहर कानन साजे ॥
सैकत सुंदर त्यांत सुखावुनि सारस-हंस-कदंब विराजे ॥ ६५ ॥
वृक्ष तटीं घनदाट, सभोंवति घाट, तयावरि थाट बकांचा ॥
डोलत चंपक, बोलतसे शुक, चालत गानविलास पिकांचा ॥
सांचतसे मकरंद फुलांतुनि, पाहतसे अलि त्यांत निवारा ॥
नाचत एक नटूनि पदावरि मोर मदें पसरूनि पिसारा ॥ ६६ ॥
गंधभरें करि अंध अलींस असा अति-मंद सुगंधित वारा ॥
वाहतसे, फुलल्या लतिका वन-भाग सुरम्य विराजत सारा ॥
खेळतसे मृगशावक कौतुकदायक होत किती पितरांना ॥
चंदन-संगत दंग भुजंगम वेष्टुनियां बसले विटपांना ॥ ६७ ॥

शंखकुलें दिसती पुलिनातुनि वेतस वारिजवें नत झाले ॥
त्यांत कुठें तृणकंद विराजति, शैवल वाढुनियां दृढ आले ॥
उंचवटे विवरें सिकतांतुनि कैक, तयांतुनि दर्दुर बोले ॥
त्यांत फुलें तटणदप गाळिति, चित्रविचित्र तदां जल हाले ॥ ६८ ॥

गाहतसे गजराज सख्यांसह, वाहतसे जल येउनि लाटा ॥
पाहतसे खगवृंद तया भय-भीत निघे बहु काढुनि वाटा ॥
नाहतसे उडवोनि शिरीं जल, बाहत उच्च रवें स्वकुलाला ॥
साहतसे नलिनी निज संकट, राहतसे मग पीडितमूला ॥ ६९ ॥

रम्य फुलें अरविंद, गळे मकरंद तयांतुनि मंद जलीं या ॥
धुंद बनूनि मिलिंद तयावरि सुंदर गायन लागत गाया ॥
चित्रविचित्र-तरंग-तरंगित रंगत पुष्प-मरंद-रसें हें ॥
चंचल-वंजुल-कुंज-तटावरि हापटुनी मग मंजुल वाहे ॥ ७० ॥

विस्तृत सिंधुसमान सरोवर विस्मित हें करितें सकलांना ॥
तीरलता प्रतिबिंबित होउनि तांडव या दिसती करितांना ॥
मंद-समीरण-कंपित-लोल तरंग किती उठती आजि नाना ॥
निर्मल हें परि नील कुठें हिरवेंहि तसें जल ये अनुमाना ॥ ७१ ॥

धावति मीन सभोंवति, दर्दुर सादर एक दिशा धरिताहे ॥
आवरुनी निज पाय जलावरि कासव निश्चल येउनि राहे ॥
मारुनियां सलिलांत उड्या करि पाणबुडा बहु मीन धराया ॥
यत्न, पहा ! उठत किति बुद्बुद सारसही निघती विचराया ॥ ७२ ॥

फणिराज; शेष. **सैकत**; वाळवंट. **वेतस**; देवनळ. **पीडितमूला**; जिचीं मुळें शिथिल झालीं आहेत अशी. **मिलिंद**; भुंगा. **तरंगतरंगित**; लाटा येऊन उसळलेलें. **वंजुल**; बोरूचा वेत. सवाई वृत्त.

लीला-मंदोर्मि-माला कलकल-बहला धावनाक्रांतकूला ॥
तीरींच्या वृक्षमूला झगडुनि सरला येति मागें विलोला ॥
अंभोजामोद झाला चलमधुपकुला हेतु मोहावयाला ॥
हंसां उत्साह आला, परिमल भरला, त्यागुणें जीव धाला ॥ ७३ ॥

द्वादशदल कमलबंध.

लीलामंदोर्मिमाला; लीलेनें मंद अशा लाटांच्या माला. **कलकलबहला**; मृदु नादानें पूर्ण अशा. **धावनाक्रांतकूला**; ज्यांची धांव तीरापर्यंत पोहोंचते आहे अशा. स्रग्धरा वृत्त.

मंदोर्मि-मर्मर-विहंगम-मंजु-गीतें ॥ अर्पी सरोवर तुह्मांप्रति सांत्वनातें ॥
कांहीं विवेक करुनी मन शांतवा या॥ताता किमर्थ करितां चिर शोक वाया

मंदोर्मि०......सांत्वनातें; लाटांचा कलकल व पक्ष्यांचें मधुर कूजन यांच्या मिषानें सरोवर जणों तुमचें शांतवन करितें आहे. वसंततिलका वृत्त.

परिसुनि वचनें निजानुजाचीं प्रतिवचना करि तो न चापपाणि ॥
व्यथित निकटिंच्या अशोकमूलीं स्फटिकशिलेवरि बैसला श्रमोनी ॥

पुष्पिताग्रा वृत्त.

सर्ग १४ वा

चिरकाल अशोक-वृक्ष-मूलीं मग सीतापति पावला विरामा ॥
न तथापि अशोक मात्र झाला, गवसे कीं न वधू गुणाभिरामा ॥ १ ॥

न......गुणाभिरामा; अशोक वृक्षाखालीं फार वेळ बसूनही राम स्वतः अशोक (शोकरहित) झाला नाहीं; कारण त्याची गुणसंपन्न स्त्री त्याला सांपडेना. माल्यभारा वृत्त.

पडला अति-दग्ध-चित्त धन्वी स्फटिकाश्मावरि लोचनां मिटोनी ॥
सगळ्यांहि निज-प्रिया-वियोगें मन गेलें विषयांवरी विटोनी ॥ २ ॥

स्फटिकाश्मावरि; स्फटिक शिलेवर.

विमलाश्मशिलेवरी असा तो जंव विश्रांति जगच्छरण्य याची ॥
सरसी-सलिलांत राहिलेल्या उपमा पावत नील पंकजाची ॥ ३ ॥

जगच्छरण्य विश्रांति याची; जगाचें आश्रयस्थान असा राम (जगाला विश्रांति देणारा) स्वतः विश्रांतीची याचना करीत पडला. उपमालंकार.

प्रभु-विग्रह-वर्ण-संगमानें गमली ती धवला शिलाहि नीला ॥
सगळ्य विपिन-स्थितां मयूरां घन-खंडापरि पातल्या महीला ॥ ४ ॥

रामाच्या देहाच्या निळ्या वर्णाच्या समागमानें, त्या वनांतल्या सर्व मोरांना तो स्फटिकाचा दगड पांढरा असूनही, पृथ्वीवर पडलेल्या मेघाच्या तुकड्याप्रमाणें निळा दिसूं लागला.

प्रथम प्रभु मैथिली-तनूच्या मिळवी केवळ बाह्य संगमाला ॥
विरहें परि तो तयास आतां बहिरभ्यंतर-लभ्य पूर्ण झाला ॥ ५ ॥

प्रथम (सीता असतांना) रामाला सीतेचा समागम बाह्य तेवढा मिळत असे; पण आतां तिचा विरह झाल्यावर, त्याला तिचा सर्वस्वी ध्यास लागून ती त्याला अंतर्बाह्य दिसूं लागली. विषमालंकार.

उघडी निज लोचनांस तो जों क्षण चिंतूनि वधू मनोऽभिरामा॥
तंव गोचर संनिधींच झाला नयनां पर्वत ऋष्यमूक-नामा ॥ ६ ॥
ललना बहु टेंकड्या जयातें नग तो मत्तपणें मला विलोकी ॥
समजूनि असें तयाकडे तो विरही कोपकटाक्ष एक टाकी ॥ ७ ॥

या पर्वताला टेंकड्यारूपी पुष्कळ स्त्रिया आहेत ह्मणूनच हा उन्मत्तपणानें आपल्याकडे पाहतो आहे असें रामाला वाटलें व त्यानें त्या पर्वताकडे रागानें पाहिलें. **विरही;** स्त्रीचा ज्याला वियोग झाला आहे तो (राम.)

गिरिच्या अति उंच पांच शृंगां तंव एकत्र बघूनि चापपाणि ॥
द्विगुणीकृत-कोप होउनीयां गिरिचें शासन मानसांत आणी ॥ ८ ॥

राम जोंवर रागानें पर्वताकडे पाहूं लागला तों त्याला तो पर्वत आपल्याकडे पांच मस्तकें उंच करून पाहतो आहे असें दिसून आलें; तेव्हां त्याचा राग दुप्पट वाढला व त्यानें पर्वताला शिक्षा करण्याचें मनांत आणलें.

करिती शिखरें उठोनि तों तीं, बसुनी, जाउनि, येउनी वळोनी ॥
अतिविस्मित जानकीपतीला अचलाचीं चलनास दर्शवोनी ॥ ९ ॥
दिसलीं शिखरांस मागुती त्या गुरु पुच्छें नग-मूल-लंबमानें ॥
मग हे पशु हिंस्र, भाव ऐसा प्रभुचित्तांत समुद्भवे क्रमानें ॥ १० ॥
नगमूललंबमानें; पर्वताच्या पायथ्यापर्यंत लोंबणारीं.

तंव एक तयांतला उठोनी पशु दोनी चरणांवरी निघाला ॥
निकटस्थित वन्य बांधवांच्या श्रवणाशीं क्षण लागताचि झाला ॥ ११ ॥
कपि हे – नर वन्य वा असावे प्रभु आणी हृदयांत कल्पना ही ॥
दिसती नरलक्षणें तयांशीं मनुजांशीं स्फुट भेद अल्प नाहीं ॥ १२ ॥
धरिती मुकुटादि भूषणांनीं नरजातीसह जे बळेंचि नातें ॥
प्रभुला गिरिरूढ देहधारी नर वा वानर वा कळेचिना तें ॥ १३ ॥
गिरिरूढ देहधारी; पर्वतावर बसलेले प्राणी. संदेह अलंकार.
प्रभु-संश्रित-पादपावरी तों उडुनी एक नगावरोनि आला ॥
जन त्यांतिल गर्जना करोनी, गमला वानर सत्य राघवाला ॥ १४ ॥
प्रभुसंश्रितपादपावरी; रामानें आश्रय केलेल्या वृक्षावर.

क्रमुनी बहु अंतरासि आला कपि एकाच उडींत जो जवानें ॥
कुतुक-स्मित-युक्त पाहिलें त्या बलधामा नरपाल-पुंगवानें ॥ १५ ॥

नरपालपुंगवानें; राजांत श्रेष्ठ अशा रामानें.

नग–भीषण-काय, वज्रदेही, नव कौपीन कटीस कांचनाचें, ॥
घनगर्जित, पुच्छ लांब लोळे, मुख बालार्क-समान वानराचें ॥ १६ ॥

कौपीन; लंगोटा.

चपलेक्षण, दीर्घ-लोम-शाली, गुरु वक्षःस्थल, पादलंबपाणि ॥
अरुणाभ नखावली, जयाच्या तुलनेतें न जगीं बलिष्ठ कोणी ॥ १७ ॥

दीर्घलोमशाली; लांब केंसांनीं युक्त. **पादलंबपाणि**; आजानुबाहु.

जननीजठरांतुनी निघे तों रविबिंबाप्रति जो उडोनि गेला ॥
अमरेश्वर-दत्त वज्रघाता असुनी बालहि साहताचि झाला ॥ १८ ॥

करि जिंकुनि सर्व देवसेना निज-कीर्ति-प्रसरास जो दिगंतीं ॥
रदनां उपटोनि काढुनी जो शिशु दंडी पुरुहूत-मत्त-दंती ॥ १९ ॥

पुरुहूतमत्तदंती; इंद्राचा माजलेला हत्ती (ऐरावत.)

कपि तो न, पिनाकपाणि साक्षात् प्रभु-नाम-स्मरणें मनीं न धाला ॥
सगुणांघ्रि-निषेवणा कराया कपिरूपें अवतीर्ण येथ झाला ॥ २० ॥

पिनाकपाणि; पिनाक धनुष्य धारण करणारा (शंकर.) **सगुणांघ्रिनिषेवणा कराया**; रामाच्या सगुण स्वरूपाच्या पावलांची सेवा करावयास.

विटपावरि जेधवां तरूच्या उतरे तो जनकाधिकें रयानें ॥
कपि, पादप तेधवां लवे तो, त्यजिती पक्षि तया महाभयानें ॥ २१ ॥

विटपावरि; फांदीवर. **जनकाधिकें रयानें**; आपल्या बापापेक्षां (वायूपेक्षां अधिक वेगानें.

निरखी नरवीर वानरातें, नरवीरा कपिवीर कौतुकानें ॥
निजमूर्तिस पाहिलें जणों त्या नयनादर्श-मिषें परस्परानें ॥ २२ ॥

निजमूर्तिस......परस्परानें; त्या दोघांनीं एकमेकांच्या डोळेरूपी आरशांत जणूं काय एकमेकांचें प्रतिबिंबच पाहिलें.

उभयांतर-संभवां विकारां फुटले अंकुर, मित्रभाव झाला ॥
प्रथमांतरजन्य, तों दुजाच्या हृदयीं प्रेम धरी समुद्रमाला ॥ २३ ॥

दोघांच्या हृदयांत एकमेकांना पाहून जे विकार उत्पन्न झाले होते त्यांला अंकुर फुटले; रामाच्या विकाराचा परिणाम मित्रभावांत झाला, व मारुतीच्या विकाराचा परिणाम प्रेमभावांत झाला.

कपिनायक हा सखा असावा रघुरायास असें मनांत वाटे ॥
प्रभु-दर्शन-जन्य भक्तिभावें कपिचें तों बहुसाल चित्त दाटे ॥ २४ ॥
परि राघव-विक्रमास आधीं कपिशार्दूल परीक्षुनी पहाया ॥
धरि जों मति गर्वयुक्त चित्तीं कळली ती तंव तूर्ण रामराया ॥ २५ ॥

कपिशार्दूल; वानरसिंह (मारुति). **तूर्ण**; लगेच.

मग मोडुनि एक वृक्षशाखा कपि रामावरि सोडि लागवेगें ॥
तंव ती रघुनाथ दूर लोटी तल-शायी निज-चाप-कोटि-योगें ॥ २६ ॥

तलशायी; वृक्षाच्या तळीं निजलेला. **निजचापकोटियोगें**; आपल्या धनुष्याच्या कमानीनें.

जंव लक्ष्मण घे शरासनातें निज हस्तीं कपिशासना कराया ॥
तंव राघव वारुनी तयातें वदला, बा दुखवी न वानरा या ॥ २७ ॥
कपि खेळतसे कुतूहलानें, शिशुचेष्टा न तदीय दंड्य मानी, ॥
घन-गर्जन-वर्षणें नगाला वद होते बहु काय लाभहानी ॥ २८ ॥

घन......लाभहानी; मेघाच्या गर्जनेपासून अथवा वृष्टीपासून पर्वताचा विशेष्या नफातोटा कांहीं होतो का !

दुसरी कपि एक वृक्षशाखा प्रभुदेहावरि जों सवेंचि लोटी ॥
तंव राघव तीसही निवारी उचलोनी निज-चाप-वक्र-कोटि ॥ २९ ॥
जंव त्या नर-वानरांत चाले घटिकामात्र असा विनोद, झाला
तंव वृक्ष अशाख तो, दुजांचा कलि होतो निकटस्थ-शासन ॥

अशाख; शाखाहीन. **दुजांचा०......**दुसऱ्यांच्या तंट्यांत शे ॥ ४७ ॥
उपद्रव होतो. अर्थांतरन्यास. ती ॥

मग पल्लवहीन पादपा घे उपटोनी कपि पाणि-पल्लवा नाशी ॥ ४८ ॥
उतरूनि महीस, रामदेहावरि टाकी उचलोनि कौ रामानें मारुतीचा मी भक्त
उडवी प्रभु कार्मुकें द्रुमाला, भ्रमतो वृक्ष तसा
कपि-संश्रय मात्र नष्ट झाला, प्रभुदेहावरि स एकरूप झालें ॥
से समाधिजन्य आलें ॥ ४९ ॥
कपिसंश्रय......झाली; वानराच्या बसण्याच या, सुरकांक्षिता दुरापा ॥
आयती सांवली झाली. दिन-राज-वंश-दीपा ॥ ५० ॥

धरणीस्थित कीश तो प्रकोपा चढल ज्याला परम सुख असें म्हणतात; देव ज्याची
प्रभुला निज विक्रमें जिणावें धरित. **दिनराजवंशदीपा**; सूर्यवंशाच्या कुल-

कीश; वानर. **तातें**; बाबानें (म्हणजे

भिरकावुनि फेकतां निघे तो नग पावून नभीं महाजवातें ॥
सरतां वरि आत्म-वेग-जन्या करि वातावरणोदरीं रवातें ॥ ३४ ॥

सरतां......रवातें; वर चढत असतां त्या पर्वतानें आपल्या वेगापासून हवेंत मोठा शब्द उत्पन्न केला.

चढतां बहु उंच अंतरालीं घनसा भासत अद्रि लोचनांला ॥
परमावधि पावतां रयाची क्षणमात्र स्थिर अंबरांत झाला ॥ ३५ ॥

धरणीवरि जो विशालदेही गिरि तो कंदुकसा नभांत भासे ॥
अधिकार-भरान्विता नराला बहुधा येत लघुत्व दूर-वासें ॥ ३६ ॥

अधिकार०......दूरवासें; अधिकारावर असलेला मनुष्य दूर ठिकाणीं गेला असतां त्याला प्रायः हलकेपणा येतो. अर्थांतरन्यास.

क्षण पावुनि अंबरीं विरामा फिरला तो नग भूवरी पडाया ॥
परलब्ध न वीर्य मानवाच्या पुरतें उच्च पदास सांवराया ॥ ३७ ॥

परलब्ध......सांवराया; परक्यानें दिलेलें वीर्य मनुष्याला आपलें उंच पद राखण्याला पुरत नाहीं; त्याला स्वतःचें असावें लागतें. अर्थांतरन्यास.

पतना मग लक्ष्य राघवाची करुनी मूर्ति महीतलासि येतां ॥
नग, राघवही स्वपाणिपद्में उचली कार्मुक दुष्ट-दंड-दाता ॥ ३८ ॥

नग राघवाची मूर्ति पतना लक्ष्य करुनी महीतलासि येतां, असा अन्वय.

सुटतां नग हातचा कपीला मग झाला अनुताप, आंवराया ॥
न शके, परि सावधान राहे पडतांना गगनांत सांवराया ॥ ३९ ॥

हातचा पर्वत सुटल्यावर मारुतीला मोठा पश्चात्ताप झाला, पण मग त्याला तो पर्वत आंवरतां येईना; तेव्हां तो पडूं लागला असतां त्याला वरच्यावर झेलावें अशा तयारीनें तो राहिला.

सुटला तंव रामबाण वेगें भिडला जाउनि पर्वता नभःस्था ॥
नग बाण-फलस्थ तेधवां तो गमला भूसम शेष मस्तक-स्था ॥ ४० ॥

बाणफलस्थ नग; बाणाच्या टोंकावर राहिलेला पर्वत. **शेषमस्तकस्था भूसम;** शेषाच्या मस्तकावर राहिलेल्या पृथ्वीप्रमाणें. उपमा.

शरवात कपीस लागला जो कपि गेला गगनांत तद्भयानें, ॥
भ्रमुनी क्षणमात्र ये महीला, मिटुनी लोचन राहिला भयानें ॥ ४१ ॥

शरवात; बाणाच्या पिसाऱ्याचा वारा. **तद्भयानें;** त्यांच्या जोरानें.

जंव धूलि-कणावपात झाला निज गात्रांवरि तो म्हणूनि पाहे ॥
नयनां उघडूनि अंतरालीं नग तों चूर्णित रेणु वर्षताहे ॥ ४२ ॥

मारुति भयानें डोळे मिटून राहिला असतां त्याच्या अंगावर धूळ पडूं लागली म्हणून त्यानें जों डोळे उघडून वर पाहिलें तों पर्वताचा भंग होऊन त्याची धूळ आपल्या अंगावर पडते आहे असें त्यास दिसलें.

गगनोद्गत शैल तो क्षितीला नच आला परतून मागुता हें ॥
न विलक्षण, राम-लब्ध-मोक्षा तरि कैसा अवपात लाधताहे ॥ ४३ ॥

आकाशांत गेलेला तो पर्वत पृथ्वीवर पुन्हा परत आला नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं; कारण रामानें ज्याचा मोक्ष (पक्षीं मोचन) केला त्याचा अवपात म्ह० अधोगति (पक्षीं पतन) कशी होईल ?

मग गर्व समस्त नष्ट झाला कपिचा धांवुनियां पुढें निघाला ॥
रघुनाथपदाब्ज-रम्य-युग्मावरि लोटांगण घालिताचि झाला ॥ ४४ ॥
प्रभु-पाद-विलीन-चित्त होतां कपि मोहास अतीत सर्व झाला ॥
रघुनाथ-पदावपात-मूल्यें मिळवी तो परमोन्नता पदाला ॥ ४५ ॥

प्रभच्या पायांचे ठिकाणीं नम्रचित्त होतांच मारुति सर्व मोहापासून सुटला; रामाच्या पायांवर पडणें ही किंमत देऊन त्यानें फार उंच पद मिळविलें. परिवृत्ति अलंकार.

अतिसद्गद कंठ वानराचा, तनु रोमांचित आपदांत झाली ॥
नयनांतुनि मोदबाष्प वाहे, हृदयीं सात्विक भावना उदेली ॥ ४६ ॥

आपदांत; पायाच्या टोंकापर्यंत.

कपिच्या रघुवीर नम्र शाषी मग झाला करिता करप्रसादा ॥
कपि राहुनियां निवांत सेवी पद-कंजीं परमावधि-प्रमोदा ॥ ४७ ॥
उठवूनि सवेंचि वानरातें कवटाळी नरवीर तो तयासी ॥
परिरंभमिषें जणों कपीचा मग भक्त-प्रभु-भेद-भाव नाशी ॥ ४८ ॥

परिरंभमिषें...... नाशी, त्या आलिंगनाच्या मिषानें रामानें मारुतीचा मी भक्त व हा देव असा असलेला भाव नाहींसा केला.

प्रभु-दृष्टिंत दृष्टि लीन झाली, उभयांचें मन एकरूप झालें ॥
कपि होउनि रामरूप ठेला, सुख भोगासि समाधिजन्य आलें ॥ ४९ ॥
चिरकाल सुखासि सेवुनी त्या परमाख्या, सुरकांक्षिता दुरापा ॥
मग वानरकेसरी निवेदी निज वृत्ता दिन-राज-वंश-दीपा ॥ ५० ॥

परमाख्या सुरकांक्षिता दुरापा; ज्याला परम सुख असें म्हणतात; देव ज्याची इच्छा कारितात व जें दुर्मिळ आहे अशा. **दिनराजवंशदीपा**; सूर्यवंशाच्या कुलदीपक रामाला.

सुत मी प्रभुराज अंजनीचा कपिवंशीं जननास तुच्छ आलों ॥
परि आजि भवत्कर-प्रसादें परमानंद-पदास पात्र झालों ॥ ५१ ॥
मम मित्र समीप-शैल-शृंगीं बसले वानर चार ते प्रतापी ॥
तुमच्या चरणांस पाहण्यातें असती उत्सुक फार ते तथापि ॥ ५२ ॥
निज-दर्शन-लाभ देउनीयां प्रभुनें धन्य तयांसही करावें ॥
तदशेष-तमो-मला स्वकीयें करुणा-पूर्ण विलोकनें हरावें ॥ ५३ ॥

तदशेषतमोमला; त्यांच्या सर्व अज्ञानरूपी मलाला.

दिसतो पहिला तयांत जो तो मम सुग्रीवसखा किरीटधारी ॥
असुनी नृप तो निजाग्रजाच्या अनयानें बनला असे भिकारी ॥ ५४ ॥

अनय; अनीति, जुलूम.

असती सम-वीर्य कीश-बंधू परि जो ज्येष्ठ तयास वासवानें ॥
दिधली विजय-प्रसून-माला मग तो होय अजेय तद्गुणानें ॥ ५५ ॥

कीशबंधु; वानरबंधु. **वासवानें**; इंद्रानें. **विजयप्रसूनमाला**; जय मिळवून देणारी फुलांची माळ.

हरुनी ललना सहोदराची करितो तो चिर राज्य वालिनामा ॥
मम मित्र अनाथ होउनी हा करिता होय नगावरी स्वधामा ॥ ५६ ॥
दुसरा कपि तो नलाख्य आहे, तिसऱ्यातें अभिधान नील ऐसें ॥
चवथा जन ऋक्षराज तेथें बसला जांबवदाख्य वृद्धवेषें ॥ ५७ ॥

ऋक्षराज; अस्वलांचा राजा.

समरीं तरि वालिला वधोनी मम-मित्र-व्यसनास या हराया ॥
प्रभुवीण समर्थ कोण आहे शरणायात जनीं कृपा कराया ॥ ५८ ॥
परिसूनि कथा तदीय आला प्रभुनेत्रांतुनि अश्रु-बिंदु खालीं ॥
प्लवगार्ति निज-प्रिया-वियोग-स्मरणा कारण कीं विशेष झाली ॥ ५९ ॥

प्लवगार्ति...झाली; कारण सुग्रीवाच्या दुःखाची कहाणी रामाला सीतेच्या वियोगाची आठवण करून देण्यास मोठें कारण झाली.

तंव विस्मित मारुती विचारी अनुजातें प्रभुच्या हळूंच, झालें ॥
प्रभुला तरि काय दुःख जेणें शुभ नेत्रांतुनि अश्रुबिंदु आले ॥ ६० ॥
मग लक्ष्मण सर्व वृत्त सांगे, कपि तें आयकुनी उगाच राहे ॥
हृदयांत ह्मणे कपीश्वराशीं सम दुःखा रघुराज भोगिताहे ॥ ६१ ॥

कपीश्वराशीं; सुग्रीवाशीं.

मग मारुति बोलला तयातें प्रभुजी ! शोक तुह्मी करा न आतां ॥
तुमचे कपि दास सर्व आह्मी क्षितिजाशोध करूं मिळोनि ताता ॥ ६२ ॥
दिन फार न जाहले, स्त्रियेतें हरुनी राक्षस एक अंतरालीं ॥
दिसला निघतां अह्मांस शोकें गगना ती तंव भेदितीच झाली ॥ ६३ ॥
ललना-परिमोचनार्थ मी जों उडुनी सत्वर अंबरांत गेलों ॥
तंव राक्षस तो अदृश्य झाला, क्षितिला होउनि मी विषण्ण आलों ॥६४॥
तरि तीच असेल भूमिकन्या गमतें सत्य मदीय मानसाला ॥
मज कीं घनरोदनीं तिच्या त्या तव-नाम-स्मरणावभास झाला ॥ ६५ ॥

मज......झाला; कारण, तिनें आपल्या दीर्घ आक्रोशांत तुमचें नांव उच्चारल्याचा मला भास झाला.

दयिता-नव-वृत्त ऐकुनी तें द्रुत फोडी प्रभु हांक कामिनीला ॥
ललने ! मज भेटशील कां गे ! ह्मणुनी शोकनिमग्न फार झाला ॥ ६६ ॥
जंव शोक करूनि काल कांहीं प्रभु पावे रुदनोत्थिता विरामा ॥
तंव मारुति-लोचनांस पाहे समदुःखास्तव बाष्प-वारि-धामा ॥ ६७ ॥

रुदनोत्थिता विरामा पावे; रडण्यापासून समाधान झालें (रडण्यानें दुःख हलकें होतें हें प्रसिद्धच आहे.) **तंव०......धामा**; तोंवर त्याला मारुतीच्या डोळ्यांत समदुःखानें अश्रु आलेले दिसले.

मग होउनि शांत राम बोले सखया मान्य तवार्थना मला ती ॥
तव-मित्र-रिपूस मी वधोनी करितों तत्सकलापकार-शांति ॥ ६८ ॥

तवार्थना; तुझी विनंति. **तत्सकलापकारशांति**; त्याला झालेल्या सर्व पीडेचें शमन.

करितो तव मित्रकार्य आधीं मग या साह्य तुह्मी मला कराया ॥
घडते सहकारिता जनांतें क्षम नौका व्यसनार्णवा तराया ॥ ६९ ॥

घडते......तराया; संकटसमुद्र तरण्याला एकजुटीनें काम करणें हीच उत्तम नाव होय. अर्थांतरन्यास.

तरि घेउनि ये त्वदीय मित्रा मजपाशीं, मज भेटवी तयातें ॥
अचलावरि जाउनी त्वरेनें कळवी त्यास मदीय निश्चयातें ॥ ७० ॥
अभिवंदुनि मारुति प्रभूतें मग शैलावरि जाय लागवेगें ॥
कळवोनि कपींस वृत्त सारें परते घेउनियां तयांस संगें ॥ ७१ ॥
परिसूनि तदीय मोदवार्ता बहु ते हर्षित कीश-वीर झाले ॥
मग राम-समीप चालुनी ते न, न धांवोनि परी उडोनि आले ॥ ७२ ॥

मग...आले; मग ते रामाजवळ चालत नव्हे—धांवत नव्हे—तर एका उडींतच आले.

सकलीं प्रभु वंदिला क्रमानें कपिनाथें हि, नलें, तसाच नीलें ॥
परि राघव तो न जांबवंतें जरठत्वेंचि तयास वांकवीलें ॥ ७३ ॥

परि...वांकवलिं; परंतु जांबुवंताला मात्र रामास नमस्कार करण्याची जरूर पडली नाहीं; कारण त्याला ह्मातारपणानें आयतेंच वांकविलें होतें.

बसले परिवेष्टुनी नृवीरां कपि-कंठीरव चारही दिशांनीं ॥
जणुं राक्षस-वंश जाळण्या तो प्रकटे सप्तशिखावतीर्ण वन्हि ॥ ७४ ॥

नृवीरां; रामलक्ष्मणांना **कपीकंठीरव**; कपिसिंह. (सुग्रीव, नळ, नीळ, जांबुवंत, मारुति). **जणुं...वन्हि**; जणूं काय राक्षसवंश जाळण्याकरितां तो पांच वानर व दोन नर मिळून सात ज्वालांनीं अवतरलेला अग्निच प्रकट झाला. उत्प्रेक्षा.

मग पावकसाक्षिका प्रतिज्ञा करण्यातें नरवीर-कीशवीरां ॥
नयपंडित जांबवंत सांगे सकलांच्या गमलें बरें विचारा ॥ ७५ ॥

पावकसाक्षिका प्रतिज्ञा करण्यातें; अग्नीला साक्ष ठेवून शपथा घेण्यास. **नयपंडित**; नीतिशास्त्रांत निपुण.

नल-नील-मुखीं यथावकाशें विपिनीं त्या विपुलेंधना कपींनीं ॥
मिळवोनि समीप राघवाच्या मग केला परिदीप्त दिव्य वन्हि ॥ ७६ ॥

नलनीलमुखीं कपींनीं; नलनीलादिक वानरांनीं.

वालीस मी वधुनियां समरानुराधीं ॥
मित्रासि राज्यललना मिळवोनि आधीं ॥
देईन, हाच मम निश्चय धर्मविज्ञा ॥
बोले प्रभू प्रथम तेथ अशी प्रतिज्ञा ॥ ७७ ॥

समरानुरोधी; युद्धप्रसंगांत. **धर्मविज्ञा**; धर्म जाणणाऱ्या ! (अग्ने). वसंततिलका वृत्त.

मी जाउनी, कपिहि पाठवुनी दिगंता, ॥
आणीन मेळवुनि राघव-दार-वार्ता ॥
होईन साह्य रिपुमर्दनिं राघवातें ॥
सुग्रीव यापरि वदे निज निश्चयातें ॥ ७८ ॥

वसंततिलका.

झाला साक्षिविधी पुरा, सुरवरां आनंद झाला खरा ॥
वाटे तो नर-वानरांत न बरा, संधि प्रमत्तासुरां ॥

श्रीरामा गुणसागरा भवहरा वंदूनि वीर्याकरा ॥
आणाया निज सोदरासि समरा सुग्रीव गेला पुरा ॥ ७९ ॥

प्रमत्तासुरां; मत्त झालेल्या दैत्यांना. **वीर्याकरा**; वीर्याचा निधि अशा (श्रीरामा). शार्दूलविक्रीडित वृत्त.

सर्ग १५ वा.

किष्किंधेच्या निकटीं सुग्रीव सहर्ष मानसें आला ॥
उद्देशुनि वालीतें मग मोठी हांक फोडिता झाला ॥ १ ॥
पर-दार-धर्षका ! रे ! चोरा ! ये बांधवाधमा कुटिला ॥
निटिलावरि मी आलों द्याया पद सेविसी कसा उटिला ॥ २ ॥

परदारधर्षका; परस्त्रीचा अपहार करणाऱ्या. **उटिला सेविसी**; अंगाला उटणीं कंसलीं लावून घेतो आहेस ?

कां लाविसी विलंबा याया बाहेर पाय कां अडती ॥
प्राण्या कृतपापांची द्याया लागेचि एकदां झडती ॥ ३ ॥
होता करीत गोष्टी तेव्हां अंतःपुरांत जो वाली ॥
सुग्रीवाची त्याच्या कर्णावरि हांक तेथ ती आली ॥ ४ ॥
मग तैसाचि निघे तो बाहेरीं त्यजुनि दार-परिरंभा ॥
सौख्यास शत्रुदर्शन दूषवितें गरलसें सुधाकुंभा ॥ ५ ॥

सुधाकुंभा गरलसें; अमृताच्या घागरींत विष टाकलें असतां तें जसें दूषित होतें तसें.

येउनि नगरद्वारीं वाली जो शत्रुशोध करिताहे ॥
तों सुग्रीव तयातें सामोरा होउनी उभा राहे ॥ ६ ॥
अनुजासि ह्मणे वाली येतोसि पुनःपुन्हा मरायातें ॥
मी सोडितों तुला तरि इच्छिसि कां संगरा करायातें ॥ ७ ॥
गेलासि आजवरि तूं वांचूनि, म्हणूनि आज सुटशील ॥
हें न खरें, कां मूढा काला बोलावितोसि हठ-शील ॥

हठशील; हट्ट धरणारा.

तव वीर्य गर्जनावधि, युद्धहि मम-दर्शनावधि गमे तें ॥
तव विजय हाचि जावें युद्धांतुनि वांचुनी तनुसमेतें ॥ ९ ॥

तनुसमेतें; शरीरासह (त्वां). तुझ्या वीर्याची शिकस्त म्हणजे गर्जना, तुझ्या युद्धाची पराकाष्ठा ह्मणजे माझें दर्शन व लढाईतून जिवंत परत जाणें हीच तुझ्या विजयाची कमाल होय.

सोडितों तुला मी आतांही एकवार मूढासी ॥
न करि पुन्हा परि माझ्या जागृत कोपानलासि गूढासी ॥ १० ॥
निर्भर्त्सना करी बहु अनुजाची तो मदांध कपि वाली ॥
मग परताया स्वपुरा दृष्टि निजांतःपुराकडे घाली ॥ ११ ॥
सुग्रीव सेवुनी त्या सोदर-गर्वोक्ति-तीव्र-धारांतें ॥
प्रत्यर्पी कोपानें अग्रज-वक्षीं कर-प्रहारातें ॥ १२ ॥

सोदरगर्वोक्तितीव्रधारांतें; बंधूच्या गर्वयुक्त बोलण्याच्या मर्मप्रहारांना.

त्या कठिण मुष्टि-घातें वालीला निमिष मूर्च्छना आली ॥
जातां लोपा मागें कोपा जोपासिती परी झाली ॥ १३ ॥

जातां...झाली; ती मूर्च्छना संपली तेव्हां तिनें आपल्या मागें क्रोधाची जोपासना (वर्धन) करून ठेवली.

अनुज-प्रहार-लाभें वाली कल्पांत-कालसा खवळे ॥
कोपें मग त्याच्यावरि करण्या मुष्टिप्रहार वीर वळे ॥ १४ ॥
ते विंध्य-हिमाचलसे अन्योन्यां बंधु धडकले समरीं ॥
सम-रीति युद्ध कुतुकें दोघांचें पाहिलें तदा अमरीं ॥ १५ ॥

समरीति; सारख्या पद्धतीचें (युद्ध).

ओढिति परस्परांतें लोटिति देती मुखांत चडकाणी ॥
वक्षास वक्ष भिडलें, हस्तातें होय कवळिता पाणी ॥ १६ ॥
ते पूर्व-पश्चिमेचे सर्वांगें भेटले जसे सिंधु ॥
युद्ध-व्याजें गाढाऽश्लेषातें अर्पिती सखे बंधु ॥ १७ ॥

युद्धव्याजें; त्या सख्ख्या भावांनीं युद्धाचें जणं काय निमित्त करून एकमेकांना गाढ आलिंगन दिलें.

जों द्वंद्वयुद्ध झालें दोघांचें एक दोन घटिका तें ॥
वाटे त्यां चेष्टविलें कोपानें युद्ध-केलि-वटिकांतें ॥ १८ ॥

वाटे...वटिकांतें; कोपरूपी बुद्धिबळें खेळणारानें तीं दोन मोहरीं खेळविलीं असें वाटलें. (बुद्धिबळाच्या खेळांतील मोहरीं एकमेकांजवळ येतात, पुनः दूर होतात, पुनः एकमेकांच्या पगांत येतात त्याप्रमाणें ते दोघे झुंजत होते, असा भाव.)

सुग्रीव भागला बहु गेलें तद्वीर्य सर्वथा गळुनी ॥
धांपा टाकी बहुधा, मागें पाहे पुनःपुन्हा वळुनी ॥ १९ ॥

वाहे फेंस मुखांतुनि, हृदय उडे धडधडां, स्मृति निमाली ॥
सोदर-वज्र-कराच्या आघातें प्रबल मूर्च्छना आली ॥ २० ॥

होउनि सवेंचि सावध लागे मागें पळावया नीट ॥
वाली निघे तयाच्या मागें लागूनियां महाधीट ॥ २१ ॥

सुग्रीव पुढें धांवे अत्युत्कट-भीति-रुद्ध-पद करिसा ॥
वाली त्याच्यामागें लागे खर-नखर-चपल-पद हरिसा ॥ २२ ॥

अत्युत्कटभीतिरुद्धपद करिसा; अति भयानें जड पडताहेत पावलें ज्याचीं अशा हत्तीप्रमाणें. **खरनखरचपलपद हरिसा;** प्रखर नखांच्या आणि चपळ पावलांच्या सिंहाप्रमाणें.

विपिनस्थ राघवाच्या निकटीं सुग्रीव येउनी पडला ॥
तों येउनियां वाली त्याच्या अंगासि मागुनी भिडला ॥ २३ ॥

वाली म्हणे तयातें आतां कां सोडितोसि अवसान ॥
चल ऊठ, ये, करूंया समर, ह्मणो लोक तुज न लव सान ॥ २४ ॥

ह्मणो...सान; तुला लोक मजहून कमी न ह्मणोत, तुला उणेपणा येऊं दे नको.

तों सुग्रीव प्रभुच्या पाहुनि मंदस्मिता मुखावरती ॥
उठला उत्साहानें समर करायास घेउनी सुधृति ॥ २५ ॥

मग चाललें पुन्हा त्या दोघांचें द्वंद्वयुद्ध वेगानें ॥
तें अन्योन्यां कथिलें पक्ष्यांनीं भीति-मिश्रितें गानें ॥ २६ ॥

तें...गानें; जवळच्या वृक्षांवरील पक्ष्यांनीं भीतीचे शब्द काढून एकमेकांना त्या युद्धाची बातमी दिली.

पुनरपि सुग्रीवातें वाली दे मुष्टिघात जोरानें ॥
मग पाहिलें प्रभूच्या त्या मुखचंद्राकडे चकोरानें ॥ २७ ॥

तों मारुति प्रभूतें वालीला द्रुत वधावया सुचवी ॥
कीं सुग्रीव निघाला चाखाया मृत्युची परासु चवी ॥ २८ ॥

परासु; मृत होत्साता.

मग काढिला प्रभूनें तूणीरांतूनि एक दिव्य शर ॥
योजूनि वालि-हृदयीं सोडियलें त्या न लावितां उशिर ॥ २९ ॥

नरवर-खर-शर सरसर सरसरुनी धांवला जशी सरला ॥
शिरला कपि-घन-हृदयीं बाहेरीं पुंखमात्र तो उरला ॥ ३० ॥

नरवरखरशर; नरश्रेष्ठ रामाचा प्रखर बाण. **सरला**; वीज. **सरसरुनी**; सरसा-उनी. **पुंखमात्र**; पिसारा मात्र.

त्या बाणाच्या घातें वाली धरणीतलासि कोसळला ॥
पवि-पात-घात-मात्रें वाटे तो अचल काय ढांसळला ॥ ३१ ॥

पविपातघातमात्रें; विद्युत्पाताच्या आघातानें.

वाली म्हणे प्रभूतें, होतों मी समर-निरत कां मातें ॥
वधिलें त्वां ? लांछन हें झालें तुज राज-कुल-ललामातें ॥ ३२ ॥

राजकुलललामातें; क्षत्रिय कुलांतल्या रत्नाला.

अपराध काय केला तुमचा मी ह्मणुनि दंडिलें मजला ॥
का धर्मपथा सोडुनि कुपथा या क्षत्र-नर-मणे ! भजलां ॥ ३३ ॥
वालीस राम बोले, मूढा कथितोसि धर्मनीतीतें ॥
तुज काय मर्कटातें नीतिकथा त्यक्त-साधु-रीतीतें ॥ ३४ ॥

त्यक्तसाधुरीतीतें; ज्यानें सज्जनांचा मार्ग सोडला आहे अशा (तुज).

निज-बंधु-कामिनीचा केला अपहार आजवरि जो कां ॥
तो काय धर्म झाला सांग परस्वापहारका कोका ॥ ३५ ॥

परस्वापहारका कोका; परक्याच्या वस्तूचा अपहार करणाऱ्या लांडग्या.

जो परपीडक दुर्जन तो माझा होय पूर्ण अपराधी ॥
मी त्या स्वशत्रु समजुनि सत्-कल्याणार्थ दंडितों आधीं ॥ ३६ ॥
या प्रभुवाक्या परिसुनि कपिहृदयीं पूर्ण होय अनुताप ॥
मग तो राम-पदाब्जीं होउनि ठेवी तनूसि निष्पाप ॥ ३७ ॥

निष्पाप होऊनि तनूसि ठेवी, असा अन्वय.

तोंवरि वार्ता कळली किष्किंधांतःपुरांत तारेला ॥
कीं नाथ आपणातें सोडुनि वैकुंठ-मंदिरा गेला ॥ ३८ ॥
आली घेउनि धांवत ती स्वसुता अंगदाभिधानासी ॥
लोळुनि नाथ-शवावरि करिती झाली महाविलापासी ॥ ३९ ॥
नाथा ! मजला सोडुनि परलोकीं केंवि जाहलें गमन ॥
किंवा गमलें होतें तेथें माझें सहागमीं न मन ॥ ४० ॥

सहागमीं; बरोबर येण्यांत. आपण मला सोडून एकटे गेलां ते मी आपणाबरोबर यावयास नाखुष होतें ह्मणून कीं काय, असा भाव.

मजला दयिता मानुनि केली जी वंचना न आजवरी ॥
ती कैंवि आजि केली प्राणेशा वरुनि मुक्ति-नव-नवरी ॥ ४१ ॥
कीं मन्मनःपरीक्षा घ्यायातें हें सुषुप्ति-मिष केलें ॥
परिरंभणार्थ आहे नाथा माझें तरी मन भुकेलें ॥ ४२ ॥

सुषुप्तिमिष; झोपेचें सोंग.

पर्यंकावरि नाहीं मीं निद्राभंग आपला केला ॥
तरि येउनियां विपिनीं शयनसमारंभ कैंवि आदरिला ॥ ४३ ॥

पर्यंकावरि; पलंगावर मीं घरांत आपला निद्राभंग कधींच केला नसून आपण वनांत येऊन कां निजलां, असा भाव.

शर घालण्या उरीं या कोणाचा दुष्ट वाहिला हात ॥
मज दीनेचा दुष्टें कोण्या केला तरी असा घात ॥ ४४ ॥
माझी एक असो, परि परलोका आजि सत्वरें जातां ॥
या मुग्ध अर्भकाची प्राणेशा काय वाहिली चिंता ॥ ४५ ॥
यापरि शोक करी बहु कवटाळुनि पतिकलेवरास सती ॥
तच्छोक-लब्ध-भावा साऱ्या शून्येक्षणा दिशा दिसती ॥ ४६ ॥

तच्छोक०......दिसती; तिच्या शोकाचा संसर्ग होऊन साऱ्या दिशा भयाण दिसूं लागल्या.

ताडी ललाट हस्तें, केशांतें आपुल्या सती तोडी ॥
प्राणेशा उद्देशुनि हांका दुःखें पुनःपुन्हा फोडी ॥ ४७ ॥
शोका त्या पाहुनियां घन-करुणाऽक्रोश-संकुलाऽलोका ॥
लोकानुग्रहकारी कळवळला दीनबंधु तो जो कां ॥ ४८ ॥

घनकरुणाक्रोशसंकुलालोका; अत्यंत करुणेच्या हांकांनीं भरलेला आहे देखावा ज्याचा अशा (शोका).

मग मारुनि तारेला हांक, प्रभु मधुरगर्भ वचनातें ॥
वदता झाला तीतें वेदांत-ग्रथित-तत्त्व-रचनांतें ॥ ४९ ॥

मधुरगर्भ; गोड आहे अर्थ ज्यांचा अशा. **वदांत०...**वेदांतावर उभारली आहे तत्वांची रचना ज्यांच्या अशा (वचनांतें).

तारे किमथ रडसी, आला जो जीव तो मरावा, हे ॥
रचना अनादि, जीव भ्रांतपणें शोकसागरा वाहे ॥ ५० ॥

हे; ही.

हा आजि न मरता तरि होता कां सांग गे चिरंजीव ॥
तूं टाकुनि पतिशोका चित्त प्रभु-चिंतनांत रंजीव ॥ ५१ ॥
रडसी जरि देहास्तव, तो देह असे समीप पडला गे ॥
जरि जीवास्तव, जीवा मरण नसे वेद तत्त्व पढला गे ॥ ५२ ॥

तूं जर नवऱ्याच्या देहाकरितां रडत असशील तर तो देह तुजजवळच पडला आहे; बरें, नवऱ्याच्या जीवाकरितां रडत असशील तर जीवाला मरण नाहीं, असें वेदांनीं सांगितलें आहे.

तूं एक याचि जन्मीं याची पत्नी, तुला कळे नातें ॥
परि कोण पूर्वजन्मीं होता तव हा तुला कळेना तें ॥ ५३ ॥
देहास लागले हे जनन-मरण-बंध ते अनादि खरे ॥
एकासचि शोचावें हा तारे न्याय कोण सांग बरें ॥ ५४ ॥

एकासचि शोचावें; देहाला जन्म व मरण हे दोन्ही सारखेच बंध लागले असतां त्यांतील एकाच बंधाबद्दल तेवढा शोक कां ?

आत्म्यास जनन मरणहि नाहीं हा भास सर्व मायेचा ॥
होतो अविनाशावरि पतिचा वा भास मात्र जायेचा ॥ ५५ ॥

अविनाशावरी; शाश्वत असे जें ब्रह्म त्यावर.

पति नश्वर तव, नश्वर तूंहि, तसा मीहि, मांडिला खेळ ॥
मायेनें, शोचाया येथें अन्या नसे तुला वेळ ॥ ५६ ॥
तरि ऊठ लागवेगें, जाई परमेश्वरा तया शरण ॥
आली घडी न दवडी, सर्वांसचि लागलें असे मरण ॥ ५७ ॥
ते वाक्य-किरण शिरले प्रभु-सूर्याचे तमोंधकाराति ॥
तारेच्या हृदयीं, मग दिव्य ज्ञानास पात्र होय सती ॥ ५८ ॥

तमोंधकाराती; अज्ञानरूपी अंधकाराचे शत्रु. (तमस्+अंधकार+अराति.)

मग धांवुनियां तारा राघव-चरणांस जाहली धरिती ॥
करि तीस बोध आंगें प्रभु, मग कैसी न मुक्तिला वरि ती ॥५९॥
मग और्ध्वदेहिकातें वालीच्या अंगदाकडोनि तदा ॥
करवोनि राम अर्पी सुग्रीवा सर्व वालि-राज्य-पदा ॥ ६० ॥

और्ध्वदेहिक; उत्तरकार्य.

निज-पत्तन-प्रवेशा प्रभुला सुग्रीव तो करायातें ॥
विनती करी परोपरि परि ती रुचली न रामरायातें ॥ ६१ ॥
मग किष्किंधा-निकटीं होतें जें रम्य एक आम्रवन ॥
तेथें निवास केला रामें होऊनि सुप्रसन्न-मन ॥ ६२ ॥

नल-नील-मारुतींतें, ऋक्षातें, लक्ष्मणासही आंगें ॥
जाउनि सुग्रीवाला अभिषेक करावया प्रभू सांगे ॥ ६३ ॥

ऋक्षातें; जांबुवंताला. **आंगें**; स्वतः.

राज्याभिषेक झाला सुग्रीवा, मोद पावली नगरी ॥
प्रभु आम्रवनीं राहुनि सीता-प्रिय-मूर्ति-चिंतनास करी ॥ ६४ ॥
मारुति करिता झाला त्याच्या वास्तव्य सर्वदा निकट ॥
त्यानेंच साधिला कीं जन्मा येऊन भक्ति-पथ बिकट ॥ ६५ ॥
सुग्रीवकार्य झालें, उरलें श्रीरामकार्य तें आतां ॥
कपिनाथें मेळविलें सीताशोधार्थ सर्व कपिजाता ॥ ६६ ॥
तों ग्रीष्मकाल बहुतेक सरून गेला ॥
वर्षाऋतु प्रकट भूवरि सांग झाला ॥
होतां महीतल जलाकुल मेघपातें ॥
झालं प्रयाण बहु दुष्कर वानरांतें ॥ ६७ ॥

सांग; आपलीं उपांगें घेऊन (मेघ, विजा वगैरे). वसंततिलका.

वर्षावसान-समयावधि वाट पाहूं ॥
सीतासतीस मग शोधुनि सर्व येऊं ॥
तों वास या उपवनीं करिजे सुखानें ॥
ही अर्पिली विनति रामपदीं कपीनें ॥ ६८ ॥

वर्षावसानसमयावधि; वर्षाऋतु संपेपर्यंत. वसंततिलका.

विनति करुनी त्याची मान्य प्रसन्न-तरें मुखें ॥
प्रभु निज पुरा जाया त्यातें निदेश करी सुखें ॥
समय सरतां याया सांगे तयाप्रति लौकरीं ॥
मग उपवनीं वास्तव्यातें विषण्ण मनें करी ॥ ६९ ॥

विषण्ण मनें; सीताशोधाची मुदत चार महिने लांबली म्हणून मनांत कष्टी होऊन. हरिणी वृत्त.

सर्ग १६ वा.

वर्षाकालारंभ धरित्रीवरि झाला ॥ नीलाकाशीं संचित झाल्या घनमाला ॥
ये पृथ्वीला वारिसमूहें नव शोभा ॥ झाली हेतू ती कृषिकातें कण-लोभा१॥

झाली...कणलोभा; इतर लोकांना जी नुसती शोभा दिसत होती ती शेतकऱ्यांना धान्याची आशा लाविती झाली. मत्तमयूर वृत्त.

संचारातें मेघ निराळीं करिताहे ॥ त्याच्या नादा भूतल सारें वरिताहे ॥
नाचे तेथें संतत कैसी चपलाही ॥ कीं क्षुब्धाच्या शांति मनातें क्षण नाहीं॥

निराळीं; आकाशांत. अर्थांतरन्यास.

होतें दीप्त व्योम रवीच्या किरणांनीं ॥ एकाएकीं व्याप्त घडे तें जलदांनीं ॥
येती धारा आतपसंगें धरणीला ॥ वर्षाच्या या यौवनकालीं मदलीला ॥३॥

येती....मदलीला; ऊन पडलें असतांही पाऊस पडूं लागला, या वर्षाऋतूच्या तारुण्यांतील लीला होत.

गर्जे आधीं, अश्रुजलातें मग ढाळी ॥ भीमाक्रोशें दिव्य वधूतें कवटाळी ॥
आतां आहे शांत चढे तों बहु कोपा ॥ घेई हाता चित्रविचित्राकृति चापा ४

दिव्य वधूतें; आकाशांतील स्त्रीला (विजेला). चित्र०...चापा; इंद्रधनुष्य.

एके ठायीं गर्जुनि जाई बहु दूरी ॥ वर्षे गारा, दे तिसऱ्यातें मग वारी ! ॥
हिंडे, नाचे, वाट धरी वा क्षितिजाची ॥ वृत्ती ऐशी चंचल मोठी तरुणांची ॥

अर्थांतरन्यास.

होतो केव्हां मत्त-गजेंद्राकृति-धारी ॥ केव्हां भासे क्रुद्ध हरीसा भयकारी ॥
केव्हां वाटे दिव्य मुनीसा द्रुतकोपी ॥ इच्छावेषी मेघ गमे हा बहुरूपी ॥६॥

द्रुतकोपी; लवकर रागावणारा.

व्योमारण्यीं माहिष कीं हा फिरणारा ॥ कीं आहे हा पांथ निराळीं भ्रमणारा
आकाशींचें पल्वल कीं हें स्रवणारें ॥ वर्षर्तूचें चित्तचि कीं तें द्रवणारें ॥७॥

हा काय आकाशरूपी अरण्यांत फिरणारा रेडा आहे, का अधांतरीं चालणारा प्रवासी आहे, का हें आकाशांतलें तळें झिरपतें आहे, कीं हे वर्षाऋतुचें चित्तच द्रवतें आहे. उत्प्रेक्षा.

मोठा झंझावात सुटोनी करि पीडा ॥ तेव्हां धूलिस्तंभ नगाशीं धरि होडा
गारांची जी वृष्टि महीला बहु होते ॥ ती पांथांना दिग्-भ्रम-युक्त श्रम देते ८

तेव्हां...होडा; त्या वेळीं धुळीचे स्तंभ पर्वताबरोबर स्पर्धा करूं लागतात. **दिग्भ्रमयुक्त श्रम**; दिशाभुलीसह श्रम, दिशाभूल व आयास.

मोठ्या मोठ्या येति महीला जलधारा ॥ त्यांच्यासंगें ही चपलाही करि मारा
जेथें वार्ता लागत नाहीं तरणीची ॥ व्हावी तेथें काय दशा या धरणीची ९

तरणीची; सूर्याची.

शेतें सारीं नांगरिलीं जीं कृषिकांनीं ॥ वाटे भूनें विंचरिली ती निज वेणी ॥
गेलीं आतां सर्व भरोनी सलिलांनीं ॥ ग्रीष्मातप्ता भूमिवधू ती करि न्हाणी ॥
वृद्धावस्था मेघसमूहा जंव आली ॥ वार्धक्याचीं गोचर चिन्हें तंव झालीं ॥
अंगीं शोभे श्वेत जरेचा ध्वज आतां ॥ धारासारा सोडुनि मांडी लघुपाता ॥

धारासारा; मुसळधारा. **लघुपाता मांडी**; झिमाझिम पडूं लागला.

होतां तोयें पूर्ण नभीं हा घनराया ॥ झाली त्याची वारि-मयी हीं क्षितिजाया॥
बिंदुश्रेणी वृक्षहि ल्याले बहु नामी ॥ कीं थोरांचे सर्वचि होती अनुगामी १२

वारिमयी; पाण्यानें भरलेली. अर्थांतरन्यास.

ग्रीष्मीं याचे याचक होते खग कोणीं॥ आला गेला यासि पुसेना जन कोणी
आतां याचे चातक झाले जन सारे ॥ पावे देहीं गौरव मोठें अधिकारें॥१३॥

ग्रीष्म ऋतूंत याची याचना कोन्याकोपऱ्यांतलीं कांहीं पांखरें (चातक) तेवढीं करीत होतीं; इतर लोक कोणी याला आला गेला विचारीत नव्हते. पण आतां सर्व लोक चातक होऊन याची वाट पाहत आहेत (कारण त्यांना जगविण्याचा अधिकार याच्या हातीं आला आहे). अर्थांतरन्यास.

होतीं दीनें आजवरी जीं पर-तंत्रें ॥ देती धारा तींच नभातें जल-यंत्रें ॥
त्यांनीं आतां उन्नत कांहो शिर कीजे ॥ पात्रापात्रा पाहुनि विद्या-धन दीजे १४

जलयंत्रें; कारंजीं. ज्या कारंज्यांना पाण्याचा पुरवठा आकाशांतून प्रथम झाला तींच कारंजीं आतां उलट आकाशाला पाणी देऊं लागलीं, तेव्हां विद्या व धन हीं पात्रापात्र पाहून द्यावींत.

लोकां कांता-पाणि-लता संश्रय झाला ॥ हिंस्रीं जीवीं गव्हर-गेहाश्रय केला।
गेली वृक्षांतूनि रहाया खगसेना ॥ एका भृंगा मात्र निवारा गवसेना ॥१५॥

लोकां...झाला; लोकांनीं स्त्रियांच्या बाहुपाशांचा आश्रय केला.

होती पूर्वीं धूलि महीची कणरूपी ॥ वर्षारंभीं ती मग झाली घनरूपी ॥
पंकाचें जें रूप तिला ये परिणामीं ॥ वैपुल्यानें घेतचि वस्तू गति वामीं॥१६॥

वामीं; आडमार्गाकडे. **वैपुल्यानें...वामीं**; कोणत्याही वस्तूला जरूरीचा पदार्थ अति मिळाला ह्मणजे ती बिघडते. अर्थांतरन्यास.

मंडूकांचा शब्द सदा ये श्रवणातें ॥ तो कार्कश्यें रम्य न वाटे कवणातें ॥
केकी मांडी नृत्य नटोनी नववेषी ॥ गेला कोठें कीं पिक झाला परदेशी१७॥

वर्षानीरें अंकुर भूला नव आले ॥ नीरावर्तें संकुल झालीं तरुमूलें ॥
स्थूलाऽघातां पर्वत सोडी जलपातां ॥ नीरक्रीडा ही करि मोदें क्षितिकांता

नीरावर्तें...तरुमूलें; झाडांच्या मुळांना पाण्याचा वेढा पडला.

स्थूलाघातां जलपातां; मोठ्यानें आपटणाऱ्या पाण्याच्या प्रवाहांना.

वर्षाकालीं नीपतरूला कुसुमांची ॥ एकाएकीं गोचर झाली जणुं कांची ॥
मेघीं तारा भक्षण केल्या गगनींच्या ॥ येथें जाती-पुष्प-मिषानें दिसती त्या ॥

नीप; कदंब. **कांची**; मेखला. **मेघीं...त्या**; मेघांनीं आकाशांत ज्या तारका भक्षण केल्या त्या पृथ्वीवर जाईच्या फुलांच्या रूपानें बाहेर पडल्या.

आतां पंकें पूरित-पात्रा कलिलांगा ॥ भेटायातें जाति पतीला क्षितिगंगा ॥
ठायीं ठायीं पल्वल-वापी-ऱ्हद होते ॥ नीरें गेले सांप्रतकालीं भरुनी ते ॥२०॥

कलिलांगा; गढूळ झालेल्या. **पतीला**; समुद्राला. **ऱ्हद**; जलाशय, तलाव.

जे दारिद्र्यीं निर्मल नीराशय ठेले ॥ ते ऐश्वर्यीं कश्मल-पूर्णांतर झाले ॥
गंगा झाल्या त्या कलिला ज्या शुचिवाहा॥संपत्तीचा मोहविकारी महिमा हा

नीराशय; जलाशय, तलाव. **दारिद्र्यीं निर्मल**;पाणी कमी असतांना स्वच्छ होते. **ऐश्वर्य कश्मलपूर्णांतर**; पाणी पुष्कळ झाल्यावर घाणीनें भरले. **गंगा...शुचिवाहा**; पूर्वी स्वच्छ प्रवाह असलेल्या नद्या गढूळ झाल्या. अर्थांतरन्यास.

पर्जन्याच्या संतत-वृष्टि-क्रम-कार्यीं ॥ आलस्याचा उद्भव जीवांवरि होई ॥
कार्यापेक्षी निश्चल गेहीं जन ठेला ॥ जाती आतां पांथ न वा पर्यटनाला २२

कार्यापेक्षी; काम करण्याची इच्छा असणारा.

वाहे जाती-रेणु-सुगंधी वनवायु ॥ झाली ग्रीष्मक्लांति समस्ता विगतायु ॥
आम्रोद्यानीं शांतपणा ये जलवर्षें ॥ वर्षा सेवी रामपदा यापरि हर्षें ॥ २३ ॥

ग्रीष्मक्लांति विगतायु झाली; ग्रीष्मऋतूनें आलेली ग्लानि नाहींशी झाली.

गेला वर्षाकाल निघोनी परिणामा ॥ सुग्रीवातें सौख्यद झाल्या बहु रामा ।
तेव्हां त्याची बुद्धि वधूमोहित झाली ॥श्रीरामाच्या कामित कार्यीं स्मृति गेली

कामितकार्यीं; इच्छित कार्यात.

सुग्रीवाची कांहिंच वार्ता गवसेना ॥ सीताशोधा वा न निघाली प्लवसेना ॥
कर्तव्यातें दक्ष कराया कपिपाला ॥ किष्किंधेतें मारुति आंगें मग गेला ॥२५॥

प्लवसेना; वानरसेना. **कपिपाळा**; सुग्रीवाला; **आंगें गेला**; स्वतः गेला.

सुग्रीवातें बोध करोनी कपि आला ॥ त्यातें कांहीं काल निघोनी मग गेला ॥
नाहीं आला वानररायाहि तथापि ॥ झाला सीताजानि तदा तो बहुकोपी ॥

सीताजानि; राम (सीता जाया ज्याची तो बहु० समास).

सौमित्रीतें कीशपुरा जाउनि आंगें ॥ सुग्रीवातें बोध कराया प्रभु सांगे ॥
आज्ञा त्याची मानुनि तो सद्गुणराशि ॥ किष्किंधेच्या सत्वर आला पुरवेशीं

कीशपुरा; वानरांच्या गांवाला (किष्किंधेला).

त्याच्या तेव्हां संनिधभागीं कपिधानी॥ नानाकारीं जी रमणीया भुवनांनीं।
वैचित्र्यानें कौतुक दे जी हृदयातें ॥ ती किष्किंधा गोचर झाली नयनांतें॥२८॥

कपिधानी; वानरांची राहण्याची जागा (किष्किंधा.)

कांहीं गेहें नूतन-नीलोपल-बद्धें ॥ कांहीं कांहीं जर्जर झालीं चिरवृद्धें ॥
कांहीं दीर्घायाम-विचित्रें बहुरंगें ॥ कांहीं जाती उंच रमाया घनसंगें ॥ २९ ॥

नूतननीलोपलबद्धें; नव्या काळ्या दगडांनीं बांधलेली. **दीर्घायामविचित्रें.** अस्ताव्यस्त बांधल्यामुळें विलक्षण दिसणारीं.

झाली वर्षा-दिव्य-जलानें नव-धूता ॥ रम्याऽलोका ती पुरनारी परिपूता ॥
रथ्या झाल्या निर्मल साऱ्या गतधूलि ॥ झाला नीरावर्त सभोंता गृहमूलीं ॥

नवधूता: नुकतीच न्हाऊं घातलेली. **नीरावर्त**; पाण्याचा वेढा.

कोणी प्रौढा वार्धक-वेषा कपिकांता ॥ कोणी मुग्धा यौवनदर्पें अविनीता ॥
पाणी आणायास गलालंबित-डिंभा ॥ येती जाती घेउनि शीर्षीं जलकुंभां ३१

अविनीता; उद्दाम. **गलालंबितडिंभा**; ज्यांच्या गळ्यांत पोरें लोंबताहेत अशा.

ठायीं ठायीं तेथ मिळालीं कपिवृंदें ॥ लीलाकेली चालविती तीं बहु मोदें ॥
कोणी अन्या ओढुनि हस्तें करि खोडी ॥कोपें त्याचें तो करघातें मुख फोडी
कोणी मारी उंच उड्या अंबर-मार्गें ॥ कोणी सौधारूढ निजाया कपि लागे॥
कोणी अन्या वक्रमुखें कौतुक दावी॥ तो अन्याच्या टोंचुनि अंगा कळ लावी

माता कोठें पाहुनि कार्यास्तव गेली ॥ मागें पुत्रें चालविली कौतुककेली ॥
तीतें येतां पाहुनियां तो गृहवेशीं ॥ घाली खाद्या लांबविलेल्या मुखकोशीं ॥

तीतें...मुखकोशीं; तिला घराच्या दाराशीं आलेली पाहतांच त्यानें उचललेला खाण्याचा जिन्नस आपल्या तोंडांत लपविला.

सौधीं वृद्धा वाळत घाली निज-चेला ॥ तें रथ्येच्या गोचर झालें कपिबालां ॥
कांहीं कालें येउनि ती जों बघताहे ॥ अस्ताव्यस्ता चेल-समृद्धी दिसताहे ॥

चेला; नेसण्याच्या वस्त्राला. **रथ्येच्या कपिबालां**; रस्त्यांतील उनाड वानरांच्या पोरांना. **अस्ताव्यस्ता०...** तिला आपल्या एका वस्त्राचीं अनेक वस्त्रें (चिंध्या) अस्ताव्यस्त पडलेलीं दिसलीं.

न्यायागारीं न्याय कराया बसलेला ॥ मंत्री झाला दुश्चित मूढापरि ठेला ॥
साक्षी वक्ते सर्वचि जेथें अपराधी ॥ शिक्षा कोणा तेथ करावी तरि आधीं ॥
देवागारीं कीर्तन आलें अवसाना ॥ तेव्हां तेथें फेडिति नारी नवसांना ॥
जो वांटाया तत्फल-दाना उठला तो ॥ मध्यें मध्यें आपण खाद्यांतुनि खातो ॥

देवागारीं; देवळांत. **जो...खातो**; त्यांनीं आणलेलीं नवसांचीं फळें वांटण्याकरितां जो वानर उठला होता तो वांटतां वांटतां आपणही खाऊं लागला.

एके ठायीं होत पुराण, श्रवणातें ॥ दाटी झाली, रीघ मिळेना कवणातें ॥
साधु श्रोता एक अशा संधिस आला ॥ सर्वांमध्यें दीर्घ उडी मारुनि गेला ॥
बाजाराची एक ठिकाणीं बहु दाटी ॥ सर्वांचीही पक्व फलांशीं परिपाटी ॥
साळी कोष्टी, चर्मक तेथें बहु वाणी ॥ वस्तूंसाठीं त्यांस पुसेना परि कोणी ॥

परिपाटी; परिपाठ, ओढ.

शिंप्यांचींही तेथ दुकानें बहु होती ॥ तेथें वस्त्रें छिद्रशतांनीं भरलीं तीं ॥
कीं क्रेत्यांच्या योग तसाच प्रखरांचा ॥ विक्रेत्यांच्या होत तयांशीं नखरांचा ॥

कीं क्रेत्यांच्या तसाच विक्रेत्यांच्या प्रखरांचा नखरांचा तयांशीं योग होत असा अन्वय. तीं वस्त्रें भोंकांनीं भरलेलीं असत याचें कारण, विकणारे शिंपी व विकत घेणारे गिऱ्हाईक या दोघांच्याही तीव्र नखांचा त्यांच्यावर प्रयोग होत असे.

ग्रामा गेला नाथ तयाची नव रामा ॥ प्रासादाग्रीं होय उभी दर्शन-कामा ॥
गेहद्वारीं पाहुनि तो आगत झाला ॥ आली एका ती अवडीनें धरणीला ॥

अवडीनें; खालीं उडी मारून. तिनें आपला नवरा दारांत आलेला पाहतांच सौधाग्रावरून खालीं उडी मारली. तिच्या घराला जिना नसेल असें नाहीं, पण जातिस्वभावानुरूप तिला उडी मारण्याची प्रेरणा झाली असा आशय.

प्रासादाग्रें, पादप, भिंती धवळारें ॥ ऐशा जागीं पौर सदा ते वसणारे ॥
गेहांमध्यें न क्षणही राहति कोणी ॥ किष्किंधा ती केवळ नामें कपिधानी ॥

धवळारें, छपरें. **किष्किंधा...कपिधानी;** किष्किंधा ही नुसती नांवाची वानर-पुरी होती. ते केव्हांही घरांतून रहात नसत.

सौमित्रीतें पाहुनि कोपें धृतचापा ॥ मोठे मोठे कीशहि येती न समीपा ॥
दूरीं वृक्षीं बैसति ते घेउनि भीति ॥ संकेतानें ती दुसऱ्यांना कथिताती४३॥
आला कोणी मानव मोठा शरधारी॥ नेणों बाणा तो परि कोणावरि मारी॥
धांवा धांवा दूर पळा सावध सारे ॥ रथ्येमध्यें सांगति ऐसें कपिपोरें ॥४४॥
एका कीशा संश्रय तेव्हां ध्वज झाला॥ कोणी सौधाग्रासि उडोनी कपि गेला
वार्धक्यानें जर्जर होता कपि कोणी ॥ देहत्यागें तो शठ मूर्च्छामिष आणी ॥

ध्वज संश्रय झाला; पताकेवर एक वानर चढला. **वार्धक्यानें...आणी,** एक म्हातारा वानर होता, त्यानें जमिनीवर अंग टाकून मूर्च्छा आल्याचें सोंग केलें.

वार्ता ऐसी ऐकुनि नारीजन गेहीं ॥ कार्यस्तब्धा होउनि ठेल्या सकलाही ॥
रथ्योदंता पाहुनि वातायन-मार्गें ॥ एका अन्येला फुगवोनी कथुं लागे ॥४६॥

रथ्योदंता; रस्त्यांतील वृत्तांताला. **वातायनमार्गें,** खिडकीच्या वाटेनें.

मोठा मोठा होत उदंत द्रुत-वाही ॥ तो सुग्रीवांतःपुरदेशाप्रति जाई ॥
ऐके तो, कीं घेउनि सेना रिपु आला ॥ जिज्ञासेनें तो मग सौधावरि गेला॥

द्रुतवाही उदंत; झपाट्यानें फैलावणारी बातमी. **ऐके...आला;** त्याला असें समजलें कीं कोणी शत्रु फौज घेऊन आला आहे.

राजद्वारीं पाहुनि रामानुज ठेला ॥ सुग्रीवाचा सर्व निघोनी मद गेला ॥
आला हर्म्या सोडुनियां धांवत खालीं॥सौमित्रीच्या संनिध लोटांगण घाली॥

हर्म्या; राजवाड्याला.

श्रीरामाचा पूर्ण असे मी अपराधी ॥ कर्तव्यातें सोडुनि केली अपरा धी ॥
या दीनातें क्षम्य गणावें करुणेनें ॥ साधुप्रज्ञा घात नतांचा करुं नेणे ॥४९॥

अपरा धी केली; भलतीच बुद्धि धरली.

साऱ्या माझ्या मेळवुनी वानरजाता ॥ जातों सीताशोध कराया द्रुत आतां॥
ऐशा वाक्या बोलुनि तो लोळत पायीं ॥ तेणें आली पूर्ण दया त्या रघुरायीं॥

त्या रघुरायीं; लक्ष्मणाचे ठिकाणीं.

येथें सारे वानर पाचारुनि आणा ॥ ऐसी आज्ञा मंत्रिजनां दे कपिराणा ॥
द्वाही त्याची सर्व पुरीला श्रुत झाली ॥ तेथें सारी वानरसेना मग आली ॥

द्वाही; दवंडी.

मोठे मोठे वानर आले बहुवर्णी ॥ कोणी काळे शोणमुखी, पिंगट कोणी ॥
कोणी होते स्थूलतनू तों कृश कोणी ॥ कोणी चाले मंद पदें, धांवत कोणी॥
एका नाहीं पुच्छ, महालांगुल कोणी ॥कोणी सौम्य, क्रूर दिसे तों बहु कोणी
गोळा झाले वानर पद्में अठरा ते ॥ ज्यांच्या सारें विश्व पुरेना जठरांतें ॥
ऐसी जेव्हां सर्व मिळाली कपिसेना ॥ वायूतेंही मार्ग रिघाया गवसेना ॥
तेव्हां त्यांतें उच्च रवानें कपिराणा ॥ बोले सीताशोध करोनी द्रुत आणा॥
शैलाग्रांच्या गव्हर गर्भांतुनि शोधा ॥ मार्गायासां वा न गणा संकटबाधा॥
साऱ्या ग्रामां देश-पुरी-पत्तन-खंडां ॥ घोरारण्यां जाउनि सारे बहु धुंडा ॥
सीताशोधा जो न करोनी कपि येई॥माझ्या दंडा निश्चित तो पात्रचि होई ॥
सीतावार्ता मेळवुनी जो कपि आणी॥त्यातें प्राणाहूनि सदा मी प्रिय मानीं॥
लागा सारे सत्वर धार्नीतुनि जाया ॥ मी रामाच्या वंदुनि येतों तंव पाया॥
आज्ञा त्याची मानुनियां ती कपि सारे॥ झाले मार्गप्रस्थित सेनापरिवारें ॥
सुग्रीवातें घेउनियां लक्ष्मण संगें ॥ श्रीरामाच्या संनिध आला मग वेगें ॥
रामांघ्रीतें जाउनि कीशेश्वर लागे ॥ किष्किंधेचें वृत्त तया सर्वहि सांगे ५८
वार्ता त्याची ऐकुनि सीतापति धाला ॥ आनंदानें त्या कवटाळी प्लवगाला॥
बोले, मित्रा सोशिसि कष्टां मम कार्यी ॥ या लोभाचा होइन कैसा उतराई॥
सुग्रीवा प्रभु-नल-नील-जांबुवंतां ॥ आज्ञापी गमन करावया समस्तां ॥
तत्संगें निजगमनार्थही तयाची ॥ तों आज्ञा पवनकुमार नम्र याची ॥ ६० ॥

तत्संगें; सुग्रीव, नळ, नील वगैरे वानरांबरोबर. प्रहर्षिणी वृत्त.

सीतेच्या बहुपरि शोधना कराया ॥ आहे या मम उचितत्व भक्तराया ॥
हा चित्तीं करुनि विचार रामराणा ॥ आज्ञा दे विरहकराहि तत्प्रयाणा ॥

विरहकराहि तत्प्रयाणा; आपणाला विरहदुःख देणाऱ्या त्याच्या गमनास.

देवीचीं अविदित लक्षणें कपींला ॥ हें झालें स्मरण तया बुधोत्तमाला ॥
जिज्ञासा निज कपि तो तदर्थ सांगे ॥ एखादें परिचय-बोध-चिन्ह मागे ॥

सीतेच्या शोधाला वानर निघाले खरे; पण त्यांना तिचीं लक्षणें कांहींच ठाऊक नाहीत हें मारुतीच्या लक्षांत आलें व त्यान त्याविषयीं आपली जिज्ञासा रामास दाखवून तिला दाखविण्याकरितां एखादी खुणेची वस्तु मागितली.

कपिकेतुची समयसूचकता ॥ गमली प्रभूसि जणुं कल्प-लता ॥
समयज्ञ जो जन तदीय मति ॥ फलसिद्धि हस्तगत भासवि ती ॥ ६३ ॥

कपिकेतुची; वानरश्रेष्ठ मारुतीची. **समयज्ञ...ती**; जो सेवक समयज्ञ असतो त्याच्या बुद्धीवरून स्वामीला फलसिद्धि हातांत आल्यासारखी वाटते. अर्थांतरन्यास. प्रमिताक्षरा वृत्त.

सीतेचीं स्फुटतर लक्षणें कपींतें ॥ सांगाया रघु-कुल-दीप लक्ष्मणातें ॥
आज्ञापी, बुध मग तो कथी तयांतें ॥ ते सारे परिसाति सावधान चित्तें६४॥

जेथें श्री-रघुपति-नाम-गायनातें ॥ वृक्षार्थी करिति विहंग एक-चित्तें ॥
ज्या ठायीं परिमल फांकला दिशांनीं ॥ ती जाणा धरणिसुता-निवास-धानी

धरणिसुतानिवासधानी; सीतेच्या वसतीची जागा.

जेथींचे तरु, धरणीहि, तोय, वारे ॥ पाषाण प्रभु-शुभ-नाम चिंतिणारे ॥
ज्या ठायीं सतत भरोनि मोद वाहे ॥ त्या ठायीं जनकसुता मनीं धरा हें ॥
देवीच्या पद-तल-शोणित-प्रभेतें ॥ गुल्फांची धवल विभा मिळून जाते ॥
दोहींचा पुढति मिळून केंद्र होतो ॥ अंगुष्ठीं नव-शशि-खंड-भास येतो॥६७॥

सीतेच्या पायाच्या तळव्याच्या तांबड्या प्रभेशीं घोंट्यांची पांढरी प्रभा मिसळते. व ती मिश्र प्रभा आंगठ्यावर पडून तिच्या पायाचा अंगठा चंद्राच्या तुकड्याप्रमाणें दिसत असतो.

भृंगाली सरसिज-कोरक-भ्रमानें ॥ यत्पादावरि बसते कुतूहलानें ॥
तद्वर्णी मिळुनि विभा नखावलींची ॥ ये शोभा चरणयुगास रम्य साची ६८

भुंग्याची माळ जिच्या पायाला कमळाची कळी समजून त्याजवर बसते आणि त्या भुंग्यांच्या काळ्या रंगांत तिच्या नखांचा तांबडा रंग मिसळून तिच्या दोन्ही पायांना कांहीं विलक्षण शोभा आलेली असते. भ्रांतिमान् अलंकार.

या चिन्हां दृढ कपिहो मनीं धरावें ॥ देवीचें मजसि न शेष रूप ठावें ॥
पायाशीं परिचय वंदनांत झाला ॥ वर्णाया मजसि ह्मणोनि तोचि आला ॥

सांनिध्यें निकट-गतासि जी कळावी ॥ ती चिन्हीं तरि मग कायसी कथावी॥
कां ध्यावे विधु गगनांत दाखवाया ॥ संकेतें चतुर नरा प्रयास वायां ॥७०॥

जी नुसतें जवळ गेल्याबरोबर ओळखावी तिच्या खाणाखुणा कशाला सांगावयास पाहिजेत ? चतुर मनुष्याला आकाशांतील चंद्र दाखविण्यास खुणा सांगाव्या लागतात काय ?

भ्रात्याच्या विनय--विलास-मंडितानें ॥
श्रीरामा सुख बहु अर्पिलें वचानें ॥
अंगुष्ठांतुनि मग काढुनी स्वमुद्रा ॥
तो देई नृपतिललाम वानरेंद्रा ॥ ७१ ॥

विनयविलासमंडितानें; विनय ज्यांत पूर्ण दिसून आला अशा (वचानें).

लागा पथास, शुभ होत तुम्हांस भूतें ॥
वर्षोत मंगल तुम्हांवरि वस्तु-जातें ॥
बोलूनियां वच असें मग राम धन्वी ॥
पादस्थ-मारुति-शिरावरि हात ठेवी ॥ ७२ ॥

वसंततिलका वृत्त.

समय कपिंनीं जातां साऱ्या चिरागत साधुनी ॥
अवनत शिरीं वारंवार क्रमें अभिवादुनी ॥
परमविमलां विश्वादर्शां जडोद्धृति-पंडितां ॥
रघुपति-पदांभोजां केलें विघट्टन-मंडितां ॥ ७३ ॥

त्या सर्व वानरांनीं फार दिवसांनीं मिळालेली संधि साधून रामाच्या पायांवर अनुक्रमानें आपलीं मस्तकें ठेविलीं व त्या वारंवार केलेल्या नमस्कारांच्या योगानें त्या अत्यंत निर्मल, जगाच्या आरशासारख्या व जडांचा उद्धार करण्यांत निपुण अशा राघवाच्या चरणकमलांना घट्टे पाडले. हरिणी वृत्त.

सर्ग १७ वा

दाही दिशांस रिघतां कपिसंघ सारा ॥
झाला प्रयाण-पर राघवही पुढारां ॥
कंठावयास रजनी, सुगुणीं अपूर्वा ॥
तो पातला स्रवण-नाम नगा प्रपूर्वा ॥ १ ॥

सुगुणीं अपूर्वा; उत्तम गुणांत पहिल्या प्रतीचा अशा (चांगली हवा, चांगलें पाणी सुरेख सृष्टिसौंदर्य वगैरे). **प्रपूर्वा स्रवणनाम नगा**; प्र आहे पूर्वी ज्याच्या अशा स्रवण नामक पर्वताला, प्रस्रवण पर्वताला. वसंततिलका वृत्त.

तेथें क्रमी प्रभु सहानुज यामिनीतें ॥
चित्तीं स्मरे विकल होउनि कामिनीतें ॥
होतां दिनोदय निघे पुढतीं प्रयाणा ॥
दे सौख्य काय अथवा विरहाकुलांना ॥ २ ॥

प्रस्रवण पर्वत जरी सुगुणांनीं अपूर्व होता तरी राम तेथें एकच रात्र राहून पुढें निघाला. यावरून विरहार्त मनुष्याला सुख देणारें असें काय आहे असा, अर्थांतरन्यास.

धाडोनियां प्रथमपासुनि दक्ष दूतां ॥
सुग्रीव वृत्त पुढचें कळवीत होता ॥
आशा पथांत बहु लावुनि तें मनाला ॥
होतें करीत गमन-क्षम राघवाला ॥ ३ ॥

गमनक्षम; चालण्याला समर्थ.

तत्सूचिता अनुसरोनि कपि-प्रयाणा ॥
प्रस्थान दक्षिण दिशे करि रामराणा ॥
अत्यंत मंद चरणें निज मार्ग सेवी ॥
मागें निजाश्रु-जल-सीकर-पंक्ति ठेवी ॥ ४ ॥

तत्सूचिता कपिप्रयाणा अनुसरोनि; सुग्रीवाच्या दूताकडून वानर अमुक दिशेनें गेले असें कळत होतें त्यास अनुसरून. **अत्यंत ... ... ठेवी**; तो जड पावलांनीं पुढें चालला होता आणि मागें दुःखाश्रूंच्या बिंदूंची ओळ ठेवीत होता.

मार्गीं तयांस कलहंस-कुलारवांनीं ॥
अंभोज-रेणु-धवलीकृत दिङ्-मुखांनीं ॥
अत्यंत मिष्ट सलिलेंहि तसाच साचा ॥
केला श्रुत प्रभव तो शरदागमाचा ॥ ५ ॥

कलहंसकुलारवांनीं; हंसपंक्तींच्या कूजितांनीं. **अंभोजरेणुधवलीकृत दिङ्-मुखांनीं**; कमळाच्या परागांनीं शुभ्र झालेल्या दिशांच्या तोंडांनीं. **शरदागमाचा प्रभव**; शरदृतूची सुरवात.

भेदोनियां कवच नील पयोधरांचें ॥
नीहारजाल करुनी शतधा तयाचें ॥
त्यांना करोनि परिपांडुर विक्रमानें ॥
आक्रामिलें नभ सलील शरन्नृपानें ॥ ६ ॥

पयोधरांचें नील कवच भेदोनि; मेघांचें निळें आवरण फोडून, **तयाचें शतधा नीहारजाल करुनी**; त्या आवरणास धुक्याच्या रूपानें शतधा छिन्नभिन्न करून.

नीहार जें पसरलें बहु अंतरालीं ॥
तें अश्रुबाष्प जणुं निर्जित मेघ गाळी ॥
कीं शारदीय ऋतुचा गगनांत भोजें ॥
नीहार-रूप विजय-ध्वज तो विराजे ॥ ७ ॥

आकाशांत जें धुकें पसरलें होतें त्या धुक्याच्या मिषानें जणूं काय शरदृतूनें जिंकून टाकलेले मेघ अश्रू ढाळीत होते; किंवा धुक्याच्या रूपानें ती शरदृतूची विजयपताकाच आकाशांत फडफडत होती. **भोजें**; ऐटीनें. उत्प्रेक्षा.

साम्राज्य-वैभव समस्त पयोधराचें ॥
येतांच सांप्रत शरन्नृपतीस साचें ॥
तो म्लान होउनि बसे मग चक्रवालीं ॥
दावी मुखा परिभवांत न मानशाली ॥ ८ ॥

दावी......मानशाली; मानी पुरुष पराभव पावल्यावर आपलें तोंड दाखवीत नाहीं. अर्थांतरन्यास.

केलें जिनें अमित तांडव अंतरालीं ॥
ती चंचला-युवति तेथुनि नष्ट झाली ॥
येती श्रुतीवरि न वा घनगर्जितें तीं ॥
जाती लयास गण नायक-देह-पातीं ॥ ९ ॥

चंचलायुवति; वीजरूपी स्त्री. **जाती......देहपातीं**; पुढाऱ्याचा देह पडला असतां त्याचे अनुयायी नाश पावतात. अर्थांतरन्यास.

झाले उडु-ग्रह परिस्फुट ते निराळीं ॥
आतां न अंधतम तें गगना विटाळी ॥
तारापथीं गमन कृष्ण पयोद टाळी ॥
कैसी छटा सदुदयांत टिकेल काळी ॥ १० ॥

उडुग्रह; नक्षत्रें व ग्रह. **तारापथीं**; आकाशांत. **कृष्ण पयोद**; काळा ढग. **कैसी......काळी**; सज्जनांचा (शरदृतूसारख्यांचा) उदय झाल्यावर काळा वर्ण शिल्लक कसा राहील? अर्थांतरन्यास.

स्वच्छें जलें, धवल सारस, शुभ्र तारा ॥
अत्यंत निर्मल पदार्थसमूह सारा ॥
अंभोज-रेणु-कण-धूसर येत वारा ॥
जात्याच कीं धवलिमा गुण हा उदारां ॥ ११ ॥

अंभोजरेणुकणधूसर; कमलपरागांच्या कणांमुळें पांढुरका. अर्थांतरन्यास.

होतां विनाश गगनांत पयोधरांचा ॥
झाला क्षितीवरि तसाच तदाश्रितांचा ॥
झाले नदी-नद कृशांग, तडाग-कूपीं ॥
अल्पत्व ये, अवनता पडल्याहि वापी ॥ १२ ॥

अवनता पडल्या; खोल पडल्या.

जे भासती लघु लतांसम दूर-वासें ॥
चोहींकडे पसरले वन-वृक्ष ऐसे ॥
घेतात सुस्वर तयांत विहंग ताना ॥
त्या मानसीं उठवितात तरंग नाना ॥ १३ ॥

पांथां पथीं हरित-सस्य-वती धरित्री ॥
झाली तयां नयनगोचर धान्य-धात्री ॥
नेत्राभिराम हिरवी बहु थोर साची ॥
आरामभू गमत ती शरदिंदिरेची ॥ १४ ॥

हरितसस्यवती; हिरव्या पिकांनीं संपन्न. **आरामभू**; उपवनाची जागा. **शरदिंदिरेची**; शरदृतुरूपी लक्ष्मीची.

वर्षाऋतूंत जल सांचुनि जागजागीं ॥
झाले तडाग चिर जे भजिजे विहंगीं ॥
तें चालतां रघुकुलोत्तम-लोचनांतें ॥
शोभायमान गमले बहु-वर्ण-जातें ॥ १५ ॥

बहुवर्णजातें; नाना प्रकारच्या चित्रविचित्र रंगांनीं.

शेतें पिकास दिसती बहुसाल आलीं ॥
त्यांचीं समृद्ध कणसें घनदाट झालीं ॥
जोपासुनी कण-महा-निधि आपुलाले ॥
चित्तीं कृषीवल किती तरि धन्य झाले ॥ १६ ॥

कणमहानिधि; धान्याचें मोठें निधान.

माळ्यावरी करुनि आसन चारकोनी ॥
गाती कृषीवल-सुता अति गोड गाणीं ॥
सोडूनि धान्य-कण-भक्षण-मोह रानीं ॥
त्यांशींच लोभ धरिला मग पांखरांनीं ॥ १७ ॥

सोडूनि......पांखरांनीं; धान्य खाण्याच्या इच्छेनें आलेल्या पांखरांना धान्य खाण्याचा विसर पडून तीं गाणें ऐकण्यांत गुंग झालीं.

शालि प्ररूढ दिसतो कण-भार-शाली ॥
त्याच्यासवें कमलिनी सलिलीं उदेली ॥

तो वांकला, न परि तत्परिरंभणाला ॥
झालाचि पात्र, मग पांडु बनोनि ठेला ॥ १८ ॥

भाताचें धाट कणसानें युक्त असें एका जलाशयांत होतें. त्याच्याच शेजारीं एक कमलिनी होती. तो तिचें आलिंगन मिळावें म्हणून वांकला पण ती तें देत नाहीं असें पाहतांच पिंवळा पडला (फिका पडला.).

सूर्योदयीं हरिखल्या कुरणांत जातां ॥
वत्सां स्मरोनि परि हंबरतात आतां ॥
ज्यांचा समस्त दिन तो चरण्यांत जाई ॥
सर्वत्र त्या परतल्या निलयांसि गाई ॥ १९ ॥
त्या पीन-पूरित-पयोधर-कैतवानें ॥
नेती उपायन सुतांस्तव तांतडीनें ॥
सोडूनि यूथ बहु धांवति लागवेगें ॥
वात्सल्य बुद्धि-रहितांतहि पूर्ण वागे ॥ २० ॥

पीनपूरितपयोधरकैतवानें; दुधानें तटतटलेल्या थानांच्या मिषानें. **नेती उपायन सुतांस्तव**; आपल्या वत्सांकरितां जणूं कांहीं खाऊ घेऊन जाताहेत. **वात्सल्य... वागे**; बुद्धिहीन प्राण्यांतसुद्धां वात्सल्य पूर्ण असतें. अर्थांतरन्यास.

ही शारदीय सुषमा दिसली जनाला ॥
झाली तदर्ध-गुण-गोचर लक्ष्मणाला ॥
त्यांतील एकहि न राघव रूप पाही ॥
शून्यांत दृष्टि परिबद्ध तदीय होई ॥ २१ ॥

तदधगुणगोचर; त्याच्या निम्यानें दृश्य.

त्या पाहुनी व्यथित-चित्त निजाग्रजाला ॥
सौमित्रि यापरि वदे रमणीय बोलां ॥
ताता ! त्यजा त्वरित शोक समस्त आतां ॥
येईल कीशपति मेळवुनी सुवार्ता ॥ २२ ॥
सर्वत्र ही दिसत शारद-रम्य-शोभा ॥
द्या पाहुनी स्वहृदया क्षण शांतिलाभा ॥
आलें स्वरूप जणुं नूतन वस्तु-जाता ॥
झाली मही हरित-वर्ण-मयी समस्ता ॥ २३ ॥

ही रेखुनी तिलक रम्य विशाल भालीं ॥
खोवोनि सुंदर तुरे निज कर्णमूलीं ॥
जाणोनि दुःख तुमचें जणुं शालिगोपी ॥
तुह्मांवरी सहृदयार्द्र-कटाक्ष ओपी ॥ २४ ॥

शालिगोपी; भाताचें पीक राखणारी शेतकऱ्याची मुलगी. **सहृदयार्द्र कटाक्ष;** सहानुभूतीनें भरलेले दृष्टिपात.

गोष्ठांस या परततां बहुसाल गाई ॥
आतां स्ववत्स-गण-विस्मृति यांस होई ॥
मार्गांत राहति उभ्या बघुनी तुह्मांतें ॥
स्नेहें पहा स्त्रवितात पयोधरांतें ॥ २५ ॥

हा एकटा वृषभ मित्र कृषीवलाचा ॥
तुम्हांस पाहुनि पथीं स्थिर होत साचा ॥
युष्मद्-विशाल-कर-लालन-कामनेनें ॥
ग्रीवा पुढें लववितो बहु कौतुकानें ॥ २६ ॥

युष्मद्विशालकरलालनकामनेनें; तुमच्या आजानु हाताकडून खाजवून व कुरवाळून घेण्याच्या इच्छेनें.

झाल्या विपंक विपिनांतिल सर्व वाटा ॥
बंधूक हा स्फुट करी नव थाटमाटा ॥
चोहींकडे उमललीं कमलें, परागां ॥
देतात काश, न धरा प्रभुजी विरागा ॥ २७ ॥

विपंक; चिखलरहित. **बंधूक;** असाण्याचा वृक्ष. **काश;** एक प्रकारचें गवत. (लव्हाळा.)

ज्यांचा समस्त गळला शरदीं पिसारा ॥
अंभोद-मित्र न धरी गगनांत थारा ॥
ज्यां राहिला न अनुकूल पदार्थ लोकीं ॥
ते हे मुखें लपविती विपिनांत केकी ॥ २८ ॥

मेघोपरोध लवमात्र नसे दिशांतें ॥
दावोनि हंस-कल-कूजित-कैतवातें ॥

पाहोनि सांप्रत तुम्हांस वनांत कष्टी ॥
या सांत्वनार्थ तुमच्या करितात गोष्टी ॥ २९ ॥

मेघोपरोध; मेघांचा उपसर्ग. **हंसकलकूजितकैतवातें**; हंसाच्या अस्पष्ट आलापांच्या मिषानें. **दावोनि..... गोष्टी**; तुह्मी कष्टी आहांत हें पाहून तुमच्या सांत्वनाकरितां दिशा या हंसांच्या आलापांच्या मिषानें जणूं काय गोष्टीच सांगत आहेत.

ज्यांच्या समस्त हिरव्या तनु, लाल चोंची ॥
काळी गळां मिरवते छवि मंडलांची ॥
अर्धेंदु-तुल्य वलयांतुनि गाहतांना ॥
ते पावती शुक नभीं नव-हार-भाना ॥ ३० ॥

अर्धेंदुतुल्य......नवहारभाना; अर्धचंद्राकार वलय करून ते पोपट आकाशांतून उडत असतां एखाद्या हाराप्रमाणें शोभताहेत.

वर्षाऋतूंत अनिरुद्ध फिरावयाला ॥
ज्यांना कधीं न अवकाश मुळीं मिळाला ॥
बाहेर ते अलि चहूंकडुनी निघाले ॥
सर्वत्र-गंधित-पराग-विमूढ झाले ॥ ३१ ॥

सर्वत्रगंधितपरागविमूढ; चोहोंकडच्या सुगंधयुक्त पुष्पपरागांनीं भ्रांत झाले.

ज्योत्स्ना नभासि, नलिनी भ्रमरासि, तारा ॥
चंद्रासि, कुंदकलिका मिळती समीरा ॥
सूर्यास दिग्युवति या धृत-हंस-माला ॥
सारीं प्रवृत्त दिसती शरदुत्सवाला ॥ ३२ ॥

धृतहंसमाला दिग्युवति; हंसाच्या पंक्तिरूपी माळा आहेत ज्यांच्या गळ्यांत अशा दिशारूपी स्त्रिया. सम अलंकार.

सर्वत्र यापरि वधू-वर-योग आला ॥
कां जानकी मग मिळेल न आपणाला ॥
हे राजराज ! निज शांतवुनी मनाला ॥
उत्साहशब्द मजशीं तरि एक बोला ॥ ३३ ॥
या हर्ष पावुनि सहोदर-भाषणानें ॥
त्या पाहिलें स-कुतुक-स्मित राघवानें ॥

प्रेमें तया जवळि घेउनि बालकाला ॥
मार्ग-क्रमीं प्रभु पुनश्च सुदक्ष झाला ॥ ३४ ॥

सकुतुकस्मित; कौतुकपूर्ण हास्य करून.

ते कंठितां स्वपथ माल्यवदद्रि-शृंगीं ॥
आले निवास करण्या रजनि-प्रसंगीं ॥
होवोनि आकुल तदा गमन-श्रमांहीं ॥
तेथेंचि वास करि राघव काल कांहीं ॥ ३५ ॥

माल्यवदद्रिशृंगीं; माल्यवान् पर्वताच्या शिखरावर.

झाले बरेच दिन येउनि त्या गिरीला ॥
घेऊनि वृत्त न तु वानर एक आला ॥
झाला प्रभु व्यथित यास्तव अंतरंगीं ॥
क्षुद्रार्थही विरहि-मानस-शांति भंगी ॥ ३६ ॥

क्षुद्रार्थही......भंगी; क्षुद्र गोष्टही विरहाकुल मनुष्याच्या मनाची शांति नाहींशी करते. अर्थांतरन्यास.

गेला निघोनि दिन एक, दुजाहि गेला ॥
जावोनियां दिन तिजा, चवथा निघाला ॥
ऐशापरी दिन न केवळ, पक्ष गेले ॥
नाहीं नगावरि तरी कपिवृत्त आलें ॥ ३७ ॥

प्रत्येक जो दिन अशापरि तेथ गेला ॥
शोषूनियां विकल तो करि राघवाला ॥
सायंतनी पसरतां सुषमा दिगंतीं ॥
एके दिनीं रघुपती बसला नगांतीं ॥ ३८ ॥

सायंतनी सुषमा; संध्याकाळची शोभा.

एकीकडे रघुपति क्षिति-सूर्य आहे ॥
येरीकडे गगन-सूर्य विराजताहे ॥
त्यांतील एक गतकांति कधींच झाला ॥
ये तीच सांप्रत गती निकटीं दुजाला ॥ ३९ ॥

येरीकडे; दुसरीकडे. **क्षितिसूर्य**; पृथ्वीवरचा सूर्य राम (आकाशांतील सूर्याविरुद्ध) **त्यांतील एक**; राम.

त्या देखुनी निज-कुलोज्वल-वंश-दीपा ॥
दुःखार्त भानु चढला बहुसाल कोपा ॥
पाहोनि निर्बल करांविण आपणाला ॥
होवोनि लज्जित जवें गिरिआड झाला ॥ ४० ॥
तो जाहला चिर अतीत न लोचनांतें ॥
तों इंदु-बिंब उदयाप्रति होय येतें ॥
बिंबार्ध-रूप-रमणीय-नवोदयाची ॥
प्राचीवरी पसरली सुषमा तयाची ॥ ४१ ॥

बिंबार्धरूपरमणीयनवोदयाची; अर्धबिंबामुळें सुंदर दिसतो आहे उदय ज्याच अशा (तयाची).

तें पूर्व-दिग्-ललित-भूषण इंदुरूपी ॥
कीं जाहली स्फुट सुधारस-दिव्य-वापी ॥
कीं तें निधान रमणीय शरद्रमेचें ॥
तें वत्स काय चुकलें रवि-नंदिनीचें ॥ ४२ ॥

पूर्वदिग्ललितभूषण; पूर्वदिशेचा उत्कृष्ट अलंकार. **शरद्रमेचें निधान**; शरदृतु-रूपी लक्ष्मीचा ठेवा. **तें...रविनंदिनीचें**; कीं तें सूर्यरूपी गाईचें वांसरूंच वाट चुकलें आहे. चंद्रमंडळावर उत्प्रेक्षा.

कीं ठेविला मणिच तो निज मस्तकींचा ॥
शेषें पयोनिधि-तटावरि दिव्य साचा ॥
स्वच्छंद कीं क्षितिवरी करण्यास केली ॥
तो दीप पार्वण-वधू धरुनी निघाली ॥ ४३ ॥

पार्वण वधू; पौर्णिमारूपी स्त्री.

उत्साह जो धरुनियां बहुसाल चित्तीं ॥
पूर्वेकडे उदय पावत रम्य मूर्ति ॥
तो पाहुनी परि नगस्थ रघूत्तमातें ॥
लज्जाऽरुणाऽनन घडे जणुं वीर्यघातें ॥ ४४ ॥

लज्जारुणानन; लाजेनें आरक्त झालें आहे मुख ज्याचें असा. **तो...वीर्यघातें**; पण त्या चंद्रानें जेव्हां पर्वतावर बसलेला (आपल्याहून सुंदर) असा राम पाहिला तेव्हां त्याची उमेद खचून तो लज्जेनें आरक्त झाला. व्यतिरेक अलंकार.

त्या संभ्रमा अनुभवी निमिषार्ध मानी ॥
स्पर्धा प्रभूसह मनीं मग फार मानी ॥
सोडूनि तो गिरितटा, मग पूर्णबिंबा ॥
झाला धरोनि करिता गगनावलंबा ॥ ४५ ॥

मानी; चंद्र हा मानी असल्यामुळें तो एक क्षणार्धच घोंटाळला. मग तो गिरितटा सोडूनि, पूर्णबिंबा धरोनि गगनावलंबा करिता झाला, असा अन्वय.

आनंद-वर्षि रघुनाथ-कृपा-कटाक्षां ॥
तो जिंकण्या करि सुधा-किरणावमोक्षा ॥
ती जाहली सुखद कैरविणींस वृष्टि ॥
लाधे शिव प्रभु-कलींतहि तुच्छ-सृष्टि ॥ ४६ ॥

आनंदवर्षि; आनंदाची वृष्टि करणारे. **कैरविणी**; कमलिनी. **शिव**; कल्याण. रामाच्या आनंददायक कृपाकटाक्षांना जिंकण्याकरितां चंद्रानें आपल्या अमृतानें भरलेल्या किरणांचा वर्षाव सुरू केला. पण त्यानें कमलिनींना सुख झालें; कारण थोर महात्म्यांच्या भांडणांत सुद्धां गोरगरिबांचें कल्याण होतें. (मग मित्रत्वांत कां न होईल?) अर्थांतरन्यास.

तो पावतां समुदया उडु-चक्रवर्ती ॥
धाली धरा, विकसलीं कुमुदें वनांतीं ॥
पावे चकोर बहु हर्ष, सुधार्द्र-शीला ॥
चंद्राकृति प्रिय न वा कवणा निशीला ॥ ४७ ॥

समुदया पावतां; उदय पावला असतां. **उडुचक्रवर्ती**; नक्षत्रांचा सार्वभौम (चंद्र.) **सुधार्द्रशीला**; अमृतानें ओथंबलेली. (चंद्राकृति.)

संपूर्ण मंडल मनोहर जें उदेलें ॥
त्या अंक-दूषणहि भूषवितेंच झालें ॥
निर्दोष तें जरि जगा बहुमान्य होतें ॥
दोषासमीपाचि गुणासि गुरुत्व येतें ॥ ४८ ॥

निर्दोष...येतें; निर्दोष वस्तु जगाला फार रुचते हें खरें आहे, पण शेजारीं एखादा दोष असल्याशिवाय गुण चांगले उठून दिसत नाहींत.

जी इंदुची पसरली द्युति पूर्वभागीं ॥
ती बिंबलीच मुकुरापरि पश्चिमांगीं ॥

शेजारधर्म धरिती चिर ज्या तयांसी ॥
त्यां ती मिळे सहज उत्तर-दक्षिणांसी ॥ ४९ ॥

जी चंद्राची प्रभा पूर्वेकडे पसरली होती ती आरशाप्रमाणें असणाऱ्या समोरच्या पश्चिम दिशेंत उमटली. मग त्यांच्या फार दिवसांच्या शेजारणी ज्या दक्षिण व उत्तर दिशा त्यांना ती सहजच मिळाली.

सोडूनियां उदय-पर्वत-केलि-मोहा ॥
झाला प्रवृत्त विधु तो गगनावरोहा ॥
तेंही पुरे न मग मध्य-तलासि आला ॥
सीमा नसे मनुज-गौरव-कामनेला ॥ ५० ॥

उदयपर्वतकेलिमोहा; उदयाचलावर क्रीडा करण्याचा मोह. अर्थांतरन्यास.

तेथूनियां बहु करामृत-वर्षणाला ॥
आरंभिता क्षितितलावरि इंदु झाला ॥
वाहे अखंडित तदीय सुधारसाचा ॥
व्योमांतुनी क्षितितलावरि ओघ साचा ॥५१॥

दूराटनें श्रमुनि जो चिरकाल आला ॥
व्योमालयीं, रतिसुखार्थ मनीं भुकेला ॥
त्या पाहुनी प्रियकरा निकटीं शशीला ॥
तारा-वधू करिति मन्मथ-जन्य-लीला ॥ ५२ ॥

दूराटनें; दुरून केलेल्या प्रवासानें. **व्योमालयीं**; आकाशरूपी घरांत. **मन्मथ-जन्य लीला**; मदनविकारदर्शक हावभाव.

कोणी स्फुरत्तनु-मनोहर-विभ्रमांनीं ॥
मोही तयास तरुणी निज तांडवांनीं ॥
कोणी प्रसन्न-मुख-दर्शित-मंद-हासा ॥
मोहावया प्रियकरा करि यत्न योषा ॥ ५३ ॥

स्फुरत्तनुमनोहरविभ्रमांनीं; स्फुरण पावणाऱ्या देहामुळें सुंदर दिसताहेत हाव-भाव ज्यांतील अशा (तांडवांनीं). **प्रसन्नमुखदर्शितमंदहासा**; प्रसन्न मुखावर दाखविलें आहे मंदस्मित जिनें अशी (योषा).

पाहोनियां प्रिय-कृता अवधीरणेला ॥
एका वधूस अनिवारचि कोप आला ॥

कोपारुणा त्वरित मत्सरजन्य भावें ॥
ती मूर्च्छिता क्षिति-निपात करी स्वभावें ॥ ५४ ॥

प्रियकृता अवधीरणेला; प्रियकर जो चंद्र त्यानें केलेल्या निर्भर्त्सनेला. **कोपारुणा......स्वभावें**; ती मत्सरजन्य कोपानें लाल होऊन पृथ्वीवर मूर्च्छित होऊन पडली. (उल्कापातावर उत्प्रेक्षा.)

सर्वांहुनी प्रिय असे बहु मी प्रियातें ॥
हें मानिते कृशतनू जंव एक तेथें ॥
तों तीच तत्सहज-वीक्षण-पात्र झाली ॥
लाजूनियां जवनिकेंत निघून गेली ॥ ५५ ॥

तों...झाली; तोंच चंद्रानें सहज तिजकडे पाहिलें. **जवनिकेंत**; पडद्यांत. एखादी चांदणी कांहीं वेळ चमकून एकदम दिसेनाशी होते, त्यावर उत्प्रेक्षा.

एकीस देत परिरंभ, दुजीस चुंबी, ॥
पाहे तिजीस कुतुकें, गमना विलंबी ॥
तो नायिका-वलय-वेष्टित-देह तेथें ॥
ऐसा करी प्रकट नायक-चेष्टितांतें ॥ ५६ ॥

गमना विलंबी; रेंगाळत चालणारा. **नायिकावलयवेष्टितदेह**; स्त्रियांनीं ज्याचा देह वेढला आहे, असा.

अत्यंत उज्वल नृपापरि रूपशाली ॥
स्नेहार्द्र शीत सुखदायक अंतरालीं ॥
ऐसा विहार करितां करितां स्वभावें ॥
तो मस्तकावरि मग प्रभुच्या स्थिरावे ॥ ५७ ॥

तीं चेष्टितें सहजही रजनीकराचीं ॥
रामासि बुद्धिकृतशीं गमलींच साचीं ॥
व्योमीं प्रभू कुपित-नेत्र-कटाक्ष टाकी ॥
त्याचीं सुधांशु-पटलें विधु दृष्टि झांकी ॥ ५८ ॥

राका असोनि भुवन-त्रय-सौख्य-दात्री ॥
ती वाटली रघुपतीस कराल रात्री ॥
पूर्णेंदुला प्रभु गणी ज्वलदग्निमात्रा ॥
शीतोपचार सुख देत न कामिगात्रा ॥ ५९ ॥

राका; पौर्णिमा. **ज्वलदग्निमात्रा**; पेटलेल्या अग्नीप्रमाणें (दाह करणारा)

कांता-स्मृति प्रबल होउनि अंतरंगीं ॥
देई तयास परिताप तया प्रसंगीं ॥
बाह्यांग दाह बहु चालवितां शशीनें ॥
वाहे तदा सुरभिवातहि कौतुकानें ॥ ६० ॥
वार्ता कळे युवतिची न, म्हणूनि झाला ॥
आधींच खिन्न बहु जो प्रभु यामिनीला ॥
त्या तेथ पूर्ण-शरदिंदु करावपातें ॥
झाला असह्य परिताप नरोत्तमातें ॥ ६१ ॥

पूर्णशरदिंदुकर वपातें; पूर्ण अशा शरदृतूंतल्या चंद्राच्या किरणांच्या वृष्टीनें.

झालें मन व्यथित, कंप सुटे तनूला ॥
शीर्षे भ्रमे, क्षण युगा विटला जिवाला ॥
तों एकदांचि रव दक्षिण-दिक्-पथानें ॥
आला प्रभु-श्रुतिवरी पवन-क्रमानें ॥ ६२ ॥

वातोर्मि-वाहित-पदावलि-भास आधीं ॥
अस्पष्ट-शब्द-रचना मग येत साधीं ॥
चोहींकडे गजर नंतर, लक्षणांनीं ॥
या, वानरागमन ओळखिलें प्रभूंनीं ॥ ६३ ॥

वातोर्मिवाहितपदावलिभास; वाऱ्याच्या झुळुकीबरोबर आलेला शब्दांचा भास. प्रथम शब्दांचा भास झाला, नंतर अस्पष्ट शब्द ऐकूं येऊं लागले, आणि नंतर तर चोहोंकडे एकच कल्ला झाला त्यावरून सीताशुद्धीस गेलेले वानर परत आले हें रामास कळलें.

आतां कळेल मजला दयिता-सुवार्ता ॥
देई असा रघुपती बहु धीर चित्ता ॥
जी लागणार घटि वानर यावयाला ॥
ती सोसवे न, हृदयाब्धिस पूर आला ॥ ६४ ॥
झालें अधीर मन, काय असेल वार्ता ॥
ही लागली रघुपतीप्रति थोर चिंता ॥
आशांकुर प्रबल जो हृदयीं उदेला ॥
तो पाहतो हृदय-भेद करावयाला ॥ ६५ ॥
तों गर्जना करित राघव-नाम-शब्दें ॥
आलीं चहूंकडुनि सन्निध कीश-वृंदें ॥

सुग्रीव, नील, नल, ऋक्षपतीहि आला ॥
त्यां पाहुनी कुशल, राम मनांत धाला ॥ ६६ ॥
या मित्रहो ! मजसमीप वदोनि वाणी ॥
त्यां भेटण्यास्तव उठे मग चापपाणि ॥
तों धांवुनी प्लवग ते प्रभु-पाद-पद्मीं ॥
साष्टांग ठेविति शिरें सुख-सार-सद्मीं ॥ ६७ ॥

सुखसारसद्मीं; सुखाचें जें अस्सल सत्व त्याचें निधान अशा (प्रभुपादपद्मीं.)

सारे परंतु जड, शब्द वदे न कोणी ॥
हें पाहुनी परम विस्मय राम मानी ॥
आतां तयास लव धीर मनीं निघेना ॥
वार्ता-विपर्यय-भयेंहि विचारवेना ॥ ६८ ॥

वार्ताविपर्ययभयें; विपरीत वार्तेच्या भीतीनें. वानर तर कांहींच बोलेनात, तेव्हां रामाला मनांतून काय ती वार्ता समजण्याची अत्यंत उत्कंठा लागली, पण न जाणों कांहीं तरी विपरीत बातमी हे आपणास सांगणार नाहींतना अशा भीतीनें त्यांना प्रश्न विचारण्याची त्याला छाती होईना.

हर्षातिरेक-भव मौन असे कपींचें ॥
कंठोपरोध-शुभ-दर्शक-चिन्ह साचें ॥
कीं स्तब्धता अपयशः-स्फुट-लक्षणा ती ॥
या चिंतनीं निमिष दुःसह अल्प जाती ॥ ६९ ॥

हर्षातिरेकभव; अत्यंत आनंदापासून उत्पन्न झालेलें. **कंठोपरोधशुभदर्शक; चिन्ह**; कंठ भरून आले आहेत असें दाखविणारें चिन्ह. **अपयशःस्फुटलक्षणा**; अपेश हेंच आहे उघड लक्षण जीचें अशी (स्तब्धता). वानर जे बोलेनात ते काय सीतेची शुभवार्ता घेऊन आल्यामुळें होणाऱ्या आनंदानें कंठ भरून आले आहेत ह्मणून, कीं अपेश घेऊन आले आहेत ह्मणून, असा क्षणभर राम विचार करीत होता.

म्लानें मुखें, सतत मौन कपीश्वरांचें, ॥
निश्वास ते जड मधूनहि तद्गणांचे ॥
त्यांचें निजाश्रु-परिमार्जन, या प्रकारीं ॥
वृत्तांत तो समजला स्वमनोविदारी ॥ ७० ॥

तद्गणांचे; त्यांच्या अनुचरांचे. **स्वमनोविदारी वृत्तांत**; (सीतेची वार्ता लागली नाहीं) हा आपल्या हृदयाचें विदारण करणारा मजकूर.

रघुपति वदे कांहो सारे असे जड राहतां ॥
मजसि सगळे ऐसे शून्येक्षणें अवलोकितां ॥
त्वरित कळवा सीतावार्ता विलंब न लावुनी ॥
वचन वदतां ऐसें आलें जल प्रभुलोचनीं ॥ ७१ ॥

हरिणी वृत्त.

मजसि अथवा झालें वृत्त श्रुत, श्रम कां करां ॥
यश न तुमच्या यत्नां आलें न दोष तुम्हां जरा ॥
खडतर असे माझें दैव, क्षणक्षण ताडितें ॥
त्वरित हरुनी सौख्या, दुःखार्णवीं मज पाडितें ॥ ७२ ॥
माझ्या राज्याभिषेकास्तव मम गुरुनीं आणिला योग जेव्हां ॥
माझें प्रारब्ध राज्ञी-वर-मिष करुनी आडवें येत तेव्हां ॥
ताताज्ञा-पालनार्थ त्वरित मग वनीं पातलों तों अदृष्टीं ॥
आलें तेथेंहि दुःख, प्रिय भरत-सखा जाहला फार कष्टी ॥ ७३ ॥

गुरुनीं; वडिलांनीं. राज्ञीवरमिष; कैकेयीस दिलेल्या वरांचें निमित्त. स्रग्धरा वृत्त.

केलें तन्मानसाच्या मधुर वच-शतें बोलुनी सांत्वना मी ॥
आतां माझीच भार्या हरुनि विधि मला लोटितो दुःखधामीं ॥
दुःखाचा सर्वदा यापरि मज विधिनें ठेविला एक वांटा ॥
अर्पाया भार वाटे खचित अवनिला जन्मलों मी करंटा ॥ ७४ ॥
हाहा ! सीते ! व्यसन मज हें पातलें हाय सीते ॥
एकाएकीं तुजसि कुदशा पातली कायसी ते ॥
आतां मातें क्षण न धरवे धीर ये भेट देई ॥
कांते तूझ्या मजसि विरहीं नातरी अंत होई ॥ ७५ ॥

मंदाक्रांता वृत्त.

आतां अंत प्रियसखि ! किती पाहसी या जडाचा ॥
पाषाणाचा मम बनविला देह वा लांकडाचा ॥
धांवे आतां त्वरित सखये येइ हे चारुगात्रि ॥
चंद्र-ज्योत्स्ना तुजविण मला जाहली काल-रात्री ॥ ७६ ॥
प्रियसखि लवलाहें धांव आलिंगना दे ॥
वदुनि मधुर वाणी तोषवी मंजु नादें ॥
तुजविण मज झाला शून्य संसार सारा ॥
क्षितिवरि मज आतां राहिला काय थारा ॥ ७७ ॥

मालिनी वृत्त.

विधु मज बहु देतो ताप हे सन्नतांगि ॥
पवन शत निघातां हाणितो मर्मभागीं ॥
त्रिभुवन वनसें हें जाहलें शून्य मातें ॥
त्वरित वदन दावीं जीववी यासि कांते ॥ ७८ ॥

न वा हा आक्रोश श्रुतिवरि तुझ्या येत सगळा ॥
तुझ्या माझ्यामध्यें विरहजलधी कीं पसरला ॥
तुला शोधूं कोठें शरण वद जाऊं तरि कुणा ॥
सखे ! कोण्या यत्नें विरहभर हा होइल उणा ॥ ७९ ॥

शिखरिणी वृत्त.

अहा सीते ! मातें तुजविण जिणें हें न बरवें ॥
भरे कंठ प्राणेश्वरि ! नच पुढें शोक करवे ॥
सखे ! केव्हां केव्हां स्मृति-निमिष अर्पी मजकडे ॥
प्रभू एकाएकीं वदुनि वच हें मूर्च्छित पडे ॥ ८० ॥

स्मृतिनिमिष; आठवणीचा एक क्षण. तूं असशील तेथूनच केव्हां केव्हां एक क्षण-भर माझी आठवण करीत जा, असा भाव.

या सोदराश्रुसहित प्रभु-देह-पातीं ॥
सारे कपी गडबडून मनांत जाती ॥
जी स्तब्धता पसरली चिरकाल होती ॥
दुःखारवांत शतधा स्फुट जाहली ती ॥ ८१ ॥

सोदराश्रुसहित प्रभुदेहपातीं; लक्ष्मणाच्या अश्रुपातासह रामाच्या देहपातांत, रामाचा देह जो पडला तो एकटा न पडतां त्यानें आपल्याबरोबर लक्ष्मणाच्या डोळ्यांतून अश्रु पाडले, असा भाव. सहोक्ति अलंकार. **जी......ती**; चोहोंकडे जी शांतता पसरली होती ती राम पडतांच वानरांच्या दुःखाक्रोशांच्या रूपानें शंभर ठिकाणीं भंग पावली.

वसंततिलका वृत्त.

कोणी पळे कपि तदा जल आणण्याला ॥
कोणी प्रभु-श्रवण-फूत्कृति-दक्ष झाला ॥
शाखा कुणी उपटुनी निकट-द्रुमाची ॥
निर्मी कपी प्रभुमुखावरि वातवीची ॥ ८२ ॥

प्रभुश्रवणफूत्कृतिदक्ष; रामाच्या कानांत फुंकर घालण्यांत तत्पर. **वातवीची निर्मी**; वाऱ्याच्या लहरी उत्पन्न करिता झाला.

सौमित्रिचाहि धृतिदुर्ग पडावयाला ॥
या संतत-व्यसन-रूप नदींत आला ॥
रामास मूर्च्छित बघूनि हताश ठेला ॥
तो धीरही सहज मूर्च्छित-कल्प झाला ॥ ८३ ॥

मूर्च्छितकल्प; जवळ जवळ मूर्च्छित झाल्यासारखाच.

परिवेष्टुनि सोदर-द्वया मग सुग्रीव-नलादि वानरीं ॥
उपसांत्वन रम्य भाषणें बहु केलें प्रभुचें अशापरी ॥ ८४ ॥

सोदरद्वया; दोघां भावांना (राम–लक्ष्मणांना). वियोगिनी वृत्त.

नरवर ! उठा, मूर्च्छा सोडा, निजार्तिस आंवरा, ॥
त्यजुनि जडता सारी, धैर्या मनांत धरा जरा ॥
व्यसन-तति या आल्या मोठ्या तुम्हांवरि कर्कशा ॥
उचित न तरी हे राजेंद्रा निपात भवादृशां ॥ ८५ ॥

कर्कशा व्यसनतति; कठिण अशा संकटपरंपरा. हरिणी वृत्त.

विकल तनु ही झाली, कोमेजला मुख–चंद्रमा ॥
प्रकट करिती सारीं गात्रें विभो जड-विभ्रमा ॥
असमय-भवा ही तों मूर्च्छा तुम्हांस न केवला ॥
विकल करिते आम्हां सर्वां अपार-भयाकुलां ॥ ८६ ॥

असमयभवा; अकालीं उत्पन्न झालेली.

कर-युग तृणाऐसें झालें कसें विरह-ज्वरें ॥
नयन मिटले, ओष्ठ-प्रांत क्षण क्षण हा स्फुरे ॥
उदर सुकलें, अस्थिश्रेणी विभाजन-गोचरा ॥
चरण नयनां देती मोह प्रभा न उरे जरा ॥ ८७ ॥

अस्थिश्रेणी विभाजनगोचरा; अस्थिपंजर मोजतां येऊं लागला आहे, हाडें इतकीं व्यक्त दिसताहेत कीं, त्यांचे वेगवेगळे भाग पाडतां येत आहेत. **चरण...जरा**; पाय पूर्वीप्रमाणेंच मोहक आहेत पण त्यांच्यावर बिलकुल तेज उरलें नाहीं.

श्रम परिहरा आतां ताता ! पुरे गुरु शोक हा ॥
नयन उघडा, या दासांना सुधा-किरणें पहा ॥
जरि न सरलीं मूर्च्छा-चिन्हें प्रभो द्रुत आपलीं ॥
क्षम न जगण्या आम्ही सारे तरी क्षण भूतलीं ॥ ८८ ॥

सुधाकिरणें; अमृतपूर्ण कटाक्षानें. **क्षम**; समर्थ.

पवनसुत जों आला नाहीं नको तंव शोक हा ॥
कथन करितो त्याचा चिन्हां विलंब शुभावहां ॥
शुभ शकुन ही राका हास्या करूनि निदर्शिते ॥
सतत तरल-ज्योत्स्ना-छद्में फुलें नभ वर्षतें ॥ ८९ ॥

सतत......वर्षतें, आकाश शुभ्र चांदण्याच्या रूपानें जणूं काय फुलांची अखंड वृष्टि करतें आहे.

तरि परिहरा देवा ऐशा अकाल-समाधिला ॥
झडकरि उठा या विध्वंसा समस्त-जनाऽधिला ॥
त्वरित सुखवा दासां हास्यामृतोत्कर वर्षुनी ॥
स्वकर-कमलीं घ्या कोदंड, स्फुरो लघु किंकिणी ॥ ९० ॥

पवनतनया देवी-वार्ता कळेल अम्हां असें ॥
खचित गमतें, त्या भक्ताला सुदुष्कर कायसें ॥
कवणही असो सीताहर्ता तदीय कळो कथा ॥
क्षण न टळतां त्या नीचाला करूं मग पालथा ॥ ९१ ॥

सीता अशा परिसतां सुख-सार-धामा ॥
फोडीत हांक उठला प्रभु दार-नामा ॥
सीते ! शशांकमुखि ! ये सखि ! भेट मातें ॥
बोलूनि हें पसरिलें प्रभुनें करांतें ॥ ९२ ॥

दारनामा; स्त्रीच्या नांवाला. वसंततिलका वृत्त.

उल्का-निपात सम-रम्य-निपात साची ॥
तों पाहिली कनकवेष्टित हीरकाची ॥
तारापथांतुनि अशी पडतां समस्तीं ॥
श्रीमुद्रिका पसरल्या प्रभु-सव्य-हस्तीं ॥ ९३ ॥

उल्कानिपातसमरम्यनिपात; ताऱ्याच्या पतनाप्रमाणें सुंदर आहे पतनाचा देखावा जीच्या अशी (श्रीमुद्रिका). **कनकवेष्टित हीरकाची;** सोन्याच्या कोंदणांत बसविलेल्या हिऱ्याची. **तारापथांतुनि;** आकाशांतून. **श्रीमुद्रिका;** श्रीकारांकित आंगठी. वसंततिलका वृत्त.

फोडीत हांक उठल्या प्रभुला धराया ॥
जे वानरीं पसरिले कर सांवराया ॥

तेही न रिक्त उरले, रमणीय-दृष्टि ॥
कीं तत्करांत पडली सुर-पुष्प-वृष्टि ॥ ९४ ॥

रमणीयदृष्टि; सुंदर आहे देखावा जीचा अशी (सुरपुष्पवृष्टि). हांक फोडीत उठलेल्या रामाला सांवरून धरण्याकरितां वानरांनीं जे हात पसरिले तेही रिकामे राहिले नाहींत. कारण त्यांच्या त्या हातांत देवांनीं फेंकलेलीं फुलें पडलीं.

निरखुनि नयनें स्वकीय आलों प्रिय तुमची प्रभुराज पट्टराणी ॥
तंव अति-घन-घोष-पूर्ण ऐशा दुमदुमुनी नभ कोंदलें रवांनीं ॥ ९५ ॥

रवांनीं; नादांनीं. पुष्पिताग्रा.

श्रुति-सुखकर येतां शब्द ते रम्य कानीं ॥
द्रुत पवनसुताचे जाणिले वानरांनीं ॥
निबिड गजर झाला एकदां कीश-वृंदीं ॥
पवनतनय आला साधुनी कार्यसिद्धि ॥ ९६ ॥

मालिनी वृत्त.

हस्तांत काय पडली प्रभु वस्तु पाहे ॥
तों मुद्रिकाच सखिची स्वकरांत आहे ॥
हेलावला हृदयसिंधु भरूनि आला, ॥
नेत्रांतुनी प्रकट पूर तदीय झाला ॥ ९७ ॥

वसंततिलका वृत्त.

देती परस्पर तदा कपिराज टाळी ॥
कोणी पळे उठुनि, कोण उडे निराळीं ॥
अन्योन्य ओढुनि करें परिरंभ देती ॥
हर्षातिरेक-सहजें कपि-चेष्टितें तीं ॥ ९८ ॥

हर्षातिरेकसहजें; पराकाष्ठेच्या आनंदामुळें स्वाभाविक उत्पन्न झालेलीं.

तों गर्जना करित राघव-नाम-घोषें ॥
आला मरुत्सुत महीवरि दिव्य वेषें ॥
जों वंदण्या प्रभुपदा नमवी शिरासी ॥
तों राघवें उचलुनी धरिला उराशीं ॥ ९९ ॥

त्यांचीं परस्पर-सुखें हृदयें मिळालीं ॥
दृष्टींत दृष्टिहि तशीच विलीन झाली ॥

आनंद-सिंधु-लहरी-सहजाऽक्षरांचें ॥
त्याच्या मुखीं प्रभु सखी-शुभ-वृत्त वाचे ॥ १०० ॥

आनंद......वाचे; आनंदसमुद्राच्या फुटणाऱ्या उकळ्या हींच नैसर्गिक अक्षरें त्यांनीं लिहिलेलें सीतेचें कुशलवृत्त रामानें मारुतीच्या मुखावर वाचलें.

देवोनी परिरंभ गाढ-निबिड प्राणेश-कुमरा ॥
बोले राघव, धन्य धन्य सखया कर्तव्य-चतुरा ॥
द्यावें काय तुझ्या गुणां उचित मी आतां वनचरें ॥
देतों हा वर, घे तथापि, मज कीं द्याया न दुसरें ॥ १०१ ॥

प्राणेशकुमरा; वायूच्या मुलाला (मारुतीला). **वनचरें मी;** वनांत राहणाऱ्या मी, मी वनवासांत असल्यामुळें द्रव्यालंकारादि वस्तु मजपाशीं नाहींत, असा भाव. शार्दूलललित वृत्त.

बद्धांना गुरुसा, मुमुक्षु जन जे त्यांना महाधारसा, ॥
साध्यप्रापक साधकां सुहृदसा, सिद्धां सुधा-सार-सा ॥
आकल्पावधि पाप-ताप-तिमिरें नाशीत विश्वांतलीं ॥
राहे तूं अविनाश सत्कविमहाकाव्यापरी भूतलीं ॥ १०२ ॥

महाधारसा; मोठ्या आधारासारखा. **साध्यप्रापक सुहृदसा;** साध्य वस्तूची प्राप्ति करून देणाऱ्या मित्रासारखा. **आकल्पावधि;** प्रळयकाळापर्यंत. शार्दूलविक्रीडित वृत्त.

समाप्त.

परिशिष्ट १ लें.

या काव्यांत आलेलीं वृत्तें.

समवृत्तें.

१ **अनुष्टुभ्.** (चरणांत अक्षरें ८.) प्रत्येक चरणांतील पांचवें अक्षर लघु व सहावें दीर्घ असतें. पहिल्या व तिसऱ्या चरणांतील सातवें अक्षर दीर्घ असतें व दुसऱ्या आणि चवथ्या चरणांतील सातवें अक्षर लघु असतें. तेरावा सर्ग या वृत्तांत आहे.

२ **अमृतध्वनि.** (चरणांत अक्षरें २२.) **गण.*** त, भ, य, ज, स, र, न, ग. १२–९२ पहा.

३ **इंदुवदना.** (चरणांत अक्षरें १४.) **गण.** भ, ज, स, न, ग, ग, ९–६१.

४ **इंद्रवंशा.** (च० अ० १२.) **गण.** त, त, ज, र. पहिला सर्ग या वृत्तांत आहे.

५ **उपजाति.** (च० अ० ११.) **इंद्रवज्रा** (**गण** त, त, ज, ग, ग.) व उपेंद्रवज्रा (**गण** ज, त, ज, ग, ग.) यांचा संकर होऊन हें वृत्त होतें. तिसरा सर्ग या वृत्तांत आहे.

६ **कलहंस.** (च० अ० १३.) **गण.** स, ज, स, ग, ग. १३–६०.

७ **तामरस.** (च० अ० १२.) **गण.** न, ज, ज, य. १३–५८.

८ **तोटक.** (च० अ० १२.) **गण.** स, स, स, स. ८–६१.

९ **दोधक.** (च० अ० ११.) **गण.** भ, भ, भ, ग, ग. ८–६६.

१० **द्रुतविलंबित.** (च० अ० १२.) **गण.** न, भ, भ, र. सातवा सर्ग या वृत्तांत आहे.

११ **नाराच.** (च० अ० १८.) **गण.** न, न, र, र, र, र. ५–५५. या वृत्तास **महामालिनी** असेंही नांव आहे.

१२ **पृथ्वी.** (च० अ० १७.) **गण.** ज, स, ज, स, य, ल, ग. २–६३.

१३ **प्रमिताक्षरा.** (च० अ० १२.) **गण** स, ज, स, स. १६–६३.

१४ **प्रहरणकलिका.** (च० अ० १४.) **गण.** न, न, भ, न, ल, ग. १३–५३.

---

*गण. य ⏑– – र –⏑– त – –⏑ भ –⏑⏑ ज ⏑–⏑ स ⏑⏑– म – – – न ⏑⏑⏑ ल ⏑ ग – असे गण आहेत. ⏑ ही लघु अक्षराची व – ही दीर्घ अक्षराची खूण आहे.

१५ **प्रहर्षिणी**. (च० अ० १३.) **गण**. म, न, ज, र, ग. दुसरा सर्ग या वृत्तांत आहे.

१६ **भ्रमरविलसित**. (च० अ० ११) **गण**. म, भ, न, ल, ग. १३–६१.

१७ **मंजुभाषिणी**. (च० अ० १३.) **गण**. स, ज, स, ज, ग. पांचवा सर्ग या वृत्तांत आहे.

१८ **मत्तमयूर**. (च० अ० १३.) **गण**. म, त, य, स, ग. सोळावा सर्ग या वृत्तांत आहे.

१९ **मंदाक्रांता**. (च० अ० १७.) **गण**. म, भ, न, त, त, ग, ग. १२–९०.

२० **मालती**. (च० अ० १२.) **गण**. न, ज, ज, र. १३–५९.

२१ **मालिनी**. (च० अ० १५.) **गण**. न, न, म, य, य. १–६७.

२२ **रथोद्धता**. (च० अ० ११) **गण**. र, न, र, ल, ग. चवथा सर्ग या वृत्तांत आहे.

२३ **रमल**. (च० अ० १६.) **गण**. र, त, स, र, त, ग. १३–५५.

२४ **रुचिरा**. (च० अ० १३.) **गण**. ज, भ, स, ज, ग, आठवा सर्ग या वृत्तांत आहे.

२५ **वसंततिलका**. (च० अ० १४.) **गण**. त, भ, ज, ज, ग, ग. सतरावा सर्ग या वृत्तांत आहे.

२६ **वंशस्थ**. (च० अ० १२.) **गण**. ज, त, ज, र. सहावा सर्ग या वृत्तांत आहे.

२७ **शशिकला**. (च० अ० १५.) **गण**. न, न, न, न, स. १३–५६.

२८ **शार्दूलललित**. (च० अ० १८.) **गण**. म, स, ज, स, त, स. १७–१०१.

२९ **शार्दूलविक्रीडित**. (च० अ० १९.) **गण**. म, स, ज, स, त, त, ग. २–६२.

३० **शालिनी**. (च० अ० ११.) **गण** म, त, त, ग. ग. नववा सर्ग या वृत्तांत आहे.

३१ **शिखरिणी**. (च० अ० १७.) **गण**. य, म, न, स, भ, ल, ग. १–६९.

३२ **सवाई**. (च० अ० २३.) **गण**. भ, भ, भ, भ, भ, भ, भ, ग, ग. १३–६४.

३३ **स्रग्धरा**. (च० अ० २१.) **गण**. म, र, भ, न, य, य, य. १३–७३.

३४ **स्रग्विणी**. (च० अ० १२.) **गण**. र, र, र, र. ८–६५.

३५ **स्वागता**. (च० अ० ११.) **गण**. र, न, भ, ग, ग. अकरावा सर्ग या वृत्तांत आहे.

३६ **हरिणी**. (च० अ० १७.) **गण**. न, स, म, र, स. ल, ग. ४–६४

अर्धसमवृत्तें.

३७ **पुष्पिताग्रा**. (१–३ चरणांत १२ अक्षरें व २–४ चरणांत १३ अक्षरें.) **गण**. १–३ चरणः—न, न, र, य. २–४ः—न, ज, ज, र, ग. दहावा सर्ग या वृत्तांत आहे.

३८ **मालभारा.** (१-३ च० अ० ११ व ३-४ च० अ० १२.) **गण.** १-३ च०:- स, स, ज, ग, ग. २-४ च०:—स, भ, र, ज, चवदावा सर्ग या वृत्तांत आहे.

३९ **वियोगिनी.** (१-३ च० अ० १० व २-४ चरणांत अ० ११.) **गण.** १-३ च०:—स, स, ज, ग. व २-४ ज०:—स, भ, र ल ग. बारावा सर्ग या वृत्तांत आहे.

विषमवृत्तें.

४० **उद्गता.** प्रथम चरण. अक्षरें १०. **गण.** स, ज, स, ल.
दुसरा चरण. अक्षरें १०. **गण.** न, स, ज, ग.
तिसरा चरण. अक्षरें ११. **गण.** भ, न, ज, ल, ग.
चवथा चरण. अक्षरें १३. **गण.** स, ज, स, ज, ग.
९-६५.

मात्रावृत्तें.

४१ **गीति.** पहिल्या व तिसऱ्या चरणांत प्रत्येकीं १२ मात्रा असून दुसऱ्या व चवथ्या चरणांत प्रत्येकीं अठरा असतात. पंधरावा सर्ग या वृत्तांत आहे.

परिशिष्ट २ रें.

या काव्यांत आलेले कांहीं अर्थालंकार.

१ **अधिक.** आधार आणि आधेय यांच्यापैकीं एकाला अतिविस्तृतपणा दाखविण्या. करितां दुसऱ्याला अति न्यूनत्व दिलें असतां अधिक अलंकार होतो- ५-४४ पहा

२ **अनन्वय.** ज्याची त्यालाच उपमा दिली असतां अनन्वय अलंकार होतो. १२-२८ पहा.

३ **अपन्हुति.** उपमेयावर उपमानाचा आरोप करण्याकरितां जेथें उपमेयाच्या स्वरूपाचा अपलाप केलेला असतो तेथें अपन्हुति होते. १३-६२ पहा.

४ **अर्थांतरन्यास.** सामान्य अर्थाचें विशेष अर्थानें, किंवा विशेष अर्थाचें सामान्य अर्थानें समर्थन केलें असतां हा अलकार होतो. २-३, २-६६, ७-३, १०-१४, १२-३. पहा.

५ असम. उपमाच नाहीं असं वर्णिलें असतें तेथें असम अलंकार होतो. १४–१७ पहा.

६ उत्प्रेक्षा. उपमेयावर हें उपमानच कीं काय अशी अभेदरूपानें कल्पना केली असते तेथें उत्प्रेक्षा अलंकार होतो. २–१४, २– ५, ८–९ वगैरे पहा.

७ उदात्त एखाद्या वस्तूची संपत्ति, समृद्धि, किंवा ऐश्वर्य वर्णिलें असतें तेथें उदात्त अलंकार होतो. ३–२० पहा.

८ उपमा. दोन वस्तूंचें सुंदर साम्य वर्णिलें असतां उपमा होते. १–४, १–५, ४–२, ६–२३ वगैरे पहा.

९ उल्लेख. एकच वस्तु अनेकांना अनेक प्रकारांनीं दिसली असें वर्णिलें असतां उल्लेख अलंकार होतो २–६२, ३–२१ पहा.

१० एकावली. पुढील वस्तु मागील वस्तूचें विशेषणरूपानें स्थापन किंवा निषेध करीत चालली आहे असें वर्णन केलें असतां एकावली होते. ६–१३ पहा.

११ काव्यलिंग. वाक्यार्थ किंवा पदार्थ हेतु असून जेथें समर्थनीय अर्थाचें समर्थन होतें तेथें काव्यलिंग अलंकार होतो. १–५८ पहा.

१२ काव्यार्थापत्ति. असें आहे तर मग असें होईल हें सांगणें कशाला असें वर्णिले असतां हा अलंकार होतो. १–६७ पहा.

१३ तद्गुण. एखादी वस्तु आपला गुण टाकून जवळ असणाऱ्या विशेष उज्ज्वल अशा दुसऱ्या वस्तूच्या गुणाचा स्वीकार करते असें वर्णन आल्यास तद्गुण अलंकार होतो. १४–४ पहा.

१४ तुल्ययोगिता. प्रस्तुत किंवा अप्रस्तुत पदार्थांचा एकवार उक्त अशा गुणरूप किंवा क्रियारूप एक धर्माच्या ठिकाणीं अन्वय होतो तेथें तुल्ययोगिता होते. ६–२६ पहा.

१५ दृष्टांत. मुख्य वाक्यार्थाच्या बोधासाठीं दुसरा तसलाच दाखला देणें यास दृष्टांत अलंकार म्हणतात. १–४६, १–६०, ३–४९.

१६ निदर्शना. दोन भिन्न वाक्यार्थांचें उपमेमध्यें पर्यवसान झालें असतां तेथें निदर्शना अलंकार होतो. ६–६२ पहा.

१७ परिकर. विशेषणें सहेतुक असलीं म्हणजे परिकर अलंकार होतो. १–१९ पहा.

१८ परिवृत्ति. सारखे सारखे किंवा कमीजास्त अशा पदार्थांचा मोबदला वर्णिला असतां परिवृत्ति अलंकार होतो. १४–४५, १३–२० वगैरे पहा.

१९ भाविक. मागें झालेल्या किंवा पुढें होणाऱ्या गोष्टी प्रत्यक्ष होत आहेत असें वर्णन आलें असतां भाविक अलंकार होतो. ११–२७ पहा.

२० भ्रांतिमान्. एखाद्या वस्तूच्या दर्शनानें तिच्यासारख्या दुसऱ्या वस्तूची भ्रांति वर्णिली असतां हा अलंकार होतो. २–२१.

२१ यथासंख्य. क्रमानें उक्त असलेल्या पदार्थांचा क्रमानेंच दुसऱ्या पदार्थांशीं अन्वय असला म्हणजे हा अलंकार होतो. १३–४० पहा.

२२ रूपक. उपमेय आणि उपमान यांचा अभेद वर्णिला असतां रूपक अलंकार होतो. १–१, ९–५९ वगैरे.

२३ विनोक्ति. अमक्या विना अमुक सुंदर किंवा विशोभित असें वर्णन आलें असतां विनोक्ति होते. ५–२३.

२४ विभावना. कारणाचा निषेध असतां कार्योत्पत्ति वर्णिली असते तेथें विभावना अलंकार होतो. ५–२८.

२५ विरोधाभास. वस्तुतः विरोध नसून विरोध वर्णन केला असतां विरोधाभास अलंकार जाणावा. १३–९, १३–१०.

२६ विशेषोक्ति. कारणें पूर्ण असतां कार्य होत नाहीं असें वर्णिलें असतां हा अलंकार होतो. ५–२९.

२७ विषम. दोन अननुरूप वस्तूंचा संबंध वर्णिला असतां विषम अलंकार होतो. ३–१०, ४–४७.

२८ सहोक्ति. दोन वस्तु एकाचकाळीं एकच क्रिया करितात असें चमत्कार उत्पन्न करणारें वर्णन 'सह' किंवा त्याच्या अर्थाचा दुसरा शब्द घालून केलें असतां सहोक्ति अलंकार होतो. १२–२५ पहा.

२९ स्वभावोक्ति. वस्तूच्या स्वभावांतील क्रिया रूप इत्यादिकांचें हुबेहूब वर्णन आलें असतां स्वभावोक्ति अलंकार होतो. ६–४७, १३–७२ वगैरे पहा.

परिशिष्ट ३ रें.

या काव्यांत आलेलीं पौराणिक नामें.

अगस्त्य. रामकालीन एक महर्षि. मित्र आणि वरुण यांनीं उर्वशीला पाहतांच त्यांचें वीर्य गळून त्यांतील कांहीं घागरींत पडलें व कांहीं पाण्यांत पडलें. पहिल्यांतून अगस्त्य झाला व दुसऱ्यांतून वसिष्ठ झाला अशी ऋग्वेदांत कथा आहे. विंध्याद्रि जेव्हां मेरु पर्वताशीं स्पर्धा करून उंच वाढूं लागला तेव्हां त्यानें सूर्याचा मार्ग अडविला व उत्तर हिंदुस्थानांत दहा दिवस काळोख पाडला. त्यावेळीं देवांनीं अगस्त्याची दक्षिण हिंदुस्थानांत जाण्याविषयीं प्रार्थना केली. कारण अगस्त्य हा विंध्याद्रीचा गुरु असल्यामुळें त्याला वाट देण्याकरितां विंध्याद्रीला खालीं पडणें जरूर होतें. व त्याचप्रमाणें पुढें घडून आलें. विंध्याच्या दक्षिण बाजूस कुंजर नांवाच्या पर्वताच्या पायथ्यास अगस्त्याचा आश्रम होता. रामाच्या वनवासांत अगस्त्यानें त्यास शस्त्रास्त्रें दिलीं व त्याचा चांगला पाहुणचार केला. अगस्त्यानें एकदां समुद्र प्राशन केला, नहुष राजाला सर्प केला, वगैरे अनेक कथा त्याजविषयीं प्रसिद्ध आहेत. सर्ग ५ वा ३८–४९ पहा.

अंगद. किष्किंधा नगरीचा वानर राजा. वाली व तारा यांचा मुलगा. यानें रामरावणाच्या लढाईत रामास मोठें साह्य केलें. १५–३९.

अत्रि. रामकालीन एक महर्षि व प्रजापति. रामाचा त्यानें पाहुणचार करून त्यास तीन दिवस ठेवून घेतलें होतें. त्याच्याविषयीं पुराणांत अनेक कथा प्रसिद्ध आहेत. २–७० पहा.

अहल्या. गौतम महर्षीची बायको. तिनें पतीचा वेष धारण करून आलेल्या इंद्राशीं न जाणून व्यभिचार केला, त्यामुळें तिच्या पतीनें तिला ' शिला होऊन पडशील ' असा शाप दिला व ती शिला झाली. पुढें रामाच्या पावलांची धूळ तिला लागतांच ती पूर्ववत् झाली व पतीजवळ नांदण्यास गेली. प्रसिद्ध साध्वी पंचकन्यांत तिची प्रमुखत्वानें गणना आहे. १२–२५ पहा.

अयोध्या. सूर्यवंशी राजांची प्रसिद्ध राजधानी. तिची लांबी ४८ मैल व रुंदी १२ मैल होती असें वर्णन आहे. १-६, १–१२ वगैरे पहा.

किष्किंधा. वालीची राजधानी. सर्ग १६ श्लोक २८–४२ पहा.

कैकेयी. दशरथ राजाच्या तिन्ही बायकांतील सर्वांत धाकटी बायको. दशरथाची पूर्वी तिनें एकदां उत्तम कामगिरी बजावल्यामुळें त्यानें तिला दोन वर देऊं केले होते. त्यांचा तिनें ऐन वेळीं उपयोग करून रामास वनवासास धाडिलें. सर्ग १ ला २८–३० पहा.

खर. जनस्थानांतला एक बलाढ्य राक्षस. हा रावणाचा सापत्न बंधु होता. रामानें याचा वध केला. सर्ग ८–७० व सर्ग ९ पहा.

गंगा. उत्तर हिंदुस्थानांतील प्रख्यात नदी. गुह नांवाच्या कोळ्यांच्या राजाच्या मदतीनें राम शृंगवेरपुराजवळ नावेंतून गंगानदी उतरून वनवासास निघाला. सर्ग दुसरा १–५० पहा.

गुह. गंगेच्या कांठीं असलेल्या शृंगवेरपुराचा कोळी जातीचा राजा. हा रामाचा एकनिष्ठ भक्त व दृढ मित्र होता. त्यानें रामाचा चांगला पाहुणचार करून त्यास नावेंतून गंगेपलीकडे पोंचविलें. १-६६, २–५१, २, ५२ वगैरे पहा.

चित्रकूट. प्रयागाजवळचा एक पर्वत. राम या पर्वतावर कांहीं दिवस राहिला होता व तेथेंच त्याची आणि भरताची भेट झाली. २–५८ पहा.

जटायु. श्येनी व अरुण यांचा मुलगा व गिधाडांचा राजा हा दशरथ राजा च हितचिंतक होता. रावण सीतेस पळवूत नेत असतां त्यानें त्याला अडवून धरिलें पण रावणानें त्याला कपटानें मर्मस्थानीं घायाळ केलें. रावणानें सीता पळवून नेली ही बातमी यानेंच प्रथम रामास दिली. १२–८९ पहा.

जांबुवंत. आस्वलांचा राजा. यानें रामरावणांच्या युद्धांत रामास मोठें साह्य केलें. सर्ग १४ वा ७३–७४ पहा.

तारा. वालीची बायको व अंगदाची आई. सर्ग १५ पहा.

त्रिशिरा. जनस्थानांतील एक बलाढ्य राक्षस. रामानें याचा वध केला. सर्ग ९, ५१–५४ पहा.

दंडकारण्य. दक्षिणेंतील नर्मदा आणि गोदावरी या नद्यांच्या मधील विस्तीर्ण प्रदेश. भृगु ऋषीच्या शापानें हें अरण्य ओसाड झालें होतें. सर्ग ४ था पहा.

दिग्गज, दिङ्नाग. आठ दिशांवर अधिकार चालविणारे हत्ती. ते ऐरावत, पुंडरीक कुमुद, वामन, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम, आणि सुप्रतीक हे होत. ९–२६ पहा.

दूषण. जनस्थानांतील एक बलाढ्य राक्षस. रामानें याचा वध केला. ९, ४९–५० पहा.

ध्रुव. उत्तानपाद राजाचा मुलगा. हा अल्पवयांत भक्तिमार्गास लागला व विष्णूच्या कृपेनें आकाशांतील मध्यवर्ती तारा झाला. १०–१४ पहा.

नंदिग्राम. चित्रकूट पर्वतानजीक असलेलें एक खेडें. रामानें राज्य नाकारल्यामुळें भरतानें त्याचा वनवास संपेपर्यंत येथेंच वास केला व रामाच्या नांवानें राज्य चालविलें. २–६९.

नळ. विश्वकर्म्याचा वानर पुत्र. याला एका ऋषीच्या वरानें पाण्यावर दगड तारण्याचें सामर्थ्य असल्यामुळें त्यानें समुद्रावर सेतु बांधून रामाचा मोठा उपयोग केला. सर्ग १४.

नीळ. एक बलाढ्य वानर यानें रामरावणयुद्धांत रामास मोठें साह्य केलें. सर्ग १४ पहा.

पंचवटी. दंडकारण्यांतील गोदावरीच्या उगमाजवळचा प्रदेश. सर्ग ७ वा पहा.

पंपा. दंडकारण्यांतलें एक सरोवर. सर्ग १३ वा पहा.

प्रस्रवण. जनस्थानाच्या मध्यभागीं असलेला एक पर्वत. सर्ग १७ श्लोक १ पहा.

पार्वती. शंकरांची स्त्री. हिनें रामाची परीक्षा पाहिली. सर्ग १२, ६४–८०.

ब्रह्मदेव. आर्यांच्या त्रिमूर्तींतला रजोगुणप्रधान देव. रावणानें सर्व देव जिंकून बंदींत घातले होते त्यांत ब्रह्मदेवाकडे त्यास पंचाग सांगण्याचें काम होतें. १०--३१ पहा.

भरत. रामाचा सापत्न बंधु. हा मोठा सत्वधीर असल्यामुळें त्याच्या आईनें त्याजकरितां मोठ्या युक्तीनें मिळविलेलें राज्य करण्याचें त्यानें नाकारलें व वनवासास गेलेल्या रामाला चित्रकूट पर्वतावर गांठून त्यानें त्याची राज्यस्वीकार करण्याबद्दल विनंति केली. रामानें ती विनंति अर्थातच अमान्य केली. तेव्हां भरतानें नंदिग्रामांत वास करून राम वनवासांतून परत येईपर्यंत रामाच्या नांवानेंच राज्य केलें. २, ६१–६९ पहा.

भारद्वाज. रामकालीन एक महर्षि, यानें रामाचा चांगला पाहुणचार करून त्यास एक रात्र ठेवून घेतलें होतें. २–५५.

भिल्ल. विंध्याद्रीवर राहणारे रानटी लोक. त्यांनीं रामाचा उत्तम प्रकारें पाहुणचार करून त्यास पुष्कळ दिवस ठेवून घेतलें. ३, ५८–६६ पहा.

मारीच. रावणाचा मामा. हा सुंद आणि ताडका यांचा मुलगा होता. रावणानें सीताहरणाचा बेत चालविला त्यावेळीं त्यानें त्यास पुष्कळ सदुपदेश केला पण रावण त्यासच मारावयास उठला तेव्हां मारीचानें मृगवेष घेऊन रामास फसविण्याचें कबूल केलें. पुढें तो मृगवेषांतच रामाच्या बाणास बळी पडला. १०, ५८–६७ व ११, ४०–५२ पहा.

मारुति. वायु व अंजनि यांचा मुलगा. याची रामाशीं गांठ पडल्यावर हा त्याचा एकनिष्ठ सेवक झाला. ह्यानें सीता-शोध लावला व रामरावणाच्या युद्धांत फार मोठें काम केलें. सर्ग १४ व सर्ग १७ पहा.

माल्यवान्. दाक्षिण हिंदुस्थानांतील एक पर्वत. राम त्या पर्वतावर कांहीं दिवस राहिला होता. १७-३५ पहा.

यमुना. उत्तर हिंदुस्थानांतली गंगेला मिळणारी प्रसिद्ध नदी. २-५६.

राम. काव्याचा नायक, दशरथ व कौसल्या यांचा पुत्र.

रावण. काव्याचा उपनायक. यानें सीताहरण केल्यामुळें याचें व रामाचें प्रचंड युद्ध होऊन याचा पूर्ण कुलक्षय झाला.

लक्ष्मण. रामाचा सापत्न बंधु. यानें केवळ बंधुप्रेमासाठीं रामाबरोबर वनवास पतकरून त्याची एकनिष्ठपणानें सेवा केली. सर्ग ६ वा पहा.

लोपामुद्रा. अगस्त्य ऋषीची साध्वी पत्नी. हिनें सीतेचा चांगला पाहुणचार केला. ५-६० पहा.

वसिष्ठ. सूर्यवंशीय राजांचा कुलगुरु व प्रख्यात महर्षि. यानें आपल्या अगाध शांतीनें विश्वामित्रास दिपविलें व सूर्यवंशावर वेळोवेळीं आलेल्या संकटांतून त्याचा बचाव केला. २-६५.

वाली. किष्किंधेचा बलाढ्य वानरराजा. यानें आपला भाऊ जो सुग्रीव त्याची बायको रुमा हिचें हरण करून सुग्रीवास हकालून दिलें होतें. पुढें सुग्रीवानें रामाशीं सख्य केलें व रामानें वालीचा वध केला. सर्ग १५ वा पहा.

विंध्य. हिंदुस्थानांतील मध्यवर्ती महापर्वत. हा मेरु पर्वताशीं स्पर्धा करून इतका उंच वाढला कीं त्यामुळें सूर्याचा गमनमार्ग खुंटला आणि उत्तर हिंदुस्थानांत दहा दिवस काळोख पडला. पुढें देवांनीं युक्तीनें अगस्त्य ऋषीस दक्षिणेंत पाठविलें आणि अगस्त्य हा विंध्याचा गुरु असल्यामुळें त्याला वाट देण्याकरितां विंध्याद्रि खालीं पडला. सर्ग ३ रा पहा.

विराध. दंडकारण्यांत रामान मारलेला एक बलाढ्य राक्षस. हा मूळचा यक्ष असून कुबेराच्या शापानें राक्षस झाला होता. सर्ग ४ था. ३५-५७ पहा.

शंकर. आर्यांच्या त्रिमूर्तींतील तमोगुणप्रधान देवता. शंकर हे रामाचें उपास्य दैवत व स्वतः कट्टे रामभक्त आहेत अशी समजूत आहे. सर्ग १२, ४९-५४ पहा.

शंबर. शूर्पणखेचा मुलगा, हा त्रिभुवन जिंकण्याच्या हेतूनें शंकराचें ध्यान करीत बसला होता. पुढें शंकरांनीं प्रसन्न होऊन त्याच्याकरितां एक खड्ग पाठविलें पण तें चुकून लक्ष्मणाच्या हातीं पडलें आणि लक्ष्मणाकडून त्याच खड्गानें शंबर हा न कळत मारला गेला. ७, ४२-५९ पहा.

शरभंग. रामाच्या काळचा एक महर्षि. हा कुष्ठरोगी होता. राम याचे आश्रमांत आल्यावर त्यानें उष्णोदकाचा झरा पृथ्वींतून उत्पन्न करून याचें कुष्ठ घालविलें. ४–६२.

श्यामवटी. यमुनेच्या दक्षिणेकडचें एक रम्य स्थल. २–५७ पहा.

शूर्पणखा. रावणाची बहीण. हिचा मुलगा शंबर यास लक्ष्मणानें मारल्यामुळें त्याचा सूड उगविण्याकरितां ती सुंदर स्त्रीचें रूप घेऊन लक्ष्मणाकडे गेली व आपल्याशीं लग्न करण्याबद्दल त्याच्या विनवण्या करूं लागली. लक्ष्मणानें तिला रामाची परवानगी आणण्यास पाठविलें. पण रामानें तिचें कपट जाणून तिच्या पाठीवर 'हिचें नाक कान कापावेत' अशीं अक्षरें लिहून दिलीं, तीं वाचून लक्ष्मणानें तशीच कृति केली. पुढें तिनें रावणाकडे कागाळी नेऊन त्यास सीताहरणास प्रवृत्त केलें. सर्ग ८, १४–६९ व सर्ग १०, ३७–५० पहा.

शृंगवेर. गुह नांवाच्या कोळ्यांच्या राजाची राजधानी. १—६४.

सरयू. अयोध्येजवळची प्रसिद्ध नदी. १–६३.

सप्तर्षि. मरीचि, अत्रि, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतु आणि वसिष्ठ हे सात ऋषि. हे नक्षत्ररूपानें आकाशांत राहिले आहेत. सर्ग १०–१४ पहा.


साकेत. अयोध्येचें नांव. **अयोध्या** पहा.

सुग्रीव. एक बलाढ्य वानर. हा किष्किंधेचा राजा जो वाली त्याचा भाऊ होता पण वालीनें यास हकालून याच्या स्त्रीचा अपहार केला होता. सुग्रीवानें रामाशीं सख्य करून त्याचेकडून वालीचा वध करविला व किष्किंधेचें राज्य मिळविलें. रामरावणांच्या युद्धांतही सुग्रीवानें रामास मोठें साह्य केलें. सर्ग १४ पहा.

सुतीक्ष्ण. रामकालीन एक महर्षि. रामाचा यानें चांगला सत्कार करून त्यास आपल्या आश्रमांत ठेवून घेतलें होतें. ४—६४ पहा.

सीता. काव्याची नायिका, रामाची स्त्री. जनक राजाला पृथ्वींत सांपडली. पुढें तिचा रामाशीं विवाह झाला आणि ती त्याच्याबरोबर वनवासास गेली. वनवासांतच तिला रावणानें पळवून नेली आणि त्यामुळेंच रामरावणांचें प्रचंड युद्ध घडून आलें.

द्विरदरद रणीं करकर करती ।। उरगरथरवें झर थर थरती ।।
स्थिरचर हरणातुर झर पुरता ।। हरहर ! धरणीवर तर परता ।। १३-५३



अम्लान पंकजमाला.

रसा रसा सारसारसारसाररसारसा ।।
रसासरा रास सार साररास सरारसा ।। १३-४१

र	सा	र	सा	सा	र	सा	र
सा	र	सा	र	र	सा	र	सा
र	सा	स	रा	रा	स	सा	र
सा	र	रा	स	स	रा	र	सा
सा	र	रा	स	स	रा	र	सा
र	सा	स	रा	रा	स	सा	र
सा	र	सा	र	र	सा	र	सा
र	सा	र	सा	सा	र	सा	र

सर्वतोभद्र

परिशिष्ट ४ थें.

तेराव्या सर्गांतील बंधांचें उद्घाटन.

गुंजानाद करी भृंग फुललीं नव सारसें ॥
मुंजास्पद-परीतांग कूललीन ससा वसे ॥ १३-१८



गोमूत्रिका बंध.

वरती रय तीर-द्रु करती व्रतती रती ॥
ती रती तव तीत्वत्वें स्मरतीरयतीं व्रण ॥ १३-३७



मुरजबंध.